
# डॉ. भालचंद्र फडके आणि समाजशिक्षण

*(राज्यस्तरीय चर्चासत्राचा अहवाल आणि कार्यवृत्तांत)*

संपादक

डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता

## समर्पित...



दिवंगत प्राध्यापक डॉ. एस. सी. भाटिया

१५ जून १९४३ – २६ नोव्हेंबर २०१६

# डॉ. भालचंद्र फडके आणि समाजशिक्षण

## (राज्यस्तरीय चर्चासत्राचा अहवाल आणि कार्यवृत्तांत)

# डॉ. भालचंद्र फडके आणि समाजशिक्षण

(राज्यस्तरीय चर्चासत्राचा अहवाल आणि कार्यवृत्तांत)

*संपादक*

**डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता**

साहाय्यक प्राध्यापक

प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

पुणे — ४११००७

# डॉ. भालचंद्र फडके आणि समाजशिक्षण
**(राज्यस्तरीय चर्चासत्राचा अहवाल आणि कार्यवृत्तांत)**

Dr. Bhalachandra Phadake aani Samajshikshan
(Rajyastariya Charchasatra Ahval aani Karyavruttant)

Dr. Bhalachandra Phadake and Social Education
(Report and Proceedings of the State Level Seminar)

***ISBN:*** 978-93-5267-768-9

***प्रकाशक :***
कुलसचिव
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ), गणेशखिंड,
पुणे—४११००७.

© संपादक
डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात व माध्यमात पुन:प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी कॉपीराईटधारक आणि प्रकाशक या दोघांचीही पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रथमावृत्ती** : २०१७

***किंमत:*** अभिवादनपर

**मुद्रण — स्थळ :**
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मूद्रणालय*
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ),
गणेशखिंड, पुणे—४११००७

## विभागप्रमुखांचे मनोगत....

डॉ. भालचंद्र फडके यांनी 'समाजशिक्षण' या संकल्पनेला नवे आयाम देताना त्यास एका विशिष्ट उंचीवर पोहचविले आहे. पुणे विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण विभागात संचालकपदी असताना त्यांनी महाराष्ट्रातील इतर विद्यापीठे आणि पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये 'समाजशिक्षण' ही संकल्पना रूजवितांनाच त्याचे महत्त्वही पटवून सांगितलेले आहे. विचार व्यक्त करण्यापेक्षा ते कृतीमधून कसे अंमलात आणावे, याचा वस्तुपाठच डॉ. फडके यांनी समाजशिक्षणामधून घालून दिलेला आहे. डॉ. फडके यांच्या स्मृतिनिमित्त राज्यस्तरीय चर्चासत्रात उमटलेले विचार पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध होत आहेत, हे निश्चितच अभिनंदनीय बाब आहे .

दरवर्षीप्रमाणे डॉ. भालचंद्र फडके यांच्या स्मृतिप्रित्यर्थ राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन आमच्या विभागामार्फत केले जाते. यावर्षी १३ मे २०१६ रोजी झालेल्या ''डॉ. भालचंद्र फडके ह्यांचे साहित्यातील आणि समाजशिक्षणातील योगदान'' या चर्चासत्रामध्ये समाजशिक्षण, ज्ञानविस्तार आणि संबंधित विषयांसंदर्भात संशोधकांनी, अभ्यासकांनी परिपूर्ण विचार मांडून चर्चासत्र यशस्वी केले. या चर्चासत्रामधील मांडलेल्या विचारांचे पुस्तकरूपाने प्रकाशन केले जात आहे. यासाठी आमच्या विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता यांनी यशस्वीरित्या जबाबदारी पार पाडली असून यासाठी मी डॉ. गुप्ता, त्यांचे सहकारी आणि विभागाचे अभिनंदन करतो.

**प्रा. डॉ. धनंजय लोखंडे**
संचालक आणि विभागप्रमुख
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ), पुणे —७

# प्रस्तावना

‘समाजशिक्षण’ ही निरंतर चालत आलेली प्रक्रिया असून समाजाची सांस्कृतिक व सामाजिक जडणघडण ही यातूनच होत असते. महाराष्ट्रात प्रामुख्याने संत परंपरेतून समाजशिक्षणाची परिणामकारकता अधिक दिसत असून ती आजच्या डिजीटल युगापर्यंत आलेली दिसते. आजपर्यंत चालत आलेले हे समाजशिक्षण मूल्यव्यवस्थेवरच उभे आहे. या क्षेत्रात अनेक संस्था, व्यक्ती यांनी आपले योगदान देताना ‘समाजशिक्षण’ ही संकल्पना अधिक व्यापक बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागाने देखील यात आपला मोलाचा वाटा उचललेला आहे. याच विभागाचे प्रथम आणि माजी संचालक डॉ. भालचंद्र फडके यांनी समाजशिक्षणाच्या ज्ञानविस्तारासाठी खूप मोठे योगदान दिलेले आहे. डॉ. भालचंद्र फडके यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी विभागामार्फत विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करत असतात. दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील त्यांच्या जन्मदिनानिमित्त विभागाने आणि मराठी विभाग ह्यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजत केलेले होते. या चर्चासत्राचा विषय ‘***डॉ. भालचंद्र फडके ह्यांचे साहित्यातील आणि समाज शिक्षणातील योगदान***’ असा होता. हे चर्चासत्र शुक्रवार दि. १३ मे २०१६ रोजी संज्ञापन अभ्यास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आलेले होते.

हे चर्चासत्र तीन सत्रांमध्ये घेण्यात आले. पहिल्या सत्रामध्ये कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. द्वितीय सत्रामध्ये सहभागी अभ्यासक आणि तज्ज्ञ व्यक्ती यांनी आपले संशोधन प्रबंध सादर केले. तृतीय सत्रामध्ये समारोप करण्यात आला. पहिल्या सत्रामध्ये चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे डॉ. श्रीपाल सबनीस, (८९ वे पिंपरी—चिंचवड येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि मराठी साहित्य संमेलनाचे सदस्य), सन्माननीय उपस्थिती डॉ. रझिया पटेल, (प्रमुख, अल्पसंख्यांक शिक्षण कक्ष, भारतीय शिक्षण संस्था, पुणे), तसेच कार्यक्रमाचे

अध्यक्ष प्रा. तेज निवळीकर (माजी संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) हे होते. द्वितीय सत्रामध्ये डॉ. कैलास बवले (समन्वयक, डॉ. धनंजयराव गाडगीळ, शाश्वत ग्राम विकास केंद्र, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे) यांनी 'सामाजिक शिक्षण आणि त्याचे परिणाम' आणि प्रा. तेज निवळीकर यांनी 'डॉ. भालचंद्र फडके यांचे चरित्र' याविषयी अतिशय प्रभावी व्याख्यान दिले. अभ्यासकांनी आपले लघु शोध प्रबंध सादर केले. तृतीय सत्रामध्ये समारोप करण्यात आला. या प्रसंगी समारोपामध्ये डॉ. अभिजीत वैद्य (राष्ट्रीय अध्यक्ष, आरोग्य सेना व सोशालिस्ट युवाजन, पुणे), डॉ. मनोहर जाधव (समन्वयक, कला, ललितकला आणि प्रयोगजीवीकला विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) या निमंत्रित वक्त्यांनीही आपले प्रभावी विचार मांडले.

चर्चासत्रामध्ये सम्यक साहित्य परिषद व इतर संस्थांचे पदाधिकारी, संशोधक, विद्यार्थी, समाजकार्यकर्ते, प्राध्यापक इत्यादी ६५ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. चर्चासत्राच्या शेवटी मी उपस्थितांचे आभार मानले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. विलास आढाव यांनी केले होते. चर्चासत्राच्या शेवटी प्रमाणपत्र वाटपही करण्यात आले. या चर्चासत्राच्या कार्यक्रम समन्वयकाची जबाबदारी माझ्यावर होती. या पुस्तकामधील काही शोध प्रबंध हे चर्चासत्रामध्ये सादर केलेले नसून समाविष्ट करण्यात आले आहेत. हे प्रबंध हे या पुस्तकातील विषयाशी निगडित आहेत.

***'डॉ. भालचंद्र फडके ह्यांचे साहित्यातील आणि समाज शिक्षणातील योगदान'*** या चर्चासत्राची निष्पत्ती पुस्तकरूपाने प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक नीती रचनाकार, प्रशासन, इतर प्रशासकीय प्रतिनिधी यांना समुदाय विकास कार्यक्रमाच्या तयारीसाठी उपयुक्त ठरेल. तसेच या पुस्तिकेतून डॉ. भालचंद्र फडके यांचे समाजशिक्षणातील आणि ज्ञानविस्तारातील विचारांची ओळख अभ्यासकांना समुदाय विकास अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल.

**.......... डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता**

# आभार

मी अत्यंत कृतज्ञतापूर्वक सन्माननीय कुलगुरू **प्रा. डॉ. वासुदेव गाडे** यांच्याविषयी भावना व्यक्त करतो की, त्यांनी आम्हास चर्चासत्राचे अहवाल पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करण्यासाठी प्रेरक मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले, त्याबद्दल मी हृदयापासून प्रामाणिकपणे त्यांचे आभार मानतो.

डॉ. व्हि. बी. गायकवाड, संचालक, विद्यापीठ आणि महाविद्यालय विकास मंडळ (बी.सी.यु.डी.), डॉ. नरेंद्र एम. कडू, कुलसचिव, डॉ. विद्या गारगोटे, वित्त व लेखाधिकारी यांच्याविषयीही त्यांनी केलेल्या चर्चासत्राच्या सहकार्यासाठी मी कृतज्ञता व्यक्त करतो.

मी सहृदय **प्रा. डॉ. धनंजय लोखंडे** संचालक आणि विभागप्रमुख, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग तसेच **प्रा. डॉ. अविनाश सांगोलेकर**, मराठी विभागप्रमुख यांचे पुस्तक प्रक्रियेमध्ये केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानतो. मी विभागातील माझे सहकारी प्रा. सतीश शिरसाठ, प्रा. भौमिक देशमुख, प्रा. विलास आढाव आणि डॉ. नवनाथ तुपे तसेच विभागातील प्रशासकीय कर्मचारी सुरेखा बेंद्रे, उल्का पाठक, मंगेश शुक्रे, निलिमा साळवी आणि शेख रफिक दाऊदभाई यांचे आभार मानतो. त्यांनी दिलेला नैतिक पाठिंबा आणि अनुकूल वातावरण बनविल्यामुळे हे पुस्तक पूर्ण होऊ शकले.

मी दिपक मोरे, माझा प्रकल्प सहकारी तसेच जयदीप लाड, माजी प्रकल्प सहकारी यांच्या सहकार्यासाठी आभार व्यक्त करतो.

मी डॉ. दत्तात्रय सुभाष कुटे, व्यवस्थापक, विद्यापीठ प्रेस आणि तेथील कर्मचारी यांचे आभार मानतो. याशिवाय अनेक मित्र, हितचिंतक, ज्यांनी या कार्यासाठी मदत केली, त्यांचेही आभार व्यक्त करतो.

मी माझी पत्नी सौ. राधा गुप्ता यांचीही प्रशंसा करतो. ज्यांनी प्रकल्पाच्या काळात घरगुती अडचणी स्वत: सोडवून मला या कार्यात मदतच केली. तसेच माझी मुले ऋत्विक गुप्ता (सोनू) आणि आकृथ गुप्ता (मोनू) यांच्याविषयी सदिच्छा व्यक्त करतो, त्यांनी मला या काळात अडथळा न आणता मदत केली.

……….. **डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता**

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शीर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| | विभाग प्रमुखांचे मनोगत | |
| | प्रस्तावना | |
| | आभार | |
| १ | अहवाल आणि कार्यवृत्तांत | १ |
| | **चर्चासत्रामध्ये सादर केलेले लघु शोधप्रबंध** | |
| २ | समाजशिक्षण: काल, आज आणि उद्या<br>*कैलास बवले* | २३ |
| ३ | आदिवासी विकासासाठी समाजशिक्षणाचे महत्त्व<br>*धनंजय लोखंडे*<br>*भाऊसाहेब महिरास* | २६ |
| ४ | साक्षरता कार्यक्रम आणि डॉ. भालचंद्र फडके<br>*तेज निवळीकर* | ३४ |
| ५ | भारतातील प्रौढशिक्षणाचा प्रभाव<br>*जयदीप रामचंद्र लाड*<br>*पी. विस्वनाधा गुप्ता* | ४३ |
| ६ | भालचंद्र फडके यांचे समीक्षालेखन<br>*सुभाष आहेर* | ४८ |
| ७ | ज्ञानविस्तारातून समाजशिक्षण... <br>*धनंजय लोखंडे* | ५४ |
| ८ | आजीवन शिक्षण – अध्ययन, व्याप्ती व क्षेत्रे<br>*सतीश शिरसाठ* | ५९ |

| | | |
|---|---|---|
| ९ | अध्ययन प्रक्रियेचे बदलते स्वरूप<br>*नवनाथ तुपे* | ६४ |
| १० | महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर : विसाव्या शतकातील आधुनिक मार्गदर्शक<br>*विलास आढाव* | ७३ |
| ११ | शालेय समाजकार्य : शालेय मुलांच्या समस्या हाताळण्यासाठी प्रभावी तंत्र<br>*भौमिक देशमुख* | ८३ |
| १२ | रघुनाथ कर्वे यांचे समाजशिक्षणातील योगदान<br>*दिपक अशोक मोरे* | ८८ |
| १३ | उच्च शिक्षणातील अंतर्विरोध आणि सामाजिक शास्त्रातील जात आणि लिंगभाव संवेदनशीलता<br>*संजयकुमार कांबळे* | ९३ |
| १४ | इ.स. २००० ते २०१० मधील मराठी दलित आत्मकथने — एक दृष्टिक्षेप<br>*धनंजय सोमनाथ भिसे* | १२२ |
| १५ | डॉ. भालचंद्र फडके यांचा अल्प परिचय | १३२ |

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग आणि मराठी विभाग

## ह्यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. भालचंद्र फडके ह्यांच्या जन्मदिनानिमित्त

## आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्राचा अहवाल

**शुक्रवार, दि. १३ मे २०१६, स. १०.०० ते सायं. ०५.३०**

**चर्चासत्राचा विषय :**

# डॉ. भालचंद्र फडके ह्यांचे साहित्यातील आणि समाजशिक्षणातील योगदान

### अहवाल व कार्यवृत्तांत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग आणि मराठी विभाग ह्यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. भालचंद्र फडके ह्यांच्या जन्मदिनानिमित्त राज्यस्तरीय चर्चासत्र शुक्रवार दि. १३ मे २०१६ रोजी संज्ञापन अभ्यास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आला होता. या चर्चासत्राचा विषय “डॉ. भालचंद्र फडके ह्यांचे साहित्यातील आणि समाज शिक्षणातील योगदान” असा होता.

नाव नोंदणी सकाळी १०.१५ ला सुरू झाली आणि त्याचबरोबर उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला, त्यानंतर चर्चासत्राचा कार्यक्रम सुरू झाला.

### प्रथम सत्र

प्रथम सत्रामध्ये कार्यक्रमाच्या उद्‌घाटन समारंभाच्या सुरूवातीस प्रथमपुष्प १०.४५ ला झाले, त्यानंतर विद्यापीठ गीत — १०.५७ ला गायीले गेले व कार्यक्रमाची खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. डॉ. सतीश शिरसाठ यांनी प्रथम सत्राचे सूत्रसंचालन केले. ते म्हणाले की, “डॉ. भालचंद्र फडके हे मराठी विभागात (पुणे विद्यापीठ) प्राध्यापक होते. नंतर ते प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागात संचालक म्हणून रूजू झाले. त्यांचे समाज शिक्षणातील योगदान खूप मोठे आहे. त्याविषयी चर्चा करण्यासाठी साहित्यिक, सामाजिक विभागाचे विविध प्रतिनिधी येथे सहभागी झाले आहेत.”

डॉ. भालचंद्र फडके यांचा परिचय डॉ. शिरसाठ यांनी सांगितला. (हा परिचय ह्या अहवालच्या परिशिष्टामध्ये जोडण्यात आलेला आहे.)

स्वागत व भूमिका ही डॉ. धनंजय लोखंडे, संचालक आणि विभाग प्रमुख यांनी मांडली.

**प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागाविषयी**

"यः क्रियावान् स पण्डितः" हे पुणे विद्यापीठाचे बोधवाक्य असून चांगले व परिपूर्ण शिक्षण यांच्याशी विद्यापीठाची सामाजिक बांधिलकी आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणाच्या उद्दिष्टांमध्ये ज्ञानविस्तार (Extension) हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट मानले आहे. १९७७ मध्ये आयोगाने आपले धोरण स्पष्ट करताना म्हटले की, विद्यापीठांनी उच्च शिक्षणाची धोरणे राबविताना ज्ञानविस्ताराला देखील महत्त्व द्यायला हवे.

निरंतन शिक्षणाचा अभ्यासक्रम विद्यापीठात १९७२ साली सुरू करण्यात आला. याचे ध्येय हे समाजातील विविध घटकांमध्ये सामाजिक जागरूकता, शिक्षणाचे महत्त्व सांगणे आणि यास अनुसरून कार्यक्रम राबविणे होय. या विभागामार्फत निरंतर शिक्षणांतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले, यात कौशल्य विकास कार्यक्रम, नवसाक्षरांसाठी अभ्यासक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम, छंद कार्यक्रम, सामाजिक जागरूकता कार्यक्रम, विशिष्ट क्षेत्र संवर्धन कार्यक्रम, विद्यापीठ आणि महाविद्यालयांचा समुदाय संवाद कार्यक्रम इत्यादी होत.

निरंतर शिक्षण कार्यक्रम उच्च शिक्षणाच्या माध्यमातून समाजाशी यशस्वीरित्या जोडण्यात आला. केंद्र सरकारने राबविलेल्या राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमास १९७७ साली विद्यापीठ अनुदान आयोगाने राबविला. राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमात या विभागाने, विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेवून यास लोकप्रिय व यशस्वी बनविले. यात पुढील काळात अशासकीय संस्था (NGO), ऐच्छिक संस्था, सरकारी विभाग, जनसंपर्क, वैयक्तिक स्वरूपात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. सामाजिक जागृततेचा प्रसार, कार्यक्षमता वाढविणे, साक्षरता कौशल्य वाढविणे, हे राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे ध्येय होते. प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागाने आपल्या प्रथम कार्यक्रमासाठी ग्रामीण, शहरी, आदिवासी हा भाग

निवडला. या कार्यक्रमाचे स्वरूप म्हणजे साक्षरतेचा प्रसार करून परिवर्तनाची चळवळ निर्माण करणे. सामाजिक प्रबोधनातून यशस्वी अनुभव जनजागृतीसाठी मांडण्यात येवू लागले, यास वर्तमानपत्र व माध्यमांनीही प्रसिद्धी दिली. ग्रामीण विकास कार्यक्रम हे महाविद्यालयांमध्ये आयोजित केले जात. यात दोन कार्यक्रम वाढविण्यात आले. १. योजना मंच, २. लोकसंख्या शिक्षण संघ.

योजना मंचाचे ध्येय हे या कार्यक्रमाची माहिती 'घर ते राष्ट्र' यानुसार देणे तर लोकसंख्या शिक्षण संघाचे ध्येय हे 'वाढती लोकसंख्या आणि संसाधन साधनांचा असमतोल' याविषयी माहिती देणे, हे होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने लोकसंख्या शिक्षण संसाधन केंद्राची देखील जबाबदारी विभागावर टाकलेली होती. लोकसंख्या शिक्षण संसाधन केंद्राकडून महाराष्ट्रातील लोकसंख्या शिक्षण संघास शैक्षणिक पाठिंबा अपेक्षित होता. महाराष्ट्र सरकारने देखील १९८९—९० मध्ये प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभागात पुढील कार्यक्रम एकाहाती आणले. १. प्रौढ शिक्षण,२. निरंतर शिक्षण, ३. लोकसंख्या शिक्षण संघ.

'जन शिक्षण निलायम' हे केंद्र म्हणून स्थापन करण्यात आले. या केंद्राला वरील घटकांशी जोडण्यात आले. या विभागाअंतर्गत साक्षरता कार्यक्रमाला 'जन अभियाना'शी जोडण्यात आले. सध्याच्या प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमाला या जन साक्षरता अभियानाशी जोडण्यात आले. जन साक्षरता अभियानाचा हेतू "एकास शिकवा, समूहाला शिकवा" असा होता. राष्ट्रीय धोरणाला अनुसरून एकूण साक्षरता अभियानाची संपूर्ण देशात अंमलबजावणी करण्यात आली. प्रथमत: एकूण साक्षरता मोहीम पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात राबविण्यात आली. यात या विभागाने जोमाने कार्य केले. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू या अभियानाचे अध्यक्ष होते. या कार्यासाठी विभागाने इतर विभाग, महाविद्यालये, व्यक्ती यांची मदत घेतली. योजना कार्यक्रम, पर्यावरण इमारत, कार्यक्रम अंमलबजावणी, मूल्यमापन, पूर्ण साक्षरता कार्यक्रम ह्या विविध योजनांमध्ये महत्त्वपुर्ण भूमिका निभावली. या विभागाने इतरही 'एकूण साक्षरता अभियाना'त काम केले. विद्यापीठ अनुदान आयोग व्यतिरिक्त विभागाने इतरही कार्यक्रमांची अशासकीय संस्था, शासकीय विभाग यांच्या मदतीने अंमलबजावणी केली.

विद्यापीठाच्या दिशा आणि मार्गदर्शनाखाली विभाग इतरही कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले आहे. ते पुढीलप्रमाणे — १. राष्ट्रीय एकीकरण, २. अशासकीय संघटना, ३. असंघटित कामगार, ४. महिला सक्षमीकरण, ५. ज्येष्ठ नागरिक, ६. आदिवासी विकास, ७. अल्पसंख्याक शिक्षण, ८. समुपदेशन, ९. तरूण शिक्षण, १०. पौगंडावस्थेतील शिक्षण, ११. रोजगार आणि उद्योजकता, १२. आजीवन शिक्षण, १३. मानवी हक्क, १४. भारतीय संविधान, १५. पूर्ववैवाहिक समुपदेशन, १६. व्यवसाय मार्गदर्शक, १७. संशोधन पद्धती.

ह्या विभागामार्फत प्रौढांना साक्षर करण्यापर्यंतच मर्यादित नाही तर त्याबरोबर Post Graduation Diploma in Tribal Development, Ph.D. Programme in Inter Disciplinary, सामाजिक परिवर्तनाचे, प्रेरणा देण्याचे, जाणीव देण्याचे कार्यक्रम देखील येथे चालू आहेत.

**विभाग व अशासकीय संस्था (बहुजन हिताय) यांच्या सहकार्याने**

प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे तसेच त्रैलोक्य बौद्ध महासंघ गण यांच्या संयुक्त विद्यमाने **"बाल संस्कार व मनोरंजन केंद्र"** कार्यक्रम दापोडी वस्ती, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता.

दापोडी वस्तीमध्ये अनेक कुटुंब राहतात, आई—वडील निरक्षर असल्याने शिक्षणाचे महत्त्व नव्हते. पालक आपल्या पाल्यांना दिवसभर घरी सोडून कामावर जात. वस्तीमध्ये राहत असल्याने मूलभूत सोई—सुविधांपासून हे लोक वंचित असतात. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन येथील ३ ते ६ वयोगटातील मुले व मुली यांच्या शिक्षणासाठी एकूण २० मुलांची निवड करून त्यांच्यासाठी 'बालसंस्कार व मनोरंजनाचे केंद्र' सुरू करण्यात आले. यासाठी सकाळी ०९.३० ते १२.३० ह्या वेळेत बालवाडीचे वर्ग भरविण्यात आले. यात खाऊ, खेळणी, बडबडगीते घेवून मुलांमध्ये या कार्यक्रमाविषयी आवड निर्माण करण्यात आली. याशिवाय १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, बालदिन, शिक्षण दिन हे दिनविशेष साजरे करण्याबरोबरच सकस आहार, स्नेह संमेलन, पालक मेळावा, भेट कार्ड बनविणे, पताका बनविणे, चित्र रंगविणे, मातीकाम, सहलींचे आयोजन करणे, भाषेची ओळख, विज्ञान विषयाची ओळख, जीवन व्यवहार, सेमी इंग्लीश अभ्यासक्रम,

अंकांची ओळख असे शैक्षणिक स्वरूपाचे कार्यक्रमही घेतले, तर फुले, फळे, भाज्या, दिशा, विविध खेळ यांची ओळख करून दिली जाई.

पालक सभेमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रगतीबद्दल आनंद व्यक्त केला. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या दिवशी पालकांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. संकेत माने या विद्यार्थ्याच्या पालकांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संकेत पहिले १० दिवस येथे रडतच असे, पण त्यानंतर त्याची भीती नाहिशी होऊन तो कविता म्हणणे, A to Z वाचन, स्वत:चे नाव सांगणे, एकत्रित होऊन खेळ खेळणे इत्यादी कृती करू लागला. त्याच्या पालकांनी संकेतमध्ये झालेल्या बदलांनी खूप आनंद व्यक्त करून या कार्यक्रमाच्या आयोजकांचे मनापासून आभार मानले.

३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी घेतलेल्या “बाल संस्कार व मनोरंजन केंद्र” या कार्यक्रमाप्रमाणेच १ ते ४ या वर्गातील मुला—मुलींच्या अभ्यासासाठी **“अभ्यासिका वर्ग”** घेण्यात आला. या मुलांना अभ्यासासाठी मोकळे वातावरण मिळणे कठीण असते. यामुळे मुलांच्या अभ्यासातील आवड कमी होऊन संपूर्ण शिक्षणाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. या अभ्यासिका वर्गामध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सिध्दार्थ नगर, रेल्वेचाळ येथे हे अभ्यासकेंद्र सुरू केले. या वर्गामध्ये पाठांतर, लिखाण, बाराखडी वाचन, जोडअक्षरांचे शब्द लिखाण, इंग्रजी, इतिहास, भूगोल या विषयांचे वाचन तसेच गणित सोडविणे, अभिनय, गाणी, चित्रे, बौद्धिक खेळ इत्यादी गोष्टी करणे तसेच इंग्रजी महिने, वार, दिशा यांची माहिती देणे इत्यादी अभ्यास येथे घेण्यात आला. या अभ्यासवर्गामुळे मुलांमध्ये बराच बदल झाला. मुले नियमित या अभ्यासवर्गामध्ये येवू लागली. मैत्रीपूर्ण वातावरण बनविणे, एकमेकांना मदत करणे इत्यादी गुण त्यांच्यात आले, त्यांच्या निकालात वाढ झाली.

याच वस्तीमधील स्त्रियांसाठीदेखील **“शिवणकाम प्रशिक्षण”** हा कार्यक्रम हाती घेतला होता. या प्रशिक्षण वर्गाचा उद्देश हा वस्तीपातळीवरील अल्पशिक्षित महिलांनी शिवणकाम क्षेत्रात पदार्पण करून दैनंदिन वापराचे कपडे घरच्याघरी शिवण्याचे कौशल्य आत्मसात करणे, किमान पातळीवर कपडे शिवण्याचा स्वंयरोजगार सुरू करणे, यामुळे तयार कपड्यांच्या कारखान्यात ‘शिवण कारागीर’ म्हणून कामही मिळू शकणार होते. शिवणकाम प्रशिक्षणात १५ महिलांनी प्रवेश

घेतला. या प्रशिक्षणात साधे ब्लाउज, कटोरी ब्लाउज, हाफ कटोरी, मद्रासी कटोरी, पंजाबी सलवार व खमीस शिकविणे, कटींग, इंच, आकडे समजाविणे, शिलाई मशिनची माहिती त्यांना देण्यात आली.

या शिवणकाम प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला. ९ महिलांनी स्वत:चा व्यवसाय सुरू केला. काही महिलांनी अधिक शिवणकाम शिकण्यासाठी बाहेर प्रशिक्षण वर्गात गेल्या. आता महिला त्यांच्या कुटुंबास या व्यवसायातून हातभार लावत आहेत. प्रशिक्षण वर्गातील सौ. अश्विनी भोकरे, सौ. शशिकला बलसुरे या महिलांनी या प्रशिक्षणामुळे आपण आपल्या कुटुंबास हातभार लावत असून त्यामुळे आमच्या जीवनपद्धतीमध्ये बदल घडून आल्याचे सांगतांना त्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रम आयोजकांचे आभार मानले.

अशाच एका 'बहुजन हिताय'च्या दापोडीमधील कार्यक्रमामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध या महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती मंजूश्री बोपडे त्या परिसरातील महिलांना सहज म्हणाल्या की, "तुम्ही शिकला पाहिजे", असे सांगताना त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यांच्या या व्याख्यानाने अनेक घरकाम करणाऱ्या महिला प्रभावित होऊन त्यांनी शिकण्याची इच्छा व्यक्त केली. ह्या महिलांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी मदत केली, त्यापैकी काही महिलांनी पदवीसाठी तर काही महिलांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला, पदवीसाठी प्रवेश घेणाऱ्या महिलांची संख्या २८० इतकी होती. या शिक्षणातून अनेक महिलांनी नोकरी मिळविली तर काही महिलांनी स्वत:चे व्यवसाय सुरू केले.

विभागाची भूमिका स्पष्ट केल्यानंतर डॉ. धनंजय लोखंडे म्हणाले की, "आज प्राध्यापक डॉ. भालचंद्र फडके यांचा जन्मदिवस आहे. (१३ मे) म्हणून प्रौढ, निरंतर शिक्षण विभाग व मराठी विभाग यांनी मिळून हा कार्यक्रम आयोजित केला आहे. आज या राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष तेज निवळीकर, प्रमुख पाहुणे डॉ. श्रीपाल सबनीस, सन्माननीय उपस्थिती डॉ. रझिया पटेल, मराठी विभाग प्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर, माझे मित्र व सहकारी डॉ. कैलास बवले हे आले आहे. डॉ. फडके यांचा विषय मराठी होता व त्यांनी मराठी विभागामध्ये बरीच वर्षे काम केले होते. शेवटच्या टप्प्यामध्ये ते प्रौढ विभागाचे संचालक होते. त्यांच्या जन्मदिनानिमित्त हा

कार्यक्रम आयोजित केला आहे." यात कोण–कोणते विषय मांडणार, यांचाही त्यांनी उल्लेख केला.

## डॉ. भालचंद्र फडके यांची एक आठवण

डॉ. भालचंद्र फडके यांनी एकदा बिडी बनविणाऱ्या स्त्रियांना काजूचे उदाहरण सांगितले होते, काजू समजाविताना दोन शब्दांची फोड करायची, 'का' आणि 'जू'. 'का' म्हणजे प्रत्येक प्रश्नाची सुरूवात 'का' ने होते. कोणतीही गोष्ट 'का' करायची किंवा आपण गरिब 'का' आहोत, असे प्रश्न 'का' पासून तयार होतात. 'जू' म्हणजे काय? असा प्रश्न त्यांनी विचारला, तेव्हा त्या स्त्रियांनी सांगितले, 'जू' म्हणजे बैलाच्या मानेवरील ओझे. हे ओझे आपल्या मानेवर का आहे, हा प्रश्न विचारला की 'काजू' हा प्रश्न तयार होतो. असा संदर्भ डॉ. फडके यांनी सांगितला होता.

## फडके आंबेडकरांच्या सहवासात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. फडके यांनी एकत्र काम केले होते. डॉ. बाबासाहेब एकदा म्हणाले होते की, 'एका व्यक्तीचा विचार हा त्याच्या विचारांबरोबर केला नाही तर एखाद्या रोपट्याची पाण्याशिवाय व खताशिवाय जी अवस्था होते, तशी त्या व्यक्तीच्या कार्याची अवस्था होते.'

डॉ. लोखंडे यांच्या भाषणानंतर डॉ. शिरसाठ यांनी मराठी विभागाचे प्रमुख **डॉ. अविनाश सांगोलेकर** यांना बोलण्यास आमंत्रित केले. आपल्या भाषणामध्ये डॉ. सांगोलेकर म्हणाले, 'डॉ. लोखंडे यांनी प्रस्ताव ठेवला की, आपण दोन्ही विभागांनी मिळुन हा कार्यक्रम साजरा करूया व आम्ही हे मान्य केले तसेच दरवर्षी या कार्यक्रमात सहभागी होऊया. मी डॉ. फडके यांचा विद्यार्थी आहे. मी दुष्काळी गाव सांगोले येथून होतो आणि मी येथे विद्यापीठात प्रवेश घेतला व मला डॉ. फडके यांनी वसतिगृहामध्ये खोली मिळवून दिली. माझे एम. ए. व एम. फिलचे शिक्षक व मार्गदर्शक हे डॉ. फडके हेच होते. त्यांच्यामुळे माझ्यासारखे असंख्य विद्यार्थी घडले आहेत. मराठी विभाग अशा कार्यक्रमाला नेहमीच पाठिंबा देत असतो. दि. १३ मे डॉ. फडके यांचा जयंतीदिन असतो पण या दिवशी विद्यार्थी सुट्टीला घरी गेलेले असतात, म्हणून '१८ सप्टेंबर' हा 'स्मृतीदिन' साजरा केला तर विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल, असे मला वाटते.'

डॉ. शिरसाठ यांनी डॉ. सांगोलेकर यांच्या भाषणानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठामध्ये एम.ए. आणि पीएच.डी. केलेल्या **डॉ. रझिया पटेल** यांना आमंत्रित केले, डॉ. पटेल ह्या हाडाच्या वक्त्या आणि समाज सुधारक आहेत तसेच 'अल्पसंख्याक शिक्षण कक्ष, भारतीय शिक्षण संस्था, पुणे' याच्या त्या प्रमुख आहेत.

डॉ. रझिया पटेल आपल्या भाषणामध्ये म्हणाल्या की, 'डॉ. भालचंद्र फडके यांना मी त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करते, डॉ. लोखंडे यांनी सांगितल्याप्रमाणे असे दिसते की, समाजाचा व शिक्षणाचा संबंध अतूट असतो आणि त्याबद्दल प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग कार्यरत आहे. डॉ. फडके यांच्या साहित्यावर जो प्रभाव आहे, तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहवास आणि त्यांच्या विचारातून पडलेला आहे. त्यामध्ये फडके सरांवर जास्त प्रभाव हा भारतातील संविधानाचा आहे, त्यातील धर्मनिरपेक्षता, समता आणि सामाजिक ज्ञान या तीन गोष्टी केंद्रबिंदू आहेत. समाजामध्ये नुसते साहित्य निर्मिती करून चालणार नाही तर प्रत्यक्षात समाजात कार्य करण्यासाठी उतरले पाहिजे, हे डॉ. भालचंद्र फडके यांनी दाखवून दिले.

डॉ. भालचंद्र फडके साहित्य : "दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह", "फुले—आंबेडकर : शोध आणि बोध" हे त्यांचे प्रमुख साहित्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक चिंतन करताना खरच माझा देश स्वतंत्र आहे काय? आज लोकशाहीला उतरती कळा येत आहे, यापासून डॉ. फडके यांचे विचार वाचवू शकतील.

भारताचे वर्णन करताना भारतामध्ये विविधता तसेच विषमताही आहे. संस्कृती म्हणजे माणसाने माणसांशी माणसासारखे वागले पाहिजे, मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे सर्वात महत्त्वाचे मूल्य आहे, असे डॉ. फडके म्हणतात. स्त्री—पुरूष समानता हे देखील डॉ. फडके यांचे तत्त्व आहे. बहुतांशी मराठी साहित्यामध्ये मुस्लीम हा 'खलनायक' म्हणून आला आहे, अशी प्रतिमा सवर्ण आणि ब्राह्मणी लोकांनी केली, यामुळे हे साहित्य बहुजन समाजाने (पहिल्या शिकलेल्या पिढीने) वाचले, तेव्हा त्यांच्या मनात हिच प्रतिमा निर्माण झाली व यापासून सर्व समाजाला कोणी वाचविले तर संत साहित्याने वाचविले. ब्राह्मणी साहित्य हे लोकप्रिय ठरेल का? मसुची वाडी (सांगली) येथील ५०

मुलींनी शाळा सोडली ती छेडछाडीमुळे, अन्सार नावाच्या मुलाला (UPSC Ranker) देखील घर मिळविण्यासाठी 'शुभम' या हिंदू नावाचा वापर करावा लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." शिका म्हणजे—निरंतर शिका, संघटित व्हा कारण संघर्ष करण्यासाठी. डॉ. बाबासाहेब म्हणतात की, फक्त विद्याच पवित्र असू शकत नाही. विद्याला चार पारंबीता आहेत. विद्याबरोबर भगवान बुद्धांनी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपण, शील म्हणजे सदाचारांनी संपन्न, करुणा म्हणजे मानव जातीवर प्रेमभाव आणि मैत्री व सर्व प्राणिमात्रांबद्दलची आत्मीयता आवश्यक आहे. धर्मनिहाय दोन समाज मुस्लीम आणि बौद्ध यामधील स्त्रिया जास्त अशिक्षित आहेत, (१९८६ च्या अहवालानुसार).

डॉ. सतीश शिरसाट यांनी डॉ. रझिया पटेल यांच्या भाषणानंतर **डॉ. श्रीपाल सबनीस** यांना भाषणासाठी आमंत्रित केले.

डॉ. श्रीपाल सबनीस आपल्या भाषणाची सुरूवात करताना म्हणाले की, रझियाताईंनी त्यांचे गुप्त चिंतन मांडले, मी रझियाताईंचे जाहीरपणे अभिनंदन करतो. डॉ. भालचंद्र फडके यांनी संशोधनात्मक बाबासाहेब मांडले, ते चार ओळींनंतर संदर्भ देत होते. डॉ. बाबासाहेबांचा प्रभाव पचवलेले भालचंद्र फडके हे 'मराठीचे प्राध्यापक' एवढीच अशी त्यांची ओळख नाही. य.दी. आणि भा.दी. असे दोन बंधू ब्राह्मण जातीमध्ये जन्मलेले आणि डॉ. बाबासाहेब यांच्या चळवळीशी जुळवून घेतलेले होते. माझ्यावर य.दी. फडके यांचा प्रभाव जास्त होता. ब्राह्मण जात ही अविश्वासू अशी जात आहे, असा समज आहे व त्यामुळे दलित समाज व ब्राह्मणांच्या मध्ये एक भिंत निर्माण झाली होती. त्यावेळी भा.दी.फडके यांनी या दलित चळवळींमध्ये कसे मिसळून घेतले? असा एक प्रश्न होता.

सनातनी ब्राह्मण व सुधारक ब्राह्मण यातील फरक हा विद्रोही चळवळीच्या, परिवर्तनवादी किंवा आंबेडकरवादी चळवळीतल्या माणसांना माहित नसेल तर, ब्राह्मण समाजातील सुधारणावादी ब्राह्मणांनी का यावे दलित चळवळींमध्ये? जर अशा सुधारक ब्राह्मणांना मागे ओढण्याचा प्रयत्न होत असेल तर ब्राह्मणही येणार नाही, मराठा येणार नाही, माळी येणार नाही व डॉ. आंबेडकर यांना अपेक्षित असणारे परिवर्तन कसे घडणार? महायान पंथामध्ये जी बुध्दांची मूर्ती

पूजा होते ती बुद्धांनाच मान्य नाही, बाबासाहेबांना मान्य नाही, बौद्धांमध्ये दोन पंथ का आले? बाबासाहेबांना लोकशाहीला पूरक असे शिक्षण हवे होते. सर्व धर्मातील ब्राह्मणवाद संपविणारे शिक्षण बाबासाहेबांना अभिप्रेत होते. याचाच एक भाग म्हणून बाबासाहेबांनी पुनर्विवाहाचा निर्णय घेतला, त्यांनी ब्राह्मण बाईशी लग्न केले. त्या बाईंनी त्यांची मनोभावे सेवा केली. बाबासाहेबांवर प्रेम करणाऱ्या काही लोकांनी बाबासाहेबांच्या प्रस्तावनेतून त्यांच्या पत्नीचा संदर्भ व प्रस्तावना वगळली. मग आंबेडकर चळवळ, दलित चळवळ यांच्या योगदानावर प्रश्नचिन्ह करावे लागेल? दलित समाजातील फातिमा बिबी यांच्या वाटेला उपेक्षा येते, त्यांचे नाव कोणीच घेत नाही, जी उपेक्षा रानडे, आगरकर यांच्या वाट्याला येते ब्राह्मण म्हणून; तीच उपेक्षा फातिमा बिबी यांच्याही वाट्याला येते. दलित समाजही मुस्लीमांच्या बाबतीत आरक्षण बाळगत असेल तर दलितांचा आणि ब्राह्मणांचा 'ब्राह्मणवाद' यामध्ये जास्त फरक नसतो.

दलित चळवळीमध्ये मुहंमद पैगंबरांचे नाव मला कुठेही दिसले नाही. गांधीतला 'महात्मा' हा प्रत्येकवेळी 'महात्मा' राहत नाही. बाबासाहेबांशी बोलताना ते बॅरिस्टर आहेत. इंग्रजांशी बोलताना बॅरिस्टर आहेत. बाबासाहेब गांधीतील 'महात्मा' का मरून देत नाहीत? बाबासाहेबांच कर्तृत्व १२५व्या जयंतीनिमित्त पुढे येत की, 'शेतकऱ्यांचे कैवारी', 'हिंदुकोडबीलाचे कैवारी', 'ओबीसींचे कैवारी', 'विद्युतबोर्डाची पायाभूत बांधणी करणारे', 'जल आयोगाची स्थापना करणारे', 'धरण व्यवस्था करणारे', 'रिझर्व बॅंकेची सूत्रात्मक बांधणी करणारे', 'विमा कंपनीची सूत्रे देणारे', इ. 'यांना' का नाही कळले? ओबीसी यांना त्यांच्यासाठी स्वतंत्र आयोग व्हावा म्हणून बाबासाहेबांनी पत्र दिले होते. हिंदू कोडबील आणले होते. बाबासाहेबांनी आर.एस.एस.ला ही परवानगी मिळवून दिली. बाबासाहेबांचा वापर सर्वच करतात. प्रकाश आंबेडकर यांनी व्यापक भूमिका घेतली. समाजवादी, बहुजन यांना एकत्र आणणे व आर.पी.आय.ची स्थापना करणे, हेच बाबासाहेबांना अपेक्षित होते.

शिवाजी महाराजांच्या राज्यात गवताच्या काडीला धक्का नव्हता, आता तर शेतकरीच मरतोय; ७० वर्षांत सरकारने काय केले? अण्णा भाऊ साठे आयुष्यभर संघर्ष करत राहिले; त्यांच्या मंडळामध्ये शाहीराला जात नसते; त्यांचा सचिव १८० कोटींचा घोटाळा करतो; शासनमुक्तीची प्रतीके म्हणून कार्य करणाऱ्या ठिकाणी १८० कोटींचा

घोटाळा होत असेल तेही अण्णा भाऊ यांच्या नावाने, तर हे डाव्यांना मान्य आहेत का? आणि उजव्यांचे अखंड हिंदू राष्ट्राची निर्मिती, जिथे कोणालाच सुख नाही, हे तत्त्वज्ञान मान्य आहे का? डॉ. फडके यांचे तत्त्वज्ञान सर्वांपर्यंत पोहचते व त्यांची जयंती साजरी केली जाते.

बसवेश्वर स्वत:ची ब्राह्मण जातीची नाळ तोडून आंतरजातीय विवाह लावतो, पहिली धर्मसंसद भरवतो, मुहंमद पैगंबर निरपराध माणसाला मारणे पाप म्हणतात, व्याज घेणे पाप मानतात, मुलगी जन्मली तर जमिनीत पुरावी या संकल्पनेला मुहंमद पैगंबर विरोध करतात. महात्मा जोतीराव फुले नाभिक लोकांचा संप घडवून आणतात, कारण ते विधवांचे केस कापण्यास विरोध करतात? जोतीराव फुले हे पैगंबरांचा गौरव का करतात?

येथे काही प्रश्न निर्माण होतात, समाज कुमारीकेचे मातृत्व मंगलमय मानतो का? सावित्रीबाईंनी ब्राह्मण बाईचे बाळंतपण केले व वंदनीय मानले. मातृत्वाच्या भानाला आज मर्यादा आहेत. महात्मा जोतीराव फुले आर्य समाजाचे; दयानंद स्वामी हे वेद मानणारे पण आंतरजातीय विवाह करणारे आहेत, त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढतात. डॉ. आंबेडकर हे सायमन कमिशनपुढे दलितांची बाजू मांडून भारताला स्वातंत्र्य मागतात. म्हणून काँग्रेस पक्ष हा डॉ. आंबेडकर यांची दखल घेतो. गांधींची महात्मेपणाची मूल्यात्मकता पचविण्याची क्षमता आंबेडकर यांच्यामध्ये होती, म्हणून आपली मागणी बाजूला ठेवली आणि काँग्रेसचा नेता जगला पाहिजे, हे त्यांना माहीत होते. हिंदू धर्माने प्रथम अन्याय केला, अनेक अन्याय पचवलेले आंबेडकर, ग्रंथ वाचलेले, लिहिणारे आंबेडकर, अर्थशास्त्रज्ञ, इतिहास तज्ज्ञ, परराष्ट्र तज्ज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, सगळ्या प्रकारच्या शास्त्रांमध्ये गती. 'युनो'ने वंचितांचा नेता, जागतिक नेता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्याची संधी सोडली नाही.

१५६ राष्ट्रांनी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले, कोलंबिया युनिवर्सिटीचा गेल्या ३०० वर्षांमध्ये, सर्वात प्रतिभावान विद्यार्थी कोण तर बाबासाहेब आंबेडकर होते. बाबासाहेब एकदाही हिंसा समर्थन करत नाहीत. म्हणून बाबासाहेब व गांधीजी 'अहिंसा' या मुद्द्यावर एकत्र येतात.

डॉ. आंबेडकर हे ब्राह्मणांना मित्र मानतात. जवळकरांनी जेव्हा 'देशाचे दुश्मन' नावाचे पुस्तक लिहिले, तेव्हा त्यांना शिक्षा झाली तरी

डॉ. आंबेडकर यांनी त्यांना सोडले. प्रत्येक जातीमध्ये ब्राह्मणवाद आहे. डॉ. बाबासाहेबांचा विरोध ब्राह्मणवाद व भांडवलशाही यांना होता. सर्व जातींमध्ये जर जातीवाद आहे तर तो ब्राह्मणवाद आहे. एक जातीची संघटना जातीवाद संपवत नाही. १९३६ साली 'स्वतंत्र मजूर पक्ष' डॉ. बाबासाहेब यांनी काढला. जातीची बंधने दूर करून स्वतंत्र पक्ष काढतात. त्यांचा जाहीरनामा हा 'शेतीचे राष्ट्रीयकरण' यावर आधारित होता. प्रबोधनाचे प्रश्न गंभीर आहेत. सगळी उत्तर चुकीची आहेत. प्रथम सर्वांना स्वत:च्या जातीविरूध्द परिवर्तनाचा लढा द्यावा लागेल.

नरेंद्र दाभोळकर यांचे हौतात्म्य तुम्ही जातीमध्ये बांधणार का? साने गुरूजींचे पंढरीचे उपोषण ब्राह्मणाच्या जातीमध्ये गुंडाळणार का? मराठी जातीमध्ये पण बिनजातीवादी माणसं आहेत. मुस्लीम जातीमध्ये देखील बिनजातीवादी माणसं आहेत. कुठलाही एक माणूस एका समाजासाठी व एका संस्कृतीच्या उद्धारासाठी पुरेसा नाही, एवढे सगळे संत व समाजसुधारक असूनही आपला समाज सुधारला का? सैराटच्या कथेमध्ये काय काल्पनिक आहे, दोन भिन्न जातीमध्ये विवाह का होऊ शकत नाही? निसर्गाच्या भावना तुम्ही दाबून ठेवणार का? समाजाच्या प्रबोधनासाठी, सुधारणेसाठी मुळापासून क्रांतीकारक बदल करावे लागतील. महापुरूष कोण्या एका जातीचे नसतात. बाबासाहेब 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' यावर थांबत नाही, ते 'हिंदू कोडबिल' आणतात. डॉ. आंबेडकर यांचे अनुयायी रानडेंचे मोठेपण जानव्यात गुंडाळून ठेवतात, ज्या रानडेंचे आंबेडकर गौरव व तोंडभरून कौतुक करतात.

प्रौढ, निरंतर शिक्षण विभागाविषयी मत मांडताना डॉ. सबनीस म्हणाले की, वीस विभागामध्ये वेगवेगळे प्रकल्प हे या प्रौढ शिक्षण विभागाने घेतले आहे, परिवर्तन व प्रबोधन यांचेही प्रश्न स्वीकारले आहेत. प्रौढ विभागातील एकही प्राध्यापक ऐकमेकांविरूद्ध बोलत नाही; हे फार दुर्मिळ चित्र आहे. याचे सर्वांना श्रेय मिळते.

डॉ. शिरसाठ यांनी डॉ. सबनीस यांचे आभार मानताना **प्रा. तेज निवळीकर** यांना निमंत्रित केले.

"साक्षरता कार्यक्रम आणि डॉ. भालचंद्र फडके" या विषयावर बोलताना, प्रा. तेज निवळीकर म्हणाले की, "आपल्या देशात राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम १९७८ सालापासून सुरू करण्यात आला. या वर्षापासूनच डॉ. भालचंद्र फडके प्रौढ शिक्षणाच्या चळवळीत सहभागी

झाले होते. डॉ. भालचंद्र फडके पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात विद्यार्थीप्रिय आणि मनमिळावू प्राध्यापक म्हणून काम करत होते.”

## द्वितीय सत्र

द्वितीय सत्राचे सूत्रसंचालन डॉ. तुपे यांनी केले. आपल्या सूत्रसंचालनामध्ये डॉ. तुपे यांनी **डॉ. कैलास बवले** यांचा परिचय करून दिला. लोकशिक्षणाच्या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या राज्य साधन स्वरूप संस्था म्हणजे State Research Centre येथील योगदान, नवीन संस्था ‘शाश्वत ग्रामविकास’ची स्थापना, प्राचार्य म्हणून त्यांची भूमिका, अशी ओळख करून दिल्यानंतर त्यांना भाषणासाठी निमंत्रित करण्यात आले.

आपल्या भाषणामध्ये डॉ. कैलास बवले म्हणाले की, लोक शिक्षण हे समाज शिक्षणाचे मूळ आहे. समाज तीन प्रकारचे शिक्षण घेत असतो, अनौपचारिक, औपचारिक आणि सहज शिक्षण. आजही अनौपचारिक व सहज शिक्षण हे समाज शिक्षणाची मोठी जबाबदारी पार पाडत आहेत. ‘शिक्षण’ या शब्दाची फोड केली असता ‘क्षण’ हा शब्द बाहेर पडतो, म्हणून क्षणाक्षणाला आपल्याला जे ज्ञान प्राप्त होते, त्यास शिक्षण म्हणतात, म्हणजेच याचा संबंध निरंतर शिक्षणाशी आहे. i.e Lifelong Learning.

वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतांनी भागवत धर्मप्रसाराचे कार्य करताना समाज उद्धाराच्या तळमळीतून विविध स्वरूपाची साहित्यनिर्मिती केली. ‘लोकसंवाद’ हे त्यांच्या साहित्यातील प्रमुख वैशिष्ट्य. त्यासाठी त्यांनी लोक—तत्त्वाचा प्रभावी वापर केला. ‘लोकांनी, लोकांसाठी निर्माण केलेले लोकांचे तत्त्व म्हणजे लोक तत्त्व.’ यासाठी संतांनी अभंग, गौळण, भारूड, विराणी, वासुदेव अशा वेगवेगळ्या प्रकारची साहित्यनिर्मिती केली व लोकांपर्यंत पोहचविली. समाजशिक्षणाचे अनौपचारिक पद्धतीने काम करणारे संत म्हणजे पहिले लोकशिक्षक होते.

दुसरे संत म्हणजे समाजसुधारक. महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवाचे रान करून शिक्षणाचा वापर समाज परिवर्तनासाठी केला. यातूनच पुढे देशाच्या राज्यघटनेतील महत्त्वाची

मूल्ये निर्माण झाली. समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही, सामाजिक न्याय, कायद्याचे राज्य, आदर ही समाजबोधणीची मूल्ये समाज शिक्षणाचा एक भागच होती. अनौपचारिक व सहज शिक्षणाबरोबर आता औपचारिक शिक्षणाची सुरूवात झाली आणि समाज शिक्षणाची साचेबद्ध व ठोकळेबाज शिक्षण आकृतिबंध तयार झाला, समाजाबरोबर शिक्षक ही बदलत गेला.

शेकडो वर्षांच्या या प्रवासात समाजाने विविध क्रांत्या अनुभवल्या. पहिली क्रांती म्हणजे कृषी क्रांती, माणसाच्या गरजा भागविण्यासाठी कृषीचा उपयोग इतक्या सीमित पद्धतीने होता. पुढे औद्योगिक क्रांतीमुळे उद्योगप्रधान समाजाची निर्मिती झाली. उत्पादन तंत्र व समाजाची मानसिकता बदलली. समतेच्या आणि त्यागाच्या मूल्यांकडून समाज विषमतेच्या आणि भोगाच्या दिशेने प्रवास करू लागला. त्यातून अधिक लालसा, अधिक उपभोग व त्यासाठी अधिक उत्पादन, नफा ही समाजाची वैशिष्ट्ये घडत गेली. यामुळे विषमता वाढू लागली. लोकशिक्षणाची माध्यमेही बदलली. रेडिओ, दूरदर्शन अशी माध्यमे काही प्रमाणात समाजशिक्षणाचे कार्य करू लागली, तोपर्यंत समाज इलेक्ट्रॉनिक्स् आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीला सामोरा जाऊ लागला. ही चौथी क्रांती म्हणजे डिजीटल युगाची सुरूवात होय. समाज शिक्षणासाठी आता सोशल मिडियाचा वापर होऊ लागला. प्रचंड वेगवान आणि सामर्थ्यशाली साधनांच्या सहाय्याने अव्याहत चालणारे समाज शिक्षण व आजीवन सहज शिक्षण हे आजच्या समाजशिक्षणाचे स्वरूप आहे. त्यात मूल्य घसरणीचा वेगही वाढला आहे.

पाच—दहा वर्षांपूर्वीचे डिजीटल समाजाची सुरूवात झाली आहे, म्हणून उद्याच्या समाजशिक्षणाची साधने काय असतील ती हेरली पाहिजेत. कारण आज भारतात १०० कोटी लोक मोबाईल वापरतात. आता प्रबोधन हे १०० कोटी डिजीटल समाजात राहणाऱ्या लोकांचे करायचे आहे. डिजीटल समाजात राहणारा व्यक्ती दोन जगामध्ये वावरतो. १. वास्तव जग, २. काल्पनिक जग

वास्तव जग म्हणजे आता ज्या ठिकाणी राहत आहे तो समाज आणि अवास्तव जग म्हणजे सोशल मिडियातील जग. आताच्या समाजामध्ये मशीन भाकरी खात आहे, म्हणजे माणसाऐवजी मशिनला जास्त मागणी आहे. आजच्या समाजामध्ये एकत्र येऊन

निर्मिती करण्यावर भर येत आहे, म्हणजे दोन कंपन्या एकत्र येत आहेत. आज दोन मिनिटात संदेश जातो व लोक एकत्र येतात व क्रांती होते. विकीपिडीयाचा मालक कोणीही नाही, उद्यासाठी MOOC (Massive Online Open Course) ही समाजशिक्षणाची नवीन पद्धत तयार होत आहे. तुम्ही ही पद्धत अंमलात नाही आणली तर दुसरा कोणी आणेल. जागतिकीकरणामध्ये कोणताही समाज दुसऱ्यापासून वेगळा होऊ शकत नाही व औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण यांची दरी कमी होऊ शकते. उद्या कोणत्याही पदवीची गरज नाही. सुरूवातीच्या शतकांमध्ये समाजात बदल हळूहळू होत होता, आता तो जास्त जलद होत आहे.

समाज शिक्षणासाठी संस्था व व्यक्ती यांची भूमिका बदलावी लागणार आहे. हाती असणाऱ्या माध्यमांचा वापर केला पाहिजे. मुक होत जाणाऱ्या समाजाला बोलता केला पाहिजे. समाज शिक्षणातून सामाजिक संपत्तीची निर्मिती आणि त्यांच्या वापरावर समाजाचा अधिकार बदल, हे सोशल मिडियाच्या डिजीटल समाजशिक्षणात अपेक्षित आहेत. मात्र, मूल्यव्यवस्थेच्या पायावरच ही इमारत उभी राहील, हे आपण सर्वांनी लक्षात घ्यायला हवे. (हा लघुप्रबंध ह्या अहवालाच्या परिशिष्टामध्ये जोडण्यात आलेला आहे.)

डॉ. कैलास बवले यांच्या भाषणानंतर जयदीप लाड यांनी त्यांचा “भारतातील सामाजिक परिवर्तन: प्रौढशिक्षण कार्यक्रमाचे परिणाम” या विषयाचा प्रबंध सादर केला. हा प्रबंध श्री जयदीप लाड व डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता यांनी केला होता.

**भारतातील सामाजिक परिवर्तन: प्रौढशिक्षण कार्यक्रमाचे परिणाम**

मानवी संसाधन घडविणारा साक्षरता हा एक महत्त्वाचा पैलू आहे. माणसाचे राहणीमान उंचावण्यासाठी भारत सरकार व विविध राज्य सरकारे यांनी प्रौढ शिक्षणाचे अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत, ज्यामुळे साक्षरतेचा प्रसार हा सर्व लोकांमध्ये होत आहे. ‘जागतिक साक्षरता’ हा महत्त्वाचा घटक म्हणून पुढे येत आहे, ज्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक सुधारणा यामधील बंध खूप मजबूत ठरत आहे. साक्षरतेमुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेती आणि इतर घटकांच्या वाढीसाठी होत आहे, अनेक संस्थांच्या विस्तारासाठी व कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी साक्षरता महत्त्वाचे काम करू शकते.

निरक्षर शेतकरी हा क्वचितच सहकारी व पंचायत संस्थेचा पुरेपूर फायदा घेण्यात यशस्वी होतो. निरक्षर वातावरणामध्ये, अशा सहकारी व पंचायत संस्था, नोकरशाही, पिळवणूक करणारे जमीनदार आणि सावकार यांच्या नियंत्रणाखाली असतात.

कुटुंब नियोजन व साक्षरता यामधील संबंध खूप जवळचा आहे. कुटुंब नियोजनामध्ये साक्षर महिला ह्या निरक्षर महिलांच्या पुढे आहेत. आहाराबद्दल सल्ले, मुलांची काळजी आणि आरोग्य याबद्दल साक्षर लोकांशी चांगला संवाद साधता येतो, असा अनुभव आहे. साक्षरता व सामाजिक जडणघडण यामधील संबंध आपणास व सर्व जगास खूप फायदे देणारा आहे, असे दर्शवितो. म्हणून साक्षरतेकडे सर्वांनी जास्त लक्ष पुरविले पाहिजे. आजपर्यंतच्या या मोहिमेमध्ये यशाची सुरवात झाली आहे. साक्षरतेचे प्रमाण हळूहळू वाढत चालले आहे, साक्षर लोकांची संस्था वाढत आहे. निरक्षरतेचे प्रमाण अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रियांमध्ये जास्त आहे.यावरून साक्षरता वाढविण्याची गरज ही राष्ट्राच्या व मानवी संसाधनांच्या वाढीसाठी लागणारा महत्त्वाचा पैलू आहे हे समजते.

वरील गोष्टींवरून प्रौढ शिक्षण कार्यक्रमांच्या गरजेविषयी आपण चर्चा करणे व ते काम हाती घेणे गरजेचे आहे हे समजते. (हा लघुप्रबंध ह्या अहवालच्या परिशिष्टामध्ये जोडण्यात आलेला आहे.)

चर्चासत्रात संशोधन प्रबंध सादर करताना प्रा. डॉ. धनंजय लोखंडे आणि भाऊसाहेब महिरास यांनी “आदिवासी विकासासाठी समाजशिक्षणाचे महत्त्व” संशोधन प्रबंध सादर केला. (हा लघुप्रबंध ह्या अहवालच्या परिशिष्टामध्ये जोडण्यात आलेला आहे.)

याशिवाय प्रा. डॉ. धनंजय लोखंडे यांनी “ज्ञानविस्तारातून समाजशिक्षण” हा संशोधन प्रबंध सादर केला. (हा लघुप्रबंध ह्या अहवालच्या परिशिष्टामध्ये जोडण्यात आलेला आहे.)

यानंतर “डॉ. भालचंद्र फडके यांचे समीक्षालेखन” या विषयावर प्रा. डॉ. सुभाष आहेर यांनी संशोधन प्रबंध सादर केला. (हा लघुप्रबंध ह्या अहवालच्या परिशिष्टामध्ये जोडण्यात आलेला आहे.)

डॉ. नवनाथ तुपे यांनी आपले विचार थोडक्यात मांडताना म्हटले की, सत्र समन्वयक या नात्याने मी ५—७ मिनिट बोलणार आहे. खूप छानपैकी विश्लेषण आदरणीय डॉ. कैलास बवले यांनी

मांडले आहे. समाजशिक्षण म्हणजे मला वाटते की, समाजाची पुनर्रचना म्हणजे प्रबोधन. भारतात सामाजिक प्रबोधन झाले का? तुर्कस्थानच्या इस्तांबूलमध्ये जेव्हा तुर्की लोकांनी हल्ला केला, तेव्हा तेथील कलावंत, तत्त्वज्ञ हे ग्रीकमध्ये गेले, तेव्हा जगामध्ये सामाजिक प्रबोधनाची सुरूवात झाली. युरोपमधील स्थानिक संस्कृती व ग्रीकांची संस्कृती एकत्र येऊन युरोपमध्ये ज्ञान परंपरांमध्ये परिवर्तन घडले. पण याच्याही पलिकडचे प्रबोधन म्हणजे धार्मिक सुधारणा, उद्‌बोधन आणि विद्रोह.

डॉ. भालचंद्र फडके यांनी विद्रोह ठळक केला आहे. पण भारतात सामाजिक पुनर्रचना घडली नाही, जातीहीन आपला समाज झाला नाही; बदल झाले पण पुनर्रचना झाली नाही, म्हणून सामाजिक शिक्षणाची गरज आहे. युरोपमध्ये का पुनर्रचना झाली? तर तेथे नैसर्गिक संशोधने जास्त झाली, याचा परिणाम जनमाणसावर झाला व तेथील लोकांनी धर्मचिकित्सेला सुरूवात केली. भालचंद्र फडके यांनी धार्मिक चिकित्सा केली, सामाजिक पुनर्रचनेची चिकित्सा केली. मी डॉ. कैलास बवले यांचे अभिनंदन करू इच्छितो की, ज्यांनी डिजीटल सोसायटीची कल्पना मांडली, डिजीटल रचनेसाठी सामाजिक पुनर्रचना गरजेची आहे. डिजीटल सोसायटीबद्दलची संकल्पना मांडल्याबद्दल मी डॉ. कैलास बवले यांचे आभार मानतो.

## तृतीय सत्र

या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. विलास आढाव यांनी केले. डॉ. आढाव यांनी आपल्या सूत्रसंचालनावेळी म्हणाले की, 'डॉ. भालचंद्र फडके यांचे साहित्यातील व समाजशिक्षणातील योगदान हा महत्त्वाचा विषय आहे. समाज आणि विद्यापीठ यांमधील सांधा जोडण्याचे काम प्रौढ, निरंतर शिक्षण विभाग करत आहे व डॉ. फडके यांनी या विभागाचे नेतृत्त्व केले होते. डॉ. फडके यांनी समाजशिक्षणाची मुहुर्तमेढ हि १९७८–१९८६ मध्ये विभागामध्ये सर्वांच्या मनामध्ये रूजवली. लोकशाही, प्रगतशीलपणा व समानता हे डॉ. बाबासाहेब यांचे त्रिवेणी सूत्र डॉ. फडके यांनी आत्मसात केले होते.' यानंतर डॉ. आढाव यांनी डॉ. अभिजीत वैद्य यांना भाषणासाठी निमंत्रित केले.

डॉ. अभिजीत वैद्य आपल्या भाषणात म्हणाले की, मी जवळपास सर्व वर्तमानपत्र रोज चाळतो पण कोणत्याही वर्तमानपत्राने

डॉ. फडके यांच्या जन्मदिनाची दखल घेतली नाही. साहित्यातील मोठ्या लोकांचे महत्त्व वर्तमानपत्रांना नाही, म्हणून आपण याचा खेद व्यक्त केला पाहिजे. बुद्धिवंत आणि समाजाच्या उन्नतीसाठी योगदान करणाऱ्या व्यक्तींचा असा विसर पडणे, हे चांगल्या समाजाचे लक्षण नाही. म्हणूनच समाज उथळ होत चाललाय.

मी खरा हृदयरोग तज्ज्ञ आहे. रूग्णांची नाडी पकडण्याच्या आधी समाजाची नाडी कशी पकडायची, याचे शिक्षण मला राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून मिळाले. 'आरोग्य सेना' ही लातूरच्या भूकंपापासून ते परवाच्या चेन्नईच्या पुरापर्यंत प्रत्येक वेळेस प्रत्यक्ष आपत्तीच्या वेळी 'आरोग्यसेना' तिथे जाऊन मोफत सेवा करते. आपत्तीचे दणके थांबणे शक्य नाही, पण आपत्तीच्या वेदना कमी करणे, हे आपल्या हातात आहे. त्यासाठी वैद्यकीय पथकामध्ये सर्वसाधारण माणूस उभा केला पाहिजे, त्यासाठी समाजशिक्षणाची सुरूवात झाली ती १९९३ सालापासून, कारण फक्त डॉक्टर पुरेसे नाहीत. आतापर्यंत आरोग्यसेनेने १४,००० लोकांना प्रशिक्षण देऊन उभे केले आहे.

य.दी. फडके व भा.दी. फडके हे दोघेही अत्यंत विद्‌वान हाडाचे विश्लेषक, चिकित्सक होते. अशी दोन महान भावांची जोडी भारतात ऐकमेव असेल. जेव्हा आपण ब्राह्मणशाहीवर तुटून पडतो तेव्हा हल्ला ब्राह्मण्याच्या प्रवृत्तीवर केला, पण हा हल्ला जेव्हा ब्राह्मणावर केला जातो, तेव्हा तो जातीवर जायला सुरूवात होते.

काही कादंबरीकार, चरित्रकार काही व्यक्तींचे आयुष्य अवास्तव फुलवतो व घडलेल्या घटना त्या महान व्यक्तीला चिटकवतो. अशी माणसे खरे चरित्र समाजापुढे आणण्यास असमर्थ असतात. माझ्या दृष्टीने अशा चरित्रांची किंमत शून्य असते. याला मी बालबोधचरित्र म्हणतो. काही तटस्थ चरित्रकार तटस्थपणे चरित्र लिहितात. काही चरित्रकार विचारचरित्र लिहित असतात, डॉ. भालचंद्र फडके यांसारखे मला विचारचरित्र लिहिणारे चरित्रकार आवडतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जेव्हा राजकारणात विभूती पूजा येते, तेव्हा राजकारणाचं अध:पतन झालेल असतं. हा जगाच्या अध:पतनाचा सिद्धांत आहे. पण जेव्हा डॉ. भालचंद्र फडके यांनी या भाषणाचा संदर्भ लिहिला, तेव्हा ते कोठेही विभूती पूजेमध्ये अडकले नाही. खरा मोठा माणूस हा वास्तवामध्ये अधिक मोठा असतो, त्याच्यावर मखर चढवायची, सजवायची गरज नसते. कारण

तो त्याच्या विचारांनीच मोठा होत गेलेला असतो. बाबासाहेबांचे चरित्र हे डॉ. फडके यांनी अशा पद्धतीने लिहिले आहे. बाबासाहेबांच्या यश—अपयशाचा आलेख म्हणजे चवदार तळ्याचा सत्याग्रह, मंदिर प्रवेश, स्वतंत्र पक्षस्थापना, त्यातून आलेले अपयश व त्यातून आलेले नैराश्य. पण या चरित्राच्या सुरूवातीला डॉ. भालचंद्र फडके यांनी त्यांच्या प्रतिभेचा आविष्कार दाखविला आहे. बाबासाहेबांचे एक काल्पनिक चरित्र लिहिले आहे. असे लिहिण्यासाठी ती व्यक्ती विद्वान असावी लागते व संदर्भाचा खजिना असावा लागतो.

संगीत किंवा त्यासारख्या गोष्टींनी समाजाची मानसिकता एखाद्या स्तरापर्यंत पोहचण्यासाठी उपयोग होतो. पण खरे अक्षर साहित्य हे खऱ्या अर्थानं समाज शिक्षणाचे प्रभावी साधन आहे, पण या साहित्यामध्ये रोचकतेचा अभाव असतो. डॉ. भालचंद्र फडके यांच्यासारख्या तळागाळात, वस्त्या—वस्त्यात फिरणारा साहित्यिक नाही. सर्वच महापुरूषांवर दरोडे घातले जातात, यावर बाबासाहेब कसे अपवाद ठरू शकतील. काही दिवसांनी बाबासाहेबांना शोधायला नागपूरला जायला लागले तरी आश्चर्य वाटायला नको. प्रकाश आंबेडकरांची मुलाखत आली होती. त्यात त्यांनी म्हटले की, बाबासाहेबांना संघपरिवाराने कितीही चोरायचा प्रयत्न केला तरी त्यांना ते पचणार नाही. संघ परिवाराचे वैशिष्ट्य असे आहे की, एखादा महापुरूष जर आपल्या विचारांच्या विरूद्ध असेल, त्याच्या विरोधी विचारांना संपवणे शक्य नसेल तर त्या महापुरूषाला कवटाळायचं व त्याला ओलांडून पुढे जायचे, आर्य व ब्राह्मण संस्कृतीचे असे वैशिष्ट्य आहे. बुध्दाची लोकायतधारा व धम्माची धारा संपवता येत नाही, म्हणून त्या बुध्दाला विष्णूचा अवतार ठरवून टाकला. म्हणून अशा वेळी डॉ. भालचंद्र फडके व त्यांचे साहित्य आठवते. त्यांचे व्याख्यान समाजाला व समाजाच्या आरोग्याला उन्नत करणारे असते.

'डॉ. आंबेडकर आणि गांधी' ही डॉ. फडके यांची दुसरी गाजलेली कलाकृती (नाटक). एक नाटककार म्हणून डॉ. भालचंद्र फडके कसे होते, यापेक्षा ही कलाकृती जास्त श्रेष्ठ मी म्हणेन. डॉ. फडके यांनी गांधींना खलनायक करण्याचा प्रयत्न केला नाही तर गांधी व आंबेडकर हे समांतर दाखविले आहेत. सावरकरांनी 'सात सोनेरी पाने' या पुस्तकात बौध्द धर्माविषयी, बुध्दांविषयी व आंबेडकरांविषयी विष ओकले होते, त्याविषयी कोण काही बोलत नाही. अशा प्रकारचे विष डॉ. फडके यांनी कधीही ओकले नाही.

डॉ. भालचंद्र फडके यांच्याविषयी बोलताना त्यांच्या भावासंदर्भात उल्लेख करणे गरजेचे आहे, कारण स्वत: भालचंद्र फडके यांना य.दी. फडके यांचा अभिमान वाटतो. आज देशात भयाचे वातावरण आहे. चळवळी दडपण्याचे कारस्थान चालू आहे. डाव्या विद्यार्थी नेत्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न चालू आहे आणि हे अपघाताने घडत नाही. डॉ. बाबासाहेबांची राज्यघटना टिकेल की नाही, असा प्रश्न तयार होत आहे. या देशात हुकुमशाहीचे, धर्मांधतेचे वातावरण दिसत आहे. या पाश्‍र्वभूमीवर पुरस्कार वापसी झाली, त्यामध्ये मी देखील जाहीरपणे पुरस्कार परत केला, पण हे पुरेसे नाही. या देशाची व्यक्तीस्वातंत्र्य, अभिव्यक्तीस्वातंत्र्य, समाज व्यवस्था आणि लोकशाही हे सर्व साहित्यात आले असता साहित्यिकांचा वर्ग गप्प का?

ज्यावेळी हुकुमशाही आली तेव्हा साहित्यिक हुकुमशाहीच्या बाजूने होते, पण भालचंद्र फडके हे त्यांच्या विरोधात उभे होते. भालचंद्र फडके व य.दी. फडके यांमध्ये निडरता होती. आजही माझ्यासारखा माणूस क्षण—क्षण बाबासाहेबांचा विचार करतो व त्यांच्याबदद्लचे ज्ञान डॉ. भालचंद्र फडके यांच्या साहित्यातून मिळते. डॉ. फडके यांनी बाबासाहेबांचे विविध विचारांचे संकलन केले व इंग्रजीतही लिहिले.

डॉ. आढाव हे नंतरच्या सूत्रसंचालनामध्ये म्हणतात की, डॉ. फडके यांना बाबासाहेबांचा विचारांचा वसा आणि वारसा लाभला आहे आणि त्यांचे साहित्य हे समाज परिवर्तनाचे साधन आहे व 'लोकशाहीचे चिंतन' हा ग्रंथ आजच्या परिस्थितीला लागू होऊ शकतो. लोकशाही जिवंत राहण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांकडे लक्ष केंद्रित केले आहे. आपल्या व्यस्त जीवनातून येथे आल्याबद्दल मी डॉ. अभिजीत वैद्य यांचे आभार मानतो.

डॉ. मनोहर जाधव यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी डॉ. मनोहर जाधव म्हणाले की, मी डॉ. फडके यांना पाहिलेला व त्यांच्याशी बोललेला विद्यार्थी होतो. त्यांनी एका नाट्यशिबिरात अध्यापन केले होते, तिथे मी विद्यार्थी होतो, सातारा येथील कॉलेजमध्ये नाट्यशिबिर होते, तिथे 'अस्मिता दल साहित्य मेळावा' होत होता. तिथे साहित्यातील व्यक्ती स्वखर्चाने यायचे. डॉ. फडके रात्रभर प्रवास करून सकाळी तिथे यायचे. अंघोळ करून फ्रेश

चेहऱ्यानी पुढे यायचे आणि अजिबात थकायचे नाही. एस.एस.सी. बोर्डामध्ये ते सदस्यदेखील होते, डॉ. फडके माणूस म्हणून उमदा होते व विद्‌वानही होते. ते विद्यार्थ्यांना मदत करायचे. 'युगयात्रा' नाटकाचे सूत्रधार भालचंद्र फडके होते; ते नाटक भूमि चिटणीस यांनी लिहिले होते. डॉ. फडके यांच्याबद्दल *'दलित फडके'* असे म्हटले जायचे, त्यांपैकी त्यांच्या पत्नी यांनी एक निबंध लिहिला होता, *'माझे दलित फडके'*. खूप सुंदर लेखन होते.

अस्मिता दलाच्या मेळाव्यात आम्ही गेलो होतो, तेव्हा सर्व मोठी माणसं पुढे मांडी घालून बसली होती. तेव्हा मला डॉ. फडके यांनी सांगितले, "आदिवासी कवीची शब्दफेक कशी आहे बघ". त्यावेळी सर्व कवींना वाटायचं की, भालचंद्र फडके यांनी माझ्या कवितेला प्रस्तावना लिहावी व डॉ. फडके यांना सर्वांची प्रस्तावना लिहायला आवडायचे, कारण त्यांचे धोरण हे सर्वांना पाठिंबा देण्याचे होते. डॉ. फडके यांनी कथांचे, लेखांचे संपादन केले होते, त्याच्यामागे एक भूमिका होती.

शेवटी डॉ. फडके इतके आजारी होते की, त्यांना लिहायला होत नव्हते, त्यांचा चेहरा खूप निरागस होता. मी एक महाराष्ट्र साहित्य परिषदेत लेख लिहिला होता, तेव्हा डॉ. फडके यांनी पत्र लिहून माझे कौतुक केले होते. माझ्यासारखा खेड्यातून आलेला विद्यार्थी डॉ. फडके यांना भेटू शकला व त्यांच्यापासून शिकू शकला, याचा मला अभिमान वाटतो. डॉ. जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. अभिजीत वैद्य, प्रा. तेज निवळीकर, डॉ. धनंजय लोखंडे, डॉ. विलास आढाव व श्रोत्यांचे आभार मानले.

यानंतर डॉ. आढाव म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांनी 'भारतातील जाती संस्कार: त्यांचा उगम आणि उत्पत्ती', हा लेख, ९ मे १९१६ साली २५ वर्षांचे असताना लिहिला होता. बाबासाहेब प्रत्येक वेळेस बदलत गेले आहे, पण जाती नष्ट झाल्या आहेत का? दलित साहित्यामध्ये प्रेरणेचा स्त्रोत डॉ. फडके यांनी निर्माण केला. त्याबदद्‌ल हे चर्चासत्र आयोजित केले होते.

यानंतर चर्चासत्राचे समन्वयक डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता यांनी आभार प्रदर्शनात आपले मत व्यक्त करताना म्हटले की, ''समाजशिक्षण' देशाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यात मोलाची भूमिका बजावित असून आपण सगळे समाजशिक्षणाची व्याप्ती

वाढविण्यासाठी कटीबद्ध आहोत. यासाठी हे चर्चासत्र आपणास नक्कीच मार्गदर्शक ठरणार, अशी आशा करतो. हे चर्चासत्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभाग आणि प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते, यासाठी मी विद्यापीठाचे कुलगुरू, प्रशासकीय विभाग, मराठी व प्रौढ निरंतर शिक्षण यांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, इतर उपस्थितांचे आणि साहाय्यकांचे आभार व्यक्त करतो.' अशा पद्धतीने चर्चासत्राचा समारोप करण्यात आला.

पुढील पानावर या चर्चासत्रामध्ये सहभागी आणि तज्ज्ञ अभ्यासकांनी सादर केलेले संशोधन प्रबंध आणि या विषयासंबंधित माहिती दिलेली आहे.

# समाजशिक्षण : काल, आज आणि उद्या

**डॉ. कैलास बवले**

समन्वयक,

डॉ. धनंजयराव गाडगीळ शाश्वत ग्रामविकास केंद्र,

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

**समाजशिक्षणातून समाजपरिवर्तनाची ही चळवळ महाराष्ट्रात आणि इतरत्रही संतपरंपरेतून आली आहे. समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक जडण—घडणीत या संतपरंपरेचे मोठे योगदान असते. महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव, नाथ, वारकरी, दत्त इ. भक्ती संप्रदायांचे महत्त्वाचे योगदान आहे. देश व जागतिक पातळीवरील समाजशिक्षणात बौध्द, जैन, शीख, ख्रिस्त, मुस्लिम या धर्मातील धर्मगुरूंनी लोकसंवाद साधून समाजशिक्षणाचे मोलाचे कार्य केले आहे.**

बदल हाच चैतन्यमय जीवनाचा स्थायीभाव आहे. बदलत्या समाजातील लोकशिक्षण हेही सातत्याने बदलत असल्याचे दिसून येते. लोकतत्त्वाच्या माध्यमातून लोकशिक्षण हे समाज शिक्षणाचे मूळ आहे. समाज तीन प्रकारे शिक्षण घेत असतो. अनौपचारिक, औपचारिक आणि सहज शिक्षण. आजही अनौपचारिक व सहज शिक्षण हे समाज शिक्षणाची मोठी जबाबदारी पार पाडत आहे.

वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतांनी भागवत धर्मप्रसाराचे कार्य करताना समाजोध्दाराच्या तळमळीतून विविध स्वरूपाची साहित्यनिर्मिती केली. लोकसंवाद हे त्यांच्या साहित्याचे प्रमुख वैशिष्ट्य. त्यासाठी त्यांनी लोकतत्त्वाचा प्रभावी वापर केला. लोकांनी, लोकांसाठी निर्माण केलेले लोकांचे तत्त्व वापरण्यासाठी या संतांनी अभंग, गौळण, भारूड, विराणी, वासुदेव अशा वेगवेगळ्या प्रकारची साहित्यनिर्मिती केली व ती प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचविली. समाजशिक्षणाचे अनौपचारिक पध्दतीने काम करणारे हे संत म्हणजे पहिले लोकशिक्षक होत. आत्मोध्दाराबरोबर लोकोध्दाराचे व्रत त्यांनी स्वीकारले होते.

बुडती हे जन, न देखवे डोळा ।

येतो कळवळा म्हणुनिया ।।

संत तुकारामाचा हा अभंग समाजाप्रती संतमनाचे तळमळीचे प्रतिनिधित्व करतो. बाराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत या संत संप्रदायाने मूल्याधिष्ठित समाजशिक्षणाचे कार्य केल्यानंतर ही समाजशिक्षणाची धुरा समाजसुधारकांनी आपल्या खांद्यावर घेतली. महात्मा फुले, गो.ग. आगरकर, महर्षी धोंडो कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचा समाज परिवर्तनासाठी आणि समाजशिक्षणासाठी वापर करण्यासाठी जीवाचे रान केले. सत्यशोधक समाजाची निर्मिती हे स्वप्न उराशी बाळगून महात्मा फुले यांनी जी लोकशिक्षणासाठी साहित्यनिर्मिती केली व प्रत्यक्ष समाजोध्दाराची सत्यशोधक चळवळ उभी केली; ती त्या काळोतील समाजशिक्षणाचा उत्तम नमुना होता. शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब ते अखंडांची निर्मिती. या लोकसाहित्याचा त्यामध्ये समावेश होतो. महर्षी धोंडो कर्वे यांनी समाजातील उपेक्षित स्त्रीवर्गासाठी सावित्रीबाई फुले यांनी निर्माण केलेली शिक्षणाची वाट अधिक विस्तारित करण्याचे महत्कार्य केले. डॉ. बाबासाहेबांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र आपल्या समाजाच्या उध्दारासाठी समाजशिक्षणाच्या भावनेतूनच दिला.

संतपरंपरा ते समाजसुधारक या समाजशिक्षणातील प्रवासात एका सुजाण, सत्शील, सुसंस्कृत, मूल्याधारित समाजाची निर्मिती व्हावी, हा मुख्य धागा होता. शांती, सत्य, सहनशीलता, करुणा, सहकार्य या वैश्विक मूल्यांचा त्यामध्ये अंतर्भाव होता. यातूनच पुढे देशाच्या राज्य घटनेतील महत्त्वाची मूल्ये निर्माण झाली. समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही, सामाजिक न्याय, कायद्याचे राज्य, आदर, ही समाजबांधणीची मूल्ये समाज शिक्षणाचा एक भागच होती. अनौपचारिक शिक्षणाची सुरूवात झाली आणि समाज शिक्षणासाठीचा साचेबध्द व ठोकळेबाज शिक्षण आकृतिबंध तयार झाला.

शेकडो वर्षांच्या या प्रवासात समाजाने विविध क्रांत्या अनुभवल्या. पहिली क्रांती होती कृषी क्रांती, मानवाच्या गरजा आणि त्या भागविण्यासाठी कृषीचा उपयोग इतक्या सीमित पध्दतीने त्या काळी समाजरचना होती. पुढे औद्योगिक क्रांतीमधून उद्योगप्रधान समाजाची निर्मिती झाली. उत्पादन तंत्र आणि समाजाची मानसिकताही बदलली. समतेच्या आणि त्यागाच्या मूल्यांकडून समाज विषमतेच्या

आणि भोगाच्या दिशेने प्रवास करू लागला. त्यातूनच अधिक लालसा, अधिक उपभोग व त्यासाठी अधिक उत्पादन, अधिक नफा व वाढती विषमता ही समाजाची वैशिष्ट्ये घडत गेली. लोकशिक्षणाची माध्यमेही बदलली. रेडिओ, दूरदर्शन अशी माध्यमे काही प्रमाणात समाजशिक्षणाचे कार्य करू लागली. तोपर्यंत समाज इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीला सामोरा जाऊ लागला. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातील ही ज्ञान—विज्ञान—संगणक व तंत्रज्ञानातील क्रांती समाजाचे स्वरूप बदलू लागली.

जगभरातील या क्रांतीमुळे महासंगणक आणि इंटरनेटचे जाळे यामुळे समाज जोडला जाऊ लागला आणि समाजशिक्षणासाठी या नवनव्या माध्यमांचा आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर होऊ लागला. ही चौथी क्रांती म्हणजे डिजिटल युगाची सुरूवात होय. विविध इलेक्ट्रॉनिक्स साधनाने आणि अधिकाधिक शक्तीमान स्मार्ट फोनने सतत जोडलेला समाज, हे आजच्या डिजिटल समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रचंड वेगवान आणि सामर्थ्यशाली साधनांच्या सहाय्याने अव्याहत चालणारे समाज शिक्षण वा आजीवन सहज शिक्षण हे आजच्या समाजशिक्षणाचे स्वरूप आहे. त्यात मूल्य घसरणीचा वेगही वाढला आहे. उद्याच्या समाजशिक्षणामध्ये आणि समाज विकासामध्ये या डिजिटल शिक्षणाचा मोठा वाटा असणार आहे. क्षमतावर्धन व स्वयंसिध्दता आणि समाजोपयोगिता ही त्या समाजशिक्षणाची त्रिसूत्री असेल.

जागतिक पातळीवरील माहिती, ज्ञान—मूल्ये, खुली शिक्षण संसाधने, यांच्या प्रभावी वापरातून स्थानिक पातळीवरील, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, इत्यादी समस्यांचे निराकरण करण्यासाठी डिजिटल युगातील उपलब्ध व्यवस्थेचा वापर करणारे शिक्षण, हे खरे भविष्यातील लोकशिक्षण असणार आहे. अशा या समाज शिक्षणातून सामाजिक संपत्तीची निर्मिती आणि त्याच्या वापरावर समाजाचा अधिकार, असे क्रांतिकारक बदल या सोशल मिडियाच्या डिजिटल समाजशिक्षणात अपेक्षित आहेत. मात्र, मूल्यव्यवस्थेच्या पायावरच ही इमारत उभी राहील, हे आपण सर्वांनी लक्षात घ्यायला हवे.

# आदिवासी विकासासाठी समाजशिक्षणाचे महत्त्व

**डॉ. धनंजय लोखंडे**
प्राध्यापक – संचालक व विभागप्रमुख
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**भाऊसाहेब महिरास**
संशोधक विद्यार्थी, (समाजकार्य),
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**प्रस्तावना:**

आदिवासी समाज आणि या समाजाच्या चालीरीती, संस्कृती, समस्या, राहणीमान आदी बाबींसंबंधी अभ्यासकांना आणि इतर समाजाला माहिती होत आहे. माध्यमे, सोशल नेटवर्किंग, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते इत्यांदीमुळे यात भर पडलेली आहे. गेल्या साठ वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा इतर समाजातील लोकांशी संपर्क आणि संवाद वाढलेला आहे. संस्कार, संस्कृती, आचार–विचार यांची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

आदिवासींच्या प्रगतीसाठी स्वातंत्र्यपूर्वीच्या कालखंडात ज्या समाजसेवकांनी आणि सुधारकांनी मोलाचे योगदान दिले होते, त्यांच्या कार्याला आजच्या युगात खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. यामध्ये आदिवासी युवा शक्तीचे कार्य उल्लेखनीय आहे. सामाजिक संस्था आणि शासनाने दिलेला मदतीचा हात यांमुळे आदिवासी समाजसुधारणेच्या कार्याला काही प्रमाणात गती मिळत आहे. महाराष्ट्रात अनेक आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जीवन, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, चालीरीती, धार्मिकता यांच्यात सारखेपणा दिसून येत नाही. प्रत्येक जमातीमध्ये वेगवेगळी वैशिष्ट्ये आढळतात. प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन हे सभोवतालच्या भौगोलिक, आर्थिक आणि परंपरागत चालत

आलेल्या आणि रूढ झालेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे, असे असले तरी सर्वसामान्य आदिवासींचे जीवन, त्यांची मूल्ये आणि वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळतो.

आधुनिकीकरणामुळे समाजातील सर्वच घटकांमध्ये अनेक स्थित्यंतरे होत असली तरी अजूनही आदिवासींच्या रोजगाराचा प्रश्न प्रगत समाजाच्या तुलनेने अधिक भीषण अवस्थेत आहे. भरमसाठ प्रमाणात होणारी जंगलतोड, झपाट्याने वाढणारे शहरीकरण, जंगलावर वाढते अतिक्रमण अशा अनेक कारणांमुळे आदिवासी समाज जंगलांशिवाय पोरका होत आहे. बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे अशिक्षित बांधवांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातीलच एक गंभीर समस्या म्हणजे 'कुपोषण' ही होय.

आदिवासींचा रोजगार व उदरभरण, पोषण हे पूर्णपणे जंगल संपत्तीवर अवलंबून आहे. अनेक मार्गांनी जंगल संपत्तीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. यामुळे आदिवासींच्या हातातील हक्काचे काम म्हणजे जंगल संपत्ती गोळा करणे व जवळच्या बाजारात जावून नाममात्र किंमतीच्या वस्तू विकणे. उदा. डिंक, हिरडा, जडीबुटी, वनौषधी आदिंची विक्री करून उदरनिर्वाह करणे, जिकरीचे झाले आहे. यातून आदिवासी युवकांमध्ये व्यसनांचे प्रमाण वाढले आहे व मद्य विक्री व्यवसायाकडे वळू लागले आहेत. यातून कुटुंबाकडे दुर्लक्ष, जुन्या रूढी—परंपरांचे वर्चस्व, प्रगत समाजापासून लांब राहण्याची मानसिकता, संकोचतवृत्ती यामुळे आदिवासी समाजात रोजगाराचा पूर्णत: अभाव, त्याकरीता होणारे स्थलांतर, प्रचंड दारिद्रय, परिणामी गर्भवती, बाळांतीणीची व बालकांच्या आरोग्याची हेळसांड यातून, कुपोषणाचे दृष्ट चक्र सुरू होते व ते बालमृत्यूपर्यंत येऊन पोहचते. अशा अनेक अडचणींना आदिवासी समाज सामोरे जात आहे. त्यांच्या विकासाला काही प्रमाणात हातभार लावणाऱ्या विविध शासकीय योजना आहेत.

**विकास योजनांची अंमलबजावणी :**

आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी कल्याणाकरीता अनेक योजना राबवल्या जातात. पण त्यापैकी खरोखरच आदिवासी भागात किती योजना पोहोचतात? विस्थापित, बेरोजगारी, जुन्या रूढी—परंपरा, प्रगत समाजाकडून होणारे शोषण, मागासलेपण, कुपोषण आदी समस्यांनी पोळलेल्या आदिवासींच्या शाश्वत विकासाची त्यांची जबाबदारी सरकारने घ्यावी, असे अनेक समाजसुधारक, सामाजिक

कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक यांनी सुचवून झाले आहे व त्या आधारावर शासनाकडूनही प्रयत्न केले जात आहेत. परंतु योग्य लाभार्थ्यांपर्यंत योग्य योजनांचा लाभ पोहचवणे व योजनांची परिणामकारकता वाढविण्यासाठी, लोकसहभाग मिळवण्यासाठी तसेच आदिवासींच्या शाश्वत विकासासाठी शासनस्तरावरून ठोस प्रयत्न करण्याची आजही आवश्यकता आहे. देशातील आदिवासींची एकूण लोकसंख्या पाहता शासकीय प्रयत्न कशाप्रकारे केले जात आहेत, याची प्रचिती त्या योजनांचा आढावा घेतल्यास येते.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्या १,२१,०५,६९,५७३ एवढी असून त्यापैकी आदिवासी समाजाची लोकसंख्या १०,४२,८१,०३४ एवढी आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या आदिवासी समाज हा ८.६१ टक्के आहे.

देशातील आदिवासी लोकसंख्येचा विचार करता केंद्र व राज्य शासन पुरस्कृत अनेक योजनांच्या माध्यमातून आदिवासी विकासाकरीता व्यापक प्रयत्न केले जात आहेत. या योजनांमधील पुढील पाच योजना या आदिवासी युवकांना स्वयंरोजगार व समाजशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या आहेत.

१. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना,

२. स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना,

३. सैन्य तथा पोलीस भरती प्रशिक्षण योजना,

४. मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना,

५. अनुसूचित जमातींच्या उमेदवारांसाठी सेवायोजना नोंदणी.

**विकास योजना अंमलबजावणीतील अडचणी**

राज्यात आदिवासींच्या विकासासाठी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्यातील आदिवासी लोकसंख्या प्रमाणात स्वतंत्र ९ टक्के इतक्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. हेतू हा की, समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अतिदुर्गम, निर्जन स्थळी वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी जमातीसाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार व निवारा या चार प्रमुख बाबींसंदर्भातील पायाभूत सुविधा योग्य प्रकारे राबविणे आवश्यक

आहे. परंतु आदिवासी विकास विभागातील काही तांत्रिक अडचणींमुळे योजना व त्यांचा निधी शेवटच्या माणसांपर्यंत पोहचतोच असे नाही. नवसंजीवन योजना, अंत्योदय धान्य योजना, शेतीविषयक पूरक योजना तसेच खावटी योजनेतील धान्य लोकांपर्यंत पोहचण्यात अडथळे येतात. आदिवासींच्या नावाने बनावट जातींचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळवून शैक्षणिक व शासकीय सेवेत आरक्षणाचा लाभ घेणारे बिगर आदिवासी समाजही तितकाच जबाबदार आहे आणि म्हणूनच अर्थसंकल्पातील आदिवासींच्या सर्वाधिक निधी बोगस आदिवासी समाजाकडून बळकावले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारे आदिवासी विकासाच्या अनेक योजना असल्या तरी वरील अडचणींमूळे आदिवासी बांधव त्यांच्या हक्कांपासून वंचित राहत आहेत.

आधुनिक काळात आदिवासी मुले—मुली शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेऊ लागले आहेत. त्यांच्यासाठी शासनातर्फे अनेक योजना, प्रशिक्षण सोयी, अभ्यासक्रम व भत्त्यांची सोय केलेली आहे, पण बेकारीचे वाढते स्वरूप व रोजगार संधीचा अभाव, यामुळे नोकरी शोधताना त्यांना देखील अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शासनाची मदत किंवा योजना प्रत्येक आदिवासी कुटुंबापर्यंत पोहोचतेच असे नाही, म्हणून 'कलेतून स्वयंरोजगाराकडे वाटचाल', हे एक आशावादी पाऊल ठरू शकते. वर्तमानकाळात बेरोजगारीवर एक चांगला उपाय म्हणजे 'स्वयंरोजगार' होय. स्वयंरोजगार तीन प्रकारे करता येतात:

१. उच्च आणि तांत्रिक प्रशिक्षण प्राप्त करून, २. असंघटित आणि ग्रामीण क्षेत्रात कृषी किंवा कृषीपूरक व्यवसायांच्या माध्यमातून, ३. स्थानिक साधनसंपत्तीवर आधारित गृहउद्योग. यांच्या माध्यमातून आदिवासी समाज वरीलपैकी दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या स्वंयरोजगारांची निर्मिती करू शकतात व त्यातून इतर अनेक हातांना काम मिळवून देऊ शकतात. याचे दुहेरी फायदे होतील. एक तर, आदिवासींना आर्थिक उत्पन्न प्राप्त होईल आणि दुसरे म्हणजे, आदिवासींच्या कलेची जोपासना करता येईल. आदिवासींना आर्थिक उत्पन्नाचे मार्ग सापडल्यास, त्यातून आदिवासींचे सक्षमीकरण व आदिवासी विकासाच्या समाजशिक्षणाचे ध्येय साध्य करता येईल आणि आदिवासी विकासाला एक नवी दिशा मिळेल. स्वयंरोजगारातून खालील बाबी साध्य होतील:

१. आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख साधन उपलब्ध होईल.

२. आदिवासी हस्तकला व पारंपरिक वस्तूंची जोपासना होईल.

३. विशेष प्रशिक्षणाशिवाय या कलांचा प्रसार करणे शक्य होईल.

४. आदिवासी समाजामध्ये संघटितपणा व एकात्मता वाढेल.

५. आदिवासी समाजामध्ये आत्मविश्‍वास व जागरूकता निर्माण होईल.

६. आदिवासी समाजाला बाहेरच्या जगाचा परिचय होईल व व्यवहार ज्ञानात भर पडेल.

७. कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावल्यामुळे राहणीमानाचा स्तर उंचावण्यास मदत होऊन ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील.

८. वैचारिक देवाणघेवाणीतून अनेक समस्यांवर प्रकाश टाकता येईल.

९. शिक्षण, प्रशिक्षणाचे प्रमाण वाढून आदिवासी समाजाच्या गुणात्मकतेत भर पडेल.

१०. हस्तकलेवर आधारित स्वयंरोजगारामुळे देशाच्या आर्थिक विकासालादेखील हातभार लागेल.

आदिवासी समाजाला अवगत असलेली आणि परंपरागत कला स्वयंरोजगाराच्या स्वरूपात रूपांतरित करता आली तर त्यांच्यासाठी विकासाचे एक नवे दालन खुले होईल. जीवनाचा कायापालट करणारे ते एक प्रकाशपर्व ठरेल. थोडक्यात, आदिवासी समाज नैसर्गिक साधनसामुग्रीला आपल्या कल्पकतेच्या आधारावर विविध व नित्य उपयोगाच्या वस्तूमध्ये रूपांतरित करून हस्तकौशल्याद्वारे त्यांची उपयोगिता वाढवून, बाजारपेठांपर्यंत पोहचू शकतात; यासाठी त्यांना कौशल्यांवर आधारित प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

आदिवासी विकासात स्वयंरोजगाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आदिवासींनी त्यांच्या कलांना स्वयंरोजगाराच्या स्वरूपात जगासमोर आणले तर त्याचे अर्थव्यवस्थेत फार मोठे योगदान ठरेल. एवढेच नाही तर ग्रामीण क्षेत्रातील रोजगारांच्या संधीत वाढ होईल,

आर्थिक व सामाजिक विषमता कमी होण्यास साहाय्य होईल, उपलब्ध नैसर्गिक सामुग्रीचा पूर्णपणे उपयोग करता येईल, कमी भांडवलाच्या सहाय्याने व्यवसाय सुरू करता येईल, सुबक व कलापूर्ण वस्तूंचे उत्पादन करणे सहज शक्य होईल, युध्दकाळात हस्तकलेवर आधारित उद्योग सुरक्षित राहतील, विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यास हातभार लागेल, शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी करता येईल, शेतीला जोडव्यवसायाच्या स्वरूपात व्यवसाय करता येईल. त्यामुळे बेकारीचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागेल, पर्यावरणपूरक व्यवसाय असल्यामुळे प्रदूषणासारखी समस्या निर्माण होणार नाही, आदिवासी कलात्मक वस्तूंची स्वतंत्र ओळख निर्माण होईल, आदिवासी संस्कृतीचे जतन करण्याची प्रेरणा निर्माण होईल, आदिवासी समाजाला शासकीय योजनांचा परिचय होऊन त्याचा लाभ घेता येईल, आदिवासी समाजाद्वारे निर्मित वस्तूंची स्वतंत्र ओळख निर्माण होऊन, त्यांना स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध होईल, देशाच्या एकूण आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यास या व्यवसायांचा उपयोग होईल.

आदिवासीबहुल क्षेत्रात आदिवासींच्या रोजगारावर भर दिल्यास, त्यांच्या पारंपरिक व्यवसायातून निर्माण होणाऱ्या वस्तूंचे मूल्यवर्धन केल्यास व प्रचार अणि प्रसार माध्यमातून त्यांना बाजार उपलब्ध करून दिल्यास आदिवासी समाजाची स्वंयरोजगाराकडे वाटचाल सुरू होईल.

## आदिवासी विकासातील समाज शिक्षणाचे महत्त्व :

आदिवासी विकासातील समाज शिक्षणाचे महत्त्व समजून घेताना आधी समाजशिक्षण व विकास या दोन संकल्पना समजून घेणे आवश्यक वाटते.

## समाजशिक्षण म्हणजे काय? :

अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून सुसंस्कृतपणा, सृजनशीलता, प्रामाणिकता, सहृदयता, प्रज्ञा, मैत्री, करुणा इत्यादी गुण निर्माण करून ते वृद्धिंगत करणे, त्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सांस्कृतिक असा सर्वांगीण विकास साध्य करणे म्हणजेच समाजशिक्षण होय.

**विकास म्हणजे काय? :**

बी. के. डी. यांच्या मते, ‘विकास ही अशी एक समग्र स्वरूपाची कृती—योजना आहे, की जी सामाजिक कृतींच्या सर्वच बाजूंमध्ये निर्देशित आणि मार्गदर्शनावर आधारीत असे परिवर्तन करू पाहते व त्याचा संबंध राष्ट्रीय प्रगतीशी असून नियोजित उद्दिष्टांची पूर्ती होण्यावर भर असतो’, थोडक्यात विकास म्हणजे सामाजिक कृतींच्या सर्व क्षेत्रात — सामाजिक, राजकीय, आर्थिक, आरोग्य, शैक्षणिक, पायाभूत सुविधा व सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातील सर्वांगीण प्रगतीची प्रक्रिया होय.

विकास कार्यक्रमांतर्गत आदिवासी जमातींचा बाह्य जगाशी व मुख्य प्रवाह संस्कृतीशी (Main – stream culture) घनिष्ठ संबंध घडून येतो. आदिवासी जमातीतील जितक्या जास्त व्यक्तींचा जीवनक्रम आणि जीवन जगण्याची पद्धती बदलेल, तितका विकास कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होईल.

आदिवासींच्या स्वयंरोजगारासाठी होत असलेल्या प्रयत्नांबरोबरच त्यांच्या समाजशिक्षणासाठी देखील विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. कारण समाजशिक्षणातून आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी आदिवासींच्या मनात असलेली संकुचित प्रवृत्ती, अलिप्ततेची भावना कमी होणे आवश्यक आहे. याकरीता आदिवासींना समाजशिक्षणामध्ये हेतुपुरस्सर समाविष्ट करणे आवश्यक आहे. दोन्ही समाजातील चांगल्या व पुरोगामी बाबींना प्रोत्साहन मिळण्यासाठी समाजशिक्षणातून चांगल्या प्रकारे प्रयत्न करता येऊ शकतात, याचे चांगले उदाहारण म्हणजे राष्ट्रीय येवा योजनेअंतर्गत व समाजकार्य अभ्यासाचा भाग म्हणून आदिवासी व ग्रामीण भागात निवासी शिबीरे आयोजित केली जातात. या शिबीरांमधून युवा वर्गास स्वावलंबनाबरोबरच समाजशिक्षणाचे धडेदेखील दिले जातात. यातून आदिवासींच्या एकात्मिक विकासाला मोठया प्रमाणात उपयोग होत आहे, म्हणून आदिवासी विकासासाठी समाजशिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

## संदर्भसूची

भारतातील अनौपचारिक शिक्षणाची वाटचाल, राज्य साधन केंद्र, पुणे, प्रथम आवृत्ती मार्च २०११.

आदिवासी विकास प्रशासन, डॉ. एस. जी. देवगांवकर, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.

आदिवासी विकास प्रशासन, डॉ. एस. जी. देवगांवकर, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.

http://adimculture.wordpress.com

http://www.censusindia.gov.in

http://www.marathisrushti.com/articles ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि)

# साक्षरता कार्यक्रम आणि डॉ. भालचंद्र फडके

**प्रा. तेज निवळीकर**
माजी संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपल्या देशात राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम १९७९ सालापासून सुरू करण्यात आला. या वर्षापासूनच डॉ. भालचंद्र फडके प्रौढ शिक्षणाच्या चळवळीत सहभागी झाले होते. वसतिगृहाचे रेक्टर म्हणूनही अनेक विद्यार्थ्यांना ते मदत करीत असत. प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभागाचे मानद संचालक म्हणून विभागाचे नेतृत्व ते करीत होते. विद्यापीठ, महाविद्यालयाच्या चौकटीत प्रौढ शिक्षण योजना कशी राबविली जाईल, अशी अनेकांच्या मनात शंका होती. परंतु डॉ. फडके यांचे समर्थ नेतृत्व लाभल्याने केंद्राधारित प्रौढ शिक्षण कार्यक्रम वेगवेगळ्या महाविद्यालयात जोमाने राबविला गेला. डॉ. फडके यांचा वावर संचालक म्हणून नव्हता तर एक कार्यकर्ते प्राध्यापक म्हणून ते अनेकांना मार्गदर्शन करत असत.

अनेक प्राचार्य, प्राध्यापकांशी त्यांचे वैयक्तिक आणि जिव्हाळ्याचे नाते होते. त्यामुळेच त्यांच्या शब्दाला अतिशय मान होता. प्रौढ शिक्षणाची योजना ही केवळ अक्षर ओळख नाही तर व्यापक अशा सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीशी संबंधित आहे, असे आग्रहाचे आणि प्रभावी विधान ते मांडत असत. त्यामुळे अनेक प्राध्यापक, सामाजिक जाणिवेपोटी या चळवळीत सहभागी झाले होते. विभागातर्फे प्रौढ शिक्षणाबरोबरच निरंतर शिक्षण योजनाही राबविली जात असे. या योजनेच्या अंमलबजावणीतही त्यांनी मनापासून भाग घेतला.

पुढे डॉ. भालचंद्र फडके मराठी विभाग सोडून प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभागात पूर्णवेळ संचालक म्हणून रूजू झाले. त्यामुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना काम करण्यास अधिक हुरूप आला. डॉ. फडके मराठी साहित्याचे ख्यातनाम प्राध्यापक म्हणून

सगळीकडे सुपरिचित होतेच; परंतु साहित्याच्या अभ्यासाबरोबरच सामाजिक चिंतन हाही त्यांचा खास विशेष होता. विशेषत: गरिबातला शेवटचा माणूस कसा उभा राहील, याबद्दल त्यांच्या मनात कणव तर होतीच; परंतु त्याहीपेक्षा तो स्वत:च्या अस्मितेने कसा बोलेल यावर त्यांचा कटाक्षाने भर होता. त्यामुळेच सामान्य माणसाने शिकावे. स्वत:वर होणाऱ्या अन्यायाबद्दल संघटितरीत्या ठाम उभे रहावे, असे त्यांना मनापासून वाटत असे. त्यामुळेच झोपडपट्टीतील अनेक नवसाक्षर महिलांचे मेळावे आम्ही पुणे विद्यापीठात आयोजित करू शकू. एवढेच नाही तर एकदा माझ्या आठवणीप्रमाणे दोनशे नवसाक्षर महिलांची सहल पुणे विद्यापीठात आयोजित केली होती. डॉ. बाबासाहेब जयकर ग्रंथालय, विद्यापीठातील इतर विभाग, विज्ञान विभागातील म्युझियम्स् हे सर्व दाखविल्यानंतर सर्व नवसाक्षरांना अतिशय वेगळा अनुभव आला. एवढेच नाही तर त्यावेळी पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदी असणारे डॉ. राम ताकवले यांनीही जातीने सर्व महिलांची भेट घेऊन मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. फडके यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय होता.

त्यांनी लगेच सांगितले, ''निवळीकर, या सर्व महिलांना माझ्यातर्फे जेवण देतो. त्या दृष्टीने व्यवस्था करा''. सर्व महिलांची आम्ही जेवणाची व्यवस्था केली. पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमागील हिरवळीवर सर्व महिलांच्याबरोबर खाली बसून डॉ. फडके यांनी अतिशय आनंदाने भोजन केले. केवळ काहीतरी विद्यापीठाची ती योजना आहे, असे त्यांना वाटतच नव्हते. त्यांच्या काळातच कवी नारायण सुर्वे, बाबुराव बागुल, विद्या बाळ, डॉ. आनंद यादव असे किती तरी साहित्यिक कार्यक्रमाच्या निमित्ताने सहभागी झाले. तसेच एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, गं. बा. सरदार, वि. वि. चिपळूणकर, सत्यरंजन साठे, बाबा आढाव इत्यादी विचारवंतांनीही वेगवेगळ्या कार्यक्रमात सहभागी होऊन मार्गदर्शन केले.

डॉ. फडके यांचा संबंध केवळ पुणे विद्यापीठाच्या प्रौढ शिक्षण विभाग किंवा महाविद्यालय एवढ्यापुरताच नव्हता तर अखिल भारतीय पातळीवर प्रौढ शिक्षणाची दिशा कशी असावी, हे ठरविण्यातही त्यांचा

सहभाग असे. त्यांच्या काळातच अखिल भारतीय पातळीवरील अनेक परिषदा, चर्चासत्रे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलीत. डॉ. रामलालभाई पारीख, डॉ. एस.सी. भाटिया, एम.एल्. मेहता, नानुभाई जोशी, जय गोपाळ, कमलिनी भंसाळी, डॉ. माधुरीबेन शहा यांच्याशी प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या संदर्भात अतिशय जवळचे संबंध होते. डॉ. फडके एखादा मुद्दा चर्चासत्रात इतका ठासून मांडत की सर्व तज्ज्ञ मंडळींना तो मुद्दा मान्य करावाच लागे. असेच एकदा अखिल भारतीय पातळीवर एक कॉन्फरन्स पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आली होती. या कॉन्फरन्समध्ये देशातील वेगवेगळ्या विद्यापीठाचे कुलगुरू, प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागाचे संचालक, सहाय्यक संचालक आणि ज्ञान विस्तार कार्यक्रमातील तज्ज्ञ हे सहभागी झाले होते. या परिषदेत अनेक मान्यवर मार्गदर्शन करणार होते. या परिषदेत अनेक सत्रांचे नियोजन करण्यात आले. त्यातीलच एक सत्र नवसाक्षर प्रौढांच्या मनोगताचेही असावे असे ठरले. खरंतर अशा कॉन्फरन्समध्ये असे सत्र असावे का? असे वाटत होते. परंतु डॉ. फडके यांच्या पुढाकाराने डॉ. गावकर यांच्या अध्यक्षतेखाली हे सत्र पार पडले. झोपडपट्टीतील अनेक महिलांनी आपली मनोगते व्यक्त केली. यात काही मुस्लिम महिलाही सहभागी झाल्या होत्या, तर वेगवेगळ्या हॉटेलमध्ये काम करणारे वेटर यांनी ही आपले अनुभव स्वत:च्या भाषेत कथन केले. पुणे विद्यापीठासारख्या नावाजलेल्या विद्यापीठात ही सर्व अनुभवकथने मांडताना ऐकणाऱ्यांना एक वेगळाच अनुभव येत होता.

सर्व नवसाक्षर स्वत:च्या बोली भाषेत अनुभव मांडत असत आणि सर्व अनुभव मनोगतांचे इंग्रजी भाषेत भाषांतर डॉ. भालचंद्र फडके करीत असत. यातलीच एक द्रौपदीबाई कदम आपले मनोगत मांडताना सांगत होती, ‘‘आता बगा साहेब, तुमी किती येगयगळ्या भागातून आलात. तुमच्या सगळ्यापुढं माझ्यासारख्या बाईनं काय भाषण करावं.? पण मया सांगते, फडकेसर लई देवमाणूस हाय. त्यांच्यामुळंच आज आमी इथ इद्यापिठात येऊ शकलो. आता तुमी म्हनताय, बाईनं भाषण करावं. पण खरं सांगू काय, उन्हात चालायचो,

फुफाट्यात पाय लई पोळायचे, प्रौढ शिक्षणाची चप्पल मिळाली आन पाय पोळायचेच थांबले की. आन् म्हणूनच म्हंते आतापर्यंत म्या अंधारात् व्हते पण आता या शिक्षणाने उजेडात आल्यासारखे वाटते.'' द्रौपदाबाईंचे हे मनोगत ऐकताच साऱ्या सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. अनेक प्रतिनिधींनी डॉ. भालचंद्र फडके यांच्या या अभिनव उपक्रमाबद्दल अभिनंदन केले.

औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा अनौपचारिक शिक्षणातूनच माणूस घडत असतो. आपण समाजातील निरक्षरांना साक्षर करतो असे न वाटता आपणही समाजातून शिकत असतो. असा दृष्टिकोन ते आमच्यावर बिंबवत असत. गरीब मनुष्य निरक्षर असेल परंतु तो अडाणी नाही या दृष्टिकोनानेच काम केले पाहिजे, असे ते आग्रहाने सांगत. हे सांगताना सुध्दा अतिशय अनौपचारिक पध्दतीने पटवून देत. त्यामुळे डॉ. फडके हे आम्हा सर्वांना एक मार्गदर्शक पालकच आहेत असे वाटत असे.

विद्यापीठासारख्या व्यवस्थेत राहूनही सामाजिक कार्य करता येते आणि ते जाणीवपूर्वक केले पाहिजे असे त्यांना वाटे. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत गेला पाहिजे असे आग्रहाने ते मांडत आणि यासाठीच निरंतर शिक्षण योजना, साक्षरता कार्यक्रम, लोकसंख्या शिक्षण मंडळ, नियोजन मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ, दूर शिक्षण इत्यादी अनेक ज्ञान विस्तार योजनांच्या माध्यमातून डॉ. फडके यांनी कधी मार्गदर्शक म्हणून तर कधी प्रत्यक्ष फिल्डमध्ये येऊन सहभाग केला. कार्यालयात बसून काम करण्यापेक्षा प्रत्यक्ष लोकांतच गेले पाहिजे असे त्यांना वाटे आणि म्हणूनच कुकडेश्वरचा आदिवासी मेळावा, नंदुरबारला कंजारभाट समाजातील महिलांसाठी चालणाऱ्या प्रौढ शिक्षण केंद्राचे कार्य, एन. एस. एस. तर्फे काळदरीसारख्या उपेक्षित भागात झालेल्या शिबिरातील कार्यात, पुणतांब्याला झालेली बहि:शाल व्याख्यानमाला, मुस्लिम महिलांसाठी निरंतर शिक्षण योजनेमार्फत चालणाऱ्या शिलाई

मशिनच्या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रत्यक्ष जाऊन कार्यकर्त्यांना शाबासकी देणारे अशी अनेक रूपं त्यांची पाहिलेली आहेत.

**उच्च शिक्षणाचे तीन उद्दिष्टे आहेत** — १) शिकविणे, २) संशोधन करणे, ३) ज्ञान विस्तार. तत्त्वत: ही तिन्ही उद्दिष्टे जरी मान्य असली तरी प्रत्यक्षात मात्रच शिकविणे आणि संशोधन करणे या दोन उद्दिष्टांना जितके महत्त्व आहे तितके ज्ञान विस्तार उद्दिष्टाला महत्त्व नाही, हे प्रत्यक्ष व्यवहारातील अनुभवातून लक्षात येते. डॉ. फडके यांच्या वैचारिक चिंतनाचा गाभा असा सांगता येईल की या तिन्ही उद्दिष्टांना उच्च शिक्षणाच्या व्यवस्थेत समान महत्त्व असले पाहिजे तसेच शिक्षणामुळे आत्मविश्वास येणे आणि जीवनात स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी कौशल्य प्राप्त करता आले पाहिजे आणि म्हणूनच ते भाषणातून सांगत, साक्षरता हे साध्य नाही तर ते एक साधन आहे. मनुष्याची प्रगती होणे हे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यांच्या अशा वैचारिक मार्गदर्शनामुळेच पुणे विद्यापीठाच्या वेगवेगळ्या महाविद्यालयात एक्सटेंशन कल्चर तयार होऊ शकले हे मान्य करावे लागेल. या सर्व कामासाठी त्यामानाने त्यांना फार कमी कालावधी मिळाला. मराठीचे प्राध्यापक, साहित्यिक म्हणूनच आयुष्यातील बरीच वर्ष त्यांची गेलीत. यापेक्षा जर त्यांनी प्रौढ निरंतर व ज्ञानविस्तार विभागात काम करण्याची संधी अधिक वर्षे मिळाली असती तर या एक्सटेन्शन कार्यक्रमाला अजून वेगळी दिशा मिळाली असती असे वाटते. या सर्व उपक्रमातील त्यांचे योगदान समाजातील इतर लोकांना फार कमी माहिती आहे. ते केवळ विद्यापीठाचेच काम करत होते असे नाही तर अखिल भारतीय पातळीवरही एक्स्टेंशन कार्यक्रमाबाबत त्यांच्या शब्दांना मान होता. एवढेच नाही तर त्यांनी सुचविलेल्या कल्पना कार्यक्रमासाठी स्वीकारल्या जात असत आणि म्हणूनच एक्स्टेंशन कार्यक्रमाच्या दृष्टीने डॉ. फडके यांचा कालावधी म्हणजे प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभागाच्या आयुष्यातील सुवर्ण काळ होता.

समाजातील सामाजिक कार्य करणारा कार्यकर्ता नेहमीच उपेक्षित असतो. त्याच्या कामाच्या मानाने समाजात त्याला योग्य स्थान

मिळतेच असे नाही. त्यामुळे एखाद्या वेळी त्याला निराशा येऊ शकते. डॉ. फडके यांचा आग्रह असे, कोणत्याही परिस्थितीत कार्यकर्ता उपेक्षिला जाता कामा नये. कार्यकर्ता ही एक भूमिका आहे. सामाजिक विचारवंत आपल्या लेखनाद्वारे ज्याप्रमाणे सामाजिक प्रबोधनाचे काम करतात, त्याप्रमाणेच कार्यकर्ते आपल्या प्रत्यक्ष कार्यातून समाजघडणीचे काम करत असतात. खरं तर साहित्यामध्ये समाजातील वेगवेगळ्या व्यक्तिंचे स्वभाव चित्रण होत असते. परंतु प्रत्यक्ष काम करणारा कार्यकर्ता हा अशा व्यक्तींच्या जीवन प्रगतीसाठीच झटत असतो. त्याला खरं तर प्रोत्साहन देऊन समाजात मानाचे स्थान दिले पाहिजे. असे अनेक कार्यकर्ते साक्षरता चळवळीत काम करत होते. या सर्व कार्यकर्त्यांना त्यांनी अतिशय मायेने जोपासले. त्यांच्या वैयक्तिक सुख—दुःखात जातीने लक्ष घातले. त्यांच्या प्रेरणेनेच आज अनेक विद्यार्थी संघटक, पर्यवेक्षक आणि प्रभारी प्राध्यापक अनेक क्षेत्रात चमकत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे श्रध्दास्थान. साक्षरता प्रशिक्षण शिबिरातील व्याख्यानात डॉ. बाबासाहेबांबद्दलच्या अनेक आठवणी, त्यांचे विचार सांगून शिबिरार्थींना ते मंत्रमुग्ध करत.

सन १९७९ ते १९८६ या काळात त्यांनी दलित साहित्याच्या चळवळीला ज्याप्रमाणे बळ दिले, त्याप्रमाणे याच कालावधीत साक्षरता चळवळीलाही प्रोत्साहन देण्याचे काम केले. केंद्राधारित प्रौढ शिक्षणाचा पाया म्हणजे ‘वस्ती पातळीवर प्रौढ शिक्षण केंद्र’ होय. अशा केंद्रातून अनेक साक्षरता उपक्रमाच्या व्यतिरिक्त जाणीवजागृतीचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात याच कालावधीत मोठ्या जोमाने झाले. जाणीवजागृतीबरोबरच प्रौढांचा जीवनस्तर सुधारला पाहिजे, त्यासाठी अनेक आर्थिक उपक्रमही राबविण्यात आले. यासाठी त्यांनी कुठेही औपचारिकपणा दाखविला नाही. त्यामुळेच अनेक महाविद्यालयांमध्ये नवसाक्षरांचे मेळावे आयोजित करण्यात आले. अशा मेळाव्यांतून नवसाक्षरांचे मनोगत तर असतेच परंतु त्याबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमही करीत असत. प्रभारी प्राध्यापक, प्राचार्य, पर्यवेक्षक, संघटक यांचे टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण शिबिरे होत असत. अशा शिबिरातून बंदिस्त अभ्यासक्रम शिकविण्याऐवजी समाजातल्या असलेल्या विषयांना धरूनच अनेक

विचारवंत साहित्यिकांना मार्गदर्शनासाठी ते बोलवत. त्यामुळे साक्षरता चळवळीतील कार्यकर्त्यांचा न्यूनंगड कमी होत असे. एकीकडे असे नवनवे उपक्रम आयोजित करीत असतानाच अशा उपक्रमांवर आधारित वेगवेगळ्या वर्तमानपत्रात ते लिखाणही करत. असेच एकदा प्रौढ शिक्षण कार्यक्रमातील पर्यवेक्षकांचे शिबिर पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात अनौपचारिकपणे कौटुंबिक वातावरण डॉ. फडके यांनी तयार केले. हे अनुभव इतके अस्सल आणि धगधगते होते की ऐकणाऱ्यांचे मन सुन्न होत असे. असे अनुभव ऐकणारे अस्वस्थ होत असत. अजून समाजाचे किती काम करावे लागेल? कितीही कठीण प्रसंग आला तरीही परिस्थितीपुढे न डगमगता कार्यकर्त्यांनी ठाम उभे रहावे हे ते सांगत. या शिबिरार्थींच्या अनुभवावर आधारितच त्यांनी ‘दैनिक सकाळ’मध्ये लेख लिहिला. अनेकांनी लेख वाचला आणि साक्षरता चळवळीत सामाजिक प्रबोधनाचे इतके पायाभूत काम चालू आहे, याची अनेकांना जाणीव झाली. हा लेख वाचूनच प्रसिध्द साहित्यिक पु.ल. देशपांडे यांचे डॉ. फडके यांना अभिनंदनाचे पत्रही आले होते. अशा पध्दतीने वर्तमानपत्राबरोबरच आकाशवाणी, दूरदर्शन या जनसंपर्क माध्यमांचा उपयोग साक्षरता कार्यक्रमांच्या प्रसारासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात केला.

वयाच्या मानाने विचार केल्यास ते पाच जिल्ह्यातील दूरदूरच्या साक्षरता उपक्रमास इतक्या वेळा उत्साहाने सहभागी होत असत की त्यापुढे आम्हासारख्या तरूण कार्यकर्त्यांनासुध्दा अचंबा वाटे. एक वेळ आम्ही थकत असू, परंतु साक्षरता कार्यक्रमासंदर्भात दौरे करीत असतांना ते कधीही थकत नसत. उलट उत्साहाने ते कार्यकर्त्यांना प्रेरणा देत; नव्या नव्या कल्पना मांडत. एखाद्या ठिकाणी चांगला उपक्रम झाला असेल तर जाहीर शाबासकी कार्यकर्त्यांना देत असत. एखाद्या ठिकाणी काही काम झाले असेल, काही उणे जाणवले असेल तर न रागावता कोणत्या पध्दतीने काम केल्यास यश येईल हेही ते आपुलकीने समजावून सांगत. गरीब मनुष्य डोळ्यापुढे आणून त्याच्या भल्यासाठी सर्वांनी काम केले पाहिजे, असे त्यांना वाटे.

समाजातील संघर्ष दोन गोष्टीमुळे होतो, असे ते वेगवेगळ्या सभेत मांडत. एक क्रेडिट आणि दुसरे जेलसी. कारण नसतानाही व्यक्ती साध्यासाध्या बाबतीत क्रेडिट घेण्यासाठी धडपडत असते. या क्रेडिटसाठीच अनेक व्यक्तिमध्ये संघर्ष होतो. त्यामुळे साक्षरता चळवळीतील कार्यकर्त्याने क्रेडिटचे शेअरिंग करावयास शिकावे. या क्रेडिटप्रमाणेच जेलसी हाही मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण नसतांनाही एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची जेलसी करीत असते. या जेलसीपोटीच मतभेद होतात, द्वेष वाढतो. यामुळेच सार्वजनिक कामाला खीळ बसते. यासाठी साक्षरता चळवळ यशस्वी करायची असेल तर चळवळीतील कार्यकर्त्याने, अधिकाऱ्याने श्रेयासाठी भांडू नये आणि दुसऱ्या व्यक्तिची जेलसी करू नये, हे ते वडिलकीच्या नात्याने पटवून दाखवित.

पुणे विद्यापीठाचे प्रौढ, निरंतर शिक्षणाचे कार्य महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठातही चर्चिले जात असे. केंद्राधारित प्रौढ शिक्षणाबरोबरच (मास प्रोग्रॅम फॉर फंक्शनल लिटरसी) कार्यात्मक साक्षरतेचा सामूहिक कार्यक्रमही देशात मोठ्या प्रमाणात राबवावा आणि पुणे विद्यापीठ त्यासाठी एक मॉडेल तयार करेल, हाही त्यांचा संकल्प होता. एम.पी.एफ.एल. कार्यक्रमाची सुरूवात झाली. वेगवेगळ्या महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात लिटरसी किट्सचे वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमात नवीन हुरूपाने डॉ. फडके सहभागी झाले. जे केंद्राधारित प्रौढ शिक्षण केंद्रामध्ये करता आले नाही, ते अशा मासबेस कार्यक्रमात नवनवे प्रयोग करता येतील, असे आम्हासारख्या कार्यकर्त्यांना वाटत असतानाच सर निवृत्त झाले. त्यामुळे साक्षरता कार्यक्रमातील नव्या कल्पना राबविता आल्या नाहीत. व्यावहारिक पातळीवर ते जरी निवृत्त झालेत, तरीही व्यक्तिगत पातळीवर साक्षरता कार्यक्रमाच्या वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी होऊन त्यांनी कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. एका अर्थाने त्यांची साक्षरता चळवळीशी नाळ घट्ट झाली होती. अनेक कार्यक्रमामुळे प्रकृतीकडे दुर्लक्ष होत असे. परंतु सौ. हेमलता फडके या त्यांच्या पाठीशी भक्कम उभ्या असल्यानेच डॉ. फडके हे काम करू शकले असे वाटते.

आकाशवाणीवरील अनेक नवसाक्षर महिलांचे अनुभव कथन सौ. फडके यांनी ऐकले की, त्यांना मनापासून आनंद होत असे. त्याचबरोबर साक्षरता चळवळीतील कार्यकर्त्यांचे कौतुकही त्या मनमोकळेपण करत. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ, विचारवंत, कार्यकर्ते, साहित्यिक, कलाकार, अधिकारी यांच्याशी डॉ. भालचंद्र फडके यांचे घनिष्ट संबंध असत. अशा सर्व व्यक्तींशी बोलताना साक्षरता कार्यक्रमातील अनुभवाबद्दल, कामाबद्दल ते कौतुकाने बोलत. त्यांच्या सुचनेनुसार आदरणीय नेते एस.एम. जोशी यांचा फोन मला आला आणि त्यांनी प्रत्यक्ष साक्षरता केंद्राचे कामकाज पाहण्याची इच्छा व्यक्त केली. आदरणीय आण्णांना पुणे शहरातील सात प्रौढ शिक्षण केंद्राना घेऊन भेटी दिल्या. त्यातलेच एक केंद्र कोंढवा लेप्रसि हॉस्पिटल हेही होते. केंद्रातील नवसाक्षरांचे अनुभव कथन ऐकून आण्णांना मनापासून आनंद झाला. एवढ्या मोठ्या नेत्यांना घेऊन मी एकटाच तीन दिवस फिरत होतो. माझ्या दृष्टीने मी हा मोठा ठेवा समजतो. डॉ. फडके यांना मी जेव्हा घरी भेटावयास जात होतो, तेव्हा साक्षरता कार्यक्रमातील वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती देत असे, तेव्हा त्यांचा चेहरा प्रफुल्लित होत असे. तेव्हाही ते गरीबी आणि निरक्षरता या दोन समस्यांचे निराकरण कसे करता येईल यावर त्यांचे चिंतन करत असत. त्यांची भेट झाली तर आम्हासारख्या कार्यकर्त्यांना साक्षरता चळवळीत काम करायला बळ मिळत असे.

''दलित रंगभूमीने आता सांस्कृतिक क्षयाचा विनाश करणारे, मूल्यांचे प्रतिष्ठापना करणारे, नाटक सिध्द केले पाहिजे. कृष्णवर्णीय लेखक आपली वेदना व्यक्त करताना म्हणत असत की, श्वेतवर्णीयांना आम्हाला समजून घेता आलेले नाही. त्यांना कधी आमच्या दु:खाचे आकलनच झाले नाही. या वेदनेतून कृष्णवर्णीयांची रंगभूमी जन्माला आली. त्यांच्या रंगभूमीचे नाते त्यांच्या मुक्तिलढ्याशी आहे. आज कृष्णवर्णीय रंगभूमी प्रस्थापित रंगभूमीला आव्हान देत उभी आहे. दलित रंगभूमीला देखील हे स्थान मिळविता येईल.''

—डॉ. भालचंद्र फडके
(दलित रंगभूमी : प्रस्तावना)

# भारतातील प्रौढशिक्षणाचा प्रभाव

**जयदीप रामचंद्र लाड**
प्रकल्प सहकारी

**डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता**
सहाय्यक प्राध्यापक
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ), पुणे—०७.

शिक्षण ही एक सामाजिक जीवनातील गरजेची क्रिया आहे. कोणत्याही देशाचे भविष्य हे त्या देशाच्या मनुष्यबळावर अवलंबून असते. आपल्या देशातील मोठा वर्ग हा अज्ञानाशी झुंज देत आहे. निरक्षरता देशाच्या प्रगतीआड येत आहे. सुशिक्षित लोक कोणत्याही निरक्षर लोकांच्या सुधारणेसाठी व सर्वसाधारण सुधारणेसाठीच्या कार्यक्रमासाठीपुढे येत नाहीत, असे आपल्याला दिसून येते. निरक्षर लोकांनी प्रतिसादन देण्याची मूळ कारणे ही प्रेरणेची कमतरता व जागृतीची कमतरता अशी आहेत. भारत सरकारने यासाठी प्रौढ शिक्षणाचे अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत, याचबरोबर औपचारिक शिक्षणाचे कार्यक्रमही आहेत.

प्रौढ शिक्षणाचे ध्येय हे सर्व माणसांचे राहणीमान उंचावणे आहे. यामध्ये स्वतःची, समाजाची आर्थिक व सांस्कृतिक सुधारणा करणे, यांचा सामावेश होतो. प्रौढ शिक्षणाचे कार्य शिक्षण घेणाऱ्या लोकांना मदत करणे हे आहे. शिक्षण दिल्यामुळे त्यांच्यामध्ये ज्ञान, कौशल्य आत्मसात करण्याच्या क्षमतेत वाढ होते, परिणाम कार्यक्षमतेत वाढ होते.

प्रौढ शिक्षणाचे अनेक कार्यक्रम हे स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर राबवण्यात आलेले आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात प्रौढ शिक्षणाचे दोन कार्यक्रम तयार केले होते. त्यांतील एक हा 'केंद्राशी आधारित दृष्टिकोन' (१९८८ पूर्वी) व दुसरा 'विशिष्ट कार्याशी आधारित दृष्टिकोन' (१९८८ नंतर) असे होते.

'प्रौढ शिक्षण' ही जुनी संकल्पना आहे. ही स्वातंत्र्यापूर्वी, स्वातंत्र्यानंतर आणि आता अशा तीन टप्प्यांत आहे. स्वातंत्र्यापूर्वी प्रौढ

शिक्षण हे फक्त मूलभूत साक्षरता व ज्ञान पुरवायचे, तेही समाजामधून मिळायचे. पुराणातील कथा, रामलीला, कीर्तने नाट्यगृहे, जत्रा आणि खेड्यांचा बाजार हे समाजाकडून व काही धार्मिक संस्था म्हणजे गुरुकुल यांच्या माध्यमातून स्वातंत्र्यापूर्वी माणसाला ज्ञान व साक्षरता मिळत होती. प्रौढ शिक्षणाचा वारसा, जुन्या परंपरागत ज्ञानातून आपल्या देशामध्ये चालत आला होता. परंतु अशा ज्ञानातून आर्थिक विकास मर्यादीत होता. हे देशाच्या कल्याणासाठी हितकारक नव्हते. पण या कमतरता इंग्रजांच्या राजवटीत कमी होऊ लागल्या व प्रौढ शिक्षण हे देशाचे धोरण झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात दैनंदिन जीवनातून निरंतर शिक्षण घेण्यावर भर देण्यात येऊ लागला. काम करण्याच्या हेतूने जे शिक्षण कामी येईल असे 'कार्यात्मक शिक्षण' घेणे प्रभावी ठरू लागले. पाऊलो फेरी असे म्हणतात की, "सामाजिक बदल हळूहळू राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमांमुळे लोकांच्या पुढे येत आहेत. ही क्रिया आजही चालू आहे". (शाह एस. वाय. : १९९०)

प्रत्येक टप्प्यांमध्ये वेगवेगळे कार्यक्रम तयार करण्यात आलेले आहेत. त्यांचा वापर भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या नावाअंतर्गत उदा, सामाजिक शिक्षण, सर्व साक्षरता मोहीम इ. आहेत. अशा प्रकारे कार्यक्रम तयार करण्यासाठी व लागू करण्यासाठी सरकारी आणि बिगरसरकारी संस्था असल्या तरी या मोहिमांना निधी पुरवण्याचे काम मुख्यत: भारत सरकार करत असते. "केवळ योजनांची नावे बदलण्यात अर्थ नाही. प्रौढ शिक्षणाची वाढीची प्रक्रिया ही वर्षानुवर्षे चालली आहे. बदलत्या दृष्टिकोनाबरोबर, भारतातील मुख्य प्रौढ शिक्षण संस्था ही मूलभूत गरजांवर असावी." (शाह एस. वाय. : १९९०)

प्रत्येक निरक्षर व्यक्ती ही अडाणी नसते. पण जवळजवळ सर्वच अडाणी व्यक्ती ह्या निरक्षर असू शकतात. यासाठी साक्षरतेचा प्रसार वाढवण्याची गरज आहे. साक्षरता लोकांना स्वावलंबी बनवण्याचे महत्त्वाचे कार्य करते. समजा, जर महाराष्ट्रातील साक्षर व्यक्ती कर्नाटकमध्ये गेली तर तेथील गाड्यांचे फलक त्या व्यक्तीला वाचता येत नाहीत. ती व्यक्ती गोंधळते. त्या व्यक्तीला आपण निरक्षर असे म्हणू शकत नाही, याची जाणीव होते. त्या व्यक्तीला उचित ठिकाणी जाण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीच्या सहकार्याची गरज पडते. ती व्यक्ती

तिच्या उचित स्थानी जाते. पण आता आपण अशा निरक्षर लोकांबद्दल चर्चा करू जे पूर्ण निरक्षर आहेत. त्यांना छोट्याछोट्या गोष्टींसाठी उदा. बँकांमधील व्यवहार, प्रवास, सरकारी कामे यांसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. अशा निरक्षर लोकांना कोणीही फसवू शकते. अशा लोकांसाठी प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. अशा प्रौढ शिक्षण कार्यक्रमांमुळे लोकांच्या राहणीमानामध्ये, आर्थिक व्यवहारांमध्ये, राजकीय जागरूकतेमध्ये भरपूर बदल घडून येत आहेत. लोक स्वत:ला बदलून जागरूक नागरिक, जागरूक पालक, सदृढ आरोग्य असणारे नागरिक बनवत चालले आहेत. लोकांना साक्षरतेचे महत्त्व समजू लागले आहे.

कुटुंब नियोजनाचे महत्त्व आता हळूहळू सर्वांच्या लक्षात येऊ लागले आहे. लोक एक किंवा दोन अपत्यांवर कुटुंब नियोजन करत आहेत. स्थूलपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, एड्स यासारख्या रोगांबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण होऊ लागली आहे. लोकांनी नियंत्रित आहारावर लक्ष केंद्रित केले आहे.पर्यावरणाचे महत्त्व हे 'सामाजिक वनीकरण', 'झाडे लावा झाडे जगवा' या योजनांमधून लोकांपर्यंत पोहोचू लागले आहे.

या सर्व गोष्टींचा प्रसार हा साक्षरतेच्या मार्गातून होऊ लागला आहे. शिक्षणाचे महत्त्व समजल्यामुळे लोक आपल्या पाल्यांना वेगवेगळ्या शाळांमध्ये पाठवत आहेत. मुलांची आरोग्य व शिक्षणाविषयीची काळजी जास्त चांगल्या प्रकारे घेत आहेत. प्रौढ शिक्षणाबरोबर, निरंतर शिक्षण घेण्यावरही आजचे प्रौढ भर देत आहेत. प्रौढ शिक्षण हे सर्व स्त्री—पुरुष, गरीब—श्रीमंत, सर्व जाती—जमाती यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पसरत आहे. साक्षर लोकांची संख्या ही नेहमी वाढत चालली आहे.

प्रौढ शिक्षणामुळे सामाजिक बांधिलकी, एकात्मता, संवेदनशीलता, स्त्री—पुरुष समानता, सर्वधर्म सहिष्णुता अशा मूल्यांचा प्रसार वाढत चालला आहे. लोकांमध्ये, प्रेम, समभाव, करुणा जागृत होत आहे. अशा गोष्टींमुळे देशाचे नाव व भविष्य उज्ज्वल होत आहे. प्रौढ शिक्षण हे सामाजिक शिक्षण, आरोग्य शिक्षण, पर्यावरण शिक्षण, आर्थिक मिळकत इत्यादी देण्यासाठी कार्य करत आहे. यामुळे देशाच्या अर्थकारणावर चांगले परिणाम होत आहेत.

**भारतातील साक्षरतेचा दर (१९०१ ते २०११)**

तक्ता १: भारतातील साक्षरतेचा दर (१९०१ ते २०११)

| वर्ष | एकूण | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| १९०१ | ५.३५ | ९.८३ | ०.६० |
| १९११ | ५.९२ | १०.५६ | १.१५ |
| १९२१ | ७.१६ | १२.२१ | १.१८ |
| १९३१ | ९.५० | १५.५९ | २.९३ |
| १९४१ | १६.१० | २४.९० | ७.३० |
| १९५१ | १६.६७ | २४.९५ | ७.९३ |
| १९६१ | २४.०२ | ३४.४४ | १२.९५ |
| १९७१ | २९.४५ | ३९.४५ | १८.६९ |
| १९८१ | ३६.२३ | ४६.८९ | २४.५२ |
| १९९१ | ५२.११ | ६३.८६ | ३९.४२ |
| २००१ | ६५.३८ | ७५.८५ | ५४.१६ |
| २०११ | ७४.०४ | ८२.१४ | ६५.४६ |

स्रोत: भारतीय जनगणना, रजिस्ट्रार जनरल कार्यालय, भारत.

वरील तक्त्यावरून समजते की, भारतामध्ये साक्षरता वाढत चालली आहे. कारण भारत सरकार व वेगवेगळी राज्य सरकारे यांनी प्रौढशिक्षणासाठी भरीव कार्ये केली आहेत. वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या परिणामांमुळे साक्षरतेमध्ये वाढ होत आहे. यावरून प्रौढ शिक्षणाचे महत्त्व व परिणाम आपणास दिसून येतात.

**निष्कर्ष**

आपण सन १९०१ पासून ते २०११ पर्यंतच्या ११० वर्षे कालावधीच्या प्रौढ शिक्षण कार्यक्रमांच्या सुधारणेबद्दल तपशीलवार चर्चा केली आहे. देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सुधारणांमध्ये प्रौढ शिक्षणाने वरील सर्व प्रयत्न केले आहेत. प्रौढ

शिक्षणाच्या कार्यक्रमांमध्ये शिक्षणाच्या महत्त्वाविषयी सामुदायिक आणि सामाजिक एकत्रीकरण व सामाजिक जागरूकतेमध्ये झालेली सुधारणा दिसून येते. औपचारिक शिक्षणाची पद्धत ही कोणत्याही देशाच्या साक्षरतावाढीसाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. या तत्त्वावर प्रौढ शिक्षण चळवळीची गरज भर देते. लोकांनी साक्षरता कार्यक्रमांना दिलेला प्रतिसाद पाहता त्यांना उच्च साक्षरता हवी आहे, असे दिसून येते. त्यामध्ये संगणक साक्षरता आणि इंटरनेटच्या माध्यमातून प्रसारित होणारी साक्षरता अशा गोष्टींचा जास्त समावेश असावा. भारत सरकारने याविषयी भरीव कामगिरी करावी, अशी उद्याच्या प्रौढ शिक्षणाची गरज सांगते.

### संदर्भ


बोरडिया अनिल, (१९५७), "शेतकऱ्यांची कार्यात्मक साक्षरता कार्यक्रमाची समीक्षा, १९६९—१९७४", भारतीय प्रौढ शिक्षण मंडळ, नवी दिल्ली.

बोरडिया अनिल व सहकारी, (१९७३), "भारतातील प्रौढ शिक्षण— एक वाचणयोग्य पुस्तक ", निचीकेता प्रकाशन, मुंबई (बॉम्बे).

वासुदेव राव बी. एस., (१९८४), "प्रौढ आणि निरंतर शिक्षण : काही दृष्टिकोन", ग्रामीण विकास प्रकाशन, आंध्र प्रदेश.

वासुदेव राव बी. एस., (१९८८), "विशाखापट्टनम् जिल्ह्यातील राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम", हिमालया प्रकाशन गृह, दिल्ली.

शाह एस. वाय., (१९९०), "भारतातील प्रौढ शिक्षण विद्यापीठाचे धोरण, तत्त्वज्ञान आणि  अडथळे", विद्यापीठ बातम्या, Vol. xxviii, No. 46.

गुप्ता पी. व्ही., (२०११), "निरंतर शिक्षण कार्यक्रम शिकाऊ व भागधारकांची जाणीव", द असोसिएशन प्रकाशक, अंबाला शहर, हरियाणा.

# डॉ. भालचंद्र फडके यांचे समीक्षालेखन


**प्रा. डॉ सुभाष आहेर**

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,

औंध, पुणे – १७.

भ्रमणध्वनी ९८५०२०९३७२, subhashdaher@gmail.com


## प्रास्ताविक

साहित्यकृतीचा सम्यक दृष्टीने घेतलेला शोध म्हणजे समीक्षा. साहित्यकृतीचे सर्वांगीण आकलन, आस्वादन व मूल्यमापन म्हणजे समीक्षा होय. समीक्षालेखन करणाऱ्या समीक्षकाला कोणत्याही लेखकाविषयी पूर्वग्रह, दूषित भाव अथवा आपपरभाव ठेवून चालणार नाही. साहित्यकृतीचा आस्वाद, आकलन व मूल्यमापन हे समीक्षेचे महत्त्वपूर्ण तीन टप्पे आहेत. दोन वेगवेगळ्या साहित्यप्रकारातील कलाकृतींचे अथवा एकाच प्रकारातील दोन कलाकृतींचे मूल्यमापन एकाच समीक्षापध्दतीने करता येत नाही. प्रत्येक कलाकृतीचा पोत वेगवेगळा असतो. समीक्षकास तो शोध घेता आला पाहिजे. समीक्षालेखन हा एका अर्थाने न संपणारा प्रवास असतो.

## साहित्यसमीक्षा : स्वरूप व लेखन

आस्वाद, आकलन व मूल्यमापन यांचा परस्परांशी संबंध आहे. मूल्यमापनासाठी मात्र कलाकृतीचा आस्वाद व आकलन आवश्यक असते. एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन न करताही त्या कलाकृतीचा आस्वाद घेतला जाऊ शकतो. मूल्यमापनाचा प्रश्न आस्वादाशी संबंधित असला तरी तो समीक्षा व्यवहाराचा भाग आहे. ''साहित्यसमीक्षा हा साहित्याचे 'साहित्यपण' हरवू न देता ते स्पष्ट करणारा, साहित्याच्या मर्मबंधाला स्पर्श करणारा, साहित्याच्या आकलन, आस्वादनाला, मूल्यमापनाला योग्य ती दिशा, दृष्टी व चौकट पुरविणारा, तत्संबंधीची स्वत:ची व इतर जिज्ञासूंची अभिजातता वाढीस लावणारा, साहित्याच्या रहस्याचा बुध्दिपुरस्सर वेध घेणारा एक पृथक्करण संकलनकुशल, संस्कृतिसंबंध असा ज्ञान व्यवहार आहे.''[१]

गो.म. कुलकर्णी यांच्या मते, समीक्षा म्हणजे साहित्याचे अंतरंग व बहिरंग उलगडून पाहण्याच्या दृष्टीने केलेली एक शोधयात्राच असते. समीक्षा करताना कलाकृतीचे आशयविश्व, अभिव्यक्तीपध्दती, मांडणी, सामाजिक–सांस्कृतिक पार्श्वभूमी, लेखकचरित्र आदी घटकांचाही विचार केला जातो. अशा प्रकारे केलेली समीक्षा ही खऱ्या अर्थाने 'सम्यक ईक्षणात्मक' होते. प्रत्येक कलाकृतीची समीक्षा रूढ कसोट्यांनी करून चालत नाही. चांगल्या साहित्यकृतीच्या मूल्यमापनासाठी प्रसंगी समीक्षकाला रूढ असणाऱ्या कसोट्यांचा फेरविचार करावा लागतो. भाषासौंदर्य सत्यप्रतीती आदी कसोट्यांबरोबरच अनुभवाची उत्कटता, प्रामाणिकपणा, सलगता, सार्वकालिकता या सुध्दा कलाकृतीच्या मूल्यमापनाच्या कसोट्याच आहेत.

साहित्यातील अनुभव हा मानवी जीवनावरील एक भाष्यच असते. साहित्य हा समाजजीवनाचा आरसा असतो. कलावंताचा अनुभव त्याच्या जीवनमूल्यभावाशिवाय आविष्कृत होऊ शकत नाही. 'प्रस्थापित साहित्याचे गंभीरतेने पुनर्मूल्यांकन करणे, अधिक विस्तृतपणे समर्पक वाटणाऱ्या नव्या साहित्य, संकल्पनांचा शोध घेणे, नवसाहित्याशी सुसंगत अशा स्फुट समीक्षा विचारांची सूत्रबध्द मांडणी करणे आणि त्याच्या आधारे जुन्या किंवा नव्या साहित्यकृतीच्या जाणिवा–उणिवांची, सामर्थ्याची अथवा मर्यादांची उकल करणे, ही आजच्या समीक्षेची महत्त्वाची दिशा आहे.'[२] डॉ. भालचंद्र फडके यांचे समीक्षालेखन या पध्दतीचे आहे. साठोत्तरी साहित्यप्रवाहांपैकी एक जीवनवादी साहित्य प्रवाह म्हणून दलित साहित्याची ओळख आहे. दलित साहित्याची समीक्षा करून सैध्दांतिक मांडणी डॉ. भालचंद्र फडके यांनी केली.

## डॉ. भालचंद्र फडके यांचे समीक्षालेखन

मराठी समीक्षाव्यवहारात डॉ. भालचंद्र फडके यांचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. त्यांचे पुढील ग्रंथलेखन त्याची साक्ष देतात.

१. दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह (१९७७).

२. दलित साहित्याची प्रकाशयात्रा (१९८०)

३. मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन (१९८०)

४. कथाकार खानोलकर (१९७९)

५. मराठी लघुकथा (संपादन)

६. अरविंद गोखले यांची कथा (संपादन १९७३)

७. सहा कथाकार (संपादन १९७५)

८. दलित एकांकिका (संपादन)

डॉ. भालचंद्र फडके यांनी दलितसाहित्याची चिकित्सा व मांडणी साधार समीक्षाग्रंथाद्वारा केली. दलित साहित्य हे जीवनाशी बांधीलकी मानणारे साहित्य आहे. मराठी साहित्यात दलित साहित्य प्रवाहावर सर्वच पांढरपेशा किंवा प्रस्थापितांनी टीका केली, विरोध केला, दलित साहित्याविषयी आस्था ठेवून तटस्थपणे, ठामपणे, चिकित्सकपणे दलित जाणिवेच्या स्वरूपाची मीमांसा काही दलितेतर समीक्षकांनी केली. त्या समीक्षकांत प्रा. वा. ल. कुलकर्णी, दि.के. बेडेकर, म. भि. चिटणीस, प्रा. शरदचंद्र मुक्तिबोध, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. नरहर कुरूंदकर व डॉ. भालचंद्र फडके यांचा समावेश होतो.

डॉ. भालचंद्र फडके दलित साहित्याची समीक्षा करताना म्हणतात, 'दलित जीवनमूल्य ही अखेर माणसाच्या माणूस असणाऱ्या प्रतिष्ठेची, श्रेष्ठतेची ग्वाही देतात. याचा प्रत्यय दलित कला व दलित साहित्य यांचा आस्वाद घेताना येतो. दलित साहित्याकडे अगदी आस्थेनेच नव्हे तर जिव्हाळ्याने लक्ष देणारे, दलित जातीत जन्माला न येता दलितांच्या दुःखाचे जागृत आत्मभान असणारे, जातिव्यवस्थेविरूध्द, वर्गव्यवस्थेविरूध्द विद्रोहाची भूमिका ठामपणे स्वीकारणारे व डॉ. आंबेडकर यांच्या धम्मचक्र सोहळ्यात प्रत्यक्ष सहभागी असलेले डॉ. फडके हे दलित साहित्याचे केवळ भाष्यकारच नव्हेत तर प्रमुख समीक्षक आहेत'[३] असा गौरव डॉ. ज्योती लांजेवार करतात. यातूनच डॉ. फडके यांच्या दर्जेदार दलित साहित्य समीक्षालेखनाचा प्रत्यय येतो.

दीक्षाभूमीवरील डॉ. आंबेडकर यांचा धम्मविधी सोहळा 'याचि देही याचि डोळा' डॉ. फडके यांनी बघितला होता. यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या ऐकलेल्या विचारांच्या चिंतनातूनच ''दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह'' या पुस्तकाची पुढे निर्मिती झाली. त्यात ते म्हणतात, 'दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक

व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयकारी केलेले आहेत आणि ज्यांच्यासाठी शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत, अशा दलितांच्या साहित्यनिर्मितीला दलित साहित्य म्हणावे.'[४] दलित साहित्य हे परिवर्तनाच्या लढ्याचे साधन आहे. 'दलित साहित्यः वेदना व विद्रोह' या ग्रंथात त्यांनी दलित साहित्य, व्याख्या व स्वरूप, दलितांच्या वेदनेचे आदिरूप — संत चोखामेळा, दलित विद्रोहाचे आदिरूप डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठी साहित्यात दलितांचे चित्रण क्षीण का? दलित रंगभूमी, दलित कथा, कांदबरी, कविता इत्यादींचे स्वरूप, दलित साहित्याची समीक्षा व भवितव्य आदी मुद्दे साधार मांडून चिकित्सक चर्चा केलेली आहे.

डॉ. भालचंद्र फडके यांच्या मते, दलितांच्या साहित्यातून युगानुयुगाची चिरवेदना व्यक्त होते. या वेदनेचे आदिरूप म्हणजे संत चोखामेळा व विद्रोहाचे आदिरूप म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी मांडणी त्यांनी साधार केली आहे. दलित साहित्याची तत्त्वत्रयी म्हणून वेदना, विद्रोह व नकार यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या मते, ''विद्रोह मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी असतो. एक मूल्यसमूह नाकारून नवा मूल्यसमूह अस्तित्वात यावा, म्हणून विद्रोहाचा अवतार असतो म्हणून मूल्यभाव नसेल तर विद्रोहाला काहीही अर्थ नाही. दलित लेखकांचा विद्रोह, विशिष्ट व्यक्तिविरूध्द वा विशिष्ट जमातीविरूध्द नाही तर हा विद्रोह, ही बंडखोरी स्वत्व शोधासाठी आहे. प्रतिगामी प्रवृत्ती आणि कालबाहय जीवनादर्श यांच्याविरूध्द हा विद्रोह सतत चालू राहणार.''[५] दलित साहित्याचा प्रवाह हा जिवंत, जीवनदायी प्रवाह असून तो येथील मरगळलेल्या, कोंडलेल्या मराठी साहित्याला जीवनरस देईल. दलित साहित्यप्रकारांचे मूल्यमापन त्यांनी आस्वादक भूमिकेतून केले. 'दलित साहित्याची प्रकाशयात्रा' या ग्रंथात काही मृत्युलेख आहेत. केशव मेश्राम, गं.बा. सरदार, रा.ग. जाधव आदींच्या लेखनाचा परामर्श घेतला आहे. केशव मेश्राम यांच्या कवितेची इत्यंभूतपणे सुजाण समीक्षा केली आहे. डॉ म. ना. वानखेडे यांच्या कार्याची व लेखनाची दखल मराठी साहित्याला कधीतरी घ्यावी लागेल, असे डॉ. फडके म्हणतात.

रा.ग. जाधव यांच्या लेखनाविषयी डॉ. फडके म्हणतात, '१९६७ ते १९७७ पर्यंतच्या काळात श्री. जाधव यांनी केलेले लेखन म्हणजे त्यांच्या चिंतनाचा परिपाकच आहे. त्यांचे लेख दलित

चळवळीची व्याप्ती स्पष्ट करतात. मराठी साहित्यक्षेत्रात दलित साहित्याची आद्यचर्चा देण्यात प्रा. जाधव यांनी एक प्रकारचे औचित्य दाखविले आहे.' प्रा. सरदार यांच्याबद्दल प्रा. फडके म्हणतात की, 'प्रा. सरदार हे दलित साहित्याचे निर्भीड भाष्यकार आहेत. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे एक शस्त्र आहे.' प्रा. सरदार यांच्या दलित साहित्यविषयक मतांचा त्यांनी परमार्थ घेतलेला आहे.

'मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन' या ग्रंथात स्त्रियांचे कथालेखन, कवितालेखन, आत्मचरित्रपर लेखन, कादंबरी लेखन, इतर लेखन आदी लेखनाचा मागोवा घेतलेला आहे. स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक, अन्याय याविषयी मनोगतात त्यांनी खंत व्यक्त केली आहे. विलक्षण अशा आवर्तातून बाहेर पडून मराठी लेखिकेने आधुनिक झाले पाहिजे, 'थांबला तो संपला' हे जाणून मराठी लेखिकांनी परिवर्तनाच्या दिशा शोधल्या पाहिजेत. त्यांनी आता उदासीनता व आत्मतुष्टता सोडून दिली पाहिजे. वर्तमानाला सामोरे गेले पाहिजे, वास्तवाचे चित्रण केले पाहिजे, मराठी लेखिका म्हणजे एक जातिवंत व जिवंत झाड असले पाहिजे, अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. मराठी लेखिकांनी बंधमुक्त होऊन स्वातंत्र्याचे मोल जाणले पाहिजे. स्त्री मुक्तीची चळवळ खंबीरपणे उभे राहणे त्यांना अपेक्षित होते. कथा, कविता, कादंबरी व आत्मचरित्र या चार वाङ्मय प्रकारांना समृध्द करण्याचा प्रयत्न स्त्रियांनी केला. मराठी साहित्याला वळण लावू शकणारी प्रयोगशीलता मराठी लेखिकांमध्ये कमी आहे, अशी स्पष्ट मते त्यांनी नोंदवली आहेत.

वरील लेखनाबरोबरच त्यांचे संपादित ग्रंथही प्रसिद्ध आहेत. उदा. मराठी लघुकथा, अरविंद गोखले यांची कथा, सहा कथाकार, दलित एकांकिका इत्यादी.

डॉ. भालचंद्र फडके यांच्या मते, दलित साहित्याचा आस्वाद व आकलन मराठी समीक्षेला पुरेसे करता आले नाही. दलित साहित्याचे मूल्यमापनही मराठी समीक्षेने आकृतिवादी मानदंडाने केले आहे. दलित लेखकाचे अनुभव, स्वत:चे वेगळेपण, अस्तित्त्व व स्वत:चा 'घाट' घेऊन येणार, हे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. दलित साहित्याच्या सैध्दांतिक मांडणीत व समीक्षेत डॉ. भालचंद्र फडके यांचे योगदान अपूर्व असे आहे.

## समारोप

डॉ. भालचंद्र फडके यांनी समीक्षालेखनातून दलित साहित्याची सैध्दांतिक भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे दलित साहित्याच्या अभ्यासास एक नवी दिशा प्राप्त झाली. दलित साहित्याचे वेगळेपण, जाणिवा, वेदना, विद्रोह व नकार, भवितव्य यांसबंधी आपली स्पष्ट मते त्यांनी मांडली. दलित साहित्याचे मूल्यमापन करण्यासाठी कोणती दृष्टी हवी, याचे विश्लेषण त्यांनी केले. आपल्या साहित्यविषयक भूमिकेवर ठाम राहून डॉ. फडके यांनी तिरस्काराचे वा प्रहाराचे धोरण न स्वीकारता दलित साहित्याचे समर्थन केले. या सर्व कारणांमुळे, त्यांच्या समीक्षालेखनामुळे डॉ. भालचंद्र फडके दलित साहित्याचे मर्मग्राही टीकाकार, सामर्थ्यशाली समीक्षक व आंबेडकरी चळवळीतील एक हितचिंतक ठरतात.

## संदर्भ व टिपा


१ ‘प्रदक्षिणा खंड २’, संपादन अनिरूध्द कुलकर्णी, लेख—स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य — समीक्षा, लेखक गो.म. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २०००, पृ. ३४३.

२ लांजेवार ज्योती, ‘दलित साहित्य समीक्षा’, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९२, पृ. ०१.

३ तत्रैव, पृ. ७७.

४ फडके भालचंद्र, ‘दलित साहित्य वेदना आणि विद्रोह’, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७७, पृ.२७.

५ तत्रैव, पृ ६९,७०.

# ज्ञानविस्तारातून समाजशिक्षण....

**प्रा. (डॉ.) धनंजय लोखंडे**
संचालक आणि विभागप्रमुख,
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७
मो. ९४२३२४७०५१, ई–मेल – hodadult@unipune.ac.in

ज्ञानविस्तार शिक्षणातून समाजाची निरंतर सुधारणा व्हावी; समाजशिक्षण व्हावे हे अपेक्षित आहे. या सुधारणेमध्ये सामाजिक सुधारणा, आर्थिक सुधारणा आणि शारीरिक सुधारणा अभिप्रेत आहे. ज्ञानविस्तार कार्यक्रमातून लोकांनी स्वत:चा विकास करून घेतला पाहिजे; स्वत:चे प्रश्न स्वत: सोडविण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण घेतले पाहिजे, अशी संधी ज्ञानविस्तार उपलब्ध करू शकते. विद्यापीठ अनुदान मंडळाने उच्च शिक्षणाच्या उद्दिष्टांमध्ये 'ज्ञानविस्तार' (Extension) हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट मानले आहे. शिकविणे, संशोधन करणे आणि ज्ञानविस्तार ही उच्च शिक्षणाची उद्दिष्टे आहेत.

'ज्ञानविस्तार' ही संकल्पना आणि ज्ञानविस्तार शिक्षणाची क्षेत्रे व्यापक आहेत. ज्ञानविस्तार शिक्षण हे समाजाभिमुख शिक्षण आहे तसेच हे क्षेत्र व्यक्ती, कुटुंब, गावे यांचा विकास करू शकते; म्हणजेच समाजविकास आणि परिवर्तन करू शकते.

एन्समिंजर यांच्यामते, "ज्ञानविस्तार हा एक कार्यक्रम आहे. लोकांनी स्वत:चा विकास करून घेण्याची एक प्रक्रिया आहे. उत्पादन आणि राहणीमान सुधारणे म्हणजे ज्ञानविस्तार".

## ज्ञानविस्तार कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये

भारताच्या ज्ञानविस्तार कार्यक्रमात वस्ती विकास कार्यक्रम हा अंतर्भूत आहेत. तो सर्वांगीण विकासाचा असा कार्यक्रम आहे. त्यामध्ये

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिकता विकास यांचा समावेश आहे.

- उच्च जीवनमान सुधारण्यासाठी लोकांचा दृष्टिकोन बदलणे.
- जबाबदार नागरिकत्व आणि ग्रामीण नेतृत्व तयार करणे.
- स्वावलंबनाची संकल्पना रूजावी, कार्यक्रमात सक्रिय सहभाग रूजावा, स्वत:चे ज्ञान वाढवून दुसऱ्याचे मत समजून घेणे की जेणे करून राष्ट्रीय विकासात हातभार लागेल.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि उत्पादन वाढ व्हावी.
- लघुउद्योगांमधून प्रोत्साहन, त्यातून रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नात वाढ व्हावी.
- स्वयंविकासाबरोबर कुटुंब आणि वस्ती यांच्या विकासासाठी प्रेरणा देणारा कार्यक्रम व्हावा.
- सामाजिक दर्जात सुधारणा व्हावी आणि कार्यक्रमात सहभाग वाढावा.

विकासासाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण आणि करमणुक एवढेच लोकांना मिळणे यात अपेक्षित नाही तर परिवर्तनासाठी काय केले पाहिजे; यासाठी लोकांची मानसिकता बदलणे अभिप्रेत आहे. कोणत्याही थरातील व्यक्तीला कधीही, कोठेही आणि कोणत्याही माध्यमातून जीवनभर नवनवीन कौशल्ये शिकता यावीत, यासाठी उच्च शिक्षणात 'आजीवन शिक्षण' (Lifelong Education) ही संकल्पना अस्तित्वात आली असून स्वतंत्र पदव्युत्तर अभ्यासक्रम म्हणूनही विकसित होत आहे.

ज्ञानविस्तार कार्यक्रम हा व्यापक स्वरूपाचा असून त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक, शिक्षक आणि समाज तसेच समाज आणि विद्यापीठे यांचा समन्वय साधण्यासाठी ज्ञानविस्तार कार्यक्रम ही एक उत्तम संधी आहे. विद्यार्थी, समाज आणि एकूणच शिक्षणव्यवस्था यांच्या समन्वय आणि सहकार्याने 'विकास' आणि 'परिवर्तन' शक्य आहे. गरिबांचे अज्ञान आणि निष्क्रियता यांचे मुळ त्यांच्या आर्थिक,

सामाजिक आणि राजकीय गुलामगिरीमध्ये आहे, याची खोलवर जाणीव झाल्यामुळे ब्राझीलमधील शिक्षणतज्ञ पाउलो फिरअरे यांनी जाणीवजागृती करण्यासाठी कोणते साधन हाती घ्यावे, याचा विचार सुरू केला. शिक्षणाची पारंपरिक पार्श्वभूमी कशी बदलता येईल आणि नव्याने पार्श्वभूमी कशी करता येईल, याविषयी आपले धोरण निश्चित केले आणि शिक्षणाचा संबंध त्याने आर्थिक—सांस्कृतिक परिस्थितीशी जुळवला. म्हणजेच, ज्ञानविस्तार शिक्षणातून व्यक्तिविकास आणि सामाजिक विकास घडवून आणण्याचा हा कार्यक्रम आहे. ज्ञानविस्तार आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. 'विकास' या संकल्पनेत सामाजिक विकास, शैक्षणिक विकास, राजकीय विकास आणि आर्थिक विकास म्हणजेच समाजाचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे.

विकास म्हणजे जनतेने स्वत:चे भविष्य स्वत:च्या हातात घेऊन उज्ज्वल भविष्यकाळ घडविण्यासाठी सामर्थ्यवान होणे आणि जनतेने न्याय, बंधुत्व आणि प्रेम यावर आधारलेला समाज निर्माणण्यासाठी कार्य करणे; या कार्यासाठी जनतेच्या सामूहिक संघटनेची आवश्यकता असते. त्यातून जनतेचे सामर्थ्य निर्माण होते. जनतेचे सामर्थ्य हे एकता, सहकार्य, संघटना आणि कृतीपासून निर्माण होते. माणसाच्या स्वत:च्या भवितव्याची निर्मिती म्हणजेच विकास. विकासाची महत्त्वाची तीन उद्दिष्टे आहेत; गरिबी नष्ट करणे, बेकारी नाहिशी करणे आणि सामाजिक विषमता नष्ट करणे. माजी राष्ट्रपती महामहिम डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी ग्रामीण विकासासाठी एक सूत्र मांडले आहे. ते सूत्र म्हणजे 'प्युरा', याचा अर्थ असा की, प्रोव्हायडींग अर्बन अमेनिटिज इन रूरल एरिया (पी.यु.आर. ए.). हे सूत्र यासाठी महत्त्वाचे आहे की, शहरी भागाच्या विकासासाठी दिल्या जाणाऱ्या सोयी—सवलती धोरणात्मक बदल करून ग्रामीण विभागात उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण भागाचा विकास झपाट्याने होऊ शकेल. त्यातून ज्ञानसंपन्न समाजनिर्मितीस नक्कीच मदत होईल. हे साध्य करण्यासाठी 'ज्ञानविस्तार' हे एक प्रभावी माध्यम आहे. उच्च शिक्षण पद्धतीमध्ये 'ज्ञानविस्तार' या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे.

ज्ञानविस्तारातून विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिप्रामाण्यवाद रूजवून तो त्यांचेमार्फत समाजापर्यंत पोहचविला पाहिजे. त्यासाठी विद्यापीठांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या तसेच अधिकार आणि कर्तव्यांचा परामर्श घेतल्यास 'ज्ञानविस्तार' हे उच्च शिक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने अनेक विद्यापीठ ज्ञानविस्ताराच्या अनेक उपक्रमांची विविध कार्यक्रम आणि योजनांमधून अंमलबजावणी यशस्वीपणे करीत आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि संस्था ज्ञानविस्तार कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होत आहे, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. संस्थाचालक, प्राचार्य, संचालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांचा या कार्यक्रमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक आहे. अनेक वस्त्या आणि खेडी अशा स्वरूपांच्या कार्यक्रमांमुळे उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी झालेली आहेत. बहि:शाल शिक्षण मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग, कमवा व शिका योजना या शिवाय अनेक विभाग विद्यापीठ पातळीवर कार्यरत असून सक्षमपणे ज्ञानविस्ताराचे काम करीत आहे. विविध विद्यापीठांच्या ज्ञानविस्तार कार्याचा परामर्श घेतला तर एक अतिशय महत्त्वाची विद्याशाखा म्हणून ज्ञानविस्ताराचा उल्लेख करावा लागेल.

यु.जी.सी.च्या ९ व्या पंचवार्षिक योजना मार्गदर्शिकेपासून या विभागाच्या शैक्षणिक होण्याच्या प्रक्रियेस गती आली आहे. विशेषत: ११ व्या पंचवार्षिक योजनेतून 'आजीवन शिक्षण' ही विद्याशाखा विकसित करण्याचे निर्देश दिले असून देशात त्या अनुषंगाने एम्.ए. ही पदवी 'आजीवन शिक्षण' या विषयात सुरू केलेली आहे. यामुळे संकल्पनात्मक बाबींबरोबर विद्यार्थ्यांना क्षेत्र कार्यातून सिद्धांत विकसित करता येतील.

**संदर्भ :**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४.

Youth in Education and Community Services, Dr. Dhananjay Lokhande Samajdarshan Prakashane, Pune, (2008).

जाणीवजागृती: फिरअरे यांची शिक्षण पद्धती, शरद कुलकर्णी.

'Extension' A Journal Published by Govt. of India-Article C.C. Hearne.

A Guide to Community Development D. Ensminger.

महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास : नवे दालन—नव्या संधी. प्रा. शमसुद्दिन तांबोळी — डायमंड प्रकाशन, पुणे (२००९).

ज्ञानविस्तार शिक्षण — प्रा. धनंजय लोखंडे, पुणे विद्यापीठ सुवर्णा महोत्सवी प्रकाशन १९९८—९९.

Devdas Rajammal P. (1978) Community and Social Services As Curricular in Higher Education, University of Madras.

Universities / Colleges and Rural Development Ed. Dr. S.C. Bhatia.(1985).

Dr. Babasaheb Ambedkar Writing & Speeches – Vol. 2., Govt. of Maharashtra.

दलितांचे शिक्षण—डॉ. भिमराव रामजी आंबेडकर (अनु.), प्रा. देविदास घोडेस्वार (संपा.), प्रदीप गायकवाड, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर, (२००४).

महाराष्ट्रातील विद्यापीठापुढील काही शैक्षणिक व शासकीय समस्या, वसंत हरी गोळे (१९७२) मुंबई मराठी साहित्य संघ.

# आजीवन शिक्षण — अध्ययन व्याप्ती व क्षेत्रे

**डॉ. सतीश शिरसाठ**

प्राध्यापक

प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## शिक्षण आणि आजीवन शिक्षण

व्यक्तीमध्ये अपेक्षित बदल घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. माहिती आणि कौशल्ये देणे तसेच नैसर्गिक कलांची (aptitude) रूजवणूक करणे, असाही शिक्षणाचा अर्थ सांगितला जातो. औपचारिक, अनौपचारिक आणि सहज शिक्षण अशा शिक्षणाच्या तीन पद्धती सांगितल्या जातात.

जीवनाचा मोठा कालावधी (span) लक्षात घेता शाळा — कॉलेजच्या मर्यादित काळात मिळणारे शिक्षण पुरेसे ठरणार नाही. म्हणून शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया असावी, या भावनेतूनच आजीवन शिक्षण संकल्पना उदयाला आली. UNESCO च्या मते आजीवन शिक्षण या संकल्पनेत पुढील मुद्द्यांचा समावेश होतो.

१. व्यक्तीच्या जीवनभर चालणारी ही प्रक्रिया असते.

२. यात औपचारिक, अनौपचारिक आणि सहज या प्रकारांचा समावेश होतो.

३. व्यक्ती आणि समाजाच्या जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी ती जाणीवपूर्वक आणि सततची प्रक्रिया असते. आजीवन शिक्षण ही संकल्पना UNESCO ने १९७० मध्ये स्वीकारली.

## आजीवन शिक्षणाकडून आजीवन अध्ययनाकडे

UNESCO ने आजीवन शिक्षणाकडून आजीवन अध्ययनाचा स्वीकार केला. त्यामागील कारणे—

१. शिक्षणातून शिकणाऱ्यांच्या सर्व गरजा भागविल्या जातील, याबद्दल फारशी आशा उरली नाही.

२. आजीवन शिक्षणाचा हेतू सामाजिक उत्थानातून समाज आणि पर्यायाने व्यक्तीबदल घडून येईल हा होता. मात्र त्यापेक्षा थेट व्यक्तीच्या जीवनाशी, गरजांशी निगडित काहीतरी असावे, ही भावना प्रबळ झाली.

३. आजीवन शिक्षणाचा भर संस्था आणि संरचनेवर (structure) होता. आजीवन अध्ययनाचा भर व्यक्तीविकासावर आहे. त्याबरोबरच व्यक्तीविकासाच्या दृष्टीने रोजगार क्षमतेचाही विचार येथे केला आहे.

आजीवन अध्ययनाची संकल्पना १९९० मध्ये आली. आजीवन अध्ययनात The Organization for Economic co-operation and Development (OECD) ची भूमिका महत्त्वाची आहे. OECD ने आजीवन अध्ययनाची व्याप्ती केवळ आर्थिक दृष्टिकोनापेक्षा वाढवून ती holistic कशी होईल याचा विचार केला. १९९६ साली दिलेल्या व्याख्येत OECD ने आजीवन अध्ययनाविषयी पुढील विचार मांडले आहेत.

१. हे अध्ययन आहे.

२. यातून व्यक्तिगत आणि सामाजिक विकासाची अपेक्षा केली जाते.

३. सर्व स्थितीत, सर्व प्रकारचे अध्ययन (औपचारिक, अनौपचारिक आणि सहज) यात समाविष्ट होऊ शकेल. उदा.

   अ. शाळा, महाविद्यालयातील औपचारिक शिक्षण.

   ब. व्यवसायाच्या ठिकाणी दिले जाणारे कौशल्यवाढीचे प्रशिक्षण, प्रौढ शिक्षण.

   क. घरी, समाजात सहज दिले जाणारे शिक्षण.

४. यात सर्वांना आवश्यक ज्ञान व कौशल्ये यावर भर दिला जातो.

५. यात वयाचा कोणताही विचार केला जात नाही. लहान बालकांपासून वृद्ध नागरिकांपर्यंत सर्वजण यात सहभागी होऊ शकतात.

६. बेरोजगारांबरोबरच रोजगार करणाऱ्या कामगारांना आवश्यक ज्ञानात वाढ करण्यासाठी किंवा पुन:प्रशिक्षणासाठी या अध्ययनाचा लाभ घेता येतो.

१९९० च्या दशकाच्या अखेरच्या वर्षात झालेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील कृतीसत्रे – चर्चासत्रांतून आजीवन अध्ययनाची व्याप्ती वाढविली गेली.

व्यक्ती आणि समाजगटांच्या लोकशाही स्वरूपाच्या तसेच नागरी स्वरूपाच्या सक्रिय वाढीचा यात समावेश केला जातो. त्यातून सर्वांच्या सर्व प्रकारच्या विकासासाठी उपयुक्त बाबी यात अंतर्भूत केल्या.

**आजीवन अध्ययनाची व्याप्ती (Scope)**

– व्यक्ती, समूह (गट), समाजाचे विविध घटक.

– त्यांचे (स्वत:च्या विकासासाठी) अध्ययन.

– हे अध्ययन कोणत्याही स्थितीत /क्षेत्रांत होऊ शकते. (उदा. औपचारिक, अनौपचारिक आणि सहज पद्धतीने)

– यात बरोजगार व्यक्तीबरोबर उपलब्ध असलेली व्यक्तीसुद्धा सहभागी होऊ शकते.

– अशा प्रकारे विकासासाठी माणसे व्यक्तिगत स्वरूपात, गट स्वरूपात तसेच कोणत्याही पद्धतीने, कोणत्याही स्थितीत शिकू शकतात.

**आजीवन अध्ययनाची क्षेत्रे (fields)**

आजीवन शिक्षणाप्रमाणे आजीवन अध्ययन ही संकल्पना आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे आली. हे ध्यानात घेऊन त्याच्या क्षेत्रांची मांडणी केली आहे. त्याचा भारतीय स्थितीत आपण अर्थ लावला तर उपयुक्त ठरेल.

१. **औपचारिक शिक्षण :** भारतात औपचारिक शिक्षणाचे जाळे मोठे आहे. (आकडेवारी, शाळा, महाविद्यालय, विद्यार्थी इत्यादी.) यांत शाळा, महाविद्यालयात दाखल होणाऱ्या, शिक्षण पूर्ण करणाऱ्या, गळती आणि त्या शिक्षणाचा व्यक्तीविकासासाठी उपयोग करणाऱ्या युवकांची संख्या यात तफावत. समाजातील विविध गट (कष्टकरी, महिला, शेतकरी, मागासवर्गीय इत्यादी) यापैकी काहींची निवड करून त्यांना या प्रक्रियेचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. औपचारिक शिक्षण देणाऱ्या/अध्ययनास प्रोत्साहन देणाऱ्या अनेक संस्था/व्यक्ती आहेत, अनेक योजना आहेत. (उदा. सर्व शिक्षा अभियान, संपूर्ण साक्षरता योजना) त्याला मदत करणाऱ्या अनेक संस्था/व्यक्ती आहेत. त्यांची व्यक्तीविकासासाठी योग्य सांगड घातली पाहिजे. उच्चशिक्षणात १० टक्के युवकांचाही सहभाग नाही, या वास्तवाला छेद देणारी पणती प्रकाशित करणे आपल्या हातात आहे. संपूर्ण काळोख हटवणे अवघड आहे. सामाजिक वास्तवातून याबाबतीत संशोधन करून काही सिद्धांत / ठोकताळे मांडता येतील.

औपचारिक शिक्षण अधिक रंजक, उपयुक्त होण्यासाठी प्रयत्न करता येतील. मात्र त्यातील तांत्रिक बाबी, फी खर्चाचे मोठे प्रमाण, उच्च शिक्षण संस्थांची क्षमता (Intake Capacity) यांचाही विचार व्हावा.

२. अनौपचारिक शिक्षण – औपचारिक शिक्षणातील अनेक forms कमी करून व्यवसायाच्या, कामाच्या ठिकाणी लोकांच्या सोयीने अनौपचारिक शिक्षणाला पर्याय म्हणून नव्हे तर पूरक म्हणून त्यांचा वापर केला जावा. दारिद्रय निर्मूलन, निरक्षरता निर्मूलन, साक्षरता आणि इतर कौशल्ये टिकविणे व वाढविणे, मानवी हक्क रक्षण व त्यांची ओळख, पर्यावरण रक्षण, हेवेदावे, भांडणे, दंगली टाळणे, ज्ञानाधारित समाजाशी जुळवून घेण्याच्या दृष्टीने ICT ची ओळख व उपयोग, व्यक्ती सबलीकरण, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, स्थानिक व वैश्विक जगातील स्पर्धेत टिकण्यासाठी काही कौशल्य वाढीचे उपक्रम, उत्पन्नवाढीला, रोजगार निर्मितीला चालना देण्याचे उपक्रम इत्यादींची निवड आपला लक्ष्यगट पाहून केली पाहिजे.

अनौपचारिक शिक्षणाची उपयुक्तता, त्यातून मिळणारे सर्टिफिकेट, बाजारात त्याचे मोल या बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यादृष्टीने काही Continuing Education कार्यक्रम आखले पाहिजे. समकक्षता कार्यक्रम (Equivalency) शोधून व्यक्तीला त्याचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (उदा. नवसाक्षरांना ४थी, ७वी, SSC परीक्षांना बसविणे, National Open School, मुक्त विद्यापीठे बहि:स्थ शिक्षण इत्यादी).

**सहज शिक्षण**

उपयुक्त सामाजिक, मानवी मूल्यांची जोपासना करून व्यक्तीजीवन संपन्न होण्यासाठी सहजशिक्षणाचे कार्यक्रम आखले पाहिजे. उदा. ज्येष्ठ नागरिक, गृहिणींना फावल्या वेळेतील उपक्रम, शौर्य, मानवता, देशभक्ती, बंधुभाव, सत्य अशा Holistic मूल्यांचा प्रसार करण्यासाठी अनुभव कथने, Case-Studies काही Motor Skills (ड्रायव्हींग, पोहणे, संगीत इत्यादी) शिकविण्यासाठी उपक्रम.

यु.जी.सी.च्या भूतपूर्व अध्यक्ष डॉ. माधुरीबेन शहा यांनी केलेल्या ऐतिहासिक भाषणातून पुढील अपेक्षा व्यक्त केल्या. 'विद्यापीठ आणि महाविद्यालय समाजाचा भाग आहेत. त्याचे उत्तरदायित्व म्हणून समाज विकासात त्यांनी उच्च शिक्षण संस्था सहभागी झाले पाहिजे. त्यासाठी सामाजिक प्रश्न शोधून काढले पाहिजेत, त्यावर आधारित उपक्रमांची आखणी केली जावी.

आपण समाजाचाच भाग असल्याने समाजविकासाचे समाधान आपणास मिळेलच, उच्चशिक्षण अर्थपूर्ण आणि बळकट होईलच, शिवाय त्यातुन आपलाही फायदा होईल. उच्च शिक्षणासाठी प्राध्यापकांच्या मूल्यांकनात ज्ञानविस्तार (Extension) कार्यक्रमांत सहभागी होणे याला मोठे स्थान आहे.

**टीप** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागामार्फत महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय कार्यशाळांमध्ये सादर केलेला निबंध. कार्यशाळा—'आजीवन शिक्षण (Lifelong Learning) — उदयान्मुख ज्ञानशाखा: संधी व आव्हाने' दिनांक — २२,२३,२५,२६ फेब्रुवारी २०११.

# अध्ययन प्रक्रियेचे बदलते स्वरूप

**डॉ. नवनाथ तुपे**
साहाय्यक प्राध्यापक
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०७
मो.नं.९४२३३९३४७६
email : nabhatupe@yahoo.co.in

अध्ययन ही मानवी जीवनातील एक विकास प्रक्रिया आहे. अध्ययनातून वैयक्तिक, सामाजिक, भौतिक विकास घडून येतो. अध्ययन हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. अध्ययनाने व्यक्तीला प्राप्त साधन संपत्तीचा विकास व उपयोग करता येतो. जागतिकीकरणात अध्ययन प्रक्रिया ही आर्थिक वाढीच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक बनली आहे. म्हणून प्रत्येक व्यक्ती अध्ययनशील बनली पाहिजे आणि अध्ययन हे विशिष्ट वयापर्यंतच मर्यादित न राहता ते आजीवन झाले पाहिजे.

**अध्ययन म्हणजे काय?**

या प्रश्नाच्या अनुषंगाने अध्ययन प्रक्रियेवर एक दृष्टीक्षेप टाकला असता काही ठळक व्याख्या समोर येतात. वूडवर्थ यांनी अध्ययनाची व्याख्या करताना नमूद केले आहे की, "Learning is relatively permanent change in behaviour" याचा अर्थ असा होतो की, 'अध्ययन म्हणजे वर्तनातील कायमस्वरूपी बदल होय'. बदल हा निसर्गाचा नियम आहे. कार्यवादानुसार सुद्धा जगात शाश्वत असे काही नाही. प्रत्येक गोष्ट परिवर्तनीय आहे. तर तेथे मात्र असा प्रश्न उपस्थित होतो की, एखादे विशिष्ट वर्तन ठशासारखे कायमस्वरूपी असेल तर ह्या परिवर्तनीय जगामध्ये ते किती प्रमाणात उपयुक्त ठरेल? म्हणून या व्याख्यांसंबंधी शंका उपस्थित होते. शाळा महाविद्यालयात एखादे

वर्तन अवगत केल्यानंतर ते कायम स्वरूपी व्यक्तीला उपयोगी ठरेल, याची शाश्वती देता येत नाही. म्हणून अध्ययनाची ही व्याख्या साचेबद्ध स्वरूपाची आहे हे स्पष्ट होते.

अध्ययनाच्या उपरिनिर्दीष्ट प्रक्रियेत गुथ्री या तज्ज्ञाने केलेल्या अध्ययनाच्या व्याख्येमुळे अगदी भिन्न असा बदल दिसून येतो. गुथ्री (Guthry) यांच्यामते, 'Learning is to respond differently to a situation because of post experiences so Learning is a Continuous change.' याचा अर्थ असा की, भूतकालीन अनुभवामुळे एखाद्या प्रसंगात भिन्न स्वरूपाचा प्रतिसाद देणे म्हणजे अध्ययन होय. यावरून अध्ययन ही वर्तनात निरंतर बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे. यावरून असे दिसून येते की, व्यक्तीला सातत्याने बदलणाऱ्या या विश्वामध्ये टिकून राहण्यासाठी सतत आपल्या वर्तनात बदल घडवून आणावा लागतो. जे परिस्थितीशी समायोजन करतात आणि स्वत:च्या वर्तनात बदल घडवून आणतात, ते टिकून राहतात आणि जे बदलत नाहीत त्यांना या विश्वात टिकून राहणे अवघड होते. म्हणून नवनवीन अनुभव घेणे आणि नवीन बदलाला सामोरे जाण्यासाठी आजीवन अध्ययनाची गरज आहे. पेटर जारविस (Peter Jarvis) यांच्यामते, एखाद्या अनुभवातून अध्ययन घडवून येते, आपल्या संवेदना हेच आपले अनुभव बनून राहतात. संवेदना घेण्याचे मार्ग हे ऐकणे, पाहणे, सुगंध घेणे, चव चाखणे आणि स्पर्श जाणून घेणे इत्यादी आहेत. या पायाभूत संवेदनातून व्यक्ती अनुभव घेत असतो. मात्र विचार, कृती आणि भावनांचा तरल अनुभव हे ही उच्च प्रतीचे अनुभव घेण्याचे मार्ग आहेत. त्यांचेही अध्ययन प्रक्रियेत मोठे योगदान आहे. शेवटी जॉन बॉवडन आणि फेरन्स मार्टन यांनी 'द युनिव्हर्सिटी लर्निंग बियॉन्ड क्वालिटी ॲण्ड कॉम्पेटन्स' या ग्रथांत अध्ययनाची प्रक्रिया विशद करताना नमूद केलेल्या आपल्या व्याख्येवर आपले लक्ष वेधले जाते. जॉन बॉवडन (Johan Bowden) आणि फेरन्स मार्टन (Ference Morton) यांच्या मते "Learning is that which enables us to see something in the world in different way" ते पुढे म्हणतात, Effective actions requires an effective way of seeing या व्याख्येवरून असे दिसून येते

की, अध्ययनातून अशी क्षमता निर्माण होते की, त्याद्वारे व्यक्तीला जगाकडे भिन्न दृष्टीने बघता येते. चांगल्या कृती करण्यासाठी परिणामकारक दृष्टीची आवश्यकता असते. अध्ययनाची बॉवडन आणि मार्टन यांनी केलेल्या व्याख्येनुसार अध्ययन म्हणजे व्यक्तीमध्ये नवनिर्माण क्षमता विकसित करण्याची प्रक्रिया आहे.

व्यक्तीला जगातील प्रत्येक घटकाकडे भिन्न—भिन्न दृष्टीने बघता आले पाहिजे. साधारणतः एखाद्या टेबलाकडे आपण दृष्टी टाकल्यानंतर तो आपणास कसा दिसतो? चार पाय असलेला चौकोनी पृष्टपटल धारण केलेला मेज म्हणजे टेबल, असे सर्वसाधारण चित्र सर्वसामान्य माणसाच्या मनपटलावर निर्माण होते. मात्र एका सर्जनशील इंजिनिअरने या टेबलाकडे भिन्न दृष्टीने बघितले आणि ज्याला एक भरभक्कम पाय असलेला, पायथ्याशी अर्धगोल चकती लावलेला आणि गोल पृष्ठपटल धारण केलेला गोलमेज टेबल त्याने त्याच्या दृष्टीसमोर रंगविला आणि गुरूत्वाकर्षणाचा व हवेचा दाब या नियमांचा परिणामकारक उपाययोजन करून एका पायाचा हा गोलाकार टेबल त्या इंजिनिअरने तयार केला. येथे टेबल या संकल्पनेकडे त्याने भिन्न दृष्टीने बघितले. अशा प्रकारे प्रत्येक समस्येकडे भिन्न दृष्टीने बघण्याची क्षमता प्राप्त असलेली व्यक्ती कोणत्याही समस्येवर उपाय शोधू शकते. प्रश्नांची नवीन उत्तरेही ती मिळवू शकते. या संदर्भात एक निरीक्षण येथे नमूद करणे आवश्यक वाटते. पूर्वी बसला ज्या खिडक्या होत्या, त्यांच्या काचा वर—खाली सरकत्या होत्या. मात्र ग्रामीण भागातील खडबडीत रस्त्यावर या खिडक्यांच्या काचांची झडपे ही अचानक खाली आदळत असत आणि त्यामुळे लहान मुलांची बोटे, अबालवृद्धांच्या हातांना खिडक्यांच्या झडपांमुळे इजा होत होत्या. यासारख्या अनेक तक्रारी बसच्या कार्यशाळेत नोंदविण्यात आल्यात. तेव्हा या बसेसच्या खिडक्यांच्या काचांची झडपे अचानक खाली आदळतात, ही समस्या कशी दूर करावी? हा प्रश्न कार्यशाळेतील अभियंत्यांसमोर आला. म्हणून त्या कार्यशाळेतील इंजिनिअरने त्या काचांच्या समस्येकडे भिन्न दृष्टीने बघितले आणि खिडक्यांची वर लटकविली जाणारी झडप त्याने फक्त मागे—पुढे या दिशेने सरकती

ठेवली आणि ती समस्या कायमस्वरूपी दूर केली. अशा प्रकारे 'जगाकडे भिन्न दृष्टीने बघण्याची क्षमता म्हणजे अध्ययन होय', की जी समस्या निर्वाचन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब ठरते.

**अध्ययनाची बदलती प्रक्रिया :**

अध्ययन प्रक्रिया कशी बदलत गेली याचे सिंहावलोकन करावयाचे झाल्यास आपणास कृषिसंस्कृती अथवा कृषिक्रांतीवर पहिला दृष्टिक्षेप टाकावा लागतो. कृषी संस्कृतीमध्ये मानव हा जंगलाच्या सान्निध्यातून थोडा बाहेर आला. उदर—निर्वाहासाठी त्याने शेतीचा शोध लावला. ही भटक्या टोळीबद्ध समाजातील पहिली क्रांती होय. हा कृषी संस्कृतीतील समाज अतांत्रिक समाज होता. या समाजातील बदल अत्यंत मंद गतीने होत होते. या कृषी समाजातील सामाजिकीकरणाची प्रक्रिया ही पायाभूत होती. या प्राथमिक सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत अध्ययन हे अनुकरणातून होत असे. लोक एक—दुसऱ्याच्या अनुकरणातून शिकत होते. 'सुताराचे मूल' सुतारकीच्या अनुकरणातूनच अध्ययन करीत असे. अशा प्रकारे परंपरेने एका पिढीचे ज्ञान अनुकरणाच्या प्रक्रियेतून दुसऱ्या पिढीला मिळत असे.

कृषिक्रांतीनंतर जगामध्ये दुसरी क्रांती झाली. ती औद्योगिक क्रांती होती. औद्योगिक क्रांतीने कामाच्या प्रक्रियेवर, पद्धतीवर, स्वरूप आणि वेगावर थेट परिणाम केला. एवढेच नव्हे तर कामाच्या गुणवत्तेतही वाढ झाली. उत्पादन क्षमताही वाढली. याची परिणीती म्हणून संपूर्ण समाज व्यवस्थाच बदलली. बदललेला समाज हा तांत्रिक समाज होता. सामाजिक बदलामध्येही मोठ्या वेगाने बदल होत होते. समाजिकरणाची प्रक्रियाही प्राथमिक अवस्थेतून दुय्यम स्वरूपात परावर्तित झाली. सहाजिकच या दुय्यम समाजिकरणाच्या व बदलाच्या प्रक्रियेत एजंट रूपी एक दुवा निर्माण झाला. त्यासाठी निश्चित असे वर्तन घडून येणे बदलत्या परिस्थितीत आवश्यक ठरते. या वर्तन बदलासाठी आंतरक्रिया हेच अध्ययनाचे माध्यम झाले. या ठिकाणी

कागदाचा शोध लागला आणि दुय्यम समाजिकरणासाठी मोठा महामार्ग उपलब्ध झाला.

औद्योगिक क्रांतीनंतर आलेली क्रांती ही माहिती व तंत्रज्ञानाची क्रांती होती. या क्रांतीने समाजिकरणाची प्रक्रिया अत्यंत गतीशील बनली. सामाजिक बदल मोठ्या वेगाने होऊ लागले. सूचना देण्याघेण्याच्या प्रक्रियेत मूलभूत बदल झाला. 'आंतरक्रिया' ही माहिती तंत्रज्ञानामुळे आंतरबाह्य बदलून गेली. आता लोकांना याचे चांगलेच ज्ञान झाले की, 'मन' हे काही अंधारी कोठडी नव्हे, की ज्यात माहिती कोंबली म्हणजे अध्ययन होते. म्हणून अध्ययन ही एक भारांकित रासायनिक (Electrochemical) अभिक्रिया असून त्यामध्ये मानसिक पातळीवर आंतरक्रिया घडवून आणणे हिच मूलभूत प्रक्रिया आहे. म्हणून प्रभावी आंतरक्रिया घडवून आणणे हा एक अध्ययनाचा मार्ग बनला आहे. सुरूवातीच्या टप्प्यात ही आंतरक्रिया एक मार्गी होताना दिसत होती. उदाहरणार्थ शिक्षक—विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियांचा अभ्यास केला तर खालील निरीक्षणे हातात येतात. उदा. शिक्षक शिकवितात — विद्यार्थी शिकल्याचे दाखवितात. शिक्षक विचार करतात, तर विद्यार्थी विचारहीन होतात. शिक्षक सज्ञान असतो तर विद्यार्थी अज्ञान असतो. शिक्षक सक्रिय असतो तर विद्यार्थी निष्क्रिय असतात. अशा प्रकारे वर्ग खोल्यांमध्ये एकतर्फी आंतरक्रिया होत होती. त्यात अधिक परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता आहे. ही आंतरक्रिया दुहेरी घडून आली पाहिजे.

अध्ययन प्रक्रिया ही एका चढत्या शिडीप्रमाणे आहे. त्या शिडीच्या पायथ्याशी तथ्य असतात तर त्याचे माहितीत रूपांतर दुसऱ्या टप्प्यात होते. ज्ञान, आकलन आणि आंतरिक दृष्टी विकास असे क्रमवार टप्पे या शिडीवर दिसून येतात आणि शेवटचा टप्पा 'हुशारी' हा अध्ययनाचा परमोच्च बिंदू मानला गेला आहे.

अशाप्रकारे अध्ययनाची प्रक्रिया कशी बदलत आहे? या प्रश्नाच्या अनुषंगाने येथे ऊहापोह करणे अपरिहार्य आहे. विसाव्या

शतकामध्ये ही प्रक्रिया संबंध जगभर कशी होती आणि ती एकोणिसाव्या शतकामध्ये कशी बदलू पाहत आहे? याचा आपणास विचार करावा लागतो. त्यासाठी आपणास कोणते कृती आराखडे अमलात आणावे लागतील याचाही विचार करावा लागेल. प्रथमत: अडथळे दूर करण्यासाठी कोणते निर्णय घेणे आवश्यक आहे, याचा शोध घ्यावा लागेल. त्यासंबंधी काही तथ्ये Normon Longworth यांनी स्पष्टपणे मांडली आहेत. त्या अनुषंगाने भारतीय परिस्थितीचा विचार केला असता खालील घटकानुरूप बदल आपल्या शिक्षणव्यवस्थेत करणे आवश्यक आहे.

१. **शिक्षणातील अडथळे निराकरणासाठी निर्णय :**

- २० व्या शतकातील शिक्षणाची सर्व निर्णय ही जनशिक्षण आणि त्यांचे प्रशिक्षण या भोवती झाल्याचे दिसून येतात.
- मात्र २१ व्या शतकात व्यक्ती अध्ययनाच्या गरजा आणि त्यांची शैली, त्यांचे वय, अभिवृत्ती आणि पात्रता या घटकांना अनुसरून शिक्षणाचे निर्णय घ्यावे लागतील.
- या परिवर्तनासाठी कोणते कृतीआराखडे अमलात आणावे, यासंबंधी विचार होणे गरजेचे आहे. प्रथमत: कोणती अडथळे येतात याची निश्चिती करणे आणि त्या अडचणी सोडविण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे, त्यासाठी आजीवन अध्ययनाची खास अशी व्यूहरचना करावी लागेल.

२. **अध्ययनावरील मालकी हक्क :**

- अध्ययनाची गरज हिच खरी मालकी होती आणि अध्ययनासाठीचा आशय मात्र शिक्षकांच्या हाती होता, अशी परिस्थिती विसाव्या शतकात होती.
- मात्र एकविसाव्या शतकामध्ये अध्ययनकर्ता हा ग्राहक बनला आणि अध्ययनकर्त्याची गरज आणि अध्ययनाचा

आशय हे दोन्हीसुद्धा अध्ययन करणाऱ्या व्यक्तीच्या स्वाधीन केले जात आहे.

- अध्ययनकर्त्याला सक्षम करणे ही शिक्षकाची बांधिलकी असणार आहे. त्यासाठी आजीवन अध्ययन योजना तयार करावी लागेल.

३. **शिक्षणात सामाजिक गतिमानता :**

- २० व्या शतकामध्ये शिक्षक अथवा अधिव्याख्याता हाच माहितीचा किंवा ज्ञान पुरविणारा मुख्य स्रोत होता, तो एकमेव या स्रोतांचा वितरक असे.
- मात्र एकविसाव्या शतकामध्ये शिक्षक अथवा अधिव्याख्याता हे समाजामध्ये उपलब्ध असणारे सर्व स्रोत व तज्ज्ञता यांचे व्यवस्थापक बनतील आणि समाजातील स्रोतांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांच्या विकासासाठी ते उपलब्ध करून देतील.
- समाजातील कुशल, बुद्धिमान, तज्ज्ञ व ज्ञानी जनांचा शोध घेणे आणि तो अध्ययनकर्त्यांपर्यंत पोहचविणे ही कृती योजना आपणास हाती घ्यावी लागणार आहे.

४. **साधने आणि तंत्राची गरज :**

- विसाव्या शतकात शिक्षण प्रशिक्षण व्यवस्था ही रोजगार व तत्सम गरजा यावर आधारित होती.
- मात्र एकविसाव्या शतकात रोजगार व जीवनाभिमुख शिक्षण असणार आहे. जीवनाच्या गरजा पूर्ण करणारे हे शिक्षण असेल.
- व्यक्तीच्या रोजगाराच्या, जीवन जगण्याच्या, सामाजिक, आर्थिक आणि आरोग्याच्या सर्व गरजा विचारात घेऊन शिक्षणाची बांधणी करावी लागेल.

५. **अध्ययनाच्या सुविधा सार्वत्रिक करणे :**

- विसाव्या शतकात कोर्सेस अथवा अभ्यासक्रम हे विविध शिक्षण संघटना स्वत:च्या परिसरात पुरवित असे.

- एकविसाव्या शतकात अध्ययनकर्त्याच्या प्रभावानुसार कोर्सेस तयार केले जातील आणि केव्हाही, कोठेही, कशाही पद्धतीने, कोणालाही, पाहिजे त्या गतीने शिक्षण उपलब्ध करून दिले जाईल.
- घरात, बागेत, शाळेत, कामाच्या ठिकाणी, रस्त्यावर, बसमध्ये शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. जेव्हा व्यक्तीला हवे, त्या वेळेस, हवे ते शिक्षण मिळाले पाहिजे.

६. **अपयश मुक्त शिक्षण :**

- विसाव्या शतकात परीक्षा ह्याच व्यक्तीच्या शिक्षणाचे यश—अपयश ठरवित असे.
- एकविसाव्या शतकात अपयश मुक्त शिक्षणाची बांधणी केली जात आहे. परीक्षा ह्या व्यक्तीच्या शिक्षणातील यश—अपयश निश्चित करण्यासाठी असणार नाहीत तर शिकण्यास प्रेरणा देण्यासाठी असतील. जेव्हा विद्यार्थ्याला वाटेल तेव्हा तो स्वत:चे मूल्यमापन करून घेईल.
- नवउपक्रमशील मूल्यनिर्धारणाची साधने नव्याने निर्माण करावी लागतील. विद्यार्थ्यांना त्यांच्या वेळेनुसार स्वयंमूल्यमापन करून घेण्यास संधी द्यावी लागेल.

७. **कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम :**

- विसाव्या शतकात कशाचा विचार करावा, यासाठी ज्ञान व माहिती यावर आधारित शिक्षण होते.
- एकविसाव्या शतकात आकलन, कौशल्य, मूल्ये यावर आधारित कसा विचार करावा, या दृष्टीने शिक्षणाची मांडणी केली जात आहे.
- स्वत:ची कौशल्ये व मूल्य वाढावीत असे अभ्यासक्रम तयार करावे की ज्याद्वारे लोकांच्या क्षमता विकसित केल्या जातील.

८. **क्रियाशील नागरिकत्व वाढीस लावणे :**

- विसाव्या शतकात अध्ययन ही कष्टप्राय व अवघड अशी तपश्चर्या मानली जात होती.
- एकविसाव्या शतकात मात्र अध्ययन ही आनंददायी प्रक्रिया असून जी सहभागी आणि परस्परांना जोडणारी व गुंतवून ठेवणारी बौद्धिक प्रक्रिया आहे.
- अध्ययनाचे महोत्सव भरविणे, कुटुंब, व्यक्ती, समुदाय आणि विविध संघटना यांचा अध्ययन महोत्सवात सहभाग वाढविणे.

अशाप्रकारे एकविसाव्या शतकात केवळ विशिष्ट गटासाठी, विशिष्ट वयोगटासाठी शिक्षण असणार नाही तर प्रत्येक व्यक्तीसाठी व संबंध जीवनासाठी शिक्षण निर्माण करावे लागेल. आजीवन अध्ययन विचारात घेऊन शिक्षणाची पुनर्रचना करावी लागेल. वर्गामध्ये माहिती अथवा आशय पुरविणे, हे शिक्षकाचे काम असणार नाही तर विविध स्रोत विद्यार्थ्यांना पुरविणे, हे त्याचे कौशल्य महत्त्वाचे असणार आहे. विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देऊन भागणार नाही तर त्यांना 'हवे ते ज्ञान', 'पाहिजे त्या वेळेला', 'कसे निर्माण करावे' याचे प्रशिक्षण द्यावे लागेल. ज्ञाननिर्मितीचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित करावे लागतील.

## संदर्भ


Jarvis Peter (2006), Towards A Comprehensive Theory of Human Learning, Lifelong Learning and The Learning Society, Vol. 1, Rutledge, New York.

Bowden John and Mortan Ference (1998), The University of Learning, Beyond Quality and Competence, Rutledge Taylor Francis Group, London and New York.

Longwarth Norman (2003), Lifelong Learning In Action, Transforming Education In The 21st Century, Rutledge, Taylor & Francis Group, London & New York.

# महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर: विसाव्या शतकातील आधुनिक मार्गदर्शक

**डॉ. विलास आढाव**
प्राध्यापक
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे– ४११००७
मो.: ९८५०९१०९१७, E-mail : adhavvb@gmail.com

विसावे शतक हे ऐतिहासिक, सामाजिक आणि औद्योगिक उत्क्रांतीचे शतक म्हणून इतिहासामध्ये गणले गेले आहे. या शतकाने फुले—आंबेडकरांसारखे ऐतिहासिक महामानव दिले. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचा मृत्यू झाला. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. या दोन महामानवांचा मृत्यू आणि जन्म यांची ऐतिहासिक सांगड दिसून येते. एके ठिकाणी क्रांतिसूर्याचा अंत होत आहे व दुसऱ्या ठिकाणी उद्याच्या आशावादी प्रज्ञासूर्याचा उगम होत आहे. असे दु:खद व सुखद गोष्टींचा एकत्रित मिलाफ घडवून आणणारे असे हे प्रसंग आहेत.

महात्मा फुले यांनी सामाजिक चळवळीची धुरा व सूत्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वाधीन करून आपले संपूर्ण जीवन अस्पृश्यांच्या, उपेक्षितांच्या, विस्थापितांच्या आणि स्त्रियांच्या उद्धारासाठी वाहून घेतलेल्या अभूतपूर्व कार्याची सांगता केली. फुले—आंबेडकर ही दोन युगपर्वे इतिहासाची फार मोठी देणगी आहे, हे आपणा सर्वांना कदापि विसरता येणार नाही. या देशामध्ये सामाजिक सुधारणेचा पाया सर्वप्रथम महात्मा फुले यांनी घातला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याच्यावर कळस चढवला.

क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ अमेरिकेतील निग्रो चळवळीला अर्पण केला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले गुरू क्रांतीबा फुले यांना 'Who were the Shudras' (अस्पृश्य मूळचे कोण) हा ग्रंथ अर्पण केला. फुले आणि

आंबेडकर हा जसा द्वंद्व समास आहे तसा जगाच्या इतिहासामध्ये अब्राहम लिंकन आणि डॉ. आंबेडकर हा देखील द्वंद्व समास आहे.

राजा राममोहन रॉय यांच्या निधनानंतर पंचावन्न वर्षांनी आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्यापूर्वी पंधरा वर्षे म्हणजे, इ.स. १८२७ साली म. जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म झाला. राममोहन किंवा न्या. रानडे हे ब्राह्मण कुटुंबात जन्माला आल्यामुळे त्यांना जन्मानेच विद्येची परंपरा लाभली होती. परंतु जोतीराव हे हिंदुधर्मपरंपरेत शूद्र मानलेल्या माळी या शेतकरी जातीत जन्मले असल्यामुळे त्यांना शिक्षण घेण्यासाठी एकीकडून ब्राह्मण पुरोहितवर्गाशी आणि त्यांच्या परंपरानिष्ठ घरांतील थोरामोठ्यांविरुद्ध संघर्ष करावा लागला. ब्रिटिशांच्या भारतातील राजकीय सत्तेमुळे शिक्षण सार्वत्रिक होण्याच्या मार्गावर होते. त्यामुळे त्यांनी पुण्यातील मिशनरी शाळेत इंग्रजी शिक्षण घेतले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचा थॉमस पेन यांच्या लिखाणाशी परिचय झाला. विशेषत: पेन यांच्या ‘Right of Man’ या ग्रंथाच्या वाचनाने ते भारावून गेले होते आणि सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते बनले. भारतातील ब्रिटिश साम्राज्यशाही नष्ट करण्यासाठी आणि देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग त्यांना योग्य वाटला. त्यासाठी त्यांनी श्री. लहुजी वस्ताद या मातंग जातीतील थोर महामानवाने सुरू केलेल्या तालमीत सैनिकी प्रशिक्षण घेतले. इ.स. १८४७ साल हे जोतीरावांच्या जीवनातील क्रांतिकारी साल होते. थॉमस पेन यांचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार आणि लहुजी वस्ताद यांच्या तालमीतील शिक्षणाने ते राष्ट्रवादी विचाराने भारावून गेले होते. परंतु एकाच वर्षात त्यांना उच्चवर्णीय जातीचा जो अनुभव आला, त्यामुळे त्यांच्या मनात तीव्र संघर्ष सुरू झाला. त्यांच्या एका मित्राच्या लग्नाच्या वरातीत ते सामील झाले असताना ते शूद्र असल्यामुळे त्यांना वरातीतून बाहेर काढण्यात आले. हा अपमान त्यांना सहन झाला नाही. ते अंतर्मुख बनले आणि भारतातील शूद्रातिशूद्र समूहाचा खरा शत्रू कोण याचा शोध घेऊ लागले. ज्या ब्रिटिशांनी भारतावर राजसत्ता स्थापिली होते ते ब्रिटिश की, ज्या ब्राह्मण पुरोहितवर्गाने बहुजन समाजाला धर्माच्या नावाने हजारो वर्षे गुलामगिरीत ठेवले तो ब्राह्मण. पुरोहितवर्ग आणि त्यांचा धर्म प्रचंड वैचारिक संघर्षानंतर त्यांना हे दोन्हीही शत्रूच वाटत होते. परंतु या दोन्हीही शत्रूंशी एकाच वेळी लढणे अशक्य असल्याने सामाजिकदृष्ट्या पुरोगामी असलेल्या ब्रिटिश शासनाच्या साहाय्याने ब्राह्मण पुरोहितवर्गापासून स्वातंत्र्य मिळवणे त्यांना

अधिक योग्य वाटले. याची कबुली त्यांनी पुढे इ. स. १८७३ साली लिहिलेल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात दिली आहे. ब्राह्मण लोकांनी थॉमस पेन यांच्या ग्रंथाच्या आधारेच आपण सर्व लोक एक झाल्याशिवाय अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन लोकांशी बरोबरी करू शकणार नाही असे त्यांच्या मनात भरल्यामुळे "मी तसले वेडाचार काही दिवस माझ्या लहानपणी करीत होतो, परंतु पुढे मी जेव्हा त्याच ग्रंथावरून बारीक विचार करून पाहू लागलो तेव्हा या सुधारल्या भटांच्या मतलबी मसलतीचा खरा अर्थ माझ्या ध्यानात आला." भट ब्राह्मणांना ब्रिटिशांना या देशातून हाकलून लावून आणि त्यांची राजसत्ता स्थापन करून शूद्रातिशूद्रांना कायमचे गुलामगिरीत कसे ठेवायचे होते, याची विस्ताराने चर्चा करून त्यांनी ब्रिटिशांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक सुधारणांकडे लक्ष वेधले आहे. परंतु त्याचबरोबर शूद्रातिशूद्रांनाही इशारा देताना स्पष्टपणे म्हटले आहे की, "इंग्रज लोक आज आहेत, उद्या नाहीत, ते आपल्या जन्माला पुरतील म्हणून कोणाच्याने खासकरून सांगवत नाही. यास्तव त्या लोकांचे राज्य या देशात आहे तोच आपण सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यातून मुक्त व्हावे, यामध्ये मोठा शहाणपणा आहे. देवाजीने एकदा शूद्रावर दया करून इंग्रज बहादरांच्या हातून भटनानांचे बंड मोडवले म्हणून बरे झाले, नाहीतर त्या शादावलाच्या पुढच्या लिंगापुढे रुद्र करणाऱ्या सुधारल्या भटांनी आजपावेतो कित्येक महारांस एकेरी धोतर नेसल्यामुळे अथवा कीर्तनामध्ये संस्कृत श्लोकांचा उच्चार केल्यामुळे काळे पाणी दाखवले असते."

यावरून महात्मा फुले यांच्या मनातील बहुजन समाजाच्या गुलामगिरीची कारणे आणि त्यातून मुक्त होण्याचा मार्ग स्पष्ट दिसतो. त्याचप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यशाहीकडे पाहण्याची त्यांची दृष्टीही स्पष्ट होते. महात्मा फुले भारतातील शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्या गुलामीचे कारण हिंदुधर्माच्या वर्ण आणि जातीव्यवस्थेत पाहतात. त्यांच्या पराधीनतेचे कारण पुरोहित—वर्गाने स्वतःच्या आर्थिक लोभाने जे कर्मकांड, अंधश्रद्धा आणि नरकाची भीती दाखवून त्यांना भविष्याबद्दल सतत भयग्रस्त ठेवण्याचा जो उद्योग केला त्यात आहे असे मानतात. म्हणून महात्मा फुले यांना त्याविरुद्धचा संघर्ष साम्राज्यवादातून स्वतंत्र होण्यापेक्षा अधिक महत्त्वाचा वाटत होता. कारण या संघर्षात युरोपीय प्रबोधनाची आधुनिक शास्त्रीय आणि विवेकवादी दृष्टी घेऊन आलेले ब्रिटिश राज्यकर्ते आपल्या जन्माला

पुरणार नाहीत, हे सांगून ब्रिटिशांना कधी ना कधी भारतातून जावेच लागेल, हेसुद्धा महात्मा फुले सूचित करीत होते. ब्रिटिश साम्राज्यशाही मूल्यमापन त्या काळातील सैद्धान्तिक अभिनिवेशावर न करता ते भारतातील तत्कालीन समाजवास्तवाच्या आधारावर आणि एतद्देशीय पेशवाईसारख्या धर्मराज्य आणि सामंतीव्यवस्थेच्या तौलनिक वास्तवावर व्हावे, असे केवळ फुले यांनाच वाटत नव्हते तर, राजा राममोहन रॉय यांच्यापासून ते डॉ. आंबेडकरांपर्यंतच्या सर्वच समाजसुधारकांना वाटत होते. भारतीय राजकारणात महात्मा गांधी यांच्या उदयापर्यंत तरी स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकीय सत्ता आणि बंधुभाव या आधुनिक मूल्यांवर समाज उभारणी होईल, याची खात्री कोणीही देऊ शकत नव्हते. म्हणून महात्मा फुले यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीला दिलेला पाठिंबा चूक होता, असे म्हणता येणार नाही. मग गुलामगिरी ही स्वकीयांची असो की परकीयांची असो, तिच्यात कोणताही गुणात्मक फरक नसतो. भारतीय शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया धर्मशास्त्रांनी लादलेल्या सामाजिक गुलामगिरीत हजारो वर्षे खितपत पडल्या होत्या. म्हणून फुले यांनी थॉमस पेन यांचा आदर्श समोर ठेवून, हिंदू धर्माची आणि धर्मशास्त्रांची कठोर चिकित्सा निधड्या छातीने कधी उपहासगर्भ तर कधी शिवराळ आणि रांगड्या भाषेत केली. ज्या वर्षी पश्चिमेकडे कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांचा कम्युनिस्ट जाहीरनामा प्रसिद्ध झाला, त्या वर्षी म्हणजे इ.स. १८४८ साली शूद्रातिशूद्रांसाठी पहिली मुलींची शाळा सुरू केली. शिक्षणाशिवाय शूद्रातिशूद्रांची आणि स्त्रियांची गुलामगिरी नष्ट होणार नाही, यासाठी शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे. सार्वजनिक सत्यधर्मासारखा धर्मनिरपेक्ष इहवादी परंतु शुद्ध आस्तिकवाद दिला. कबीर आणि तुकारामाचा वारसा सांगत त्यांची आधुनिक ज्ञानविज्ञानाशी सांगड घालत आधुनिक जीवनमूल्यांचा स्वीकार करून त्यांचा प्रसार केला. इतर सुधारणांप्रमाणे जुन्या धर्मग्रंथांचे नवे अर्थ न सांगता त्यांचा उच्छेद करण्याची आणि माणसाने त्यांच्या विवेकशक्तीचा वापर करण्याची शिकवणूक दिली. म्हणूनच महात्मा जोतीराव फुले यांना आधुनिक भारताचे जनक मानणे उचित आहे.

वास्तविक पाहता, महात्मा फुले यांनी इतर काहीही न लिहिता फक्त अखंडच लिहिले असते, तरीही फुले एक क्रांतिकारी कवी, पुरोगामी समाजसुधारक, मर्मज्ञ राजकारणी आणि व्यासंगी विद्वान म्हणून मान्यता पावले असते, इतके त्यांचे काव्य प्रभावशाली आहे. जगातील अनेक धर्म हे स्वर्ग—नरकाच्या कल्पनेवर उभे आहेत आणि

त्यांच्या धर्मग्रंथांतील प्रत्येक शब्द हा दैवी असून ते शब्दप्रामाण्य आणि ग्रंथप्रामाण्य स्वीकारल्याशिवाय माणसाला मोक्ष किंवा स्वर्ग लाभत नाही असे आग्रही प्रतिपादन करतात.

महात्मा फुले यांच्या निर्मिक स्वार्थासाठी, कोणाच्या तरी हितासाठी कल्पनेने साकार केलेला देव नाही. तो माणसाला आत्मसन्मान देणारा, स्वत:चा धनी स्वत:च आहेस, असे सांगणारा तर होताच परंतु त्याने निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये मानवी निर्मितीमागे काही हेतूही ठेवलेले आहेत. त्याने केलेली माणसाची निर्मिती आणि दिलेला विवेक निर्हेतुक नाही. तो हेतू सिद्ध झाला की, निर्मिकही संतुष्ट करणे म्हणजे जन्माचे सार्थक करणे. जोतीरावांचा निर्मिक कोणतेही आमिष दाखवत नाही. तो पूजाअर्चा, तीर्थयात्रा सांगत नाही. त्याने माणसाला विवेक दिला तो इतरांना लुटण्यासाठी, वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी नव्हे तर तो निगर्वी बनवण्यासाठी आणि सर्वांच्या कल्याणासाठी झटण्यासाठी दिलेला आहे. महात्मा फुले यांच्या मनात माणसाचे एक आदर्श रूप सतत दडी मारून बसलेले होते. त्यांनी माणसाची केलेली व्याख्या त्याच्या कर्तृत्वाच्या आधारे केलेली आहे. ती नीट समजावून घेतली की महात्मा फुले यांच्या धर्मसंकल्पनेत माणूस कसा केंद्रस्थानी आहे, याची सहज कल्पना येते. महात्मा फुले लिहितात, जो निर्मळ अंत:करणाचा, निर्दोषी, विचारी, सत्य आचरणारा, सूर्याप्रमाणे प्रकाशमान, चंद्राप्रमाणे शीतल, इतरांना न पीडा देणारा, धैर्यवान, शूर, जितेन्द्रिय, सद्वर्तनी तोच माणूस.

निर्मिले बांधव स्त्रीपुरुष प्राणी।
त्यात गोरे कोणी रंग वर्ण।। १ ।।
त्यांचे हितासाठी बुद्धिमान केले।
स्वतंत्र ठेविले ज्या त्या कामी।। २ ।।
कोणास न पीडी कमावले खाई।
सर्वा सुख देई। आनंदात।। ३ ।।
खरी हीच नीती मानवाचा धर्म।
बाकीचे अधर्म। जोती म्हणे।। ४ ।।

याचा अर्थ निर्मिकाने निर्मितीच्या प्रक्रियेत माणसाला इतर गोष्टींबरोबरच बुद्धी किंवा विवेकही दिला आहे. त्या विवेकाचा वापर करून कोणासही न पीडणे, त्रास न देणे, स्वत:च्या कष्टाने कमावलेलेच अन्न खाणे, फुकटच्या किंवा इतरांचे शोषण करून

कमावलेले अन्न निषिद्ध मानणे, ही जोतीरावांची साधी सरळ नीतीची कल्पना आहे. ही नीती निर्मिकाने निर्माण केलेली नसून ती निर्मिकाने माणसाला दिलेल्या बुद्धीने, विवेकाने निर्माण केलेली आहे. तिचा उपयोग करायचा की नाही हे माणसाने ठरवायचे आहे.

तिचा वापर, उपयोग वरीलप्रमाणे केला तर सर्वांना आनंद आणि सुख लाभेल. शेवटी ते सांगतात हीच खरी नीती आहे आणि त्यालाच माणसाचा धर्म म्हणतात. देव, आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, इत्यादींची धर्माच्या नावाखाली करणारी बाकीची सर्व थोतांडे धर्म नसून अधर्म आहेत. अशी त्यांच्या धर्मसंकल्पनेची रोखठोक भूमिका आहे. महात्मा फुले पुढच्या अखंडात एखाद्या गूढ, असत्य, पारलौकिक, शब्दबंबाळ, अतर्क्य धर्माचे निरूपण करीत नाहीत तर त्यांच्या रोकड्या धर्मासंबंधी सांगतात :

“सत्यविण नाही धर्म तो रोकडा।
जनांशी वाकडा मतभेद।। १।।
सत्य सोडू जाता वादामध्ये पडे।
बुद्धीस वाकडे। जन्मभर ।। २।।
सत्य तोच धर्म करावा कायम।
मानवा आराम। सर्वठायी।। ३।।
मानवाचा धर्म सत्य हीच नीती।
बाकीची कुनीती। जोती म्हणे।। ४।।”

जो धर्म सत्यावर उभा नसतो तो जनताद्रोही असतो. जे सत्याचा आधार सोडून देतात ते आयुष्यभर स्वतःच्या विवेकाशी जन्मभर प्रतारणा करीत असतात. जे लोक स्वतःच्या विवेकाशी प्रतारणा करीत असतात, ते नीतिमान बनूच शकत नसतात. म्हणून नीतीचा उगम विवेकांतून होतो. त्यासाठी त्यांचा उपयोग माणसाला करावा लागतो म्हणून नीती ही मानवनिर्मित असते. या दोन्हीही अखंडांच्या शेवटच्या ओळी तपासल्या तर नीती आणि धर्म यांचे नाते समजून घेता येऊ शकेल. पहिल्या अखंडातील शेवटची ओळ ‘खरी हीच नीती मानवाचा धर्म’ अशी आहे तर दुसऱ्या अखंडातील ‘मानवाचा धर्म सत्य हीच नीती’ असा आहे. याचा अर्थ ‘नीती हाच धर्म आणि धर्म म्हणजेच नीती’ असा होतो. महात्मा फुले यांच्या विचारासंबंधी आपले विवेचन जसजसे पुढे जाईल तसतसे महात्मा फुले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरू का मानले हे स्पष्ट

होत जाईल. आपल्या गुरूंच्या विचारांची चिकित्सा करून त्यांच्या विचारांचा विकास करीत आणि त्यांत स्वत:च्या विचारांची भर टाकीत बाबासाहेबांचे वैचारिक जीवन घडत गेले आहे. बुद्ध, कबीर आणि फुले यांना असा शिष्य लाभणे, ही अन्य महामानवांना हेवा वाटावा अशीच गोष्ट आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या The Buddha and his Dhamma या ग्रंथाच्या चौथ्या खंडात 'धर्म आणि धम्म' यांची तुलना करताना लिहिले आहे "Morality is Dhamma and Dhamma is Morality, in other words, Dhamma morality takes the place of God although, there is no God in Dhamma" म्हणजेच, नीती म्हणजेच धम्म आणि धम्म म्हणजेच नीती, वेगळ्या शब्दांत सांगायचे झाले तर धम्मात नीतीने ईश्वराचे स्थान घेतलेले आहे.

महात्मा फुले यांना बुद्धाची महती वाटत होती. त्यांच्या लिखाणात बुद्धांचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो. बुद्धांचे गुणगाण गाताना महात्मा फुले लिहितात,

बुद्धांनी खोड मोडिली, कीर्ती जोडली सर्व जगात।। १।।
मनी आर्यभट्ट कुढती, उघड रडती, उर पिटीत।। २।।
जोतीस जोत जोडी लाविना, एकी होईना सर्व जगात।। ३।।
फुले रावांचे तिखे बोल, नव्हती फोल आणा ध्यानात।। ४।।

महात्मा फुले यांनी पुढे बौद्धधर्मासंबंधी लिहिले आहे, "ब्राह्मण भटाविषयी बरे न वाटून त्यांनी बौद्धधर्माची स्थापना करून आर्य ब्राह्मणांच्या कृत्रिम धर्माचा बोजवारा करून या गांजलेल्या शूद्र शेतकऱ्यांना आर्य भटांच्या पाशातून मुक्त करण्याचा सपाटा चालवला होता. इतक्यात आर्य मुकुटमण्यातील महाधूर्त शंकराचार्यांनी बौद्धधर्मी सज्जनांबरोबर नानाप्रकारचे वितंडवाद घालून हिंदुस्थानात मोड करण्याविषयी दीर्घ प्रयत्न केला. तथापि बौद्धधर्माच्या चांगुलपणाला तिळमात्र धोका न बसता उलट त्या धर्माची दिवसेंदिवस जास्त बढती होत चालली. तेव्हा अखेरीस शंकराचार्यांनी तुर्की लोकांस मराठ्यांत सामील करून घेऊन तलवारीच्या जोराने येथील बौद्ध लोकांचा मोड केला. पुढे आर्य भटजींस गोमांस व मद्य पिण्याची बंदी करून अज्ञानी शेतकरी लोकांच्या मनांवर वेदमंत्र जादूसहित भट ब्राह्मणांचा दरारा वाढवला."

महात्मा फुले आणि त्यांच्या संघटनेवर कबीरांचा परिणाम सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासून होता, याची माहिती महात्मा फुले यांचे एक सहकारी तुकाराम हनुमंत पिंजन यांनी नोंदवून ठेवलेली आहे. त्याचप्रमाणे 'सत्यशोधक समाज' स्थापन होण्यापूर्वी काही महिने अगोदर जुना गंजपेठ, पुणे येथील जोतीराव फुले यांच्या दुकानात कबीरपंथी मठातील ज्ञानगिरीबुवा हे नित्य रविवारी येत असत. ज्ञानगिरीबुवा कबीराने केलेल्या बीजक ग्रंथातील भाग जमलेल्या मंडळींस वाचून दाखवत. बीजक ग्रंथ ब्रीज भाषेत असल्यामुळे बीप्रमती भागाचा ज्ञानगिरीबुवा मराठीत तर्जुमा करून जमलेल्या मंडळींस सांगत असत. त्यात ब्राह्मणांच्या स्वार्थाचे, वर्तणुकीचे वगैरेंचे वर्णन आहे. यावरून जोतीरावांचा कबीरांच्या वाङ्मयाशी गाढ परिचय झालेला होता. त्यामुळेच त्यांच्या लिखाणावर कबीरांच्या विचारांचीही छाप पडलेली दिसते. आपल्या विचारांची काव्यातून अभिव्यक्ती कशी करायची ही महात्मा फुले यांना तुकारामांनी दिलेली सर्वश्रेष्ठ अशी भेट आहे. त्यांच्यात अभंगांचे वाचन, मनन करीत आणि तुकाराम गाथेचे अनुकरण करत महात्मा फुले यांची प्रतिभा फुलत गेली. याचा पुरावा त्यांच्या अभंग आणि अखंडातून मिळतो.

महात्मा फुले यांनी हा वारसा जसा भारतीय महामानवांकडून आपल्या अभ्यास आणि परिश्रमाने मिळवला, तसाच पाश्चात्त्य थॉमस पेन यांच्याही लिखाणाचा त्यांनी सखोल अभ्यास करून त्यांचे विचार स्वीकारले. थॉमस पेन यांच्या 'मानवी हक्क' आणि 'विवेकाचे युग' या दोन पुस्तकांतील विचारांचा खोल ठसा त्यांच्या मनावर उमटला. तसेच पेन यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी जी पुस्तिका प्रसिद्ध केली होती, तिचाही परिणाम महात्मा फुले यांच्या मनावर झालेलाच होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वत्रयीने संपूर्ण जगाला एका आधुनिक वळणावर आणले होते. त्याचप्रमाणे जगात लोकशाहीचे एक नवे युग सुरू केले होते. गुणवत्ता ही वंशपरंपरेने नव्हे तर स्वकर्तृत्वावर प्राप्त होत असते. याची महात्मा फुले यांना झालेली जाणीव त्यांना धर्मचिकित्सेकडे घेऊन गेली. त्या क्षेत्रातील त्यांना बुद्ध, कबीर, चार्वाक आणि तुकाराम हे जसे आप्त वाटत होते तसेच थॉमस पेनच्या धर्मचिकित्सेने ते प्रभावित झालेले होते. म्हणूनच महात्मा फुले यांच्या लिखाणात भारतीय अवैदिक, पुरोगामी, समतावादी परंपरा आणि धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी पाश्चात्त्य परंपरा यांचा संयोग झालेला दिसतो.

महात्मा फुले यांनी एकोणिसाव्या शतकातील दरिद्री, असाहाय्य, हतबल स्त्री—पुरुषांना जागृत करून त्यांना आत्मभान देणे हा एक मार्ग त्यांच्यापुढे होता. आत्मभान माणसाला जगण्याची प्रेरणा देते आणि दु:खाविरुद्ध संघर्ष करण्यास सज्ज करते. जोतीराव फुले यांनी या समूहाला तुम्हीच या देशाचे मूळ निवासी असून तुम्हीच खरे क्षेत्रपती होता, परंतु तुमची ही दशा कोणी केली, याचा मनी शोध घ्या हे सांगून त्यांच्यामध्ये आत्मचैतन्य निर्माण केले.

या संपूर्ण समूहाच्या दु:खाचे कारण त्यांच्यात असलेले अज्ञान आहे. भारतातील सर्व शूद्रातिशूद्रांचे आणि स्त्रियांचे जीवन उद्ध्वस्त होण्याचे कारण महात्मा फुले यांनी शिक्षणात शोधले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहिले. त्या नाटकाचे शेवटचे संभाषण, "चला तर आपण दोघे आजपासून रोज रात्री फुले यांच्या शाळांत जाऊन लिहिणे वाचणे शिकू म्हणजेच पुढे जगातील सर्व गोष्टी आपणास कळू शकतील" असे आहे. शूद्रातिशूद्र अणि स्त्रियांसाठी ख्रिस्ती मिशनरी मदत करणारे असल्यामुळे महात्मा फुले यांचे त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. म्हणून ब्राह्मण सुधारकांनीसुद्धा त्यांची यथेच्छ टिंगल केली. महाराष्ट्राच्या बुद्धिवादी मंडळींच्या गळयातील ताईत असलेले प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर हे महात्मा फुले यांना उपहासाने 'रेव्हरंड' म्हणत असत. परंतु आगरकरांचे प्रेरणास्थान असलेले जॉन स्टुअर्ट मिल मात्र महात्मा फुले यांच्या शिक्षणक्षेत्रातील कामाने, विशेषत: स्त्रीशिक्षणाच्या कामाने प्रभावित होऊन त्याची दखल घेताना दिसतात. महात्मा फुले यांचे बहुजन समाजाच्या दु:खाचे निदान त्यांच्या लेखनात अनेक ठिकाणी स्पष्ट झाले आहे. त्यांनी लिहिले आहे,

"तुम्हा सांगातो बहुतां परी, गोष्ट। ही खरी शूद्रहिताची।
दुर्दशा ती अविद्येपायी, ऐकली मीहि, कथा बहुमतांची।"

महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शिक्षणाच्या कार्याने महाराष्ट्रात एका नवशिक्षित पिढीने जन्म घेतला आणि बहुजन समाजात जागृतीची एक लाट उसळली. महात्मा फुले यांनी समाजसुधारणेची गाडी इथपर्यंत आणलेली होती. ती पुढे नेण्यासाठी या तीनही भाषांत नैपुण्य कमावून सद्‌गुणी, संपन्न आणि मान्यवंत ठरलेले भिमराव रामजी आंबेडकर हे महात्मा फुले यांच्या निधनानंतर सहा महिन्यांच्या

आत या भूमीत जन्माला आले आणि भारतातील शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांच्या जीवनात प्रकाश पेरून गेले.

## संदर्भ

Ambedkar B. R. (1979), 'Writing and Speeches', Vol. 11, Government of Maharashtra, Bombay.

कसबे रावसाहेब (२०१६), 'भक्ती आणि धम्म', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई.

कसबे रावसाहेब (२००८), 'धर्मग्रंथ आणि मानवी जीवनप्रवाह', सुगावा प्रकाशन, पुणे.

फडके य.दि. (संपा.) (१९९१), 'महात्मा फुले—समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती.

कसबे रावसाहेब (१९९६), 'मानव आणि धर्मचिंतन', सुगावा प्रकाशन, पुणे.

हरी नरके यांनी संपादित केलेल्या 'महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा.'

कदम दिगंबर (२०१५), (वर्ष २रे अंकात) यांनी प्रकाशित केलेल्या 'सा. समता कृती' प्रथम वर्धापनदिन अंकातील डॉ. विलास आढाव यांच्या 'महात्मा फुले व स्त्रियांचा विकास' या लेखातून.

# शालेय समाजकार्य: शालेय मुलांच्या समस्या हाताळण्यासाठी प्रभावी तंत्र

**डॉ. भौमिक देशमुख**
प्राध्यापक
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीस शैक्षणिक संस्थांमध्ये गोंधळाची स्थिती बघावयास मिळते. एका बाजूला शालेय व महाविद्यालयांची, मुलामुलींची, विद्यार्थ्यांची व पालकांची आणि दुसऱ्या बाजूला शालेय प्रशासनाची तारांबळ होत असतानाचे चित्र आपल्याला दिसते. चांगल्या शाळा, महाविद्यालयांमध्ये आपल्या पाल्याला प्रवेश मिळविण्यासाठी पालकांचा खटाटोप आणि शालेय प्रशासनाकडून त्यांना नकार किंवा अनेक हेलपाटे घातल्यानंतर कसेतरी प्रवेश मिळविणे. या सर्व कसरतींचा प्रत्यक्ष—अप्रत्यक्षरीत्या मुलांच्या, पाल्याच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होत असतो.

व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये शाळा, पालक, समाज, मित्र—परिवार या सर्व गोष्टींचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. या सर्वांनी एकत्रितपणे, एकमेकांना पूरक अशा प्रकारच्या भूमिका बजावण्याचे काम करावयाचे असते. यापैकी एखाद्या जरी संस्थेकडून आपल्या कर्तव्याचे पालन व्यवस्थित झाले नाही तरी मुलांच्या विकासावर त्याचा परिणाम होत असतो.

या सर्व पार्श्वभूमीवर शालेय स्तरावर शिक्षण घेणाऱ्या कुमार व किशोरांसाठी त्यांचे गुंतागुंतीचे भावनिक विश्व हाताळून त्यांच्या निकोप व निरोगी व्यक्तित्त्वास पूरक अशा वातावरण निर्मितीसाठी शाळांमध्ये उच्चशिक्षित व प्रशिक्षित अशा समाजकार्यकर्त्यांची, मानसोपचार तज्ज्ञांची किंवा सल्लागाराची उपलब्धता असणे ही अनेक शालेय आवश्यकतांपैकी एक महत्त्वाची आवश्यकता समजली जाऊ लागली.

आपल्याकडे शाळांचे दैनंदिन वेळापत्रक इतके आखीव—रेखीव आणि चाकोरीबद्ध असते की, मुलांच्या गरजा आणि अडचणींकडे लक्ष देण्यास शिक्षकांना पुरेसा वेळही मिळत नाही किंवा शिक्षकांना पुरेसा वेळ असला तरी मुलांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवनामध्ये जास्तीचा हस्तक्षेप नको म्हणून शिक्षक विद्यार्थ्यांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्नच करीत नाहीत. मुलांच्या अडचणींविषयी बऱ्याचदा शालेय प्रशासनाची उदासीनताही दिसून येते. उदा. मुलांच्या वारंवार गैरहजर राहण्यामागच्या कारणांचा शोध घेतला जाणे आवश्यक असते. काही मुलांना इंग्रजीसारखे शिकविण्याचे माध्यम अवघड वाटते, एखाद्या विषयाची आवड नसणे, बेताची आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक कलह, सावत्र पालक, अतिसंवेदनशील मुले, अति संरक्षित किंवा लाडावलेली मुले, मित्रपरिवार, कडक शालेय शिस्त, सांस्कृतिक भिन्नता, भांडखोर शेजारी, सतत भांडणारे माता—पिता अशा अनेकांपैकी एक—दोन कारणांमुळे किशोरवयीन मुले टोकाचा नकारात्मक विचार करू शकतात. शाळांमध्ये अशा वेगवेगळ्या कारणांमुळे न्यूनगंड जोपासत समस्याग्रस्त झालेली अनेक मुले दिसून येतात. साधारणतः सर्वसाधारण शालेय वातावरणात अशी सर्वच मुले शिक्षकांना दृष्टीस पडतील किंवा ते ओळखता येतील असेही नाही; परंतु बहुतांश अशी समस्याग्रस्त मुले शिक्षकांच्या नजरेतून सुटत नाहीत.

अशा मुलांमधील न्यूनगंड घालविण्यासाठी शाळांमध्ये स्वतंत्र अशी यंत्रणा नसते आणि या कामी शिक्षकांचे कौशल्य आणि वेळही अपूर्ण पडतो. अशा वेळी शालेय सहायक (समाज कार्यकर्ता) किंवा सल्लागार प्रशासनाला आणि शिक्षकांना पूरक परंतु स्वतंत्रपणे काम करीत असतो. मुलांच्या अनुपस्थितीचा किंवा वेगवेगळ्या समस्यांची कारणे समजून घेण्यासाठी पालकांना वारंवार भेटणे, मुलांच्या मित्रांना, शेजाऱ्यांना, शिक्षकांना भेटणे, त्यांच्याकडून समस्याग्रस्त मुलांची संपूर्ण माहिती घेणे इ. कामे समाज कार्यकर्त्यांला वारंवार करावी लागतात. अर्थात ही माहिती घेण्यासाठी शास्त्रीय समाज कार्याचे ज्ञान आणि कौशल्ये असणे आवश्यक असते. मुलांच्या समस्येची संपूर्ण कारणे

समजून घेऊन योग्य ते 'निदान' किंवा निष्कर्ष काढून संपूर्ण अहवाल (केस रिपोर्ट) शालेय प्रशासन व संबंधित शिक्षकांकडे पाठविला जातो. त्यात समस्याग्रस्त मुलाला सुधारण्याचे उपायही सुचविले जातात.

समाज कार्यकर्ता किंवा सहायक, शालेय प्रशासन आणि पालक यांच्या संघटित प्रयत्नाने मुलांमध्ये व्यवस्थित सुधारणा होत जातात. विशिष्ट समस्येमुळे मुलांवर असणारा ताण हलका होतो आणि तो अभ्यासात प्रगती करू लागतो. ही कामाची पूर्णपणे शास्त्रीय पद्धत आहे. प्रतिबंधात्मक उपाय करण्याच्या या प्रक्रियेमध्ये समाज कार्यकर्ता समस्याग्रस्त मुलांची सुरूवातीपासूनची शैक्षणिक प्रगती, नियमितपणा आणि त्याचे वर्तन याविषयी शोध घेतो. गृहभेटीतून पालकांशी आणि इतर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांशी सुसंवाद साधतो आणि शास्त्रीय ज्ञानाच्या आधारे कारणांची चिकित्सा करून समस्यांची उकल करतो. अर्थात येथे सांघिक प्रयत्नांचीच आवश्यकता असते.

पुणे, मुंबई आणि नागपूरमध्ये काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये अशा व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. ते सल्लागार, मार्गदर्शक, प्रेरक आणि मित्र म्हणून भूमिका बजावतात. समाज कार्यकर्ता साधारणत: पाच प्रकारच्या सेवा शाळांमध्ये देत असतो. त्या म्हणजे व्यक्ती सहाय्य सेवा, शिक्षक सहाय्य सेवा, प्रशासन सहाय्य सेवा आणि समुदाय किंवा लोकसहाय्य सेवा इ. व्यावसायिक समाज कार्यकर्त्याने शाळांमध्ये नेहमी विशिष्ट आवड—निवड असलेले गट विकसित करून त्यांच्यात समन्वय साधून वैयक्तिक चर्चा, गट चर्चा, अनुभवांचे कथन असे स्वतंत्र उपक्रम राबविणे अपेक्षित असून या सर्व उपक्रमांचा उद्देश मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासात पूरक भूमिका करणे हा असतो. यासाठी शालेय प्रशासनाचा सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असतो.

शालेय सहाय्य कार्याचा इतिहास तसा फार जुना नाही. खरे तर संपूर्ण भारतात व्यावसायिक समाजकार्याचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था महाराष्ट्रात सर्वाधिक आहेत. मुळात या शिक्षणाची सुरूवातच महाराष्ट्रापासून झालेली आहे. मुंबईच्या टाटा समाज विज्ञान संस्थेने

१९३६ मध्ये या शिक्षणाची सुरूवात केली. या संस्थांमध्ये पदव्युत्तर पातळीवर व्यावसायिक समाजकार्याचे प्रशिक्षण देऊन निष्णात कार्यकर्ते किंवा प्रशंसक तयार केले जातात. अशा प्रशिक्षित समाज कार्यकर्त्यांच्या जर शाळांमध्ये नेमणुका झाल्या, तर मुलांमधील न्यूनगंड कमी करून त्यांच्यात सकारात्मक दृष्टिकोन आणता येईल. आपल्याकडे परोपकार वृत्तीने पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या समाजकार्यापेक्षा निराळ्या स्वरूपाचे हे कार्य आहे. या कार्याची चौकट पूर्णतः मानसशास्त्र, समाजशास्त्र व कल्याण प्रशासन या शास्त्रीय ज्ञानाच्या आधारावर तयार झालेली आहे. ही कार्य पद्धती वैद्यकीय व्यवसायाशी सांधर्म्य दाखविणारी आहे.

शालेय सहाय्य कार्याची सुरूवात मात्र नितांत गरजेतून अमेरिकेत झालेली आहे. सुरूवातीचे काम हे मुख्यतः पालकांच्या पातळीवरच वसाहतीत होत असे. साधारणतः १९६०च्या दरम्यान 'भेट देणारे शिक्षक' या संकल्पनेची जागा 'शालेय सहाय्य कार्यकर्ता' या संकल्पनेने घेतली. व्यावसायिक समाज कार्याचा सार्वत्रिक झालेला प्रसार आणि उपयोगिता लक्षात घेऊन विविध शाळांनीही व्यावसायिक समाज कार्याचा सार्वत्रिक झालेला प्रसार आणि उपयोगिता लक्षात घेऊन विविध शाळांनीही व्यावसायिक समाजकार्याकडे विकासात्मक दृष्टिकोनातून पहाण्यास सुरूवात केली. भारतातही हळूहळू ही संकल्पना स्वीकारली जात आहे, परंतु सरकारी पातळीवर याबाबत धोरणात्मक निर्णयाच्या अभावामुळे व्यावसायिक समाज कार्याकडे अजूनही दुर्लक्ष झालेले आहे. आपल्याकडे शहरी आणि ग्रामीण अशा दोन्हीही क्षेत्रांमध्ये ही संकल्पना व्यवहारात प्रभावीपणे रूजविता येईल.

आपल्याकडे शहरी अथवा ग्रामीण शाळांमधील मुले असोत त्यांनाही विविध समस्या आहेत. उदा. मुलांनी सतत गैरहजर राहणे, शाळा अर्धवट सोडून देणे, अभ्यासात बेताचीच प्रगती असणे, अभ्यासक्रम समजण्यात अडचणी, मुले अधिक संवेदनशील असणे, भावनांवर नियंत्रण न ठेवता येणे, भावनिक—मानसिक गुंतागुंतीमुळे वर्तन लहरी, एकलकोंडे बनणे, हाताचा अंगठा चोखणे, अंथरूण ओले

करणे, हट्टी बनणे, तंबाखू, गुटखा खाणे, विडी—सिगारेट ओढणे, नशेच्या आहारी जाणे, पालकांना चुकविणे, शिक्षकांना उलटे बोलणे, गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन करणे, बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे इच्छा व आवड असूनही शिक्षण न घेता येणे किंवा या परिस्थितीचा नकारात्मक दृष्टिकोनातून वापर करणे. या बौद्धिक—मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व वर्तनात्मक अशा वेगवेगळ्या वर्गवारीत मोडणाऱ्या समस्यांमुळे बहुतांश शालेय मुले वाममार्गाला लागत असल्याचे दिसून येते. त्यातून घर सोडून निघून जाणे, चोऱ्या करणे, खुनाच्या प्रयत्नात सामील होणे, रस्त्यावर भटकणे, मुलींची छेडछाड करणे असे प्रकार सर्रासपणे बघावयास मिळतात.

या सर्व समस्यांना कोणताही विशिष्ट एक घटक कारणीभूत नसतो, तर कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रातील दूषित वातावरणाचाही परिणाम आहे आणि त्यातून येणाऱ्या पिढ्यांमध्ये वैफल्य वाढत असल्याचे दिसून येते. हे थांबविण्यासाठी एकत्रित आणि पद्धतशीर प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून शैक्षणिक क्षेत्रातील वातावरण निकोप व निरोगी ठेवण्यासाठी शाळांमध्ये प्रशिक्षित समाज कार्यकर्त्यांची नेमणूक करून त्यांच्या माध्यमातून ‘समस्याग्रस्त मुलांच्या समस्येची’ तीव्रता काही अंशी कमी करता येईल. कारण व्यावसायिक समाज कार्यकर्ता हा विद्यार्थी, पालक, शिक्षक म्हणजेच व्यक्ती, कुटुंब, शाळा व समुदाय या विविध पातळ्यांवर काम करीत असतो.

शाळेच्या परिसरात किंवा गावात, शहरात उपलब्ध असलेल्या पूरक साधनांची माहिती शालेय प्रशासन व शिक्षकांना देणे, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किंवा आर्थिक मदतीसाठी देणगीदारांना अधिकृतपणे आवाहनही करता येऊ शकते. ‘शालेय समाज कार्य’ हा शालेय प्रशासन आणि एकूणच शिक्षणक्षेत्राचा एक अविभाज्य भाग बनायला हवा. या दृष्टीकोनातून शासन व शालेय व्यवस्थापनाने विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे.

# रघुनाथ कर्वे यांचे समाजशिक्षणातील योगदान

**श्री. दिपक अशोक मोरे**
प्रकल्प सहकारी
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ), पुणे—०७.

सध्या १८ ऑक्टोबर हा दिवस 'अॅण्ड्रॉपॉज डे' किंवा 'मॅनापॉज डे' म्हणून साजरा केला जातो. वय वर्षे ४५ झाल्यानंतर स्त्री—पुरूषांना येणारा थकवा, शरीरात होणार बदल, त्यातून होणारे आजार, त्यावर घ्यावयाची काळजी यासंदर्भात जागरूकता निर्माण होण्यासाठी असे दिवस साजरे केले जात आहेत. कारण ती काळाची गरज आहे, म्हणून हा देखील समाजशिक्षणाचा भाग होऊ शकतो. समाजशिक्षणातून समाजाचा सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक विकासाबरोबरच त्यांच्या आरोग्यासंदर्भात जागरूक राहण्यासाठी त्यास ज्ञान देण्याची गरज आहे. हा प्रयत्न विसाव्या शतकात रघुनाथ कर्वे यांनी केलेला होता.

रघुनाथ धोंडो कर्वे हे प्रामुख्याने महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे पुत्र म्हणून अधिक परिचित आहेत. समाजसुधारणेच्या कार्याचा अनुभवसंपन्न वारसा त्यांना वडिलांकडून मिळत होता. 'गणित' विषयात प्रावीण्य मिळविलेले रघुनाथ कर्वे हे व्यवसायाने प्राध्यापक म्हणून रूजू झालेले असले तरी त्यांनी विद्यार्थीदशेपासूनच समाजशिक्षणाचा ध्यास घेतलेला दिसून येतो. कर्वे यांनी संततिनियमनाच्या प्रचार व प्रसाराबरोबरच आहार, त्वचारोग, गुप्तरोग यासारख्या आरोग्यसंदर्भात जागरूकता निर्माण करणाऱ्या शास्त्रीय विचारांचा प्रसार केला.

सन १९२१ मध्ये भारतातील पहिले संततिनियमन उपचार केंद्र रघुनाथ कर्वे यांनी सुरू केले. नोकरी किंवा संततिनियमनाचे कार्य यापैकी एक निवडण्याची वेळ त्यांच्यावर आली असता त्यांनी नोकरीचा त्याग करून पूर्णवेळ संततिनियमनाचे प्रचार व प्रसाराचे काम हाती घेतले. १९२७ मध्ये त्यांनी याच समाजशिक्षणाच्या कार्यासाठी ''समाजस्वास्थ्य'' नावाचे मासिकही सुरू केले. 'संततिनियमन', 'कामशास्त्र', 'त्वचेची निगा', 'आहारशास्त्र', 'वेश्या व्यवसाय', 'मोपासांच्या कथा' यासारख्या मराठी, इंग्रजी भाषेतील पुस्तकांबरोबरच वेगवेगळ्या मासिकांमध्ये, वृत्तपत्रांमध्ये लेखही त्यांनी लिहिले. त्यांचे लेख बुद्धीप्रामाण्यवादी स्वरूपाचे असत. त्यांच्या बुद्धीप्रामाण्यवादी लेखनाला व त्यांच्या कार्याला त्याकाळात काही वृत्तपत्रे, राजकीय पक्षांनी 'अश्लील' संबोधून या कार्यास समाजशिक्षणाचा भाग असल्याचे नाकारले. त्यामुळे त्यांना तीन न्यायालयीन खटल्यांना सामोरे जावे लागले, परंतु त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले. (अप्रकाशित र.धों. — संपा. अनंत देशमुख)

महात्मा गांधींनी देखील समाजशिक्षणाचा वसा घेतलेला होता. ज्यावेळेला जग बंदुकीच्या गोळीने साम्राज्य विकास व सुरक्षेचा मार्ग अवलंबित होते, त्याचवेळी या परिस्थितीत भारतीयांना स्वातंत्र्य व सुरक्षा यासाठी महात्मा गांधींनी अहिंसेचा मार्ग दाखविला. (ज्ञानविस्ताराची क्षितिजे — धनंजय लोखंडे, नवनाथ तुपे,) तत्कालीन भारतीय लोक गरिब होते. त्यांना दोन वेळेचे जेवण मिळत नसताना नको असलेले अपत्यांसाठी 'ब्रह्मचर्य', 'आत्मसंयम' मार्गाने संततिनियमन करण्याचा सल्ला त्यांनी जनतेला दिला, ज्यास रघुनाथ कर्वे यांनी तीव्र आक्षेप घेवून 'अशास्त्रीय व अनैसर्गिक उपाय' असे संबोधले होते, थोडक्यात समाजशिक्षण हे मूल्यात्मकतेबरोबरच शास्त्रीय दृष्टिकोनातूनही योग्य असायला हवे.

रघुनाथ कर्वे यांनी संततिनियमनाचा प्रचार व प्रसार करतानाच समाजातील गैरसमज, अंधश्रद्धा व इतर शारीरिक समस्या यांवर लेखन केले, तसेच त्यांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून त्यांचे विश्लेषण करून

त्यावर मार्गदर्शन केले. संततिनियमनाच्या साधनांची माहिती त्यांनी स्वत: विदेशात जाऊन मिळविली होती. संततिनियमनाची साधने विदेशातून मागवून ‘ना नफा ना तोटा’ या तत्त्वावर त्यांनी विक्री सुरू केली. या साधनांची माहिती तसेच यासंदर्भातील पुरूषांवर उपचार ते स्वत: करीत. महिलांच्या उपचारासाठी त्यांची पत्नी मालतीबाई कर्वे यांना त्यांनी प्रशिक्षण दिले. जनतेला आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याविषयी जागरूक करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. विरोधकांची तमा न बाळगता त्यांनी आपले कार्य समाजासाठी चालूच ठेवले. संततिनियमन, आरोग्याची काळजी यांचा प्रसार हे देखील एक समाजशिक्षणाचाच भाग आहे, हे त्यांना समाजाला पटवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करावा लागला. नोकरी सोडावी लागल्यामुळेच त्यांना सामान्य आयुष्य जगावे लागले. य. दि. फडके यांनी ‘सामान्य व्यक्ती आणि असामान्य कार्य’ असे कर्वे यांच्यासंदर्भात विधान केले आहे. (र.धों. कर्वे — य.दि. फडके)

र.धों. कर्वे यांनी आपल्या कार्यामधून आणि लेखनातून स्त्री स्वातंत्र्याचा देखील पुरस्कार केला. प्रजनन प्रक्रियेमध्ये पुरूष हा निमित्तमात्र असतो, तसेच स्त्रीची इच्छा नसतानाही मातृत्व लादतो. स्त्री या पारंपरिक दास्यातून मुक्त व्हावी, यासाठी संततिनियमनाची साधने स्त्रियांनी वापरावी, असा ते आग्रह धरतात. यासाठी ते युरोपातील स्त्रियांचे आणि तेथील समाजजीवनाचे दाखले देतात. मात्र भारतात युरोपातील स्त्रीजीवनाचे अनुकरण करताना त्या विचारांचे भारतीयकरण करणे देखील गरजेचे आहे, असेही ते सुचवितात. १७ व्या शतकात फ्रान्समधील ‘निनॉ द लांक्ला’ या स्त्रीचे जीवनचरित्र ते आपल्या ‘समाजस्वास्थ्य’ मासिकामध्ये मांडून युरोपातील स्त्रियांना समाजात किती स्वातंत्र्य असते, याविषयी विवेचन करतात. तसेच फ्रान्समधील गाजलेल्या ‘मोपासांच्या’ भाषांतरीत कथांमधून स्त्री स्वातंत्र्याबरोबरच स्त्रियांचे लैंगिक संबंधाविषयीचे विचार हे नैसर्गिक स्वरूपाचे असतात, असेही ते स्पष्ट करतात. थोडक्यात, स्त्रीला पुरूषांसमान वागणूक मिळावी, असा ते आग्रह धरतात.

र.धों. कर्वे यांच्या शेवटच्या काळात भारत सरकारने समाजशिक्षणाच्या मोहिमेचा प्रसार सुरू केलेला होता. त्यांच्या या कार्यापासून स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. भालचंद्र फडके यांच्यासारख्या समाजशिक्षण तज्ज्ञांनी नक्कीच प्रेरणा घेतली असणार. समाजातील उपेक्षित घटकांना प्रवाहात आणण्यासाठी, नव्या ज्ञानाची ओळख होण्यासाठी विविध शहरांमध्ये फिरून त्यांनी आरोग्य जागृतीच्या कार्यातून समाजशिक्षणाचा प्रसार केलेला दिसून येतो.

र.धों. कर्वे यांनी संततिनियमनाचा प्रसाराच्या माध्यमातून समाजशिक्षण देण्यासाठी गावोगावी जाऊन माहिती दिली, तसेच या संदर्भात आव्हानही केले. याच पद्धतीचे कार्य डॉ. भालचंद्र फडके यांनी केले. समाजशिक्षणातून अंधश्रद्धा, अज्ञान दूर करताना बुद्धीप्रामाण्यवादाचाच आधार घ्यावा लागतो, तेव्हाच हा 'उपेक्षित' समाज समतोल साधू शकतो, हे डॉ. भालचंद्र फडके यांनी ओळखले होते. हा समान धागा रघुनाथ धोंडो कर्वे आणि डॉ. भालचंद्र फडके यांच्यात दिसून येतो.

**निष्कर्ष**

र.धों. कर्वे यांनी संततिनियमनाच्या प्रचार व प्रसारामधून समाजशिक्षण देण्याचे कार्य केले. उपेक्षित व हेटाळणी आल्यानंतर देखील त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. सामान्य जनतेला आरोग्यविषयक जनजागृती करताना खटल्यांनाही सामोरे जावे लागलेले र.धों. कर्वे यांनी ज्ञानविस्ताराच्या, समाजशिक्षणाच्या आणि समाजसुधारणेच्या कार्यास स्वत:स आयुष्यभर वाहून घेतले. त्यांनी बुध्दीप्रामाण्यवादी दृष्टीने आरोग्यासंदर्भातील अंधश्रद्धा नाकारून शास्त्रीय ज्ञान लोकांपुढे मांडले.

## संदर्भसूची


देशमुख अनंत (संपा.) (२०१०), 'अप्रकाशित र.धों.', पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

फडके य. दि. (१९८१), 'र.धों कर्वे', ह.वि. मोटे प्रकाशन, पुणे.

लोखंडे धनंजय, नवनाथ तुपे (संपा.) (२०१३), 'ज्ञानविस्ताराची क्षितिजे', युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.

दै. लोकसत्ता.

# उच्च शिक्षणातील अंतर्विरोध आणि सामाजिकशास्त्रातीलजात आणि लिंगभाव संवेदनशीलता

**संजयकुमार कांबळे**
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७

'भारत वा चीनमधील प्रगतीची आम्ही आदरयुक्त दखल घेतो. परंतु गुणवत्तेच्या बाबतीत आमच्याशी तुलनाच होऊ शकत नाही. मोठ्या संख्येने उच्चशिक्षण व संशोधन संस्थांचा विकास स्वागतार्ह असला तरी त्यांच्या माध्यमातून कोणत्या प्रकारचे मनुष्यबळ विकसित केले जात आहे याकडे अधिक चिकित्सकपणे पाहण्याची गरज आहे. काळाची पावले ओळखून त्या गरजा भागविल्या नाहीत तर समाजापुढील आव्हाने कायमच राहतील.

स्वयंअध्ययन आणि वास्तवाचे भान ठेवून भविष्याचा आराखडा सादर करणाऱ्या संशोधनावर ऑक्सफर्डमध्ये भर असतो. ग्रंथालय, संग्रहालये यांच्या माध्यमातून विद्वत्तापूर्ण शैक्षणिक परंपरा जपली जात आहे. मागणीच्या रेट्यामध्ये लोकांना हवे तसे शिक्षण देण्याच्या भारतामधील स्पर्धेत 'ऑक्सफर्ड मॉडेल' राबविणे शक्य नाही.' — डॉ. हुड, कुलगुरु ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी (लोकसत्ता पुणे; ४ एप्रिल २००९)

अकराव्या शतकात आधुनिक विद्यापीठांना युरोपात प्रारंभ झाला. आम्ही ज्ञानपरंपरा निर्माण केली असा रास्त दावा ही विद्यापीठे आजवर करीत होती. परंतु शैक्षणिक गुणवत्ता व नवे संशोधन यांच्या आधारावर काही वर्षांपूर्वी केलेल्या पाहणीत निवड झालेल्या जगातील पहिल्या २० विद्यापीठांत इंग्लंडमधील केंब्रिज आणि ऑक्सफर्ड व जपानचे टोकियो विद्यापीठ वगळता उरलेली सर्व १७ विद्यापीठे अमेरिकेतीलच आहेत. गुणवत्तेच्या दृष्टीने युरोपपेक्षा अमेरिकेने आघाडी मारली ही गोष्ट युरोपच्या निदान त्यातल्या काही राष्ट्रांच्या अहंतेला धक्का देणारी आहे. अमेरिका आर्थिकदृष्टीने समृद्ध असेल परंतु संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असलेली ज्ञानपरंपरा आमच्याच जवळ आहे असा अभिमान बाळगणाऱ्या युरोपला वस्तुस्थिती सांगणारी आणि सावध करणारी ही पाहणी आहे. (चपळगावकर, नरेंद्र २००६; पृ. ९२) आर्थिक सुबत्ता आणि विपुल साधनसामुग्री असली म्हणजे गुणवत्ता आपोआप येते असा एक युक्तीवाद लोक आणि राष्ट्रे सतत करीत असतात कारण तो त्यांच्या सोयीचा असतो; परंतु हे खरे नाही. गुणवत्तेला साधनाबरोबरच परिश्रम आणि निष्ठा यांची जोड लागते. एखाद्याच्या प्रगतीचे अनुकरण करावयाचे नसेल तर त्याच्या प्रगतीची चुकीची कारणे सांगणे हा सोपा उपाय आहे. विद्यापीठांचा दर्जा खाली येत आहे, याचे कारण शिक्षणाचे सार्वत्रिकरण आहे, असे सांगण्यात येते. विद्यार्थ्यांची संख्या वाढली हे तर खरेच त्यामुळे विद्यापीठाच्या सर्व सोयीवर प्रचंड ताण येतो हेही खरे, परंतु शैक्षणिक अवनतीचे ते एकच कारण आहे, असे मानणे आत्मवंचना आहे. शिक्षणाचा विस्तार आवश्यक आहेच, त्याविषयी मतभेदाचे कारणच नाही. परंतु सामाजिकशास्त्रे असोत, अगर भौतिकशास्त्रे असोत, नवे विचार आणि नवे संशोधन येत गेले, होत गेले तरच ज्ञानाच्या प्रगतीची गती कायम राहणार. सामाजिक क्षेत्रात नवनवे प्रश्न निर्माण होतील, त्यांची उत्तरे शोधण्यासाठी नव्याने विचार करावा लागेल.

विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात संशोधनाच्या सोयी महागड्या असतात असे क्षणभर मान्य करु; पण सामाजिकशास्त्रांतील संशोधनाबाबत असे नाही. चांगले ग्रंथालय, पाहणीसाठीच्या प्राथमिक सोयी आणि थोडीशी मदत आणि मुख्य म्हणजे स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय असणारे व ज्ञानकेंद्रित मानसिकता असणारे प्राध्यापक असले तर कोणत्याही विद्यापीठात असे संशोधन व्हावयास हरकत नाही. ज्ञानाच्या प्रगतीला बदल आणि वेग पचविण्याची शक्ती असलेली यंत्रणा आणि केवळ ज्ञानमूल्य मानणारी निकोपदृष्टी या दोन्हींची आवश्यकता असते. आपण सरकारी कायद्यान्वये स्थापन झालेली विद्यापीठे चालवितो. सरकार जसे हत्तीच्या चालीने चालते तशीच आमची विद्यापीठे चालतात. त्यात कोणताही बदल फारच अवघड असतो आणि झालाच तर तो अगदीच संथ गतीने होतो. विद्यापीठांचा उद्‌देश नवनव्या ज्ञानाचा शोध आणि ते सर्वांना उपलब्ध करुन देणे हा असला पाहिजे. त्याचेच विस्मरण झाले तर विद्यापीठांचे अस्तित्वच निरुपयोगी होण्याचा धोका आहे

आज जागतिक पातळीवर ज्ञानाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत ते अधिक स्पर्धात्मक होत आहे. म्हणून आपण जिथे कुठे राहतो, फिरतो तिथे शिक्षणाची काय व्यवस्था आहे, त्याची दर्जात्मक अवस्था कशी आहे, याचा प्रत्येकाने गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.आता केवळ शिक्षणाच्या प्रसारापुरताचा विचार तितकासा महत्त्वाचा नाही तर जागतिकीकरणाच्या काळात आपल्या प्रत्येकाची स्पर्धा शिक्षणात झपाट्याने पुढे गेलेल्या जगातल्या इतर राष्ट्रांशी असल्यामुळे शिक्षणातील स्पर्धेने व्यापक रुप धारण केले असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर शिक्षणाच्या जागतिकीकरणाची, ज्ञानकेंद्रीत समाजनिर्मितीच्या प्रक्रियेची पार्श्वभूमी लक्षात घेण्यासाठी आपल्याकडील शिक्षण पद्धतीचा आणि गुणवत्तेचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर उच्चशिक्षण कशासाठी व कोणासाठी आणि उच्चशिक्षणाचे मुख्य प्रयोजन काय, विकासाची दिशा काय असावी या प्रश्नांचा विचार करताना भारतातील उच्च शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा घेऊन लिंगभाव संवेदनशीलतेचे सामाजिकशास्त्रात असलेले स्थान आणि व्यवहार, अधोरेखित करीत मूल्यशिक्षणाचा विचार करण्यात आला आहे.

शिक्षण हे मानवाला सुसंस्कृत करण्याचे जसे साधन आहे तसेच ते त्याला विविध कौशल्ये देऊन सामाजिक-आर्थिक प्रगतीकडे नेणारी ती एक सक्षमीकरणाची प्रक्रिया आहे. मानवी भांडवलाच्या उभारणीमध्ये शिक्षणाची भूमिका अर्थशास्त्रज्ञांना महत्त्वाची वाटते, मानवी हक्कांविषयी जागरुक असलेल्यांना शिक्षण हा मूलभूत हक्क आहे असे वाटते, तर शिक्षणामुळे जाणीवा रुंदावतात आणि व्यक्तीचा नागरी जीवनातला सहभाग वाढतो, हे राजकारणी लोक ओळखून असतात. त्यामुळे ते अगदी लोकशाही व्यवस्थेत देखील शिक्षणापासून न्यायालयापर्यंत प्रत्येक बाबतीत सत्ताधारी आपली हुकूमत गाजवायचा प्रयत्न करीत असतात. कधी कधी काही प्रमाणात त्याचा समाजाला फायदाही होतो, पण बहुतांश प्रकरणात समाजाला त्याचे तोटेच सोसावे लागतात.

शिक्षणाचा प्रत्येक टप्पा हा व्यक्तीला अधिका-अधिक क्षमतेकडे नेतो, कारण एकेका पायरीवर मनुष्य नवनवीन गोष्टी आत्मसात करत असतो. म्हणूनच समाजातील सर्व घटकांना दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक असते. मात्र शिक्षणाची वाटचाल आता सेवा उद्योगाच्या दिशेने होत आहे. 'जनरल ॲग्रीमेंट्स ऑन ट्रेड्स इन सर्व्हिसेस' (गॅट्स) कराराने तर शिक्षणाचा समावेश सेवा उद्योग क्षेत्रात केला आहे. बिर्ला-अंबानीच्या अहवालाने खाजगीकरणाची बाजू उचलून धरली आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या गाजलेल्या टीएमए पै निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयानेही शिक्षण

संस्थाचालकांना 'आंथ्रप्रेन्युअर' म्हणजेच स्वयंउद्योजक हा दर्जा दिला आहेच. म्हणजेच शिक्षण संस्थाचालक हे विक्रेते, विद्यार्थी-पालक हे ग्राहक आणि शिक्षण ही 'कमॉडीटी' झाली आहे.

आज जीवनाला दिशा दाखविण्याचे, आधार देण्याचे काम ज्या शिक्षण क्षेत्राचे आहे त्याच क्षेत्रात सर्व अनाचार सत्तेच्या राजकारणाच्या आश्रयाने प्रतिष्ठित होऊन राहिले आहेत. शिक्षण विषयक अनेक समस्यांना आपणाला तोंड द्यावयाचे आहे त्यात प्राथमिक शिक्षण, विद्यार्थ्यांची गळती, अभ्यासक्रमांचे आधुनिकीकरण, परीक्षा पद्धती, विद्यार्थ्यांची एकूण प्रवृत्ती, वर्गातील अनुपस्थिती, शिक्षक-प्राध्यापकांची या व्यवसायाकडे पाहण्याची दृष्टी, त्यांची ज्ञानलालसा, शिक्षणाचे झालेले व्यावसायिकरण (Commercialization), गुणवत्तेचे अवमूल्यन, बौद्धीक शिक्षणाच्या जोडीनेच करावे लागणारे शिक्षणाचे व्यावसायिकरण, (Commercialization) संशोधन आणि शेवटी समाजाच्या तळागाळापर्यंत शिक्षणाची उद्दिष्टे व लाभ नेऊन पोचविणे यांसारख्या घटकात अनेक समस्या आपल्या पुढे आहेत, त्यामुळेच आजच्या शिक्षणविषयक दैनंदिन चर्चेमध्ये वरील विषयांबरोबरच शिक्षण आणि रोजगाराचा आणि जीवनाचा संबंध तुटलेला आहे, शिक्षणाच्या क्षेत्रात विविध पातळ्यांवर गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार वाढीस लागला आहे इत्यादी मुद्दे समाविष्ट असतात.

दुसऱ्या बाजूला शिक्षण तज्ज्ञांमध्ये शिक्षण हे साध्य आहे की साधन, त्यामध्ये परीक्षा महत्त्वाची की ज्ञानार्जनाची प्रक्रिया, अध्ययन-अध्यापनाची आदर्शवत व्यवस्था निर्माण करण्यासाठी काय करता येईल इ. मुद्दे चर्चेत असतात. अशा प्रकारची चर्चा करताना 'संपूर्ण शिक्षण क्षेत्र' किंवा शिक्षण क्षेत्रातील एखादी विशिष्ट विषयातील सखोल चर्चा असे त्याचे स्वरुप असते.

थोडक्यात शिक्षण, शिक्षण व्यवस्था आणि प्रक्रियांवर वेगवेगळ्या माध्यमांतून नियमितपणे चर्चा केली जाते. ही चर्चा सर्वसामान्यपणे नैतिक-अनैतिक, चांगले-वाईट, योग्य-अयोग्य इ. अशा कुठल्या ना कुठल्या द्विमानावर आधारित होत असते. पण या व्यवस्थेचा विचार करताना ही व्यवस्था कशी घडत आणि बिघडत आहे, त्यात कोणकोणते सत्ता-संबंध गुंतलेले आहेत याचा विचार करावा लागतो. यामधून शिक्षणाच्या प्रक्रिया कशा कार्यान्वित होत आहेत, ते लक्षात येण्यास मदत होते.

**स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शिक्षणप्रणाली - एक अंतर्विरोध**

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय शिक्षणप्रणालीला एका अंतर्विरोधाला सामोरे जावे लागले. भारतीय राज्यघटनेद्वारा समता, स्वातंत्र्य व सामाजिक न्यायाचा पुरस्कार केला गेला तर समाजविकासाची प्रत्यक्ष दिशा ही (विषम) भांडवली अशी राहिली. अशा अंतर्विरोधमय परिस्थितीत शिक्षण व्यवस्थेतून परंपरानिष्ठ मूल्यांची रुजवणूक करण्याचाच प्रयत्न झाला. भारतीय सत्ताधारी वर्गाने मात्र आधुनिक ज्ञानाच्या विस्ताराऐवजी (म्हणजे शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाऐवजी) अधिकाधिक जनतेला निरक्षर ठेवण्याचे सरंजामी तंत्र अनुसरणे पसंद केले.

उच्च शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्याची भूमिका भारतीय सत्ताधारी वर्गाने घेतली नाही. परिणामी भारतातील शिक्षणपद्धती ही किमान तीन प्रकारच्या अरिष्टांतून जात आहे. पहिलं महत्त्वाचे अरिष्ट हे शिक्षण सुविधांच्या विषम वाटपाचे आहे. तर दुसरे अरिष्ट हे शिक्षणाच्या गुणवत्तेचे आहे. गुणवत्तेची व्याख्या ही प्रस्थापित वर्गाचे हित लक्षात घेऊन केली जाते. सध्या उच्च

शिक्षणातील गुणवत्तेची व्याख्या ही भांडवलशाहीच्या संदर्भात केली जाते. भारतीय शिक्षण हे भांडवली विकासाला अनुकूल असे आहे. तरीही आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीच्या विकासाच्या संदर्भात तपासले असता भारतीय उच्च शिक्षणाचे अपयश दिसून येते. तर शिक्षण व्यवस्थेतील तिसरे अरिष्ट हे शिक्षणाच्या आशयासंबंधी निर्माण झालेले आहे. वासाहतिक काळात ब्रिटिश सत्ताधिशांनी शिक्षणाचा आशय वासाहतिक सत्तेला अनुकूल राहिल असा बनविण्यावर भर दिला होता. आधुनिक काळात शिक्षणाचे सार्वत्रिकरण घडत असताना शिक्षणाच्या माध्यमातून विद्रोही मानस घडणार नाही याची काळजी आधुनिक राज्यकर्त्यांनी जगभर घेतली आहे.

शिक्षण क्षेत्रातील आजच्या प्रश्नांना भारतीय शिक्षणाच्या गेल्या दोनशे वर्षांच्या विशिष्ट अशा विकासाची पार्श्वभूमी आहे. हे प्रश्न अचानकपणे निर्माण झालेले नाहीत. शैक्षणिक संस्थांच्या जातीग्रस्ततेचा मुद्दा हा अशाच व्यापक अरिष्टाचा भाग आहे. महाविद्यालय सुरु करणे हे ब्रिटिशांनी खाजगी प्रयत्नांवर सोडून दिले होते म्हणून स्वजातीचे प्रभुत्व नव्या परिस्थितीत, नव्या ज्ञानाच्या आधारे टिकून ठेवण्याच्या उद्देशाने ब्रिटिशांच्या मदतीने उच्च जातींनी भारतभर शिक्षणसंस्था सुरु करण्याची भूमिका घेतली. वासाहतिक काळात जात व धर्माच्या परिघात शैक्षणिक संस्थांचा उदय होणे ही बाब वासाहतिक काळातील व्यामिश्र सामाजिक संबंधांची साक्ष देते.

वासाहतिक काळात ब्रिटिश सत्ताधिशांनी उच्च शिक्षणासाठी अनुदानाचे (Grant-in-aid) तत्त्व स्वीकारले होते. महाविद्यालय स्थापनेचा पुढाकार हा पृथक जातींनी घ्यावा व सरकारने त्याला अनुदान द्यावे, असे ते धोरण होते. उच्च व मध्यम जातींतील अभिजनांना अंकित करणे, वसाहतवादाला अनुकूल विचारप्रणालीच्या विनासायास माध्यम तयार करणे आणि वासाहतिक प्रशासनाला आवश्यक असा नोकरशहांचा वर्ग तयार करणे, अशी कारणे अनुदानित महविद्यालये सुरु करण्यामागे होता.

स्वातंत्र्यानंतर भारतीय सत्ताधारी वर्गाने ब्रिटिशांनी केलेल्या संस्था व प्रशासकीय रचनांचे पुनर्मूल्यांकन वा निर्वसाहतीकरण केले नाही. शिक्षणाच्या बाबतीतही तसेच घडले. उच्चशिक्षण प्रधान शिक्षणधोरण, अनुदानाचे दातृत्वकेंद्री धोरण, परीक्षा केंद्री शिक्षण प्रणाली, पाठ्य पुस्तकांचे व अभ्यासक्रमांचे केंद्रवर्ती स्वरूप, आवश्यकतेपुरताच उच्चशिक्षितांच्या निर्मितीसाठी उच्चशिक्षण संस्थांचा नियंत्रित प्रसार, ही या धोरणाची वैशिष्ट्ये होती.

उच्चशिक्षणाचा प्रसार होऊन मोठी शैक्षणिक क्रांती झाली, शिक्षण संस्थाचालकांना, सवलतींबरोबर राजकीय बळ देखील मिळाले. हे संस्थाचालक सामाजिक बांधिलकीच्या भावनेने शिक्षणाचे पवित्र कार्य करतील अशी भाबडी समजूत करुन घेण्यात आली होती. परंतु जागतिकीकरण आणि खाजगीकरण या धोरणांमुळे आलेल्या चंगळवादाचा मोह संस्थाचालकांना आवरला नाही. स्पर्धेच्या वातावरणात भरपूर पैसा खर्च करुन पदव्या मिळविणाऱ्या परदेशस्थ भारतीय, परदेशी आणि परप्रांतीय यांच्या थैल्या संस्थांच्या दारात रिकाम्या होऊ लागल्या आणि शिक्षणसम्राट निर्माण झाले. या पैशाच्या जोरावर सत्तापद मिळविण्यात ते यशस्वी होऊ लागले. याच पैशाने राजकारण खेळू लागले. हे सर्व होत असताना सरकार मात्र झोपी गेले. सरकारमध्ये आणि संस्थेमध्ये सत्तेचा अनिर्बंध वापर आणि मनमानी कारभार सुरु झाला.

शासन नावाच्या संस्थेने डोळ्यावर पट्टी बांधून हा धुडगूस होऊ दिला याला जबाबदार कोण? शिक्षणाच्या या खेळखंडोब्याची जबाबदारी टाकायची कोणावर? या राज्यात शासन नावाची यंत्रणा तरी अस्तित्वात आहे का? अशा प्रकारचे अनेक प्रश्न उभे राहतात. ज्या शैक्षणिक संस्थांना वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये उभी करण्यासाठी शासनाने एक रुपया नाममात्र भाड्याने जमिनी दिल्या, शासकीय रुग्णालये वापरण्यास दिली, महाविद्यालयांच्या इमारती व इतर साधन सामुग्री आणि पायाभूत सोयी सुविधांसाठी तसेच एकूण खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी व्यवस्थापन कोटा दिला. व्यवस्थापन कोट्यातून किती पैसे मिळविले हे विचारु नका, असे संस्थाचालकांनी सरकारला सांगितले. महाविद्यालयांची उभारणी पूर्ण व्हावी याकरीता सरकारने सर्व काही ऐकून घेतले. याचा अर्थ या राज्यात शिक्षणाचा धंदा तेजीत यावा आणि गोरगरीब, मध्यमवर्गीय, मागासवर्गीय, शोषित-उपेक्षित वर्गाला खाजगी महाविद्यालयांची दारे बंद झाली, तरी सरकारने मिठाची गुळणी धरावी असा होत नाही.

संस्थाचालकांच्या नफेखोर वृत्तीला लगाम घालण्याचा आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न सरकारने करणे गरजेचे होते. शासनाची धोरणे, त्यामध्ये कालानुरुप सुधारणा आणि भविष्याचा वेध घेण्याचे काम प्रशासकीय यंत्रणेला करावे लागते. हे करण्यासाठी मोक्याच्या आणि महत्त्वाच्या जागी या राज्याची आंतरिक तळमळ असणारा अधिकारी वर्ग असणे आवश्यक आहे. तो पुरेसा नाही म्हणून धोरणात्मक अडचणी येत आहेत. परिस्थिती जितकी चिघळेल तितकी चिघळू द्यायची, सरकारची प्रतिमा जितकी मलीन होईल तितकी मलीन होऊ घायची आणि निवृत्त झाल्यानंतर मंत्री आणि वरील अधिकारी यांच्यावर आगपाखड करायची, प्रसंगी पुस्तके लिहून काढायची ही वृत्ती राज्यासाठी घातक आहे.

### शिक्षणात महाराष्ट्र बॅकबेंचरः शासनाची कबुली

सर्वाधिक महाविद्यालये, जागतिक दर्जाची विद्यापीठे आणि गावोगावच्या शैक्षणिक सुविधांचा डांगोरा पिटणाऱ्या महाराष्ट्राचे शिक्षण क्षेत्र आजच्या जागतिक स्पर्धेस तोंड देण्याइतके सक्षम नाही, याची कबुलीच विद्यापीठाचे कुलपती असलेले राज्यपाल, मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांच्या एका चिंतनातून नुकतीच प्रकट झाली. (सकाळ; पुणे २४ नोव्हेंबर; पृ. १) राज्याच्या सध्याच्या शिक्षणपद्धतीत बदल केला नाही, तर बेरोजगारांच्या फौजा निर्माण करण्यापलीकडे काही साध्य होणार नाही, असा निष्कर्ष निघाल्याचे समजते. यातून महाराष्ट्र शिक्षणात बॅकबेंचर असल्याचे दिसून येते.

महाविद्यालयातील शिक्षकांच्या रिक्त जागा, शिक्षणाचा दर्जा, खाजगी संस्थांची मनमानी आणि त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी सक्षम यंत्रणांचा अभाव, सामान्यांच्या आवाक्याबाहेरचे शिक्षण अशा विविध बाबींवर या बैठकीत चर्चा झाली आणि तातडीने उपाययोजना सुरु केल्या नाहीत, तर शिक्षण क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या स्पर्धेत महाराष्ट्र पिछाडीवरच राहील असे म्हटले गेले. याशिवायही शिक्षणक्षेत्रात अनेक प्रश्न आहेत. उदा. मुला-मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न, ग्रंथालयाचा प्रश्न, प्रयोगशाळा, शिक्षकांच्या वेतनाचा व संस्थाचालकांकडून होणाऱ्या अन्यायाचा प्रश्न, ग्रामीण भागातील दलित अध्यापक व स्त्री अध्यापक यांच्या निवासाचा प्रश्न असे अनेक प्रश्न आहेत ज्याचा सरकारला गंधही नाही. न्यायालये, यशपाल समिती, नियोजन आयोग, इंडिया टुडे अहवाल आदी सर्वच ठिकाणी राज्याच्या शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवरच बोट ठेवले गेले आहे. हे चित्र बदलले नाही, तर देशात येणाऱ्या परदेशी विद्यापीठांशी

स्पर्धा करण्याची राज्याच्या शिक्षण क्षेत्राची क्षमताच संपुष्टात येईल, असे परखड मत उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे प्रधान सचिव जे.एस. सहारिया यांनी मांडले. शिक्षणाचा दर्जा खालावला असून, रोजगारक्षम तरुण निर्माण होण्याचे प्रमाण जेमतेम २५ टक्के असल्याचे सहारीया यांनी या सादरीकरणादरम्यान सांगितले. (सकाळ; २५ नोव्हें. ०९ पृ. १)

राज्यातील केवळ २५ टक्के महाविद्यालयांना अधिस्वीकृती असून, फक्त आठ महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळाला आहे. उच्च शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या केवळ तेरा टक्के आहे. राज्यात ९० टक्के महाविद्यालये खाजगी संस्थांकडून चालविली जातात, पण त्यावर सरकार किंवा विद्यापीठांचा प्रभावी अंकुश नाही. तसेच मान्यता नसलेल्या शिक्षण संस्था फोफावत आहेत. तर महाविद्यालयांमधील ४० ते ५० टक्के जागाही रिक्त आहेत. भरमसाठ शुल्कामुळे राज्यातील उच्च शिक्षण गरीब विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे आणि दुसऱ्या बाजूला शिक्षकांचा दर्जाही अतिशय खालावलेला असून त्यांना नव्या स्पर्धेत टिकाव धरणारे प्रशिक्षणच मिळत नसल्याची कबुली शिक्षण सचिवांनीच दिली आहे. विनाअनुदानित खाजगी शिक्षणसंस्थाचालकांनी मनमानी कारभार करुन शिक्षणक्षेत्रात धुडगूस घातला असताना सरकार हतबल झाले असल्याचे चित्र दिसून आले. संस्थाचालकांचा दबाव आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे शिक्षणाची उज्ज्वल परंपरा असलेल्या महाराष्ट्रात शिक्षणाचा पुरता बोजवारा उडाला आहे. या परिस्थितीला जबाबदार असलेल्या राज्य सरकारने कठोर पावले उचलून महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्र डबघाईस येण्यास कारणीभूत असलेल्या घटकांचा सखोल पण जलद अभ्यास करुन परिणामकारक उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

शिक्षणाने समाज प्रगल्भ होऊ शकत असेल तर समाजाने प्रगल्भ शिक्षणाची आस धरायला हवी. जे. पी. नाईक यांनी लिहिलेल्या 'Quantity, Quality and Equality in the Indian education system' या पुस्तकात शिक्षणाचा विस्तार, गुणवत्ता आणि समानसंधी यासंबंधीचा अतिशय विद्‌वत्तापूर्ण ऊहापोह केला आहे. शिक्षणाचा प्रगतीची ही तीन महत्त्वाची मापके आहेत. शिस्त, शिक्षा, भीती, आज्ञाधारकपणा आणि स्पर्धा हे आजच्या शिक्षणातील 'पंचमहाराक्षस' आहेत. त्यांनीच शिक्षणाचे सारे वातावरण प्रदुषित करुन टाकले आहे. समाजाबद्‌दल उदासीन आणि आत्मकेंद्रीत असा नवा सुशिक्षितांचा वर्ग या शिक्षण व्यवस्थेतून घडवला जात आहे आणि हे लक्षण व्यक्तीगत पातळीवर अन्यायाचे तर सामाजिक पातळीवर गुलामांचा वर्ग पोसणारे आहे. अभ्यासक्रमातून रचलेले ज्ञान प्राप्त केल्यास सर्वांना उर्ध्वगामी गतिशीलता साधता येते, अशी धारणा किंवा शोषित वर्गाच्या साहित्याचा जीवनाचा सिमांती अंतर्भाव करणे, याद्वारे अभ्यासक्रमाच्या प्रती शोषितांमध्ये निष्ठा तयार केली जाते. त्यामुळे अभ्यासक्रमाचे पावित्र्य अधिमान्यता भेदणे अधिक अवघड बनलेले आहे. हे कार्य आव्हानात्मक आहे, पण अपरिहार्यदेखील !

शिक्षक व्यवस्थेविषयी घोर असमाधान तर आहे पण तरीही ते धरुन तर ठेवले पाहिजे, अशा पेचात आपण अडकलो आहोत. 'धरले तर चावते आणि सोडले तर पळते' अशी अवस्था झाली आहे. १९८० च्या काळात वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचे धोरण ठरविण्यात आले. त्यावेळेस मराठी विद्यार्थी कर्नाटकातील इंजिनियरींग व मेडीकल कॉलेजमध्ये देणग्या देऊन प्रवेश मिळवित होते. जे विद्यार्थी प्रावीण्य नसलेले व ज्यांना महाराष्ट्रातील संस्थांमध्ये प्रवेश मिळत नसे, असेच लोक कर्नाटकमध्ये जात असत. तेव्हाही अशा

विद्यार्थ्यांचे पालक धनदांडगे असत किंवा सरकारी अधिकारी असत. त्यावेळी राज्यशासनाकडे नवीन संस्था सुरु करण्यात पैसाच नव्हता. त्याचवेळी जगभर मात्र खाजगीकरणाचे वारे वाहू लागले होते. त्यामुळे त्यांच्या या निर्णयाचे सर्वांनी स्वागत केले. परंतु या खाजगीकरणाचे परिणाम आपणा सर्वांसमोर आहेत. यात मोठा अंतविरोध आहे. ज्या ज्ञानावरील बंदी विरोधात ब्राह्मणांना शिव्या देत दलित बहुजनांनी शिक्षणसंस्था काढल्या, त्या शिक्षणसम्राटांनी खंडणीशाहीच्या मार्फत पुन्हा एकदा नवीन पद्धतीने ज्ञानबंदी केली आहे.

१९८० च्या दशकात भारताच्या अर्थव्यवस्थेसमोर टाकलेल्या भांडवली अरिष्टाला विस्तारण्यासाठी तंत्रज्ञानाधिष्ठित आधुनिकीकरणाच्या आवश्यकतेतून १९८६ मध्ये दुसरे शिक्षण धोरण तयार झाले. या धोरणाने शिक्षणाच्या क्षेत्रात औपचारिक विषमतेला जन्म दिला. गरीब मुलांना नॉन फॉर्मल शिक्षण आणि मूठभर मुलांसाठी अभिजात नवोदय विद्यालये आणि नवउदारमतवादाच्या प्रभावाखाली 'साक्षरता मिशन', 'स्वायत्त महाविद्यालये, शिक्षणात विदेशी संस्थांचा प्रवेश यासारख्या गोष्टी याच धोरणांतर्गत होत गेल्या. पुढे १९९१ मध्ये औपचारिकरित्या नवउदारमतवादी धोरण पत्करल्यावर भारताच्या सर्वच क्षेत्रांत जागतिकीकरणाचा प्रभाव दिसायला लागला. 'संरचनात्मक समायोजने'नुसार त्याला शिक्षण, आरोग्य व जनकल्याणाच्या सर्वच बाबींवरील खर्च आवरता घ्यावा लागला. दुसरे, शिक्षणाच्या उद्दिष्टातच मूलभूत फरक करुन त्याला उपभोगवादी मुक्त बाजारपेठेला अनुरुप जनमानस बनविण्याचे साधन मानण्यात आले. याप्रमाणे फक्त मोजक्या लोकांनाच गुणवत्ता शिक्षण मिळावे. बाकीच्यांना साक्षरता पुरे; जेणेकरुन ते बाजारातून वगळले जाणार नाहीत अशा प्रकारचे वळण शिक्षणाला लागले.

जागतिक बँकेच्या इशाऱ्यावर देशात उच्च शिक्षणाची बाजारपेठ निर्माण झाली. आजपर्यंत या बाबतीत सूर असा होता की, सरकारचा शिक्षण क्षेत्रातील हस्तक्षेप फक्त प्राथमिक शिक्षणापुरता मर्यादित असावा. उच्चशिक्षण हे संपूर्णतः बाजार तत्त्वावर मुक्त करण्यात यावे. (संदर्भ २००० चा मुकेश अंबानी कुमारमंगलम बिर्ला यांनी केलेला 'फ्रेमवर्क-फॉर रिफॉर्म्स इन इज्युकेशन' हा अहवाल) मात्र उच्चशिक्षणाची बाजारपेठ ही गळतीचे प्रमाण बघता फारच लहान आहे. त्याउलट प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची बाजारपेठ तिच्या अंतःसामर्थ्याच्या दृष्टीने अफाट आहे. शिवाय त्यातूनच उच्चशिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा पुरवठा येत असल्यामुळे उच्चशिक्षणाच्या बाजारपेठेची वाढ सुद्धा तिच्यावरच अवलंबून आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात अगदी नर्सरी, के.जी. पासून श्रीमंत देशांच्या धर्तीवरील महागड्या शाळा, लाखो रुपयांचे शुल्क आकारणारे 'इंटर नॅशनल स्कूल' इत्यादींनी खाजगी विस्तारासाठी बाजारपेठ अस्तित्वात आली; पण ती अजूनही मूठभर लोकांपुरतीच मर्यादित आहे. अजूनही ९० टक्के विद्यार्थी त्यात समाविष्ट नाहीत. ही अफाट बाजारपेठेतील खाजगी वित्ताला उपलब्ध करुन देण्यासाठी जागतिक बँकेने पुरस्कारिलेले 'पब्लिक-प्रायव्हेट' पार्टनरशीपचे मॉडेल अगदी उत्तम ठरते. त्यामुळे सरकारला आपली जनता-प्रवणता प्रदर्शित करता करता खाजगी भांडवलाला सारे रान मोकळे करता येते. (संदर्भ – तेलतुंबडे, आनंद, 'शिक्षणाचा अधिकार : क्रांती की प्रतिक्रांती', सकाळ (पुणे) व ऑगस्ट २००९) भारताच्या शिक्षणक्षेत्रात परिवर्तन करण्यासाठी राष्ट्रीय ज्ञान आयोगाचा किंवा सॅम पित्रोदा यांचा अहवाल, विद्यापीठ अनुदान आयोगाचा (UGC) प्रा. यशपाल यांचा उच्च शिक्षण व आधुनिकीकरण अहवाल, खाजगी अनुदान मंडळाच्या समितीचा अहवाल, त्याच प्रश्नासंबंधी केंद्रीय मानवसंसाधन विकासमंत्र्यांनी नेमलेल्या समितीचा अहवाल, आय. आय. टी. व आय. आय. एम.

संबंधात सरकारचा दृष्टिकोन, राष्ट्रीय उच्च शिक्षण वित्तीय आयोग, अशा अनेक पातळीवर दूरगामी, मूलगामी व काही बाबतीत क्रांतीकारक (धक्कादायक) स्वरुपाचे निर्णय, धोरणे ठरविली जात आहेत. शिक्षणाच्या खुलेकरणाची खाजगीकरणाची बाजारीकरणाची केंद्रीय सूत्र या सर्व बदलातून व्यक्त होताना लक्षात येते. (पुढारी, शुक्र.२३ ऑक्टों, २००९ पृ.४)

विनाअनुदान तत्त्वावर शाळा, महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था, वैद्यकशास्त्र संस्था यांना मुक्त परवानगी गेली अनेक वर्षे माध्यमिक शाळांना व महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान आणि आता मासिक वेतनही न मिळणे, आश्रमशाळा चालकांना अनुदानासाठी मंत्रालयाचे फेरे घालावे लागणे, कंत्राटी पद्धतीने शिक्षण नेमणे ही वस्तुस्थिती कशाची द्योतक आहे? आज विनाअनुदान सूत्रामुळे शिक्षणापेक्षा राजकारण वरचढ ठरले. गैरव्यवहार झाले आणि अपप्रवृत्तींना वाव मिळाला, कॅपिटेशन फी बोकाळली आणि महाराष्ट्राबाहेरुन येणाऱ्या सधन विद्यार्थ्यांची सोय झाली. अनुदान नाही, पण राजाश्रय असलेल्या संस्थांत शिक्षण महर्षीचे पीक उदंड झाले. आजच्या राजकीय पर्यावरणात विशेषतः शिक्षणवंचित राहिलेल्या मध्यमजातींच्या अभिजनांनी नव्या शैक्षणिक संस्था स्थापनेचा सपाटाच लावला आहे. यात मोठा अंतर्विरोध आहे. त्या ज्ञानावरील बंदी विरोधात ब्राह्मणांना शिव्या देत दलित-बहुजनांनी शिक्षणसंस्था काढल्या, त्या शिक्षणसम्राटांनी खंडणीशाहीच्या मार्फत पुन्हा एकदा नवीन पद्धतीने ज्ञानबंदी केली आहे. आपण राजकारणातील घराणेशाहीवर टीका करतो, पण शिक्षणक्षेत्रातील घराणेशाहीचे काय? बहुतेक संस्थाचालक आपली मुले, जावईच नव्हे तर इतरही नातेवाईकांना नोकरीस लावताना दिसतात. एकंदरीत, आज शिक्षणक्षेत्रातील नैतिक मूल्ये रसातळाला मिळाली आली, याबाबत कोणाचेही दुमत होणार नाही. याला जबाबदार कोण, याचे उत्तर प्रत्येकजण आपापल्यापरीने शोधणार. विद्यार्थी, पालक, शिक्षकगण, नोकरशाही, राजकीय पक्ष व न्यायपालिका या सगळयांनीच या उद्योगाला हातभार लावला आहे. एखाद्या राष्ट्राची चांगली संस्कृती निर्माण करण्यास किमान ५० वर्षांचा कालावधी लागतो, असे म्हटले जाते. आपण स्वातंत्र्यानंतर ६२ वर्षे वाया घालविली आहेत. भारतासारख्या आघाडीच्या देशाला कुशल मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात कमतरता भासत असून, २०२२ पर्यंत देशात किमान ५० कोटी मनुष्यबळ लागणार आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राला अशा कुशल मनुष्यबळाची गरज येत्या तेरा वर्षांत सुमारे पाच कोटींची असणार आहे. (सकाळ; २५ नोव्हें. ०९) तर सामाजिकदृष्ट्या विचार करता ज्ञान आणि न्यायावर आधारित समाजाची जडणघडण करायची असेल तर शिक्षणक्षेत्राला प्राधान्य द्यावे लागणार आहे.

थोडक्यात, शिक्षण हे समाजसेवेचे, आधुनिकतेचे (सांस्कृतिक अर्थाने) आणि समाजपरिवर्तनाचे साधन न राहता, मार्केटींगचे, समृद्धीचे व सत्तेचे साधन बनले आहे. त्यामुळे पैशाला अमर्याद 'मूल्य' लाभले आहे. सर्व काही 'मार्केट' करता येते व पैसा कमावता येतो. खेळ, कला आदी क्षेत्रात जे शिक्षण सर्व समाजाला समतेने घेता येत नाही, ते समाजातील विषमतेची व संघर्षाची बीजे पेरले. ज्ञानसत्तेचा संबंध सरळ अर्थसत्ता व राजसत्तेशी जोडणे, शैक्षणिक व सांस्कृतिक अप्रगतीचे आणि हानीकारक ठरण्याची शक्यता आहे.

**जसा समाज तसे शिक्षण : पेराल तेच उगवते**

विद्यापीठांतील शिक्षणाचे इतके सधन व सखोल वासाहातिकरण झाले आहे की, हे विद्यापीठातील लोक त्यांच्या आसपासच्या दारिद्र्यास आणि त्यात जगण्याऱ्या सामान्य लोकांच्या समस्यांविषयी बेपर्वा असतात. आपल्याकडच्या अगदी सर्वोत्तम तंत्रशिक्षण संस्था, सर्वोत्तम वैद्यकीय

महाविद्यालये आणि विद्यापीठांतील सर्वोत्तम विभाग हे जवळपास बंदिस्त आणि कोणत्याही बाह्य प्रभावापासून अलिप्त असतात. विद्यापीठीय शिक्षणव्यवस्था ही जवळपास वासाहातिक काळापासून बाहेरच्या जगापासून दूर कोषावस्थेत गेली आहे. परिणामतः आपल्याकडच्या शिक्षणाचा अर्थ परीक्षा, पाठयपुस्तकांचा अभ्यास करणे, परीक्षेत उत्तीर्ण होणे आणि तुमच्या आजूबाजूच्या परिसराविषयी बेफिकीर राहणे एवढाच होतो.

विद्यापीठविषयीची बांधिलकी, पुढील पिढी घडविण्याची वचनबद्धता लोपपावत आहे. वेतन आयोगाचे आकडे फुगून 'फार्म हाऊस' बांधण्याची स्वप्ने प्राध्यापकवर्गाला पडू लागली आहेत. कोट्यावधींची अनुदाने लाटणारे 'बालेकिल्ले' उभारले जात विद्यापीठाच्या सातासमुद्रापलिकडील लौकीकपात्र परंपरेचे बुरुज मात्र कोसळत आहेत.

विद्याविभूषित झाल्यावर जात-पात सामाजिक भेदाभेदाची संकुचित मानसिकता गळून पडते आणि व्यापकदृष्टीचा साक्षात्कार होतो, असे मानले जाते. पण पुणे विद्यापीठात मात्र तसा अनुभव येत नाही. (पेंडसे आशिष, लोकसत्ता, पुणे) सोम, २३ नोव्हें. २००९, पृ.५) इतिहासाचे काटे उलट दिशेने फिरवायचे आहेत अशी जाहीर वल्गना करून ब्राह्मण, ब्राह्मणेतर संघर्ष पेटविण्यात आला. आता तर १९७८ नंतर पूर्णवेळ कुलगुरुपद मराठा समाजाला मिळालेले नाही, असा शोध लावत 'मराठा तितुका मेळवावा' ची भाषा केली जात आहे. अशा परिस्थितीत 'मला कुलगुरू व्हायचयं' असे बाशिंग बांधलेल्यांची मात्र कोणत्याही विद्यापीठात भाऊगर्दी झाली आहे.

प्रक्रियेतील घटकांच्या वरदहस्तानेच झालेली पेपरफुटी, नोकरभरतीमधील फसवणूक इथपासून ते विद्यापीठाच्या नावाने बोगस अभ्यासक्रम चालवून विद्यार्थ्यांना ठगविण्याचे प्रकार पुणे विद्यापीठात होत आहेत. शेकडो, कोटींच्या ठेवींचा 'बँक बॅलन्स' फुगताना विद्यापीठाचा 'हस्तीदंती मनोरा' मात्र डगमगतो आहे.

आता सगळ्याच विद्यापीठात राजकीय निवडणुकीप्रमाणे कुलगुरु पदाच्या निवडप्रक्रियेत ही रंग भरायला सुरुवात झाली आहे. प्रत्येकजण आपले घोडे दामटविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असते. प्रत्येक विद्यापीठात गटा-तटांच्या राजकारणाने डोके वर काढले आहे.

आता स्पर्धा आली की वशिलेबाजी आणि राजकीय वजनही आपोआप येते. कुलगुरु पदासाठी इच्छुक उमेदवार चकचकीत अत्याधुनिक छपाई केलेले व्यक्तीगत परिचयपत्रे (बायोडेटा) घेऊन राजकारण्यांचे उंबरठे झिजवण्यास तयार आहेत. कोणी यासाठी शैक्षणिक गुणवत्तेला जोड म्हणून अनुभवलेल्या सामाजिक जीवनाची फोडणी घालून आपली उमेदवारी रंगतदार करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. कोणाला विद्यापीठाची पहिली महिला कुलगुरु व्हायचे असते तर कोणा शिक्षण संस्थेला विद्यापीठाच्या कारभारावर अंकुश ठेवण्यासाठी आपला उमेदवार कुलगुरुपदाच्या खुर्चीवर बसवायचा असतो. प्राध्यापकांना आपल्या वर्चस्वासाठी तेथे संघटनेला मानणारा माणूस हवा आणि बड्या राजकारण्यांना आपल्या तालावर चालणारा माणूस हवा असतो. पदाची एकूण थट्टा व्हावी अशी स्थिती सध्या विद्यापीठ वर्तुळात कुलगुरुपद अनुभवते आहे. त्यातही विद्यापीठांच्या कुलगुरुंची पक्षांमध्ये वाटणी झाल्याचे ही सांगत असतात. यामधून अशा पदांची

अवनती होताना दिसते.याठिकाणी डॉ.ना. य. डोळे यांचा 'कुलगुरु कसा असावा' या लेखाची आठवण होते.

मुक्त विद्यापीठाचा विचार करता महाराष्ट्रातील मुक्त विद्यापीठाची स्थापना केली गेली. तो हेतू वा त्यामागचा उद्देश खऱ्याअर्थाने सफल होण्याआधीच अशा संस्थांना विविधांगी समस्यांनी ग्रासले आहे. ते एवढे की, विद्यापीठाची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचण्याऐवजी वाटेतच घुटमळत राहिली असल्याचे दिसते. महाराष्ट्रात विद्यापीठाचा कारभार संख्यात्मक पातळीवर प्रचंड सुधारला असला तरी गुणात्मक पातळीवर तो आजही जेमतेम आहे. राजकीय नेत्यांच्या प्रभावाखालच्या संस्थांतील अपप्रवृत्तींचा झिरप काही विद्यापीठांचा अपवाद वगळता सर्वच विद्यापीठात झाला आहे. नोकरभरती असो की कंत्राटीपद्धतीने नातेवाईकांची सोय लावणे. या सारखे प्रकार सर्रास होऊ लागले आहेत. परिणामी विद्यापीठाच्या या शैक्षणिक संकुलाचे रुपांतर नोकरी-व्यवसाय देणाऱ्या केंद्रांत होत आहे. यामधूनच अशा विद्यापीठातील गुणवत्ताही लुप्त होत आहे. अशा विद्यापीठांना युजीसीच्या एका समितीने 'गृहोद्योग' हा सार्थ शब्द वापरला आहे.

याच काळात परदेशी विद्यापीठांमुळे शैक्षणिक क्रांती होईल का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. परंतु परदेशी विद्यापीठांमुळे सरकारी विद्यापीठांना फारशी स्पर्धा निर्माण होणार नाही. खाजगी किंवा अभिमत विद्यापीठांना स्पर्धा निर्माण होईल. एक मात्र चांगले होईल, ते म्हणजे येथील दर्जेदार, प्राध्यापकांना परदेशी विद्यापीठे लठ्ठ वेतन देतील. त्यामुळे अशा प्राध्यापकांसाठी संधी निर्माण होतील. याचाच अर्थ, परदेशी विद्यापीठे आल्यानंतर गुणवत्ता मोठ्या प्रमाणावर उंचावेल, अशी आशा करणे अयोग्य आहे. आपल्याकडे सरकारी विद्यापीठांत जाणाऱ्यांचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे. या विद्यापीठांच्या रचनेला, परीक्षा पद्धतींना जोपर्यंत आव्हान निर्माण होत नाही आणि विद्यार्थ्यांना मुबलक पर्याय उपलब्ध होत नाही, तोपर्यंत ही विद्यापीठे काही बदलणार नाहीत. परीक्षा घेण्याचे यंत्रणेचे सध्याचे स्वरूपच कायम राहिल. एका अहवालानुसार दरवर्षी भारतातून सुमारे दीड लाख विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जातात आणि त्यासाठी दहा ते बारा अब्ज डॉलर खर्च करतात. परदेशी जाणाऱ्यांमध्ये श्रीमंत वर्गातीलच नव्हे, तर मध्यम वर्गातील विद्यार्थीही आहेत. परदेशी विद्यापीठांना देशात परवानगी द्यावी की न द्यावी या विषयाऐवजी या विद्यापीठांचा येथील शिक्षण व्यवस्थेला आणि अंतिमतः देशाला फायदा होईल काय, हा खरा चर्चेचा आणि वादाचा विषय बनलेला आहे. याशिवाय मोठ्या विद्यापीठांचे विभाजन आणि परदेशात गेलेल्या प्रज्ञावंत भारतीयांचे ब्रेन गेन असे मुद्दे शिक्षण आणि राजकीय क्षेत्रात नेहमीच चर्चेत असतात.

'आजचे शिक्षण कसे तकलादू व पुस्तकी आहे, त्यात आमुलाग्र बदल करण्याची कशी गरज आहे, वगैरे विचार अनेकवेळा सत्ताधारी सामान्यांपुढे व्यक्त करताना दिसतात. पण जेव्हा भारताचा राष्ट्रपती, पंतप्रधान, युजीसीचा चेअरमन, विद्यापीठाचा कुलगुरु आपले शिक्षण बदलण्याची गरज सांगतात, चीन, जपान, अमेरिकेत ते कसे चांगले आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात तेव्हा हसावे का रडावे हे कळत नाही. या स्थानावर राहून जर हवे ते बदल हे लोक करु शकत नसतील तर मग इतर कोण करणार?'

**एकछत्री नियंत्रण : यशपाल समितीचाही उच्च शिक्षण आयोगाकडे कल**

सध्या आपल्याकडे उच्च शिक्षणाचा विचार तुकड्या तुकड्याने केला जातो. त्यामुळे उच्च शिक्षणाचा एकात्मिक विचार होत नाही. या सर्वांऐवजी एकच नियंत्रण संस्था असायला हवी, असा विचार याबाबत नेमण्यात आलेली यशपाल समिती करीत आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची जागा उच्च शिक्षण आयोगाने (एचईसी) घ्यावी, असा या समितीचा कल आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने या समितीची स्थापना केली होती.

'यु.जी.सी.'च्या कार्यपद्धतीत बदल घडवून आणण्याची आणि उच्च शिक्षणासाठी एकच नियंत्रण संस्था स्थापण्याची शिफारस सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय ज्ञान आयोगाने काही वर्षांपूर्वी केली होती. त्यावर देशभर वाद झाला होता. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नव्हती. त्याऐवजी केंद्राने जेष्ठ शास्त्रज्ञ प्रा. यशपाल यांची समिती नेमली होती. 'यु.जी.सी.'च्या स्वरूपात बदल करण्याची चर्चा तिच्या सुवर्णमहोत्सवापासून सुरु झाली आहे. 'एचसीई' कशा प्रकारचे असावे याबद्दलचा अहवालही सादर करण्यात आला होता. त्यापासून प्रेरणा घेऊन पाकिस्ताननेही 'एचसीई' ची स्थापना केली आहे.

एकूण विचार करता जगातील पहिल्या दहा विद्यापीठांमध्ये स्थान मिळेल असे विद्यापीठ आपण उभे करू शकलो नाही. आयआयटी वगळता शिक्षण संस्थेचा ब्रँडही विकसित झाला नाही. अर्थात आपण केलेल्या प्रगतीमुळे भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत आहे. अवकाश तंत्रज्ञानातही भारताने आपला ठसा उमटवला आहे. परंतु अशा सुट्या प्रयत्नांपेक्षा सर्वसमावेशक कार्यसंस्कृतीचा पाया घालणे हे मोठे आव्हान आहे. विज्ञानाच्या सर्व शाखांमधील अद्ययावत संशोधनाला चालना देण्याची गरज आहे. खरोखरच ज्ञान-विज्ञानाला उद्यमशीलतेचे परिणाम देण्यात आपण यशस्वी झालो तर त्याचा आपणाला फायदाच होणार आहे.

**'वेदना जाणावया जागवू संवेदना': शिक्षणातून मूल्यशिक्षणाची घसरण**

सुमारे अर्धशतकापूर्वी शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे, व्यक्तीच्या जडणघडणीचे प्रमुख साधन आहे असे मानले जात असे हे विधान आजही तितकेच कालसुसंगत आहे. तरीपण साठच्या दशकात डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग (Education Commission) नेमला गेला. आयोगाच्या अहवालात आता 'शिक्षण हे राष्ट्राच्या विकासाचे प्रभावी माध्यम आहे ही भूमिका घेतली गेली होती आणि शिक्षणाच्या उद्दिष्टांची, आकृतिबंधाची आणि कार्यपद्धतीची पुनर्मांडणी केली गेली. आज एकविसाव्या शतकातले पहिले दशक संपताना मात्र आपण 'शिक्षणाचे मुख्य प्रयोजन' ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानधिष्ठित समाज (Knowledge Society) घडवण्याला अग्रक्रम देणे हे असल्याचे मानू लागलो आहोत. म्हणजे 'व्यक्तिमत्त्व विकास', 'राष्ट्रीय विकास' आणि ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मिती ही तीन उद्दिष्टे शिक्षणाच्या प्रयोजनाची परिभाषा (Language of Education) करण्यातील बदलांकडे निर्देश करत आहेत की आपल्या शिक्षणाकडे पाहण्याच्या परिप्रेक्ष्यातील (Prospective of Education)फरकांना अधोरेखित करीत आहेत, असा मूलभूत प्रश्न प्रथम उपस्थित करता येईल. माझ्या मते, तिघांमध्ये परस्परसंबंध असतो हे प्रथम मान्य करावेच लागेल; मात्र आज मुळातच आपल्या शिक्षणविषयक दृष्टिकोनात जो बदल होत चालला आहे, तो सुद्धा समजून घेतला पाहिजे. (धनागरे, डी.एन. २०१० पृ. १०)

खाजगीकरणामुळे आपली मूल्ये, संस्कार आणि नीतीमत्तेबद्दलच्या कल्पना पार बदलू लागल्या आहेत. पैशाच्या बळावर आपण उच्च शिक्षण क्षेत्रात काहीही करुन / करवून घेऊ शकतो अशी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचीही मानसिकता बनत चालली आहे आणि या बदलाचे फार दूरगामी परिणाम देशाच्या अखंडतेवर, एकसंघतेवर आणि आर्थिक - राजकीय स्थैर्यावर होणार आहेत. शिक्षण हे आधुनिकीकरणाचे मुख्य साधन आहे, त्याद्वारे स्वातंत्र्य, समता, समान संधी, सर्वधर्मसमभाव (Secularism) या कल्पना, नवी मूल्ये नव्या पिढीत रूजायला मदत होऊ शकते. अशी आग्रही भूमिका काही विचारवंतांनी घेतली आहे. प्रत्यक्षात मात्र असे होताना दिसत नाही.

'वेदना जाणावया जागवू संवेदना' हे शिक्षणाचे ब्रीद असायला हवे. माहिती, ज्ञान आणि शहाणपण या तीन भिन्न गोष्टी आहेत. माहितीच्या माराने बेजार झालेली मुले ज्ञानाला मुकतात. ज्ञानी माणसे शहाणी असतातच असे नाही. ज्ञानाला मूल्यांची जोड असेल तर मनुष्य खऱ्या अर्थाने शहाणा होतो. मूल्यशिक्षणात नीटनेटकेपणा वक्तशीरपणा, श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता, सौजन्यशीलता, संवेदनशीलता, विज्ञाननिष्ठा, सर्वधर्मसहिष्णुता इ. अशा मूल्यांचा अंतर्भाव होतो.

परंतु मूल्यांचा अर्थ जर वेगवेगळ्या समाजरचनेमध्ये वेगवेगळा होत असेल, तर मग अशावेळी आपल्याला समाजरचनेचा विचार आधी करावा लागतो. भांडवलशाहीमध्ये मूल्यांच्या अर्थाची नेहमी उलटापालटच होत असते. भांडवलशाहीत खाजगी मालमत्तेवर आधारित अशी समाजव्यवस्था असते. तसेच जी काही उत्पादन साधने असतात, त्या उत्पादन साधनांची मालकीही त्या भांडवलदारांच्या हातामध्ये असतात. अर्थात अशा व्यवस्थेमध्ये नफा कमविणे हेच त्या समाजव्यवस्थेचे अंतिम ध्येय असते आणि जर का नफा कमवायचा तर माणसाचे माणसाकडून शोषण करुनच तो नफा कमावला जाणार आणि माणसाचे माणसाकडून होणारे शोषण हाच जर भांडवलशाही समाजव्यवस्थेचा पाया असेल तर त्या समाजव्यवस्थेमध्ये समानता कशी येणार? त्या समाजामध्ये मूल्ये रुजणार कशी? त्या समाजामध्ये मूल्यांना खरा अर्थ मिळणार कसा? नैतिक मूल्यांची किंवा मूल्यव्यवस्थेची घसरण आपण जी म्हणतो, तिला सगळे कारण म्हणजे ही समाजव्यवस्थाच आहे, की ज्या समाजव्यवस्थेचा पायाच आधी मुळात असा ठिसूळ आहे, विषमतेवर आधारित आहे.

### शिक्षणातील व्यवस्थात्मक दुय्यमत्व आणि जनतेचे शिस्तीकरण

शोषित-वंचित घटकाला उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात आणणे इतकेच पुरेसे नाही कारण संघर्ष करुन जेव्हा या समाजघटकातील विद्यार्थी पुढे येतात तेव्हा ते शिक्षण त्यांना सक्षम बनविण्यासाठी काय करेल याचा विचार करणे आवश्यक आहे. माझ्या अनुभव आणि निरीक्षणाप्रमाणे या समाजघटकातील विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणच्या शोषणाला आणि वर्जिततेला तोंड द्यावे लागते. दलित आणि स्त्रियांना विद्यापीठीय ज्ञानक्षेत्रात 'अभ्यासवस्तू'(Object of Knowledge) ठरवून त्यांच्या ज्ञाननिर्मितीकडे पाठ फिरवून त्यांना ज्ञाननिर्मिकाचा (Subject of Knowledge) दर्जा नाकारला जाताना दिसतो आहे. सिद्धांकन व माहितीची (Theory / Empinical) प्रत्यक्ष फारकत ज्ञानाच्या विषम वाटपाची निर्मिती करते. ज्ञानाच्या उत्पादन व विस्तारातील विषमता, विद्याशाखीय क्षेत्रातील संशोधनसंस्था, विद्यापीठे, प्रकाशन व्यवस्था यांच्यामार्फत पुर्नउत्पादित होताना दिसते.

१९९० नंतर जागतिकीकरण, खाजगीकरण आरक्षणाला होणारा विरोध तर दुसऱ्या बाजूला जातीअंताच्या प्रश्नाची जोरदार चर्चा होऊ लागली. 'जात आणि आरक्षण व गुणवत्ता' हा मुद्दा जोरकसपणे चर्चीला जाऊ लागला. या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाचे विपरीत परिणाम कसे घातक आहेत हे दाखविणारे अभ्यास पुढे येऊ लागले. विद्यापीठीय ज्ञानसंस्था आणि जातींचा सामाजिक व्यवहार यामध्ये असलेली दरी याकडे अनेक विद्यापीठातील आणि संशोधन संस्थामधील विभाग व केंद्रे यांनी लक्ष वेधले आहे. सर्वसाधारणपणे १९९० नंतरच्या काही घटनांनंतर विशेषतः आंबेडकरी अभ्यासपरंपरेच्या दृश्यतेमुळे निर्माण झालेली आव्हाने, मंडल अहवालाची अंमलबजावणी, दलितांवरील अत्याचारांचा समाजाच्या अनेक स्तरांतून होणारा प्रतिकार, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दलित स्त्रीवादाची स्थापना, डर्बन परिषद यांमुळे अभ्यासकांना विद्यापीठीय विश्वामध्ये जात, वर्ग आणि लिंग भाव यामधील परस्परसत्तासंबंधांची ओळख करुन त्यामध्ये हस्तक्षेप करणे भाग पडले आहे.

गेल्या पाच वर्षांत अभ्यासकांच्या एका नव्या पिढीने मुख्यतः स्त्रीवादी, दलित आणि दलित स्त्रीवादी यांनी त्याच्या संशोधनाद्वारे (एम. फिल. आणि पीएच.डी. संशोधनाद्वारे) ज्ञान संस्थांचे संस्थीकरण, उच्च शिक्षण अध्यापन शास्त्राची पुनर्रचना करण्याचे तसेच अभ्यासक्रमातील व्यवहारांशी भिडण्याचे कार्य केले आहे.

१९९० च्यानंतर दलित विद्यार्थ्यांची कृतिशिलता विद्यापीठाच्या क्षेत्रात वाढताना दिसतो. त्याचबरोबर स्वायत्त स्वरुपाच्या दलित विद्यार्थी ग्रुपची निर्मिती होतांना दिसते. याचे महत्त्वाच्या कारणांपैकी म्हणजे उत्तरप्रदेशातील बहुजन समाज पक्षाची निर्मिती, मंडल-१ आणि दलित अध्यापकाची भरती इ.मुळे भारतातील विद्यापीठामध्ये दलित विद्यार्थी दिसू लागले. या ग्रुपनेही विद्यार्थ्यांच्या हितसबंध/सुरक्षा व जातीविषयक चर्चा विदयापीठाच्या आवारात घडुन आणण्याचे योगदान आहे.

दलित विद्यार्थी चळवळीकडे समकालीन प्रश्नावरील साहित्याचा अभाव हे होते. जातीचा प्रश्न हा सातत्याने गरिबी, प्रथा, शुध्दता इत्यादीशी जोडला जात होता. आरक्षण हे कल्याणकारी राज्याचे मोजमाप म्हणूनच त्याकडे बघितले गेले. पण दलित उप-जाती, गुणवत्तापुर्वक शिक्षण, भाषा, नागरीकत्व म्हनून हक्क इत्यादी मुद्द्यांना सामोरे जात आहेत. त्यामुळे सार्वजनिक चर्चा-जगामध्ये जातीची चर्चा करण्यासाठीचा आत्मविश्वासाची कमतरता दिसत होती. भारतीय विद्याक्षेत्रातील जागा ह्या दलित विद्यार्थ्यांच्या बाबतीत फार संवेदनशील नाहीत तर त्यामधुन वेगवेगळया प्रकारे दलित विद्यार्थ्यांना आरक्षणामुळे शिक्षणाची संधी मिळाली. पण सध्याच्या बाजरपेठेतील नोकरी मिळविण्यासाठी आवश्यक असलेलेकौशल्य,मार्गदर्शन, सुविधांची कमतरता दिसुन येते. विशेषतः दलित विदयार्थी पारंपरिक अभ्यास घेतात, पण विशेषीकरण आणि व्यावसायीक अभ्यासक्रम घेतांना दिसुन येत नाहीत. त्यामुळे ते खाजगी क्षेत्राच्या बाहेर राहतात.भारतीय ज्ञानविश्वात, अभ्यासक्रमात दलित साहित्य, संस्कृती, प्रतीके इत्यादींचा दिसत नाहीत. भारतातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था आणि वर्गाआधारीत उच्च शिक्षण जे इंग्रजीभाषेतून असल्यामुळे ग्रामीणभागातून आलेला दलित विद्यार्थी पिढीत होतात. थोडक्यात, भारतातील उच्च शिक्षणातून खरे तर दलित विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळवून ते मोठ्या प्रमाणात प्रगतीकडे जायला पाहिजे. परंतु दलित विद्यार्थी हे नकाराअर्थी, स्वत: बद्दलच्या आत्मविश्वासाची कमी घेत जगणे आणि समाजापासून दूर होत जाऊन ब्राम्हणीकरणाची प्रक्रिया स्वीकारण्यापर्यंत प्रवास होतो.

त्यामुळे सर्व स्तरातून आलेल्या दलित विद्यार्थीयांना संघटीत करून एक समावेशक व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे. ज्याची दलित विद्यार्थीयांना गरज आहे.

उदारमतवादी लोकशाहीवादी विचारप्रणालीतून विचार करणारे सुद्धाअसे म्हणतात की, सर्व शोषित गटांनी विद्यापीठात यावे, विद्यापीठे अधिक समावेशित करावी, पण त्यांनी आमची भाषा शिकावी, आम्ही ज्याला बहुविधता म्हणतो ती शिकावी. याचा अर्थ सर्वांनी लोकशाहीत सहभाग घ्यायचा आहे, पण जेव्हा तुम्ही आमच्यासारखे बोलायला लागल्यावर पण दलित संकल्पनांमध्ये गृहीत धरलेली लोकशाहीची कल्पनाच काय म्हणते तर आपण जे गृहीत धरलेले आहे त्यालाच आपणाला मुळात प्रश्न विचारायला लागतील. त्याला आपणाला फाडून काढून त्यामध्ये कोणते सत्तासंबंध दडलेले आहेत. हे बघावे लागेल तर आपण खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या दिशेने जाऊ, म्हणजे गृहीत धरुन आपणाला पुढे जाता येणार नाही.

अनेक कारणांमुळे आजकाल एकीकडे विद्यार्थी विद्यार्थिनींची स्वतंत्र विचारशक्ती खुंटत आहे. तर दुसरीकडे वाढत्या वयाबरोबर त्यांचे परावलंबित्व (Parasiteship)वाढत आहे. प्रस्थापित अध्यापनशास्त्र जर दलितांना मुक्तीचा विचार देण्यापेक्षा त्यांना कोंडीत पकडणारे डावपेच खेळत असेल तर त्यासंदर्भात लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

तारुण्याची ऐन उमेदीची कित्येक वर्षे या क्षेत्रात घालवूनही शिक्षणातील व्यवस्थात्मक दुय्यमत्वातून स्वतंत्र विचारशक्ती निर्माण करण्यावर एक प्रकारे बंदी घालताना दिसत आहे. कारण या व्यवस्थेला आज्ञाधारक गुलामसदृश्य व्यक्तींची जरुरी आहे. या भूमिकेतूनच आजच्या शिक्षणातून 'Graded Inequality' चा व्यवहार होताना दिसत आहे. म्हणून केवळ उच्च शिक्षणच नव्हे तर संपूर्ण शिक्षण व्यवस्था केवळ मालक मजूर भूमिकेत व्यवहार करताना तो व्यवहार सरंजामदार गुलामाच्या पातळीवरही जाताना दिसत आहे. आज अस्तित्वात असलेली शिक्षणव्यवस्था ही केवळ विषमता टिकवून ठेवते आहे, एवढेच नाही तर विषमता वाढविते आहे. म्हणून शिक्षणात वरवरच्या नाव घेऊन बोलण्यासारख्या सुधारणा करुन शिक्षणाचे प्रश्न सुटणार नाहीत तर शिक्षणात आमुलाग्र परिवर्तन केले पाहिजे. त्याकरीता शिक्षणातील 'Graded Inequality' अंत केला पाहिजे.

आज मुस्लिम, सामाजिक आर्थिक मागासवर्गीय, आदिवासी, दलित आदी सर्वांच्या शिक्षणासाठी सर्व समावेशक 'इन्क्लूझिव्ह' शिक्षण पद्धतीची गरज आहे. त्याच बरोबर शाश्वत आणि सर्वांचा आदर करणाऱ्या विकासाचे (सस्टेनेबल अँड सेल्फ रिस्पेक्ट) प्रारुप अंगीकारण्याची गरज आहे असे म्हणून, गुरु म्हणतात, शिक्षणाचा प्रश्न हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न असू शकत नाही. तो 'सिव्हील सोसायटीं'चा, नागरी समाजाचा प्रश्न असतो. त्यामुळे या नागरी समाजाकडूनच त्याचे उत्तर हवे असते. त्यामुळे अमुक एका वर्गाला आरक्षण दिले किंवा सवलती दिल्या, तर प्रश्न संपला अशी भूमिका चालत नाही. अमुक एक वर्ग आपलाच एक घटक असून त्याचे मागासलेपण दूर झाल्याखेरीज आपला संपूर्ण समाज प्रगत होणार नाही, अशी भावना निर्माण होणे आवश्यक असते. असे झाले तरच शाश्वत आणि आदरपूर्वक विकासाच्या प्रारुपाकडे जाता येईल. त्याची सुरुवात शिक्षण क्षेत्रापासून करता येईल. प्रगती साधायची असेल तर सर्वांना शिक्षणाची समानसंधी उपलब्ध झालीच पाहिजे. (गुरु, गोपाळ; २००६, (अ) पृ. ८) सच्चर समितीच्या अहवालासंदर्भात गोपाळ गुरु यांनी वरील विचार व्यक्त केले होते.

भांडवलशाहीमध्ये केवळ धनिक-जमीनदार आणि स्वार्थांध राज्यकर्ते यांची युती होते आणि ही युती तोंडाने केवळ नैतिक मूल्यांचा उद्घोष करते. वर्तन मात्र पदोपदी या नैतिक मूल्यांना पायदळी तुडविण्याचेच होते आणि मग शाळा-महाविद्यालयातील शिक्षणाचा आणि समाजामधल्या परिस्थितीचा काही संबंधच उरत नाही. कधी कधी असे वाटते की, आपली संवेदनशीलता आपण जर बोथट करुन घेतली नाही, तर जगणेच अशक्य होईल. अशा अवस्थेमध्ये शाळा-महाविद्यालयात मात्र आपण मुलांना राष्ट्रभक्ती शिकवायची!

जनतेचे शिस्तीकरण साधण्याच्या शिक्षणाच्याठायी असलेल्या प्रचंड सुप्तशक्तीमुळे मिशेल फुको या फ्रेंच तत्त्ववेत्त्याने शिक्षणाची गणना सैन्य दल व तुरुंग या जनतेचे शिस्तीकरण साधणाऱ्या संस्थांमध्ये केली. जनतेचे असे शिस्तीकरण साधणे म्हणजे भांडवली रचना स्वीकारण्यासाठी तिची मनोभूमिका तयार करणे. अशी मनोभूमिका तयार करण्यामध्ये अभ्यासक्रमाची भूमिका महत्त्वाची असते. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विशिष्ट अशा ज्ञानाची रचना जाणीवपूर्वक केली जाते. विशिष्ट अशा ज्ञानाची निवड, त्याचे वर्गीकरण व त्याचे शिक्षण संस्थांतून प्रस्तूतीकरण यामध्ये सत्तेचे देखील विषम वाटप होते. अशा प्रकारे आधुनिक ज्ञान हे सांस्कृतिक ज्ञान बनते. अभ्यासक्रम म्हणजे अशा ज्ञानाचे प्रयोजन (ध्येय व उद्दिष्टे) व त्याच्या शिकविण्याच्या रीती याविषयीची भूमिका असते. प्रभुत्वविचारप्रणाली व अधिमान्यता या परस्परसंबंधित संकल्पना असून त्या शिक्षणाची जवळचा संबंध आहे.

व्यक्तीगत आणि सामाजिक जीवन प्रगल्भ करणारे शिक्षण हवे असेल तर स्वतंत्रपणे विचार करु शकणारी, सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष उभा करण्याची ताकद असणारी, सुजाण नागरिकांची पिढी निर्माण करावी लागेल. परंतु अशा पिढीची निर्मिती करण्याची ताकद आजच्या शिक्षण व्यवस्थेत नाही, हे कळून सुद्धा त्यात मूलभूत परिवर्तन करण्यापेक्षा त्यात वर्गीय किंवा सांस्कृतिक सोयी करण्यातच आपण अडकलो आहोत.

वाचन, विचार आणि कल्पनाशक्ती या सर्जनशील ज्ञानाच्या पायऱ्या आहेत. ज्ञान हे चिकित्सेशिवाय सिद्ध होत नाही, हे लक्षात घेऊन प्रचलित अभ्यासक्रम चिकित्सेच्या रचनेत शिकविणे, हे शिक्षणातील क्रांतिकारी विचाराला जन्म देणारे ठरणार आहे. बुद्धाला सामाजिक कलह, विसंवाद नष्ट करणारे ज्ञान हवे होते व ते ज्ञान त्यांनी प्राप्त करुन त्याचा सामाजिक क्रांतीसाठी प्रचार केला. डॉ. आंबेडकरांनी ब्राह्मणी ज्ञान व बौद्ध ज्ञान यातील फरक सांगताना काही महत्त्वाची सूत्रे सांगितली आहेत. त्यांच्यामते, ब्राह्मणी ज्ञान हे स्मृतीप्रधान व शब्दप्रामाण्य मानणारे आहे. श्रमप्रक्रियेला नकार देण्याचा परात्म ज्ञानाच्या उत्पादनास आणि या परंपरेमधून येणारे प्रमुख उत्पादन हे ब्राह्मणी विचारसरणीचेच पाठराखण करणारे असते. ज्ञानाच्या मर्यादा समजणे हेही एक ज्ञानाचे मूल्यांकनच आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, ग्रंथप्रामाण्य नाकारणे आणि प्रत्यक्ष व अनुमानाने सत्याची पडताळणी करणे ही बौद्ध ज्ञानाची वैशिष्ट्ये आहेत.

शिक्षणाचा विचार नंतर, आधी समाज परिस्थिती बदलूया, असे न करता उलट समाज परिस्थितीच बदलायला शिक्षणाचा विचार जाणीवपूर्वक करता येईल का? हा पर्याय योग्य वाटतो आणि जर हा पर्याय स्वीकारायचा, तर आपल्याला शिक्षणातून काय करता येईल याचा विचार केला पाहिजे. कारण शिक्षण हे व्यक्तीच्या वैचारिक जडणघडणीत प्रत्यक्षच संबंधित असते, ते तिला व्यापक वास्तवाचे भान देत नाही पण वास्तव वर्तमानाचे वैचारिक मापदंड निश्चित करते. अर्थात वाचणाऱ्याची नुसती माहिती वाढत नसते तर त्याचा दृष्टिकोनही यातून तयार होत असतो.

त्यामुळे गतकाळाच्या तथाकथित उजाड वैभवात मुलांना न गुंतवता त्यांना भविष्याचा आणि शोषणरहीत समृद्ध भारताचा वेध घ्यायला शिकविले पाहिजे.

**संशोधनप्रकल्पः स्वरुप आणि निरीक्षणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्रातर्फे उच्च शिक्षणाच्या अध्ययन, अध्यापन, अभ्यासक्रम व संशोधन आणि विस्तार कार्यक्रमात 'लिंगभावा' च्या करण्यात येणाऱ्या समावेशासंबंधित संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला होता. हा अभ्यास प्रामुख्याने महाराष्ट्रातील पारंपरिक शिक्षण देणारी विद्यापीठे आणि महाविद्यालयातील भाषा आणि सामाजिकशास्त्रे या विषयांपुरता मर्यादित होता. त्या अनुषंगाने मुंबई, मराठवाडा, विदर्भ, सोलापूर, कोल्हापूर, पुणे येथील विद्यापीठामधील विभाग व महाविद्यालये, संशोधन संस्था व स्त्री संघटनांना भेटी दिल्या.

आपल्या सभोवतालची सामाजिक परिस्थिती, सामाजिक वास्तव आमचे अनुभवविश्व घडवीत असते. तेव्हा त्या परिस्थिती समाजवून घेणे ही तर सामाजिकशास्त्राच्या अभ्यासकांची अगदी प्राथमिक जबाबदारी आहे. याचा थोडा विचार व्हावा म्हणून संशोधन करताना विषयाव्यतिरिक्त जे अनुभव आले, निरीक्षणे केली आणि प्रस्तुत विषयासंदर्भात जे वाचन केले ते नोंदविण्यात आले आहे. परंतु प्रस्तुत लेखात मराठवाड्यातील केवळ लातूर, नांदेड आणि प. महाराष्ट्रातील अहमदनगर येथील काही महाविद्यालयांना भेटी दिल्या त्या अनुषंगाने केलेली निरीक्षणे आणि अनुभव नोंदविली आहे. परंतु हे प्रत्यक्ष संशोधनातील निष्कर्ष नाहीत.

अशाच विषयावरील संशोधन मेरी जॉन (उत्तर भारत), पद्मिनी स्वामीनाथन (तामिळनाडू), जे. देविका (केरळ), अर्चना शर्मा (पूर्वोत्तर राज्य) इ. अभ्यासकांनी केले आहे.तर भारतातील स्त्री अभ्यास केंद्रांचा अभ्यास पुणे विद्यापीठातील शर्मिला रेगे यांनी केला आहे. आपणास माहित आहे, की गेल्या काही वर्षात देशभरातील उच्च शिक्षणाच्या कायदेशास्त्र, अर्थशास्त्र, साहित्य, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान इ. सर्वच ज्ञानशाखांमधून स्त्री प्रश्नाचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्याचा दबाव टाकला जात आहे. तर काही ठिकाणी स्वतंत्रपणे स्त्री अभ्यास केंद्रांची स्थापना केली जात आहे.

**विद्यार्थ्यांची वर्गातील अनुपस्थिती काय सुचविले?**

आम्ही ज्या कोणत्या महाविद्यालयात आणि विद्यापीठास भेट दिली त्या प्रत्येक महाविद्यालयाच्या इमारती बऱ्यापैकी सुसज्ज आणि ऐसपैस पटांगण असलेल्या होत्या. पण या जवळपास सगळ्याच ठिकाणांतून वर्षानुवर्षे आणि दिवसेंदिवस विद्यार्थी संख्या कमी होत असल्याचे आम्हाला सांगण्यात आले. त्याच्या कारणाबाबत विचारले असता 'बेरोजगारी' च्या प्रश्नामुळे संख्या कमी होत असल्याचे सांगण्यात आले. आम्हाला पुण्यातील महाविद्यालयात असा अनुभव आला होता की, तेथील महाविद्यालयातील विद्यार्थी बाहेर छोटे-मोठे काम मिळाले असल्यामुळे वर्गात उपस्थित राहण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे 'शिकलास तर टिकलास' (नाही तर भिकारी झालास म्हणून समज) असे जे म्हटले जायचे, त्याचे प्रत्यक्षातील स्वरुप बदलले असल्याचे दिसते.

आज पारंपरिक भाषा आणि सामाजिकशास्त्राचे अध्ययन केले तर विद्यार्थ्यांपुढे बेरोजगारीच्या विळख्यात सापडण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात निर्माण होत असल्याची भावनाविद्यार्थी, शिक्षक आणि पालकांमधून दिसून येते. म्हणून भाषा आणि सामाजिकशास्त्राचे शिक्षण विद्यार्थ्यांना भिकेला लावत आहे असे अनेकांना वाटते. त्यामुळे 'शिकलास तर भिकेला लागलास' असे समीकरण झाले असल्याचा समज मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे.

सध्या मराठवाड्यातील अनेक गरीब विद्यार्थी दोन बाजूंनी अडचणीत आले आहेत. कलाशाखेत प्रवेश घ्यावा तरीही अडचण आणि विज्ञान व कॉमर्स शाखेत जावे तरीही अडचण अशी ही अवस्था आहे. आज मराठवाड्यातील लातूर, उदगीर आणि इतरत्र कॉमर्स शाखेची अवस्था इतकी डबघाईस आलेली आहे की, तिची मरणासन्न अवस्था भाषा आणि सामाजिकशास्त्रांपेक्षाही वाईट झाली आहे. पण विरोधाभास असा की, पुण्या-मुंबईतून प्रवेश मिळणे अवघड असते. तर मराठवाड्याच्या औद्योगिकरण न झाल्याच्या परिणामी या प्रदेशातील महाविद्यालयातून या ज्ञानशाखांना विद्यार्थी प्रतिसाद कमी मिळतो. त्यामुळे या विषयाच्या अध्यापकांना घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांची जमवा जमव करावी लागते. हे चित्रण काल्पनिक नसून मराठवाड्यातील अनेक महाविद्यालयांतून दिसून येणारी वास्तविकता आहे.

'आर्थिक विकासासा' साठी प्रगत मानल्या जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात कलाशाखेतही विद्यार्थ्यांचा तुटवडा निर्माण होत असल्याचे दिसले. अधिकतर विद्यार्थ्यांचा कल हा व्यावसायिक शिक्षण घेण्याकडे (झटपट पैसे मिळवून देणारे शिक्षण) दिसला. महाविद्यालयात प्रवेश असूनही बाहेर संगणकासंबंधित प्रशिक्षणाकडे अधिक लक्ष केंद्रीत केले जाते.

लातूर जिल्ह्यातील काही महाविद्यालयात तर कॉमर्स आणि कला व विज्ञान शाखांच्या खोल्यांचे क्षेत्रफळ देखील कमी अधिक असल्याचे दिसले.

थोडक्यात भाषा आणि सामाजिकशास्त्र व कॉमर्स यांच्यापुढेही प्रश्न उपस्थित झाले असून दोघांपुढेही वेगवेगळे प्रश्न आहेत. पण हे लक्षात घेतले पाहिजे की, मोर्चे काढून एखादा प्रकल्प बंद पाडता येईल. प्राचार्य, शिक्षण मंत्रीही बदलता येतील पण रोज कमी होणारी विद्यार्थी संख्या थांबवता येणार नाही हे अध्यापकांनी विचारात घेतले पाहिजे.

वर केलेल्या विश्लेषणात शिक्षणक्षेत्रात असलेली संख्यात्मक स्थिती बेरोजगारीच्या संदर्भात दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला असला तरी पत्रकारीता, संज्ञापनशास्त्र इ. सारख्या अभ्यासक्रमाला विद्यार्थी प्रवेश घेतल्यानंतर कॅम्पस इंटरव्यूहच्याद्वारे 'Placement' करण्याचे कार्यक्रम होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हातात पदवी नसली तरीही ही मुले कामाला लागतात. याकडे चांगली/वाईट इ. स्वरुपाची बाब म्हणून बघायचे की कसे, ते शिक्षणतज्ज्ञांनी आणि समाजाने ठरवायचे आहे. पण या सगळ्यातून शिक्षण व्यवस्थेत बरी-वाईट परिवर्तने होत असल्याचे दिसून येत आहे. म्हणून आज महाविद्यालयांतून विद्यार्थी असतील तर अध्यापक नसतात आणि अध्यापक असतील तर विद्यार्थी नसतात अशी स्थिती झाल्याचे दिसते.

परिणामी शिक्षणाचा विचार वेगवेगळ्या (जात, वर्ग, प्रदेश, लिंग, ज्ञानशाखा, विद्यापीठ, रोजगार, राज्याचे शैक्षणिक धोरण इ.) संदर्भात करावा लागेल. यामधून शिक्षणक्षेत्रातील प्रश्नांची कारणमीमांसा होऊ शकेल.

आपल्याकडे शिक्षणात आणि शिक्षणक्षेत्रात पूर्वीपासूनच कोणत्या ना कोणत्या स्वरुपात विषमता असल्याची दिसते. आज गरीब शिक्षण संस्था व श्रीमंत शिक्षण संस्था हा एक भेद आहे तर अनुदानित वर्ग आणि विनाअनुदानित वर्गाची रचना केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही फुट पडली आहे. तसेच अनुदानित संस्था व कायम विना अनुदानित संस्था असा देखील एक मोठा भेद निर्माण झाल्याचे दिसते.

यासोबत इतर प्रकारच्या विषमता देखील मोठ्या प्रमाणात फोफावल्या आहेत.हे ज्ञानाधिष्ठित समाजरचनेसाठी अतिशय घातक आहे. ज्या शिक्षण व्यवस्थेतून आपण व्यक्ती आणि देशाच्या विकासाची स्वप्ने पाहत आहोत त्यामध्येच ही अवस्था आहे.

आमच्या संशोधन प्रकल्पाच्या दरम्यान महाविद्यालय आणि विद्यापीठातील निरीक्षणात आम्हाला असेही दिसून आले की, कला आणि वाणिज्य शाखेचे वर्ग सुरु होण्याची अनेक वरिष्ठ महाविद्यालयातील वेळ ही सकाळी आठ वाजता सुरु होऊन दहा-आकरा वाजेपर्यंत तर ती बंद होण्याच्या स्थितीत येतात. तर काही महाविद्यालये बंद देखील झालेली असतात.

थोडक्यात सकाळी आठ वाजता शिक्षणाचा उदय होतो आणि लगेच दहा-अकराला तर ते अस्तालाही जाते. यानंतर महाविद्यालयाच्या रिकाम्या इमारती आणि दोन-चार अध्यापक इतकेच लोक घुटमळत असतात.

याठिकाणी दोष कोणाला द्यायचा हा देखील एक प्रश्न आहे. सकाळची दोन लेक्चर ऐकून अर्धवेळ कामासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना द्यायचा की अवास्तव अपेक्षा करणाऱ्या कुटुंबाला द्यायचा; वर्गात विद्यार्थीच नाहीत म्हणून लवकर घरी जाणाऱ्या प्राध्यापकाला द्यायचा की शिक्षण घेऊनही रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन न देणाऱ्या व्यवस्थेला द्यायचा. परंतु विद्यार्थी आणि शिक्षकांना वैचारिक चर्चा करण्यासाठी वेळ असला तरीही ते त्याचा उपयोग करतातच असे नाही. शिक्षकांना वर्गातील एकतर्फी संवाद महत्त्वाचा वाटतो तर विद्यार्थ्यांना यात काहीही पडलेले नाही. परीक्षेत मार्क्स मिळाले म्हणजे झाले यापुरता विचार केला जातो. वर्ग संपल्यास ते आपापल्या मार्गाने जाताना दिसतात. ते परस्परांना वेळ देत नसल्यामुळे शिक्षण आणि शिक्षण क्षेत्र कमजोर होऊन सर्वच ज्ञानशाखांमधून अर्धकच्चे (half backed) शिक्षित तरुण बाहेर पडत आहेत. आज आपल्या शिक्षण संस्था, दुय्यम नव्हे तर तृतीय दर्जाचे ($III^{rd}$ class) शिक्षण देणाऱ्या संस्था झाल्या आहेत. त्यामुळे ज्या कागदावर पदवी छापलेली असते त्या कागदाएवढीही किंमत ज्या पदवीला नाही अशा पदव्या प्राप्त केलेले लाखो तरुण विद्यापीठांच्या कारखान्यातून बाहेर पडत आहेत. या सगळ्या बाबीसंदर्भात प्राचार्य आणि संस्थाचालकाची, राज्याच्या शैक्षणिक धोरणकर्त्याची काय भूमिका असते, या सगळ्यांची गुंतागुंत एकत्रितपणे तपासणे आवश्यक आहे.

वास्तविकपाहता आज विविध अंगांनी आपले जग बदलते आहे. आपला परिसर, शहर बदलत आहे. अर्थातच विद्यार्थीही बदलले आहेत. त्यामुळे त्यांना शिकविण्याच्या पद्धतीही बदलल्या पाहिजेत. बदलत्या जगाच्या गरजांनुसार आमची अध्यापक आणि अध्यापक महाविद्यालये मात्र बदलली नाहीत. अध्यापकांनी बदलावे यासाठी गेल्या काही वर्षात जे प्रयत्न झाले, ते अतिशय तुटपुंजे आहेत. त्यामुळे अध्यापकच सक्षमनाहीत. अशी उदाहरणे पाहायला मिळत आहेत. नव्या जगाचा मंत्र क्षणाक्षणाला गुणगुणणाऱ्या या नव्या पिढीला शिकविणाऱ्या अध्यापकांना (आणि पालकांनाही) या मंत्राचा मात्र गंध नाही. नव्या पिढीच्या सर्वच प्रश्नांची उत्तरे अध्यापक म्हणून

आणि पालक म्हणून आपल्याकडे नाहीत, हे आता तपासून घेतले पाहिजे. या बदलाचे प्रतिबिंब आधी शिकविण्याच्या पद्धतीत अभ्यासक्रमात दिसले पाहिजे, म्हणजे विद्यार्थी आनंदाने वर्गात उपस्थित राहतील. त्यांच्यात नवीन दृष्टिकोन निर्माण होईल.

**तासिका तत्त्वावरील अध्यापकांची अगतिकता**

आज अध्यापनाच्या प्रक्रियेत एक किंवा दोन नियमित अध्यापक आणि इतर अनियमित तासिका किंवा करार तत्त्वावर घेतलेला) अध्यापक असे काम करीत आहेत. अनियमित असलेला अध्यापक हा महाविद्यालयाच्या स्थानिक समितीद्वारे नेमणूक केलेला असतो. या नेमणूकीतही बरेच राजकारण-अर्थकारण दडलेले असते. पण याचा अध्ययन-अध्यापन अर्थात संपूर्ण शिक्षणावरच कोणता परिणाम होत आहे याचा अभ्यास करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. पण सध्यातरी काहीजण सोडले तर याबाबत कोणी तसा विचार करीत असल्याचे दिसत नाही.

तासिका तत्त्वावरील अध्यापकांची संख्या देखील खूप मोठी असून त्यांची संख्या प्रत्येक महाविद्यालयात वाढत असलेली दिसते. लातूरमधील एका महाविद्यालयात पन्नासपेक्षाही जास्त असे अध्यापक हे अध्यापनाचे काम करीत आहेत. या तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या अध्यापकांचा अनुभव लक्षात घेतला तर तो तीन महिने ते सहा-सात वर्षे असल्याचे समजले. तर अहमदपूरच्या एका वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या काहींनी पैशासाठी जोड व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. हे तासिका तत्त्वावरील अध्यापक केवळ एम.ए. किंवा सेट/नेट पूर्ण झालेले अभ्यासार्थी अध्यापक म्हणून रुजू झालेले दिसतात. त्यांची अपेक्षा नियमित अध्यापक होणे ही असणे स्वाभाविकच आहे. कारण तासिका तत्त्वावरील अध्यापकास किमान गरजपूर्ती करण्याइतके देखील पैसे मिळत नाहीत. जे मिळतात ते अपुरे तर असतातच पण त्याचबरोबर त्यांना ते नियमितपणेही दिले जात नाहीत. या अध्यापकांना हे पैसा मिळविण्यासाठी महिन्याच्या तासिकांचा हिशोब घालून द्यावा लागतो. त्यावर विभागप्रमुखाची व नंतर प्राचार्याची सही घेऊन महाविद्यालयाच्या कार्यालयात तो अर्ज जमा करावा लागतो. यानंतर त्या अर्जाचा पाठपुरावा करावा लागतो. अर्जात काहीतरी त्रुटी असल्याचे मध्येच सांगण्यात येते व त्यात दुरुस्ती केल्यास काही दिवसांनी चेक तयार असल्याचे सांगितले जाते. एवढा खटाटोप करता करता महिन्याची १५ ते २० तारीख उलटलेली असते. अनेकवेळा पैशाच्या बाबतीत विद्यापीठाचा नियम डावलला गेल्याचे दिसते. पण पुढे नियमित अध्यापक म्हणून नियुक्ती होईल या अपेक्षेने असे अध्यापक या विषयावर स्पष्टपणे काहीही बोलायला किंवा भूमिका घ्यायला तयार नसतात.

पुण्यासारख्या शहरातील महाविद्यालयातून अशा अध्यापकांना २००-२५० रुपये तासाप्रमाणे दिले जातात, ग्रामीण महाविद्यालयात तर ही संख्या ७०,६०,------ अशी घसरत जाते. नियमित अध्यापकावरचे ‘काम’ कमी करण्याच्या हेतूने या अध्यापकांची नियुक्ती केली जात असते. प्रत्यक्षात मात्र नियमित प्राध्यापकांच्या दुप्पट काम त्यांच्याकडून करुन घेतले जाते. त्यामुळे तासिका तत्त्वावरील अध्यापकाची नेमणूक ही नियमित अध्यापकांचे, संस्थेचे सांगेल ती कामे ऐकणाऱ्या व्यक्तीची केली जाते. काही महाविद्यालयात अनेक कार्यक्रम होत असतात अशा कार्यक्रमाच्या सजावटी, देखरेखया कामांसाठी हा अध्यापक एक हक्काचा बिनामोबदला मजूर म्हणून सेवेत सविनय हजर होण्यास भाग पाडले जाते. असे तासिका तत्त्वावर किंवा कायम विनाअनुदानित संस्थेत काम करणे हे धर्मशाळेत मुक्त काम केल्याप्रमाणे आहे.

इतके असताना दुसऱ्या बाजूला अध्यापक संघटनांना केवळ नियमित अध्यापकांच्या (शिक्षक म्हटले तर वरिष्ठ महाविद्यालय/विद्यापीठातले अध्यापक रागावतात.) प्रश्नांवर (?) लढा देताना दिसतात. त्यात पगार, सहावा वेतन आयोग, पेन्शन रजा, सुट्ट्या, इत्यादींचा यात समावेश होतो. या संघटना तासिका तत्त्वावरील अध्यापकांचे प्रश्न उपस्थित करीत नसतात कारण अशा शिक्षक संघटनांतील लोकांना देखील त्यांचेही कामे मुकाट्याने, दबून राहून करणारा माणूस हवा असतो. दुसरे, असा 'माणूस' नॅक किंवा वेगवेगळ्या कमिटीसाठीचे आवश्यक साधनसाहित्य गोळा करीत असतो. इतकेच नाही तर सकाळी लवकर असणारे तास आणि कठीण व सैध्दांतिक विषयाचे अध्यापन या तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या अध्यापकांकडे सोपविले जातात. तर निवडणूकीच्या काळात प्रचाराच्या कामास देखील जुंपले जाते. असे असताना शिक्षण व्यवस्थेत आलेल्या किंवा येऊ घातलेल्या या अध्यापकांचा विचार कोणीही करताना दिसत नाही. त्यांना ती गरज वाटत नाही. एक शिक्षकी शाळा आणि अनेक विषय शिकविणारा एक अध्यापक कोणत्याही विषयाला तो न्याय देऊ शकेल असे वाटत नाही. पण सरकारला उच्च शिक्षणातून अंग काढून घ्यायचे असल्यामुळे त्यांना ही पद्धत योग्य वाटते.

म्हणजेच नियमित अध्यापक, संस्थाचालक आणि शासनसंस्था अनियमित/तासिका तत्त्वावरील व्यक्तींचा वापर करीत असते. पण फुटकळ गोष्टींच्या मोहात पडून भविष्य उज्ज्वल करण्यासाठी वर्तमानाचा नाश करणारे हे अतिशय चांगले उदाहरणे म्हणून याकडे पाहता येईल. त्यामुळे अशा (CHB) अध्यापकांची अडचण अशी होते की, लक्ष वर्तमानावर केंद्रीत करावे तर भविष्यकाळात अंधःकार निर्माण होईल की काय, अशी मध्यमवर्गीय मानसिकतेतून निर्माण झालेली भीती तर भविष्यकाळावर लक्ष केंद्रीत केले तर वर्तमानात अगतिक होऊन जगण्याची पाळी म्हणजे दोन्हीतूनही अगतिकताच पदरी पडते. मग या अगतिकतेतूनच नकारात्मक भावना निर्माण होतात आणि व्यक्तीमध्ये निराशावादी प्रवृत्तीत वाढ होत जाते. इतकेच नाही तर अशा शिक्षण संस्थांत नियुक्ती झालेल्या अध्यापकांना देखील नेहमीच दुय्यम लेखले जात आहे. बहुतांश संस्थाचालकांची संस्था सुरु झाल्यावर लवकर अलिशान बंगले, मर्सिडिज गाड्या, परदेश प्रवास व खरेदी सुरु झाली. मात्र अध्यापकांचा कोणत्या ना कोणत्या कारणाने छळ करण्यात येऊ लागला. सही एका रकमेवर घेऊन त्यापेक्षा कमी पगार देणे, दोन-तीन महिने पगार तुंबवून ठेवणे, अनुपस्थित राहिल्यास पगार कापणे, ही तर साधारण बाब आहे. पण संस्थाचालकांच्या वाढदिवशी वृत्तपत्रात जाहिरात देणे, रस्त्यांवर 'जीवंत शरदः शतम्' म्हणून बोर्ड लावणे व या खर्चासाठी त्यांच्या पगारातून कपात करणे हे देखील आता नित्याचे झाले आहे. मग असे सावित्री आणि सरस्वतीपुत्र पाट्या टाकणार नाहीत तर काय?

थोडक्यात, कायम विनाअनुदानित तत्त्वाचा जो शोध शासनाला लागलेला आहे त्यामुळे शिक्षण क्षेत्रात अनुदानित संस्था व बिगर अनुदानित संस्था असा विषमता निर्माण करणारा बदल झाला आहे. तर अध्यापकांमध्ये जात, वर्ग आणि लिंगावर आधारित भेदाला लक्ष्य करुन दमन करण्याचे काम अंगणवाडीपासून ते विद्यापीठापर्यंत झाले आहे/होत आहे. दलित आणि स्त्रिया (त्यातही जात आलीच) जरी संबंधित विषयात पात्रताधारक असल्या तरीही त्यांना अशा फुटकळ तासिका तत्त्वावर देखील घेतीलच असे नाही. पण पात्रताधारक नसलेल्यांना हितसंबंधितांना अध्यापकांची भूमिका दिली जाताना दिसते. या विरुद्ध आवाज उठविला तर 'हे असेच करतात' असे म्हटले जाते. माझे म्हणणे केवळ अमूर्त पातळीवरच नसून वास्तविक पातळीवर याचा पडताळा शैक्षणिक क्षेत्राच्या प्राथमिक, माध्यमिक असो की उच्च शिक्षण या सगळ्यातून घेता

येतो. आज शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांची हालअपेष्टा तर आपण पाहतोच, पण शिक्षक देखील व्यावहारिक पातळीवर वेठबिगार असल्यासारखेच असतात. वेठबिगाराने मालकाने सांगितलेलेच फक्त काम करायचे असते, आपणहून दुसरे काहीही करायचे नाही आणि आपल्या कामाबद्दल काय किंवा मिळालेल्या आज्ञांबद्दल काय, असा स्वतंत्रपणे विचार अजिबात करायचा नाही. सरकारला विरोध करायचा नाही की सरकारच्या कोणत्याही निर्णयाबद्दल शंकाही घ्यायची नाही. सरकारला काही सुचवायचेही नाही. मग सरकारला त्याचे काही चुकले म्हणून सांगण्याचे तर धाडस करायचे नाही. आपणाला आठवण असेलच की, शिक्षकांसाठी २००७ मध्ये समिती नेमून आचारसंहिता तयार करण्यात आली होती. त्यात शिक्षकांनी परवानगीशिवाय लेखन प्रसिद्ध करु नये, अशा अटी घालण्यात आल्या होत्या. (संदर्भ – कुलकर्णी हेरंब, 'गुरुजी परत येतील'; लोकमत (मंथन) ११-५-२००८)

येथे प्रामुख्याने तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या अध्यापकांसंदर्भात विचार केला आहे. पण मोठे प्रखर वास्तव हे आहे की, स्वतःच्याच वेगवेगळ्या सुरक्षिततेविषयीची काळजी करणारे हे नियमित आजचे शासन विद्यापीठांसारख्या माध्यमातून उच्च शिक्षणाची अंगे-प्रत्यंगे नियंत्रित करीत असते आणि शाळा व्यवस्थापन आणि शिक्षक वर्ग हा त्यांच्या आज्ञानुसार सरकारी शिक्षण 'राबवत' असतो. त्यामुळे कोणत्याच स्तरावर प्रयोगशीलतेला, नवनिर्मितीला वाव राहत नाही. शिक्षित होणे याचा अर्थ आजूबाजूच्या जगाचा शोध घेण्याचे आणि त्याचबरोबर जरुर तर ते बदलण्याचे सामर्थ्य प्राप्त होणे, अशा तऱ्हेने व्यक्तीला शिक्षित करणे ज्या शिक्षणाला जमत नाही ते गतिरुद्ध शिक्षण आहे. अशी एका शिक्षण तज्ज्ञाने गतिरुद्ध शिक्षणाची व्याख्या केली आहे.

नियमित अध्यापक समाजाच्या ज्वलंत आणि गंभीर प्रश्नांवर भूमिका घेऊन लढल्याचे दिसत नाही. अशा सुरक्षिततेच्या कवचात जगणारा किंवा जगू इच्छिणारा पांढरपेशी अभिजनवादी वर्ग शिक्षणातील डोनेशन, भ्रष्टाचार, संस्थाचालकांची अरेरावी इ. विरुद्ध स्पष्टपणे भूमिका घेऊन लढताना दिसत नाही. असे असले तरीही जे कोणी प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्रयत्न करतात त्यांना एकटे पाडण्याचे काम व्यवस्थितपणे केले जाते. याचाही विचार केला पाहिजे. त्यामुळे एकंदरीत समाजातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संस्थांचा सखोलपणे विचार करुन जातीवाद, अतिरेकी व्यक्तीवाद, विषमता, शोषण इ. ची पाळेमुळे तपासावी लागतील आणि त्या एकंदर व्यवस्थेचा भाग म्हणून आपणास त्याकडे पाहावे लागेल. तेथेच आपणास कदाचित अध्यापकांची घेतलेल्या गुळमूट धोरणाचा उलगडा होऊ शकेल.

काहीही असले तरी विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू समजला पाहिजे होता पण आता तो बाजूला जाऊन संपूर्ण शिक्षण क्षेत्रच कोणत्या ना कोणत्या कारणाने रसातळाला जाताना दिसत आहे.

**लिंगभावसंवेदनशीलताः संशोधन प्रवासातील निरिक्षणे**

भारतात उच्चशिक्षण अरिष्ठात सापडले असल्यामुळे त्याला अरिष्टातून बाहेर काढण्यासाठी सर्व पातळीवर स्वातंत्र्य, समता आणि न्यायाचा अर्थपूर्णरीत्या अध्ययन-अध्यापन आणि संशोधनात 'वापर' केला पाहिजे, असे १९९० च्या दशकात म्हटले गेले. त्याचाच एक भाग म्हणून अभ्यासक्रमात आणि अध्ययन-अध्यापनात स्त्रीवाद, मार्क्सवाद, फुले-आंबेडकरवादाचा समावेश केला पाहिजे असे म्हटले गेले. पण कालबाह्य ज्ञानाचे हस्तांतरण करण्याऐवजी मुक्तीदायी

ज्ञाननिर्मितीकरुन न्यायाच्या दिशेने जाण्याचा मार्ग अवलंबिणे आवश्यक आहे, तसा त्यामागे उदात्त आणि व्यापक हेतू नव्हता.परंतु अभ्यासक्रमात दलित, आदिवासींचा समावेश होणे / असणे हे इतकेच पुरेसे नाही तर, तो समावेश करता झाला आहे आणि हे अभ्यासक्रमाचा अनिवार्य / ऐच्छिक पेपर म्हणून गणना केली जाते, कोणाला शिकवायला दिले जातात याचासुद्धा विचार करावा लागतो. १) ज्ञानाचे खरे लोकशाहीकरण व्हायचे असेल तर ज्ञानाचे स्त्रोत म्हणून आपण कशाचा वापर करतो आहोत. २) कोणत्या ऐतिहासिक स्त्रोतांना आपण वर्गामध्ये आणतो. ३) कोणती पद्धती वापरतो, याकडेही लक्ष द्यावे लागेल. आपणाला कसे शिकायचे आणि शिकवायचे असेल याचाही पुर्नविचार करावा लागेल.

वेगवेगळ्या विषयांची पुनर्तपासणी करताना त्या ज्ञानशाखांना अधिकाधिक वास्तवतेकडे घेऊन जाणाऱ्या ज्ञानांची निर्मिती करताना कनिष्ठ जातवर्गातील विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि अध्यापक दिसत आहेत. मुक्तीदायी सिद्धांतनाचे लेखन करायचे तर एक स्वतंत्र बौद्धीक पाया आणि शिक्षणक्षेत्रातील चौकटीच्या बाहेरची जाणीवपूर्वकता आवश्यक ठरते.

विद्यापीठीय ज्ञान आणि सामाजिक चळवळीतील ज्ञान यातील विभेदन समजून घेऊन त्यांच्यात सुसंवाद साधण्याचा प्रयत्न 'कनिष्ठ' जातीतील प्राध्यापक आणि फुले-शाहू-आंबेडकर-अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने कार्यरत असलेली अध्यासने करताना दिसतात.

प्रस्थापित प्रतिके प्रतिमांना आव्हान देण्याचा प्रयत्न अनेक विद्यापीठांतून होताना दिसतो. त्यामध्ये सरस्वतीला ज्ञानदेवता म्हणून नकार देणे किंवा राधाकृष्णन यांचा जन्मदिन 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करणे असेल किंवा विद्यापीठात वंदे मातरम्‌ला विरोध करणे इ. चा यामध्ये समावेश होतो.तर त्याचवेळी फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा प्रसार करणारे लेखन आणि कार्यक्रम वेळोवेळी / प्रसंगानुरूप होताना दिसतात.

अध्यापकांमध्येच 'लिंगभाव' (Gender)या संकल्पनेबाबत वेगवेगळ्या समजूती-गैरसमजूती असल्याचे दिसतात. आम्ही 'लिंगभाव आणि अध्ययन, अध्यापन व संशोधन' याबाबत चर्चा करण्यासाठी आलो आहोत असे सांगितल्यानंतर त्यावर काही पुरुष अध्यापकांनी काहीही बोलण्यास नकार दाखविला. तर काही स्त्री अध्यापकांनी लिंगभाव म्हणाल्यानंतर पुढचे ऐकण्याअगोदरच लैंगिकतेवर मी काहीही बोलणार नाही असे म्हणाले. त्यांनी विषयाचे स्वरुप काय आहे ते देखील समजून घेतले नाही. अहमदनगरमधील एका अध्यापिकेला स्त्रीवाद म्हणजे काय असे विचारले तेव्हा 'आम्ही स्त्रियांबाबत कोणताही वाद करीत नाही' असे म्हणाले आणि आम्ही पुणे विद्यापीठात असल्यामुळे सेट/नेट परीक्षेतून सुट कधी मिळणार आहे, कायम विनाअनुदानित महाविद्यालये केव्हा अनुदानित होऊ शकतील, याबाबत विद्यापीठात काय चर्चा आहेत याचीच चौकशी त्यांनी केली. तर लातूरच्या एका प्रतिष्ठित महाविद्यालयातील काहीजण आम्ही लिंगभाव परिप्रेक्ष्यातून शिकवतो असे सुरुवातीला म्हणाले, पण जेव्हा लिंगभाव आणि स्त्रीवाद यासंदर्भात कोणत्या संकल्पना तुमच्या मनात आहेत, या दोन संकल्पनांत काय फरक आहे असे म्हटल्यानंतर त्यांनी निरुत्तरपणे पाहण्यास सुरुवात केल्याचा अनुभव काही ठिकाणी आला.

काही ठिकाणी असा अनुभव आला की, 'लिंगभाव' हा समाजशास्त्राचा विषय आहे तो आमचा नाही असे म्हटले गेले. पण आम्ही जेव्हा समाजशास्त्र विभागात गेलो तेव्हा

समाजशास्त्रातला 'ते' पेपर आम्ही शिकवत नाही ते 'दुसरे' अध्यापक शिकवितात असे म्हटले गेले, असे म्हणण्यामागे लिंगभाव अभ्यासाला बायकी विषय समजून त्यापासून दूर राहण्याच्या प्रयत्नात, तो विषय शिकविणाऱ्या अध्यापकास बायकी असल्याचे दाखवून हिणविण्याचा भाग त्यामागे होता. यावरुन लिंगभावाकडे पाहण्याची अध्यापकांचा दृष्टिकोन दिसून येतो. त्यामुळे सध्या उपलब्ध असणाऱ्या समाजविज्ञानाच्या शाखांमध्ये स्त्रियांचा, स्त्री प्रश्नाचा, लिंगभावाचा विचार करणे महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. आज आपणास आपल्या ज्ञान शाखेचा गाभा माहिती तर पाहिजेच परंतु इतरही शाखांचा, विषयांचा अभ्यास असावाच लागतो.

शहरी इंग्रजी येणारा विद्यार्थी हे वर्गातील इतरांवर वर्चस्व गाजवत आहेत असे त्यांना दिसून आले. विविध सामाजिक पार्श्वभूमीतून विद्यार्थी इंग्रजी अभ्यासक्रमास येतात. याचा इंग्रजी अभ्यासक्रमात विचार केलेला नाही. वर्गातील इंग्रजीमधून होत असलेले तासात काहीच समजत नाही. आजच्या काळात इंग्रजीशिवाय नोकरी नाही, तर माझ्या मते २१ व्या शतकातील भांडवलशाहीने निर्माण केलेला हा अजेंडा आहे, तर जेव्हा आपण इंग्रजीचा अजेंडा पुढे सरकवत असतो, तेव्हा इंग्रजी भाषा शिकण्यातील भीती- चर्चेत भाग न घेणे, स्वत: व्यक्त करु न शकणे, वर्गातील व्यवहार-मानखंडना या सगळयांकडे नव्याने बघावे लागणार आहे. वर्गातील चिकित्सक अध्यापनशास्त्र याची सुध्दा चर्चा करणे गरजेचे आहे. वंचित घटकातील विद्यार्थ्यांना दुसरी भाषा शिकवताना शिकावणाऱ्याची ओळख, अस्मिता, सामाजिक स्थान लक्षात घेणे गरजेचे आहे, परंतु भारतात मात्र इंग्रजी साहित्य शिकवितांना वर्ग हा एकजिनसी आहे असेच गृहीत धरले जाते. एकूणच दलित चळवळीत आणि उच्च शिक्षणातील विद्यार्थी यांच्यामध्ये बरेच अंतर पडले असून उच्च शिक्षणातील विद्यार्थीयांचे प्रश्न समजून घेण्यात दलित चळवळ कमी पडली आहे.

आम्ही ज्या महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना भेटी दिल्या तेथे 'लैंगिक छळवणूक विरोधी केंद्र' (Anti-Sexual Harassement Cell) कार्यरत असल्याचे आढळले नाही, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील एका अध्यापकाने सदरील केंद्र नसल्याबाबत खेद व्यक्त केला. याच विद्यापीठांतर्गत असलेल्या अहमदपूर येथील एका नामवंत महाविद्यालयातील एका अध्यापकाने त्यांच्या महाविद्यालयात लैंगिक छळवणूक केली जात नसल्यामुळे अशा केंद्राची (Cell)आवश्यकता नाही असे म्हणाले, पण त्यांच्या महाविद्यालयात काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सर्वत्र गाजलेले प्रकरण सांगितले. या प्रकरणात त्या महाविद्यालयातील एका मुलीचा महाविद्यालयात भर दिवसा सर्वांसमोर एकतर्फी प्रेमातून खून करण्यात आल्याची आठवण करुन दिली तेव्हा या ज्येष्ठ अध्यापकाचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता. त्यांना CEDAW म्हणजे काय किंवा ते कशाशी संबंधित आहे असे विचारले असता 'माहीत नाही' असे उत्तर दिले. पण 'सिडॉ' बाबत सगळयांना माहित असतेच असे नाही.

थोडक्यात, अभ्यासक्रमात स्त्री प्रश्नाचा अंतर्भाव तर अध्यापनात लिंगभाव परिप्रेक्ष्य असणे आवश्यक असल्याचे दिसते. परंतु विशेषीकरणाच्या या काळात अध्ययन, अध्यापन आणि अभ्यासक्रमात प्रत्येक विषयाच्या अध्यापकाने आपल्या विषयात राहूनच शिकविणे महत्त्वाचे मानले जात आहे. स्त्री प्रश्नाचा अभ्यास, लिंगभाव दृष्टिकोनाचा पुरस्कार करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्रे स्थापन केली आहेत तर आंतर विद्याशाखीय परिप्रेक्ष्यासाठी आणि अभ्यासासाठी 'आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रणली' या स्वतंत्र विभागांची स्थापना करण्यात आली आहे असे

म्हटले जात आहे. तर सामाजिकशास्त्र हे समाजविश्लेषणाचे एक तंत्र आहे, तेथे भूमिकेचा प्रश्न येतोच कोठे, असाही युक्तीवाद केला जातो.

परंतु सामाजिक शास्त्र हे काही फक्त समाज समजून घेण्याचे तंत्रज्ञान नाही. सामाजिक शास्त्रात कोणी वैचारिक भूमिका टाळायची म्हटले तर ते जमणारे नाही. वैचारीक भूमिका टाळून विश्लेषण करण्याचे जे प्रयत्न दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिकी समाजशास्त्रात झाले त्यांच्यातही प्रस्थापित भांडवलशाही लोकशाहीच्या पुरस्काराची भूमिका अद्यावत आहेच. विचारप्रणाली समाजातून हद्दपार झाल्याची दवंडी पिटतानाच डॅनियल बेलने कल्याणकारी राज्याच्या स्वरुपातील भांडवलशाही लोकशाहीला सर्वसंमतीचे प्रमाणपत्र देऊन टाकून त्याची स्वतःची वैचारिक पसंती जाहीर केली आहे.

परंतु हे लक्षात न घेता आपल्याकडील सा. शास्त्राचे अभ्यासक भाबडेपणाने आपण विचारप्रणाली पासून अलिप्त (Non Ideological)अशी भूमिका घेतली पाहिजे असेच मानताना दिसतात. इतकेच काय पण वैचारिक भूमिका घेणाऱ्यांचे सामाजिक शास्त्र अशास्त्रीय, दोषपूर्ण आहे असेच मानण्याकडे सर्वसाधारण कल असतो. आपण अमुक एका विचाराचे आहोत असा शिक्का बसण्यापेक्षा आपण 'तटस्थ' विचारसरणीचे पुरस्कर्ते (तंत्रज्ञ) आहोत अशी ओळख पटविण्यासाठी सर्वांचीच धडपड चालते. म्हणजे तटस्थ अध्ययन, अध्यापन व संशोधनाला तंत्रज्ञानाप्रमाणे प्रतिष्ठा मिळू शकेल ही भावना वैचारिक भूमिका टाळण्याचे एक कारण असते; तर समाजाविषयक शास्त्र हे मूल्य प्राधान्याच्या पलिकडेचे असते हा समज त्याचे पुरक कारण असते.

एका अध्यापकाने असेही सांगितले की, 'मुक्तीदायी विचारसरणींच्या माध्यमातून अध्ययन, अध्यापन आणि संशोधन करतांना प्रस्थापित ज्ञानाला हादरे देऊन उलटे पालटे करावे लागते.' असे ज्ञानाला उलटे-पालटे (Subversive) करतांना विद्यार्थी म्हणतात की, इतर सर्व अध्यापक आम्हांला वेगळे सांगतात आणि तुम्ही वेगळेच सांगत आहात.

हा 'मास्तर'च उलटा आहे. त्याचे डोके फिरले आहे असा विद्यार्थ्यांचा समज होत असतो. त्यामुळे स्त्रीवाद, मार्क्सवाद, फुले-आंबेडकरवाद यासारख्या विचारसरणींचा अवलंब करण्यास अध्यापक कचरतात. साधारणतः जे अध्यापक विशिष्ट विचारसरणींशी संबंधित असतात त्यांना अशा आरोपांना तर कधी बहिष्कारांना सामोरे जावे लागतच असते. यात प्रोत्साहन देणाऱ्यांची समविचारी अध्यापकांची संख्या सोबत असेल तर ठिक नाहीतर मानसिक खच्चीकरण होण्याची शक्यता असते. अशा अध्यापकांनाच जातीयवादी, एकांगी विचारसरणींचा ठरविण्यात येते हे देखील लक्षात घ्यावे लागेल, पण याला पर्याय नाही.

## ग्रंथालय आणि वाचनसंस्कृती

ग्रंथालये ही कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक अवस्थेचे प्रतिबिंब असतात आणि येथे येणाऱ्या कोणाही ग्रंथप्रेमींना ह्यावरुन आसपासचा परिसर कोणत्या स्वरुपाचा आहे हे चटकन कळू शकते. महाराष्ट्रात अशा सगळ्या सार्वजनिक ग्रंथालयांना भेटी दिली तर, सामाजिक, औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत असे बिरुद मिरवणाऱ्या या राज्याची अवस्था कशी आहे, ते सहजपणे लक्षात येऊ शकेल.

आम्ही ज्या कोणत्या महाविद्यालयास आणि विद्यापीठास भेट दिली तेथील ग्रंथालयाची देखील माहिती घेतली. या प्रत्येक ठिकाणचे ग्रंथपाल आणि त्यांचे इतर सहकारी हे मुलाखतीस उत्साहाने सहकार्य करणारे दिसले. या सगळ्याच ठिकाणच्या ग्रंथालयात ग्रंथालयातील सर्व साहित्यासंदर्भात तक्त्यांमध्ये सविस्तर माहिती भरलेली पाहण्यास मिळाली. या संशोधन प्रकल्पातून ग्रंथपालांच्या ज्या मुलाखती घेण्यात आल्या, त्यात एकच सूर होता की, आम्ही विद्यार्थ्यांना, अध्यापकांना वाटेल ती मदत करण्यास तयार आहोत परंतु त्यांचा वापरच कोणी करत नाही, संदर्भ साहित्यांचे वाचन खूप कमी प्रमाणात केले जाते, असे जवळपास सर्वच ग्रंथपालांनी म्हटले.

विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात विद्यार्थ्यांना स्वतःला हवी ती पुस्तके पाहण्यास परवानगी दिली जात नाही असे म्हणले. तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या अध्यापकांनी त्यांना पुस्तके मिळण्याबाबत अडचणी येतात असे सांगितले. एका बाजूला कमी वेतन व जास्त काम तर दुसऱ्या बाजूला अनियमित तासिका तत्त्वावर असल्यामुळे अध्यापन साहित्य मिळविण्यातल्या अडचणी यामुळे अध्यापनात दर्जेदारपणा आणणे अवघड जाते असे म्हणाले. 'नियमित' असलेल्या अध्यापकांनी ग्रंथालयात संदर्भग्रंथ हे इंग्रजी भाषेत असल्यामुळे ते वाचत नसल्याचे सांगून ग्रंथालयातील पुस्तकांमध्ये 'Text Books'चे प्रमाण जास्त असल्यामुळे आम्हाला आणि विद्यार्थ्यांना सोयीचे असल्यामुळे त्याचाच वापर केला जातो असे ते म्हणाले. ग्रंथालयात क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त भाषांतरीत असलेली संदर्भग्रंथे मागितल्यास त्यावर प्रत्येकवेळी 'नाही' असे उत्तर येते, असे काही अध्यापकांनी सांगितले.

परंतु जे नियमित अध्यापक अनेक वर्षांपासून अध्यापन करतात ते स्वतः पुस्तके खरेदी करण्यामध्ये उदासीन असल्याचे दिसतात. पुस्तक वाचायला हवे, हे त्याला उमगत असते. पण पुस्तके खरेदी करणे हे त्याला एक कंटाळवाणे, श्रमाचे आणि खर्चिक काम वाटते. त्यामुळे मग घरात पुस्तके ठेवण्यासाठी पुरेशी जागा करण्याचीही त्याला गरज वाटत नाही. शिकत असताना फक्त पाठ्यपुस्तके...... नंतर नोकरीच्या काळात पुस्तके खरेदी करण्यापेक्षा व्हाइट गुड्स खरेदी करण्यावर भर ...... नंतर घर ...... त्यानंतर लग्न आणि मग मुले ...... त्यानंतर त्या मुलांची पुस्तके. पुस्तकांचा आपल्या आयुष्यातील हा प्रवास वाचक म्हणून किती महत्त्व राखतो, हे गांभीर्याने पाहण्याचीही कुणाला गरज वाटत नाही. आज संदर्भग्रंथ आणि अभ्यासक्रमांची पुस्तके याव्यतिरिक्त पुस्तकांचे एक भले मोठे विश्व जगात निर्माण झाले आहे. पण ते विश्व शहरांच्या सीमांनी मर्यादित राहिले आहे. शहरांमधील मोठमोठ्या 'बुकशॉप' मधील कित्येक 'टायटल्स' ग्रामीण भागात पहायलाही मिळत नाहीत. पुस्तकांचा व्यापार फक्त शहरांमधूनच चालतो, असा प्रकाशकांचा समज झाल्याने पुस्तके तिथपर्यंत पोहोचविण्यात त्यांना रस नसतो. याचा परिणाम जे खरोखर तळमळीने ज्ञानसाधना करु इच्छितात त्यांच्यावर होत असतो.

परिणामी अभ्यासकांना दर्जेदार वाचन साहित्य मिळत नाही, म्हणून त्यांच्या बौद्धीक आकलनाची क्षमता आणि व्यापकता मर्यादित असल्याचे जाणवते. अध्यापकांना लिंगभावासंदर्भात माहिती विचारली असता ती त्रोटक स्वरुपाची असल्याचे जाणवत होते. अध्यापकांची मुलाखत घेताना त्यांना स्त्रीवाद, स्त्रीप्रश्न, लिंगभाव, स्त्री चळवळ इ. संबंधित कोणकोणती पुस्तके वाचलेली आहेत आणि त्यांच्या लेखकांची नावे काय आहेत असे विचारल्यावर पुस्तकांची अर्धवट पुसट नावे तर सांगितलेल्या पुस्तकाच्या लेखकाची चुकीची नावे ही अध्यापक मंडळी सांगत होते. हे सांगण्यात कसलाही अतिशयोक्तपणा नाही. पण यात काही अध्यापकांनी त्यांचे स्वतःचे व्यक्तीगत असलेले

दर्जेदार ग्रंथालय दाखविले. काही जणांनी चांगली संदर्भग्रंथ सांगितली. पण अशांची संख्या खूपच कमी होती हे नमूद केले पाहिजे.

वाचनासंदर्भात प्रश्न विचारण्यामागे पुण्या-मुंबईच्याच लोकांचे वाचन हे जास्त असते असेही आम्हाला म्हणायचे नाही. तेथेही बऱ्याच अडचणी आहेत. उदारणार्थ, पुणे विद्यापीठासारख्या तथाकथित, 'गुणवत्तेचा' दावा करणाऱ्या विद्यापीठातील ग्रंथालयात अनेक चांगली दर्जेदार पुस्तके आणि नियतकालिके असतात पण या विद्यापीठातील काही 'ग्रंथपाल' म्हणजे ज्ञानरुपी संपत्तीवर ठेवलेला सापच आहे. स्वतः तर वाचन करायचेच नाही आणि इतरांनाही वाचन करु द्यायचे नाही. इतकाच त्यांचा कार्यक्रम असतो. असे ग्रंथपाल साक्षात ज्येष्ठ प्राध्यापक किंवा इतर विषयाच्या प्राध्यापकांना देखील पुस्तकांजवळ जाऊ देत नाहीत तर बाहेरुन पुस्तकांसाठी आलेल्यांचा तर काही प्रश्नच नाही.

जयकर ग्रंथालयाच्या वाचन कक्षात बसून स्पर्धापरीक्षांची तयारी करु इच्छिणाऱ्यांना सदरील वाचनकक्षात प्रवेश दिला जात नाही. अनेकवेळा टेबल-खुर्च्या रिकाम्या असल्यातरीही अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नाही. दरवाजावर सुरक्षा कर्मचारी बसविला जातो. तरीपण याबाबत विद्यापीठातील प्राध्यापक मूग गिळून गप्प आहेत. तर विद्यापीठ प्रशासनाला असे विद्यार्थी अडचणीचे वाटतात. 'ऑक्सफर्ड ऑफ द इस्ट' असा स्वतःचा उल्लेख करणारे हे पुणे विद्यापीठ खऱ्या ऑक्सफर्ड विद्यापीठात विद्यापीठाशी संबंधित असणाऱ्या किंवा नसणाऱ्या सगळ्यांनाच ज्ञानसाधना करण्यासाठी अवकाश उपलब्ध करुन देऊन करीयर किंवा ज्ञाननिर्मिती करण्यासाठी प्रोत्साहन देते. त्यामुळे त्या विद्यापीठाचा दर्जा आणि लौकिक टिकून राहतो.

पुणे विद्यापीठात बोटावर मोजण्याइतकेच चांगले प्राध्यापक आहेत, तर इतरांची अवस्था तालुका किंवा जिल्हा पातळीवरील महाविद्यालयातील अध्यापकांसारखीच आहे. पुणे विद्यापीठाच्या जुन्या वैभवाचा लौकिक मोठा असल्यामुळे अनेक बाबी चालून जातात. पुणे विद्यापीठ देखील इतर ऱ्हास पावत असलेल्या संस्थांपेक्षा वेगळे नाही. जी असंवेदनशीलता समाजात इतरत्र जाणवते त्याचेच प्रतिबिंब पुणे विद्यापीठात देखील दिसते. विद्यापीठाच्या असंवेदनशीलतेमुळे एकूण शिक्षण क्षेत्राचेच नुकसान होत आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

अनेकांना या विचारावर विश्वास वाटेल की नाही माहित नाही. पण ही वस्तुस्थिती आहे. रत्नाकर गायकवाड देखील या विद्यापीठातील अनागोंदी पाहून अचंबित झाले होते. त्याचा उल्लेख त्यांनी प्रकाशित केलेल्या डायरीत केला आहे. विद्यापीठाच्या विभागाअंतर्गतचे हितसंबंध आणि सत्तासंबंधांचे राजकारण इतक्या खालच्या पातळीला पोहोचले आहे, की 'विद्यापीठापासून वाचवा' (Escape from University) असे म्हणण्याची वेळ येत आहे.

थोडक्यात कोणा एका समूहाची मक्तेदारी असलेली वाचन संस्कृती काळाच्या ओघात तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे मुक्त झाली तेव्हा तिला खरे तर आकाशच ठेंगणे वाटायला लागले पण जागतिकीकरणाच्या काळात या वाचन संस्कृतीची अवस्था कशी झाली आहे ते आपण पाहतच आहोत.

**अध्यापकांच्या विचारविश्वाची जडणघडण**

बहुतांश महाविद्यालयातील अनेक अध्यापकांचे विचारविश्व आपापल्या अभ्यासविषयाच्या संपूर्ण ज्ञानशाखेतून आणि समाजाच्या सखोल अभ्यास आणि निरीक्षणातून घडण्यापेक्षा ते काम करीत असलेल्या संस्थेच्या पक्षीय राजकारणाच्या आणि ते ज्या जात वर्ग-धर्म-लिंगाशी संबंधित असतात त्या विचारसरणीतून घडत असल्याचे दिसते. याचा परिणाम अध्यापनावर होऊन विद्यार्थ्यांना अभिजात आणि समकालीन विचारपरंपरा आणि वादविवादांचे व्यापक आकलन होतेच असे नाही. त्यामुळे संबंधित विषयाची जी आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे ती होत नाही. त्यामुळे असे विद्यार्थी जेव्हा पुढे चालून आपले करीयर अध्यापन क्षेत्रात करीत असतात तेव्हा त्यांना देखील तत्कालीन, लोकप्रिय आणि विशेषतः वृत्तपत्रीय व दूरचित्रवाणीतून येणाऱ्या माहितीपेक्षा अधिक सखोलतेचे ज्ञान नसते. अशा 'ज्ञान' देणाऱ्या स्त्रोतांच्याद्वारे अध्यापनाचा कार्यक्रम सुरु होतो. परंतु ग्रंथ हे असे एकमेव माध्यम आहे जे वाचणाऱ्यापुढे त्याचे स्वतःचे अनोखे विश्व निर्माण करतात, ते त्याला अंतर्मुख व्हायला लावतात. ग्रंथ ज्या पातळीवर, ज्या विश्वात घेऊन जातात तिथे इलेक्ट्रॉनिक माध्यमच नव्हे, तर वर्तमानपत्रेही घेऊन जाऊ शकत नाहीत हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

दर्जेदार ग्रंथाअभावी अध्यापनाच्या सवयीतून समाजाच्या गंभीर प्रश्नांची उत्तरे अभ्यासपूर्ण संशोधनापेक्षा उथळ आणि सर्वसामान्यांच्या आकलनाइतकेच मर्यादित राहण्याची शक्यता असते. पुढे हे चक्र असेच सुरु राहते. याची पडताळणी आपणास समाजाच्या सामाजिक, राजकीय प्रश्नांवरील अध्यापकांच्या भाष्यातून येईल. (यासाठी उदाहरण म्हणून स्त्रीवाद किंवा आरक्षण किंवा दलित-आदिवासी यापैकी कोणताही मुद्दा घेतला तरी चालेल.) म्हणून अध्यापनातून कसदार आणि परिवर्तनवादी विचारसरणी बहिष्कृत किंवा अदृश्य असल्याची दिसते. विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा टिकविण्याचा प्रयत्न करताना शाळा-महाविद्यालयीन अध्यापनाचा दर्जा कसा वाढविता येईल, याचा देखील सखोलतेने विचार करण्याची आवश्यकता आहे. उच्च शिक्षणाने प्राथमिक-माध्यमिक शिक्षणातील प्रक्रियेशी कसलाही संवाद ठेवला नसल्यामुळे या चक्राला खतपाणीच मिळाले आहे.

थोडक्यात, अध्ययन-अध्यापन आणि अभ्यासक्रमात मूलभूत संकल्पना, पद्धतीशास्त्र आणि विविध परिप्रेक्ष्यांची मूलभूत ज्ञान सखोलतेने अभ्यासण्याची आवश्यकता अध्यापकांना पटली पाहिजे. यामधून सामाजिक, राजकीय, वैचारिक क्षेत्रात बरीच प्रगती होऊ शकेल.

राजेंद्र व्होरा आणि पळशीकर म्हणतात, इंग्रजी वसाहतीच्या काळात येथे जो समाजविषयक विचार झाला, त्यात चिकित्सकवृत्ती होती, आपले स्वत्व जपण्याचा प्रयत्न होता. जुन्या वसाहतवादाचे नव्या छुप्या वसाहतवादात रुपांतर झाल्यानंतर ही चिकित्साबुद्धी संपुष्टात आली. नवसाम्राज्यवादाच्या विळख्यात वैचारिक खच्चीकरण होऊन समाज आणि समाजविषयक सिद्धांत दोन्ही तपासून पाहण्याचा डोळसपणा आपण गमावून बसलो आहोत.

आज अशी परिस्थिती आहे की, जागतिकीकरणाचा व संसुचनाच्या नव्या युगात आता सामाजिक शास्त्रांची बहुधा गरजच उरणार नाही असे म्हटले जात आहे. आधुनिकोत्तरवादाचा प्रभाव या युगात वाढत चालला आहे, त्यामुळे एका ध्येयाप्रत वाटचाल, समाजाची हेतूपूर्ण कृती, विशिष्ट वैचारिक चौकट यांचा अभ्यास मागे पडत चालला आहेच; पण त्याचा अप्रत्यक्ष परिणाम

म्हणून सामाजिक शास्त्रातील प्रमेये व सिद्धांतही कुचकामी ठरविण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरु झालेला आहे. मागास, अशिक्षित, दरिद्री व रोगराईने पीडित समाजास हा आधुनिकोत्तरवादी दृष्टिकोन, पश्चिमेकडे उदयास आलेले हे नवे सामाजिक तत्त्वज्ञान प्रस्तुत ठरेल का? याचा गंभीरपूर्वक विचार करण्यास आपले सामाजिकशास्त्र आज नकार देताना दिसते आहे. (व्होरा/पळशीकर;१९८८)

एकीकडे सहमतीचे सिद्धांत मांडणारी अमेरिकी सामाजिकशास्त्रे आणि दुसरीकडे मागास अर्थव्यवस्थेच्या अंगभूत मर्यादांचे सिद्धांत यांच्या कचाट्यात सापडलेल्या सामाजिक शास्त्राच्या प्राध्यापकांनी मग चिकित्सा, पर्यायांची चर्चा आणि स्वकीय सामाजिक शास्त्रांची निर्मिती या साऱ्यांनाच सोडचिठ्ठी दिली. विद्यापीठातील प्राध्यापकांची ही परवड तर महाविद्यालयीन प्राध्यापक बाजारु क्रमिक पुस्तकांच्या पलिकडे जाऊ इच्छित नाहीत. स्पर्धात्मक समाजव्यवस्थेने घेरुन टाकलेल्या प्राध्यापकास स्वभाषेतून कसदार लेखन करणे एकतर जमत नाही किंवा कमीपणाचे तरी वाटते. आपल्या विचारांची गंभीरपणे चर्चा करणेही त्यांना समाजनिष्ठा म्हणून किंवा व्यवसायनिष्ठा म्हणूनही आवश्यक बाब वाटत नाही.

सामाजिकशास्त्रांच्या या दुर्दशेचे एक कारण म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात पडलेले विकासाचे स्वप्न. विज्ञान आणि तंत्रज्ञान हस्तगत करुन स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेच्या चौकटीत विकास साधावा या दिशेने प्रयत्न झाले. त्या खटाटोपामध्ये सामाजिक शास्त्रे मागे पडली की सामाजिक शास्त्रांची गरज वाटेनाशी झाली. एक अर्थशास्त्र वगळले तर बाकीच्या सामाजिक शास्त्रांना विकासाच्या प्रक्रियेत काहीच स्थान नाही, अशी परिस्थिती आली. तंत्रज्ञान म्हणजेच विकास ही कल्पना समाजात, विद्यापीठांमध्ये तसेच सरकारदरबारी रुढ झाली आणि सामाजिकशास्त्रे ही भाकड गाय बनली. गाय म्हणून मारावी की नाही एवढाच प्रश्न उरला. स्वतःच्या मूल्यांवर पुरेशी श्रद्धा नसलेले पगारी गोरक्षक म्हणून ह्या विषयांचे प्राध्यापक ही गाय कशीबशी सांभाळत राहिले. केवळ त्यांच्या स्वतःच्या व्यावसायिक अस्तित्वासाठीच ह्या सामाजिक शास्त्रांचा प्रतिपाठ ते करीत राहिले. पण आपल्या आणि आपल्या विषयांच्या उपयुक्ततेची त्यांना खात्री नाही आणि समाज तर ह्या सगळ्या प्रकाराकडे आपद्धर्म म्हणूनच पाहतो, असे दिसते.

अशा परिस्थितीत सामाजिक शास्त्रे आशयघन कशी ठरु शकतील? प्रस्थापित अर्थव्यवहार हे स्पर्धा, भांडवलशाही यांच्यावर आधारलेले आहेत. प्रस्थापित मूल्यव्यवस्था भांडवली मूल्यांची बनलेली आहे. ह्या प्रस्थापित चौकटी सामाजिक शास्त्रांना निर्णयप्रक्रियेच्या दावणीला बांधून सामाजिक शास्त्र हे प्रस्थापिताच्या पुरस्कारासाठी वापरले तो ह्याचे भान ठेवून सामाजिक समीक्षेची जबाबदारी सामाजिक शास्त्रांनी पार पाडली पाहिजे. सामाजिक समीक्षा हे एका परीने पर्यायी सामाजिक शास्त्र आहे. निश्चित वैचारिक भूमिका घेऊन प्रस्थापित मूल्यव्यवस्थेचे भ्रामक स्वरुप उघड करणे, ही ह्या सामाजिक शास्त्राची जबाबदारी आहे. हे पर्यायी सामाजिक शास्त्र म्हणजे फक्त विरोध किंवा टिका असणार नाही, तर प्रस्थापित समाजरचनेला पर्यायी अशा समाजरचनेची, पर्यायी भौतिकसंबंधीची मांडणी करणे हा नव्या सामाजिक शास्त्राचा हेतू असेल.

**संदर्भसूची**


१. व्होरा, राजेंद्र आणि पळशीकर सुहास (१९८८), 'सामाजिकशास्त्रांमधील वैचारिक गारठा' परामर्श, खंड-१०, अंक-३, नोव्हेंबर १९८८, (संपा.) प्रदीप गोखले, पुणे विद्यापीठ, पुणे-७

२. व्होरा, राजेंद्र आणि सुहास पळशीकर (१९८७), 'राज्यशास्त्र कोश', दास्ताने रामचंद्र आणि कं., चित्रशाळा चौक, पुणे-३०

३. लोकसत्ता, सकाळ इ. वृत्तपत्रे

# इ.स. २००० ते २०१०मधील मराठी दलित आत्मकथने — एक दृष्टिक्षेप

**धनाजी ऊर्फ धनंजय सोमनाथ भिसे**
पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मो. ९८२२५०८४९२

दलित साहित्याची विचारसरणी ही मानवतावादी आहे. आजच्या काळात समताधिष्ठित समाजरचनेच्या निर्मितीसाठी या साहित्याची अधिक गरज आहे, कारण दलित साहित्याची निष्ठा ही मानवी नैतिक मूल्यांवर आधारलेली आहे. म्हणून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि लैंगिक आधारावर निर्माण करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या विषमतेचा निषेध करून समतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने समाजमनावर संस्कार करण्याचे काम दलित साहित्यातून केले जाते. म्हणून दलित साहित्य खऱ्या अर्थाने माणसाला माणूसपण बहाल करते. त्याकरिता दलित साहित्य हे मानवी नैतिक मूल्यांची कास धरते. समाजातील भीषण सामाजिक वास्तवाचे चित्रण करून लोकांना क्रांती करण्यास प्रेरित करते. एकूणच दलित साहित्य हे माणसाचे महत्त्व सांगणारे साहित्य आहे.

“दलित साहित्यिकाने दलित जाणिवेतून दलितत्वाचे चित्रण करण्यासाठी जे साहित्य लिहिलेले असते ते साहित्य दलित साहित्य होय.’’[१] दलित जाणीव ही येथे सामाजिक जाणीव बनते आणि सामाजिक जाणीव ही सामाजिक बांधिलकीला कधीच सोडू शकत नाही, तेव्हा सामाजिक बांधिलकी ही सामाजिक परिवर्तनाला प्रेरित करते. याबाबत डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, “विकसित जीवनाची परिनीती हेच परिवर्तन, ही जाणीव दलित मनाला या शतकाने, या फुले—आंबेडकर युगाने करून दिली आणि निर्मितीक्षम दलित लेखक कलावंत आत्मतेज घेऊन पुढे आले.’’[२]

दलित साहित्याचा हेतू केवळ मनोरंजन करणे हा नसून, स्वत:ला व स्वत:च्या समाजाला शोषणातून मुक्त करणे, परिवर्तनाला अधिक प्राधान्य देणे, तसेच लोकशाही, समाजवाद, विज्ञानवादाला

अधिक जवळ करणे हा आहे. माणूस हा दलित साहित्याचा आद्य, मध्य आणि अंत्य बिंदू आहे. म्हणून हे दलित साहित्य माणसाच्या अवमूल्याच्या विरोधात लढा उभा करते. आम्हीही माणसे आहोत' हा दलित साहित्याचा जाहीरनामा मानवी मूल्यांचे संरक्षण करणारा आहे. म्हणून भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जोपर्यंत जातव्यवस्था टिकून आहे, तोपर्यंत दलित साहित्याचे लेखन सुरूच राहील. दलित साहित्याच्या प्रेरणांमागे फुले—आंबेडकरी विचार ज्याप्रमाणे दिसून येतो, त्याप्रमाणे बुद्ध, मार्क्स, शाहू यांचीही प्रेरणा खंबीरपणे उभी आहे.

दलित आत्मकथने म्हणजे दलित साहित्याचा आत्मा आहेत. दलित समाजाच्या वाट्याला आलेले हे शोषित जगणे इतर समाजाच्या वाट्याला आले नाही, या पार्श्र्वभूमीवर जीवनाची कैफियत मांडणारा दलित आत्मकथनकार एकाच वेळी आपल्या जीवनाबरोबरच तो ज्या समाजातून आला आहे, त्या समाजाचे चित्रणही जगासमोर मांडताना दिसतो. दलित आत्मकथने ही दलित भटक्या आदिवासींचे दु:ख, वेदना, व्यथा याचबरोबर त्यांच्या उद्धाराच्या चळवळींचा वेध घेणारे चित्रण रेखाटताना दिसतात. याविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, “दलित आत्मकथने म्हणजे दलितांच्या जीवनातील दु:खांच्या गाथाच होत.''[३] म्हणून त्या दलित आत्मकथनाकारांचे दु:ख हे समाजाचे दु:ख ठरते. दलित आत्मकथनकाराची समाजाशी असलेली बांधिलकी त्याच्या लेखणीतून स्पष्ट दिसून येते. म्हणून दलित आत्मकथनकाराचे प्रश्न हे दलित समाजाचे प्रश्न बनतात.

आत्मकथन आणि आत्मचरित्र यामध्ये सूक्ष्म असा फरक आहे. यावर अनेक अभ्यासकांनी चर्चा करून त्याचे साहित्य प्रकाशित केले आहे.

## साहित्य आणि समाज — सहसंबंध

कोणताही साहित्य प्रवाह एकाएकी निर्माण होत नाही. त्याच्या निर्मितीमागे काही प्रेरणा, प्रयोजने, प्रवृत्ती व हेतू असतात. बदलती नवी साहित्यदृष्टी, साहित्यमूल्य ज्याप्रमाणे त्याच्या मुळाशी असते, त्याप्रमाणे बदलते जीवन, बदलता संदर्भ, बदलत्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घडामोडी यांचाही समावेश होतो. जसा काळ तसे साहित्य... साहित्यात काळाचे प्रतिबिंब कमी—अधिक प्रमाणात उमटलेले असते. काळाच्या परिणामापासून साहित्य वेगळे राहू शकत नाही. थोडक्यात, जीवन बदलले की साहित्य बदलते, जीवनात

नवेपणा आला की साहित्यातही नवेपणा येतो. हा नवेपणा शब्द, भाषा, अभिव्यक्ती, आविष्कार यात असतोच, पण त्याशिवाय आशय, अनुभव, जीवनदर्शन, जीवनचित्रण यातही दिसून येतो.

साहित्य हे लेखकाची निर्मिती असते, परंतु, निर्माण केलेली साहित्यकृती ही त्या लेखकापुरती मर्यादित नसते. लेखकाने साहित्यात मांडलेले अनुभवविश्र्व हे समाजातले असते. म्हणून साहित्यिकाला कळत–नकळत समाज घडवत असतो. समाजातून मिळालेले अनुभवविश्र्व लेखक साहित्यकृतीच्या माध्यमातून समाजासमोर मांडत असतो, म्हणून साहित्य ही लेखकाची व्यक्तिगत निर्मिती असली तरी ती व्यापक अर्थाने समाजाची निर्मिती असते. म्हणून साहित्य मानव्य सापेक्ष आहे, त्यामुळे माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदू ठरतो. म्हणूनच साहित्य आणि समाज यांच्यामध्ये मूलभूत असा परस्पर घनिष्ठ संबंध पहायला मिळतो. याविषयी डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, "साहित्याचा भाषाशास्त्रीय आणि साहित्यशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केला जातो, परंतु साहित्याचा समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केला, तर तो परिपूर्ण अभ्यास ठरेल.''[४] हे विधान साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध स्पष्ट करण्यास अधिक उपयुक्त ठरू शकेल.

## जागतिकीकरण आणि दलित साहित्य

इ. स. २००० नंतरच्या मराठी दलित आत्मकथनांचे स्वरूप आणि वाटचाल पहायची झाल्यास या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक पर्यावरणाचा थोडक्यात आढावा घेणे उचित ठरेल.

१९९१पासून देशाने उदारीकरण (Liberalization), खासगीकरण (Privatization), जागतिकीकरण (Globalization) या धोरणांच्या कार्यक्रमांना सुरवात केली. या घटनेचा या कालखंडावर सर्व क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात प्रभाव पडल्याचे जाणवते.

जागतिकीकरणातून जशा अनेक संधी निर्माण झाल्या, तसेच अनेक प्रश्नही निर्माण झाले आहेत, हे नाकारता येऊ शकत नाही. प्रचंड स्पर्धेमुळे पैशाचे वाढलेले महत्त्व, मानवी मूल्यांची मोठ्या प्रमाणात झालेली पायमल्ली, प्रमाणापेक्षा अधिक जोपासली जाणारी व्यावसायिक दृष्टी, इंग्रजी भाषेचा देशी भाषांवर वाढता प्रभाव, अशा

अनेक गोष्टींचा परिणाम पहावयास मिळतो. मराठी साहित्य हेसुद्धा जागतिकीकरणातून सुटू शकले नाही.

मराठी साहित्यातील दलित साहित्य प्रवाहावर जागतिकीकरणाचा कळत–नकळत प्रभाव दिसून येऊ लागला. म्हणून २००० ते २०१० या कालखंडातील मराठी दलित आत्मकथनाचे स्वरूप व वाटचाल पाहताना वरील घटनांचा विचार करावाच लागेल.

## इ. स. २००० ते २०१० मधील मराठी दलित आत्मकथने – स्वरूप व वाटचाल

रामचंद्र नलावडे यांचे 'दगडफोड्या' हे आत्मकथन २००० साली प्रसिद्ध झाले. या आत्मकथनातून १९७४पर्यंतच्या घटना आल्या आहेत. या आत्मकथनाने मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेण्याचे काम केले आहे. रामचंद्र नलावडे हा वडार समाजातील तरुण असून, तो सुधारणावादी दृष्टिकोन बाळगणारा आहे. या आत्मकथनातून वडार समाजाचे जीवन जगण्याचे चित्रण लोकांसमोर उभे राहते. त्याचबरोबर २००० साली आनंद निकाळजे यांचे 'खडकावरचं वादळ' आणि विमल मोरे यांचे 'तीन दगडांची चूल' अशी दोन आत्मकथने प्रकाशित झाली. भटक्या समाजाचे स्थलांतरित जीवन जगणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे चित्रण 'तीन दगडांची चूल' या आत्मकथनातून विमल मोरे यांनी प्रभावीपणे मांडले आहे. भटक्या समाजाला स्थैर्य नसते. त्यामुळे त्या समाजाची प्रस्तापित समाजाकडून कशी अवहेलना होते, त्यांना मूलभूत गोष्टीसाठी कसा पराकोटीचा संघर्ष करावा लागतो, याचे हुबेहूब चित्रण करून मोरे यांनी समाजासमोर एक नवा प्रश्न उभा केला आहे.

अशोक पवार यांचे 'बिऱ्हाड' आणि बाबूराव मडवी यांचे 'आकांत' ही दोन आत्मकथने २००१ साली प्रकाशित झाली. अशोक पवार यांच्या 'बिऱ्हाड' या आत्मकथनाविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''ही एक लक्षणीय साहित्यकृती म्हणून याची नोंद घ्यावी लागेल. वाचताना मनाला अस्वस्थ करणारं, सुन्न करणारं हे आत्मकथन समाजातील दु:ख, दारिद्य्र आणि गुन्हेगारीच्या विळख्यात चिरडलेल्यांची दु:खद गाथाच आहे.''[५]

बाबूराव मडवी हे आदिवासी समाजातील असून, एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून जगत असताना त्यांना आलेले अनुभव

त्यांनी आपल्या 'आकांत' या आत्मकथनात रेखाटले आहे. या अनुभवविश्र्वाला उजाळा देताना त्यांच्या आठवणी या मनात घर करून राहतात. आदिवासी समाज हा आजही विकासापासून वंचित आहे, आदिवासी समाजाचे दारिद्य, उपासमार, भावभावना यांचे हृदयद्रावक चित्रण त्यांनी रेखाटले आहे.

उत्तम कांबळे यांचे 'वाट तुडवताना' हे आत्मकथन २००३ साली प्रकाशित झाले. त्याचबरोबर ऊर्मिला पवार यांचे 'आयदान', बाळू धोंडिबा रायमाने यांचे 'उणे—अधिक' (संपादक— प्रा. ल. बा. रायमाने), पंजाब चव्हाण यांचे 'याडी', ही आत्मकथने या वर्षात प्रकाशित झाली आहेत. 'वाट तुडवताना' या आत्मकथनात उत्तम कांबळे यांच्या शैक्षणिक वाटचालीचे, प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत जीवन जगण्यासाठी कराव्या लागलेल्या संघर्षाचे चित्रण येते.

दलित आत्मकथने लिहिण्यामध्ये दलित लेखिकाही मागे नाहीत, हे ऊर्मिला पवारांच्या 'आयदान' या आत्मकथनाच्या माध्यमातून दिसून येते. एका बाजूला दलित म्हणून आणि दुसऱ्या बाजूला स्त्री म्हणून, अशा अवस्थेत असणाऱ्या दलित स्त्रीच्या अव्हेरलेपणाची वेदना आणि संघर्ष या आत्मकथनातून दिसतो. लेखिका सामाजिक चळवळीत एक कार्यकर्ती म्हणून सक्रिय असून निर्माण झालेल्या कौटुंबिक मानसिक संघर्षाचे चित्रण, तिला आलेले विविध अनुभव या आत्मकथनातून व्यक्त होताना दिसतात. या आत्मकथनाविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, "वाचकाला अंतर्मुख करणारे हे आत्मकथन स्त्री—पुरुष नात्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन देते."[६]

बाळू धोंडिबा रायमाने यांचे 'उणे—अधिक' हे आत्मकथन त्यांच्या मुलाने (प्रा. ल. बा. रायमाने) याच वर्षात संपादित कले आहे. या आत्मकथनाविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, तसे आकाराने छोटेखानी असेच आहे, तरी ते काहीसे वेगळे आहे, तसेच मराठीतील दलित आत्मकथनाच्या परंपरेत ऐतिहासिकदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. खरे तर आत्मकथनांची संकल्पनाही निर्माण झाली नव्हती अशा काळात, म्हणजे १९६५ मध्येच या लेखनाला प्रारंभ झाला होता. प्रत्यक्ष प्रसिद्धीस मात्र २००३ साल उजडले.७ चांभार जातीत जन्माला आलेले बाळू धोंडिबा रायमाने या जिद्दी माणसाचे 'उणे—अधिक' हे आत्मकथन विपरीत परिस्थितीत व विषम समाजव्यवस्थेत शिक्षण नसतानाही आपल्या प्रामाणिक आणि कर्तृत्वाच्या बळावर शेती आणि

व्यापारात आपले नाव कमावले, याचे चित्रण या आत्मकथनातून पहावयास मिळते.

‘लमाण’ हा भटका समाज असून त्याचे जीवनचित्रण ‘याडी’ या आत्मकथनातून प्रभावीपणे मांडण्यात पंजाब चव्हाण हे यशस्वी होताना दिसतात.

दिनकर शेलार यांचे ‘सुंबरान’, दामोदर रावजी यांचे ‘कल्पतरूच्या पारंब्या’, संतोष पवार यांचा ‘चोरटा’, महादेव गायकवाड याचे ‘तंगाई’, खुशाल डवरे यांचा ‘दिवट्या’, ही आत्मकथने २००४ साली प्रकाशित झाली आहेत. दिनकर शेलार यांच्या ओघवत्या, काहीशा मिस्कील पण तटस्थ अशा न्यायाधीशाच्या लेखणीतून हे ‘सुंबरान’ आत्मकथन साकार झालेले दिसून येते. हे आत्मकथन सामाजिक बांधिलकीला एकरूप झाले आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी सोडून ते भटकताना दिसत नाही. या आत्मकथनात धनगर समाजाचे जीवनचित्रण, त्यांचे रीतिरिवाज, परंपरा, त्यांचे भटकणे, हे लेखकाच्या जीवनचित्रणाबरोबरच आले आहे.

दिवटा हा घर उजळणारा असतो, तसा तो घर रसातळाला नेणारा असतो. ‘दिवट्या’ या आत्मकथनातील नायक खुशाल डवरे हा आयुष्याला योग्य दिशा देणारा आहे. हे आत्मकथन वाचकांचे लक्ष वेधून घेण्यात यशस्वी होते.

संतोष पवार यांच्या ‘चोरटा’ या आत्मकथनातून पारधी समाजाचे चित्रण दिसून येते. भूक, दारिद्य् , अंधश्रद्धा, चोरी अशा संकटात सापडलेल्या पारधी समाजातील तरुणाचे हे आत्मकथन भारतीय समाजव्यवस्थेवर बोट ठेवणारे आहे.

महादेव गायकवाड यांचे ‘तंगाई’ हे आत्मकथन मराठवाड्यातील जातव्यवस्थेचे विदारक चित्रण समोर ठेवून पुन्हा एकदा जातव्यवस्थेबद्दल चिंतन करायला लावणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर निष्ठा ठेवणारा हा तरुण येथे आपल्याला दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूलमंत्र घेऊन तो शिक्षणाकडे वळतो आणि आपली प्रगती साध्य करण्यासाठी धडपडतो.

‘बाप्तिस्मा ते धर्मांतर’ हे इसादास भडके यांचे आत्मकथन २००५ साली प्रकाशित झाले. हे आत्मकथन धर्मांतरित ख्रिश्चन

झालेल्या बौद्ध तरुणाचे आहे. हे आत्मकथन बाप्तिस्मा, दृढीकरण आणि धर्मांतर अशा तीन भागांत विभागले आहे. धर्मांतरित ख्रिश्चन तरुणाने बौद्ध धर्म स्वीकारल्यावर त्याला आलेल्या अनुभवाचे चित्रण यात पहावयास मिळते. या आत्मकथनाविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, “सम्यक विचार करायला लावणारं, धर्मांतरित ख्रिश्चनातील बौद्ध धम्म स्वीकारलेल्या सजग तरुणाचे प्रांजळ आत्मकथन म्हणजे ‘बाप्तिस्मा ते धर्मांतर’.”[८]

उत्तम कांबळे यांचे २००६ साली प्रकाशित झालेले ‘आई समजून घेताना’ हे आत्मकथन वाचताना आणखी एका आईची ओळख आपल्याला होते. लेखकाच्या जीवनात सुखसमृद्धीसाठी आयुष्यभर राबणारी अक्का हिचे भावस्पर्शी चित्रण यात पहायला मिळते. ‘माणसाच्या दु:खाचे कारण त्याची इच्छाच आहे,’ हे तत्त्वज्ञान सांगणारी आई आपल्याला यातून भेटते. स्वत:ला म्हणजे लेखकाच्या आईला टी.बी. असल्याचे कळताच ती आपल्या नातवंडापासून दूर राहण्याचा प्रयत्न करते. अशा कितीतरी घटनांतून आईचे भावविश्र्व लेखकाने वाचकांसमोर उलगडून दाखविले आहे. उत्तम कांबळे यांच्या आईविषयी भाई वैद्य म्हणतात, “इलंदा आईने उत्तम कांबळ्यांना घडवून साहित्य व समाज घडवण्याचे कामच जणू त्यांच्यावर सोपविले आहे.”[९]

भीमसेन देठे यांचे ‘डबुलं’, शिवमूर्ती भांडेकर यांचे ‘वळंबा’, यशोधरा गायकवाड यांचे ‘माझे मी’, रामचंद्र नलावडे यांचे ‘झगडा’, रन्नेश पिंग्या काळे यांचे ‘पारध्याचं जिणं’, रामराजे आत्राम यांचे ‘उघडा दरवाजा’, दीपचंद दोंदे यांचे ‘प्रवास एक शतकाचा’ इत्यादी आत्मकथने २००७ साली प्रकाशित झाली. भीमसेन देठे यांनी दै. तरुण भारतमध्ये ‘मनबोली’ या सदरात ‘डबुलं’ नावाची आत्मकथनात्मक कथा लिहिली. पुढे ‘मृदू धागे अंतरीचे’ हे सदर याच दैनिकात चालवले. लेखकाच्या आयुष्यात घडलेले घटनाप्रसंग, भावस्पर्शी क्षण याला त्यांनी आपल्या आयुष्याचं डबुलंच समजलं आहे. या आत्मकथनाविषयी अरुण साधू म्हणतात, “देठे यांनी आठवणींच्या चिंध्याचे गाठोडे सोडलं आहे. त्यातील एकेक चिंधी वाचकांच्या मनात प्रश्नांचे गुंतावळे निर्माण करू शकेल.”[१०]

शिवमूर्ती भांडेकर यांचे ‘वळंबा’ हे आत्मकथन वडार समाजाचे प्रतिनिधित्व करणारे असून, वडार समाजाची व्यथा प्रकट

करते. परंपरेने ज्याच्या हातात छन्नी—हातोडा दिला, त्याला बाजूला सारून, हातात लेखणी घेऊन जिद्दीने शिक्षण घेऊन प्राचार्य पदापर्यंत यशस्वी कारकीर्द गाठली. ते महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वत:च्या वडिलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात.

दलित समाजातील यशोधरा गायकवाड यांनी 'माझी मी' हे आत्मकथन लिहिले. त्यांनी स्वत:चे जीवन स्वत: घडवले. शिक्षण घेऊन त्या शिक्षिका झाल्या. त्यांची मुलंही खूप शिकली, मोठी झाली. आपल्या एकटेपणाचे आणि कौटुंबिक, मानसिक संघर्षाचे चित्रण त्यांच्या 'माझी मी' या आत्मकथनात येते.

'झगडा' हे रामचंद्र नलावडे यांचे आत्मकथन. याविषयी लेखक म्हणतात की, दगडफोड्या या माझ्या आत्मकथनात इ. स. १९७४पर्यंतच्या घटना आल्या आहेत. 'झगडा'मध्ये १९७५ ते १९९८ पर्यंतच्या घटना आल्या आहेत. जन्म झाल्यापासून भूक, अज्ञान, अंधश्रद्धा आणि शोषण याविरुद्ध प्राणपणानं झगडावं लागतं. ११ 'झगडा'मध्ये वडार समाज आणि त्यांच्या संघर्षाचे वर्णन आले आहे.

रत्नेश पिंग्या काळे यांच्या 'पारध्याचं जिणं' या आत्मकथनातून फासेपारधी या गुन्हेगार समाजाचे चित्रण येते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही गुन्हेगार म्हणून संबोधल्या गेलेल्या या जमातीला माणूस म्हणून जगण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो, त्यांच्या हालअपेष्टा, अज्ञान, दारिद्र्य आणि अस्थिर जीवनामुळे एकूण समाजाची होत चाललेली अधोगती, सततचा पोलिसांचा ससेमिरा यात अडकलेल्या फासेपारधी समाजाचे चित्रण पहावयास मिळते.

दीपचंद दोंदे यांचे 'प्रवास एक शतकाचा' हे आत्मकथन आदिवासी जीवनावर भाष्य करते. एक कामगार ते कार्यकर्ता असा लेखकाचा संघर्षमय जीपनपट या आत्मकथनातून विचार करायला लावणारा ठरतो.

एका गरीब कुटुंबात जन्म घेऊन उच्चविद्याविभूषित झालेल्या आणि सामाजिक कार्याचे महत्त्व ओळखताच रिझर्व्ह बँकेची नोकरी सोडून प्राध्यापकाची नोकरी करणारे भालचंद्र मुणगेकरांचे 'मी असा घडलो' हे आत्मकथन २००८ साली प्रकाशित झाले. डॉ. मुणगेकरांनी शैक्षणिक क्षेत्रात टप्प्याटप्प्याने प्रगती करून ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले. त्यानंतर त्यांनी देशाच्या सेवेत अनेक महत्त्वाची पदे

भूषविली. जीवनातील पूर्व आठवणींचा लेखाजोखा त्यांनी या आत्मकथनात मांडला आहे.

सामाजिक, राजकीय, आर्थिक, भावनिक, जातीय अशा प्रत्येक अडथळ्यांवर मात करीत स्वत:चे आणि कुटुंबाचे बिऱ्हाड पुढे नेणारी सुनीता अरळीकर यांचे 'बिऱ्हाड' हे आत्मकथन २०१० साली प्रकाशित झाले. या आत्मकथनाचा बराचसा भाग लेखिकेने राजकीय कैदी म्हणून तुरुंगात असताना आपल्याला आलेला एकटेपणा घालवण्यासाठी लिहिलेला आहे. एका स्त्रीचे हे आत्मकथन विविध अडथळ्यांवर मात करून आपले उचित ध्येय गाठण्यासाठी केलेल्या संघर्षाची यशोगाथाच म्हणावी लागेल.

**समारोपः**

इ.स. २००० ते २०१० मधील मराठी दलित आत्मकथनांवर एक दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसून येते की, स्वातंत्र्योत्तर कालखंडात जवळपास ५० वर्षांनंतर दलित समाज काही प्रमाणात का होईना शिकला आहे. आपल्या हक्कासाठी, लढ्यासाठी तो सज्ज झाला आहे. त्यासाठी तो सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक चळवळीत प्रस्थापित चळवळीला सतत हादरा देण्याचे काम करत आहे. दलित समाजाचे सामाजिक जगणे, त्यांचे सामाजिक प्रश्न व त्यांची उत्तरे, तसेच त्यांचे आर्थिक प्रश्न व त्यांची उत्तरे शोधण्याची धडपड या कालखंडातील दलित आत्मकथनकारांच्या लेखनातून दिसून येते.

सामाजिक जीवनाचे भाष्य करणारी मराठी दलित आत्मकथने इ.स. २००० ते २०१० या कालखंडात संख्यात्मक आणि गुणात्मक पातळीवर लिहिली गेली. या आत्मकथनांतून ग्रामीण व शहरी भागातील जीवनवास्तवाचे संमिश्र चित्रण पहावयास मिळते. सामाजिक, राजकीय, आर्थिक अव्हेरलेपणाची जाणीव या कालखंडातील आत्मकथनकाराला आहे, असे दिसून येते.

दलित आत्मकथने ही मराठी साहित्याचे वेगळेपण सिद्ध करणारी आहेत. म्हणून मराठी दलित आत्मकथने ही मराठी साहित्यातील मौलिक वाङ्मय प्रकार म्हणावा लागेल. आत्मकथनकार स्वत:च्या जीवनाचे चित्रण करीत करीत कळत-नकळतपणे स्वत:च्या समाजाचे वास्तव चित्रण करताना दिसतो. हे त्याच्या समाजवास्तवाचे चित्रण वाचकाला अंतर्मुख करायला लावते.

या आत्मकथनांचे आणखी एक वेगळेपण म्हणजे आत्मकथनकार स्वत:चा गौरव करणे हा मुख्य हेतू समोर ठेवून लिहीत नसून, त्याला जीवन जगताना आलेले अनुभव कथन करण्याच्या हेतूने तो लिहीत आहे, असे दिसून येते. म्हणून दलित आत्मकथनकाराच्या वाट्याला आलेले इतरांपेक्षा वेगळे जीवन व या जीवनवास्तवाचे लेखन करीत असतानाचे त्यांच्यापुढे उभे असलेले अनेक प्रश्नांची उकल करण्यासाठी आत्मकथनकार पुन्हा पुन्हा धडपड करताना दिसतो.

## संदर्भ व टिपा:


१) सांगोलेकर अविनाश (२०१०), 'दलित साहित्य — उगम आणि विकास', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. २०.

२) मेश्राम योगेंद्र (१९९८), 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, प्रस्तावना — गंगाधर पानतावणे.

३) मुलाटे वासुदेव (२०१०), 'नवे साहित्य — नवे आकलन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती.

४) कऱ्हाडे सदा (१९९९), 'समाज आणि साहित्य', लोकवाङ्‌मय गृह, मुंबई, द्वितीयावृत्ती.

५) मुलाटे वासुदेव, '१९९० नंतरची दलित आत्मकथने — एक दृष्टिक्षेप' — अप्रकाशित लेख.

६) तत्रैव.

७) तत्रैव.

८) तत्रैव.

९) कांबळे उत्तम, 'आई समजून घेताना', लोकवाङ्‌मय गृह, मुंबई, सोळावी आवृत्ती, भाई वैद्य यांचे मनोगत.

१०) देठे भीमसेन (२००७), 'डबुलं', संस्कृती प्रकाशन, प्रथमावृत्ती, मलपृष्ठ.

११) नलावडे रामचंद्र (२००७), 'झगडा', सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती, मनोगत.

## डॉ. भालचंद्र फडके — व्यक्ति परिचय

**जन्म** : १३ मे १९२५ (धारवाड).

**मृत्यू** : १८ सप्टें. २००४

**शिक्षण** : शालेय शिक्षण विजापूर येथे.

महाविद्यालयीन शिक्षण डी. ए. व्ही. कॉलेज, सोलापूर बी.ए. पर्यत.

नागपूर विद्यापीठातून एम.ए.

पीएच.डी. १९६७.

विषय : मराठी कथेची वाटचाल (१८५० ते १९५०).

**व्यवसाय** : १९५४ पर्यंत सरस्वती मंदिर व हरिभाई देवकरण, सोलापूर येथे F. शिक्षक.

१९५५-६१मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद येथे प्राध्यापक. याच कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात.

१९६१-६२अकोला येथे शेतकी महाविद्यालयात प्राध्यापक.

१९६२-६९अमरावती येथे सरकारी महाविद्यालयात प्राध्यापक.

१९६९-७९पुणे विद्यापीठात अधिव्याख्याता.

१९७९-८५निरंतर शिक्षण, प्रौढ शिक्षण, ज्ञानविस्तार विभाग संचालक.

१९८५ निवृत्त.

१९८७-९२यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ संचालक.

**पुरस्कार** : १) आदर्श शिक्षक म्हणून महाराष्ट्र राज्य पुरस्कार.

२) राज्य शासनाचा साहित्य पुरस्कार.

*स्त्रोत — विचारधन : भालचंद्र फडके, (२०१३)*
*संपादक :डॉ. मंदा खांडगे, प्रकाशक: प्रतिमा प्रकाशन, पुणे.*

## *Dr.Bhalchandra Phadke: Personal Highlights*

**Birth** : 13th May 1925 (Dharwad)

**Death** : 18th September 2004.

**Education** :

1. Primary Education at Vijapur.
2. Collage Education of D.A.V. Collage, Solapur ( upto B.A.)
3. Nagpur University (M.A.)
4. Ph.D. 1967 {Topic : *Marathi Kathechi Vatchal. (* 1850 - 1950*)*} (Journey of Marathi Stories) (1850 - 1950)

**Profession** : Up to 1954 - F. Teacher – Saraswati Mandir & Haribhai Devkaran, Solapur.
1955-61 Collage Teacher at Milind Collage, Aurangabad. (In the period, he was associated with Dr. Babasaheb Ambedkar).
1961-62 Teacher in Agriculture Collage, Akola.
1962-69 Teacher in Government Collage at Amravati.
1969-79 Lecturer in Pune University.
1979-85 Director, Department of Adult, Continuing & Extension, University of Pune.
1985 Retired.
1987-92 Director, Yashwantrao Chavan Open University.

**Awards** 1) Maharashtra State Award as Ideal Teacher.
2) Literature Award (*Sahitya Puraskar*) of State Government.

Translation from **'Vichardhan Bhalchandra Phadke' (2013) Edited by Dr. Manda Khandge, Published by Pratima Prakashan, Pune,**

## STAFF OF THE DEPARTMENT

### Faculty Members



**Dr. Dhananjay Lokhande**
Professor-Director & Head



**Dr. Satish Shirsath**
Professor



**Dr. Bhoumik Deshmukh**
Professor



**Dr. Vilas Adhav**
Professor



**Dr. Navnath Tupe**
Assistant Professor



**Dr. P. Viswanadha Gupta**
Assistant Professor

### Administrative Staff



**Smt. Surekha Bendre**
Senior Stenographer



**Shri. Mangesh Shukre**
Technical Assistant



**Smt. Ulka Pathak**
Assistant Section Officer



**Smt. Neelima Salvi**
Junior Assistant



**Shri. R. D. Shaikh**
Peon

# संपादक परिचय



डॉ. पी. विस्वनाधा गुप्ता यांचा जन्म १९७६ मध्ये, १९९६ मध्ये बी. एसस्सी. आणि २००३ मध्ये एलएल.बी विशाखापटनम, आंध्र प्रदेश येथून पुर्ण केले. २००१ मध्ये श्री वेंकटेश्वरा विद्यापीठ, तिरूपती येथून प्रौढ शिक्षणामध्ये एम.ए. तसेच २००९ मध्ये विशाखापटनम, आंध्र प्रदेश येथून तत्त्वज्ञान विषयामध्ये एम.ए. केले. त्यांनी प्रौढ आणि निरंतर शिक्षणामध्ये आंध्र विद्यापीठातून पीएच.डी. मिळविली. त्यांनी आपले संशोधन "निरंतर शिक्षण कार्यक्रमामध्ये लोकांचा सहभाग" या विषयावर केले. यु.जी.सी. मार्फत घेतली जाणारी 'नेट' परिक्षाही ते उत्तीर्ण आहेत. त्यांनी आतापर्यंत २५ पुस्तके प्रकाशित केली असून त्यांचे ५५ संशोधन प्रबंध नामांकित प्रौढ शिक्षण आणि सामाजिक शास्त्रांच्या नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेले आहेत. तसेच ६५ संशोधन प्रबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सादर केलेले आहेत. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अनुदानित २ संशोधन प्रकल्प पुर्ण केले आहेत. त्यांनी 'आरोग्य शिक्षण' या विषयावर यु.जी.सी.चा महत्त्वाचा संशोधन प्रकल्प हाती घेतलेला आहे. डॉ. गुप्ता हे समाजातील कल्याणापासून वंचित असलेल्या घटकांसाठी काम करणाऱ्या बऱ्याच गैर सरकारी संस्था आणि कृती समिती यांच्याशी संलग्नित आहेत. डॉ. गुप्ता यांनी राष्ट्रीय साक्षरता अभियान, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या "साक्षर भारत कार्यक्रमा"च्या तांत्रिक गटामध्ये सल्लागार (संशोधन व मूल्यमापन) म्हणून काम केलेले आहे. सध्या डॉ. गुप्ता हे 'सहाय्यक प्राध्यापक' म्हणून प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पुर्वीचे पुणे विद्यापीठ) येथे सेवा बजावत आहेत.

# पुस्तक परिचय

'साहित्य' आणि 'समाजशिक्षण' या संकल्पनांचा अभ्यास करताना दोन्ही संकल्पना ह्या एकमेकांशी निगडीत आहेत. साहित्य हे समाजाचे दर्पण असते, तर समाजशिक्षणातून समाजातील अनेक दुर्लक्षित घटक साहित्य स्वरूपातून व्यक्त केले जातात. डॉ. भालचंद्र फडके हे या दोन्ही घटकांचे गाढे अभ्यासक होते. वैचारिक लेखनाबरोबरच कृतीतून समाजशिक्षणासाठी, प्रौढांसाठी अनेक उपक्रम डॉ. फडके यांनी राबविले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रौंढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग आणि मराठी विभाग ह्यांच्या संयुक्त विद्यमाने ''डॉ. भालचंद्र फडके ह्यांचे साहित्यातील आणि समाज शिक्षणातील योगदान'' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजीत करून डॉ. भालचंद्र फडके यांच्या कार्याचा गौरवच करण्यात आला. या चर्चासत्रामधून प्रामुख्याने समाजशिक्षण, साहित्य, सामाजिक न्याय, लोकशाही, आंबेडकरी विचार, समाज परिवर्तन या विषयांवर चर्चा करण्यात आली. सदर पुस्तकात या चर्चासत्राचा अहवाल व कार्यवृत्तांत आणि चर्चासत्रामध्ये सादर केलेले लघु शोधप्रबंध तसेच 'समाजशिक्षण' या विषयासंदर्भात इतर लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे. यातून 'समाजशिक्षण' ही संकल्पना अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केलेला आहे.